रा. भि. जोशी

# घाटशिळेवरी उभी



ग्रं. सं. ठाणे

REFBK-0024439

संदर्भ ग्रं प्रवास
६६१
२४४३९
२०१२५८

# घाटशिळेवरि उभी

• ※ •

# रा० भि० जोशी ह्यांची इतर प्रकाशित पुस्तके

**स्वतंत्र :** कथा — काचेचे कवच, अभिमान • **प्रवास** — वाटचाल, मजल दरमजल उधव • **आत्मचरित्रपर** — साठवणी • **समीक्षा** — साहित्यसंवाद • **व्यक्तिविषयक** — सोन्याचा उंबरठा

**इंग्रजी** : Hari Narayan Apte (Monograph)

**अनुवाद :** उर्दूचे

**वातोहत** (श्री. कृष्णचंद्र ह्यांच्या "शिकस्त" ह्या कादंबरीचे मराठी भाषांतर).
**मीलाद शरीफ,** (कथासंग्रह)
**अनोळखी वाटा** (कथासंग्रह)

**अनुवाद :** इंग्रजीचे

**काव्ये आणि विज्ञाने** (I. A. Richards च्या Poetries and Sciences चे मराठी भाषांतर).
**कला आणि मानव** (बा. सी. मर्ढेकर ह्यांच्या Arts and Man चे मराठी भाषांतर)

**संपादित :** आधुनिक मराठी गद्य.

•※•

# घाटशिळेवरि उभी

रा० भि० जोशी

REFBK-0024439

डोंबिवली

• ※ •

प्रकाशन क्र० १३

© १९८४, सौ० सुधा जोशी • प्रथम आवृत्ती : ४ आक्टोबर, १९८४ • मुखपृष्ठ : सौ० पद्मा सहस्रबुद्धे • मुद्रक : प्र० पु० भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, गिरगाव, मुंबई ४०० ००४ • प्रकाशक : सौ० सुलभा रमेश वाडेकर, अश्वमेध प्रकाशन, कृष्ण निवास, मानपाडा रस्ता, डोंबिवली (पूर्व) ४२१ २०१ • **किंमत पन्नास रुपये**

# प्रस्तावना

ह्या माझ्या प्रवासलेखाचा चवथा संग्रह. ह्यात समाविष्ट झालेल्या वीस लेखांपैकी 'पुढची मजल' हा १९६० साली आणि 'गोवे सदैव सुंदर राहो' हा १९६६ साली प्रसिद्ध झाला. बाकीचे अटरा १९७८ ते १९८४ ह्या अवधीत प्रसिद्ध झाले. त्या त्या वेळी ज्या संपादकानी आपल्या नियतकालिकात ते प्रसिद्ध केले त्या सर्वांचा मी आभारी आहे.

ह्या संग्रहातले लेख उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, ओरिसा, कर्नाटक, महाराष्ट्र आणि गोवे ह्या भागातल्या काही स्थलसंबंधी आहेत.

'सोन्याचा उंबरठा' हा माझ्या व्यक्तिविषयक लेखाचा संग्रह प्रकाशित केल्यानंतर मागोमाग माझ्या ह्या प्रवासलेखाचा संग्रह प्रकाशित करण्याचे काम 'अश्वमेध' प्रकाशनच्या सौ० सुलभा बाडेकर ह्यानी हाती घेतले ह्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

ह्या संग्रहाचे मुद्रण मौज प्रिंटिंग ब्यूरोत झाले आहे. मौज प्रिंटिंग ब्यूरोचे श्री० प्रभाकर आणि श्री० माधव भागवत, तसेच मुद्रणालयातले त्यांचे सहकारी आणि कामगार बंधू, ह्यानी अत्यंत तत्परतेने आणि नेहमीच्याच आपुलकीने हे काम केले ह्याबद्दल त्यांचा आणि 'मौज' कार्यालयातील श्री० गुरुनाथ सामंत ह्यानी मुद्रणप्रत काळजीपूर्वक वाचून तिच्यावर आवश्यक ते संस्कार केले ह्याबद्दल त्यांचाही मी आभारी आहे.

मुखपृष्ठावरचे चित्र सौ. पद्मा सहस्रबुद्धे ह्यांचे आहे एवढे सांगितले म्हणजे पुरे. इतर अनेक कामे असतानाही त्यांनी वेळ काढून हे काम केले ह्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

साहित्य सहवास
मुंबई ४०० ०५१
२५-९-८४

रा० भि० जोशी

# अश्वमेध प्रकाशनाची इतर ललित प्रकाशने

• शल्य-कौशल्य (आत्मकथा) डॉ० बी० एन० पुरंदरे • रमाई (कथासंग्रह) वसंत कानेटकर • हे हृदय कसे आईचे (कथासंग्रह) वसंत कानेटकर • सोन्याचा उंबरठा (व्यक्तिचित्रे) रा० भि० जोशी

# अनुक्रम


१ आहे कुठे 'स्वर्गाश्रम' ? (दीपावली, दिवाळी, १९७८) १

२. बुंदेलखंडी बायका (केसरी, दिवाळी, १९८२) ८

३. रोजनिशी भुवनेश्वरची (मौज, दिवाळी, १९८१) १६

४. दारुब्रह्म जगन्नाथ (पुढारी, ८ नोव्हेंबर, १९८१) २४

५. तळघरातल्या सुंदरी (मौज, दिवाळी, १९७९) ३२

६. दूरदेशचे पाहुणे (महाराष्ट्र टाइम्स, १९ डिसेंबर, १९७९) ४०

७. परतीचा प्रवास (नागपूर पत्रिका, दिवाळी, १९८१) ४७

८. रोजनिशी औरंगाबादची (मौज, दिवाळी, १९७८) ५३

९. वेरूळच्या वाटेने (मौज, दिवाळी, १९८२) ६५

१०. रोजनिशी अहमदनगरची (कवडसे, दिवाळी, १९८१) ७४

११. ओम् नमोजी आद्या (केसरी, २८ ऑक्टोबर, १९८१) ८६

१२. घाटशिळेवरि उर्मी (केसरी, ४ मार्च, १९८४) ९२

१३. पुढची मजल (धनुर्धारी, दिवाळी, १९६०) ९९

१४. एक सकाळ : भगवी आणि गार (तन्मय, दिवाळी, १९७९) १०८

१५. 'थोड मायेच' (कवडसे, दिवाळी, १९८०) ११७

१६. सोपारान्तं महीतलम् (केसरी, ९ नोव्हेंबर, १९८०) १२९

१७. एक दिवस ' एक आश्रम (मौज, दिवाळी, १९८०) १३५

१८. रोजनिशी रत्नागिरीची (मौज, दिवाळी, १९८३) १४२

१९. काळे शिलारत्न (गोमंतक, दिवाळी, १९८०) १५१

२०. गोवे सदैव सुंदर राहो. (मांडवी, जून, १९६६) १५७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६९
दा. क्र. २७७३९
१५-१०-१९७२
संद. शाखा (स्थल प्रत)



# आहे कुठे 'स्वर्गाश्रम'?

भगीरथाने महत्प्रयासाने स्वर्गातून पृथ्वीवर आणलेली गंगा हिमालयाचा परिसर सोडून जिथे पहिल्यादा सपाटीवर आली ते हरिद्वार. त्यालाच कोणी हरद्वार देखील म्हणतात. आणि ते साहजिक आहे. कारण गंगेचा हरि आणि हर ह्या दोघांशीही संबंध आहे. विष्णूच्या ती पायातून बाहेर आली आणि शंकराच्या जटेतून. जेव्हा गंगा हरिद्वारापाशी आली तेव्हा तो सोहळा पाहण्यासाठी आणि तिचे स्वागत करण्यासाठी ब्रह्मादिक सगळे देव तिथे आलेले होते. ते जिथे जमले होते ती 'हरिकी पैडी.' पहिल्यादा गंगा इथे आली तेव्हा गंगा आणि हे सगळे देव ह्याखेरीज तिथे कोणी दुसरे नसेल.

पण हळू हळू हरिद्वाराची कीर्ती पसरू लागली. ते स्थान पवित्र आहे, तिथे गंगेत स्नान आणि कुशावर्तात पिंडदान केल्याने पुण्य प्राप्त होते हे कळल्यानंतर यात्रेकरू येऊ लागले. यात्रेकरू येऊ लागले म्हणून क्षेत्रोपाध्ये आले. वाणी-व्यापारी आले. घरे झाली. बाजारपेठ वसली आणि हरिद्वार हे एक गाव झाले. इथे यात्रेकरूंची गर्दी नाही असा एक दिवसही जात नाही. कारण देशभरचे यात्रेकरू दररोज येतच असतात. पर्वकाळी विशेष.

हरिकी पैडीपाशी माणसाची कितीही गर्दी असली तरी ती विविधरंगी, प्रफुल्ल आणि प्रसन्न असते. देशभरच्या विविध रंगारूपाच्या, विविध वेषातल्या स्त्री-पुरुषांची ती गर्दी असते. गंगेच्या उजव्या तीरावर असे घाट, गर्दी, वस्ती आणि बाजारपेठ आहे, तर डावे तीर अगदी मोकळे आहे. घाटाला लागून गंगेचा प्रवाह आहे आणि त्याच्या पलीकडे नुसत्या दगडगोट्यांनी भरलेले विस्तीर्ण पात्र आहे. त्याच्या पलीकडे झाडींने झाकलेले हिमालयाच्या विस्तारातले लहानमोठे डोंगर. गंगेला जेव्हा पूर येत असेल तेव्हा प्रवाहाचा विस्तार खूप मोठा असेल. पण एरव्ही दगडांचाच विस्तार. तरी पण घाटावरल्या गर्दीकडे आणि तिच्या मागल्या वस्तीकडे पाठ फिरवून गंगेच्या प्रवाहाकडे आणि पलीकडल्या काठाकडे आणि डोंगराकडे पाहत राहावेसे वाटते.

त्यामुळेच पुन्हा जेव्हा हरिद्वारला जायची संधी मिळाली तेव्हा मला आनंद वाटला. त्याच्या आधी गेलो त्याला पुष्कळ वर्षे होऊन गेली होती. जवळजवळ

पंचवीस. ह्या अवधीत दुसरे महायुद्ध होऊन गेले होते. देश स्वतंत्र झाला होता. चीन-पाकीस्तानशी झटापटी झाल्या होत्या. वाटले, पाहू तर खरे हरिद्वार-हृषी-केशमध्ये काही फरक पडला आहे का?

हरिद्वार स्टेशनावर उतरल्याबरोबरच फरक पडलेला जाणवायला सुरुवात झाली. स्टेशनासमोर मोकळ्या जागा होत्या. त्यांत कृष्णाजिने, अस्वलांची कातडी, कमंडलू, रुद्राक्षाच्या-स्फटिकाच्या माळा, सापासारख्या वळणदार काठ्या, गुरुकुल कांगडीची औषधे वगैरे मांडून ठेवलेली छोटी-छोटी दुकाने मागल्या वेळी पाहिली होती ती कुठे दिसेनात त्याच्या जागी मोठमोठ्या इमारती झाल्या होत्या. आणि त्या इमारतींत मोठी दुकाने होती.

गावातून हरिकी पैडीकडे चाललो तर तिथेही वाटेने बैठी घरे, दुकाने, ढाबे होते त्याच्या जागी सिमेंटच्या इमारती उभ्या राहिल्या होत्या. दुकानांची गर्दी झाली होती आणि दुकानांतली गर्दीही वाढली होती.

हरिकी पैडीपाशी गेलो. घाटवीट होते तसेच होते. पाण्यात मासेही होते. गर्दीही होती. पण वरीच वाढलेली. घाटावर आणखी बांधकामे झाली होती. आणि मुख्य म्हणजे पैडीच्या मागच्या बाजूचा रस्ता खूप रुंद झाला होता. रस्ते रुंद झाले म्हणजे आपल्याला बरे वाटते. पण नेहमीच नाही. तसेच मला वाटले. रस्ता रुंद झाला होता तो यात्रेकरूंच्या सोयीसाठी नाही, तर तिथून हृषीकेशच्या वाटेने चिनी सरहद्दीपर्यंत सैन्ये, लष्करी वाहने, रणगाडे, ट्रक्स्, जीप्स, वगैरे अवजड वाहने जातात त्याच्यासाठी. ह्या अवजड वाहनांची ह्या रस्त्याने सारखी ये-जा चाललेली असते, त्यामुळे रस्ता दोन्ही बाजूंनी भेगाळला आहे. आणि हे सगळे हरिकी पैडीपासून अतीच जवळ आहे. गावाला जो एक पूर्वी नसलेला धूळभरलेपणा आलेला दिसला तो ह्या लष्करी वर्दळीमुळेच असेल.

आपण पहिल्यांदा जिथे उभे राहून गंगेचे स्वागत केले ते स्थान पाहायला ब्रह्मादिक सकल देव जर मधून मधून इथे येत असतील तर ही वर्दळ, ही गर्दी, आणि वाढत चाललेली बांधकामे पाहून त्यांना काय वाटत असेल? गंगेच्या डाव्या तीरावर अजून माणसाने आक्रमण केले नाही एवढेच त्यातल्या त्यात समाधान!

हरिद्वारचे अरुंद रस्ते, बोळ सगळे कॉंक्रीटचे आहेत आणि ते दिवसभर

मथून मथून धुतले जात असतात. त्यामुळे स्वच्छ असतात. ह्या वेळीही होते. चरकावर घासून आकार दिलेले दगडी वाडगे, गड्डू, करंडे, रुद्राक्षाच्या-स्फटिकाच्या माळा वगैरे सगळे पूर्वीसारखेच दिसत होते. पण गर्दीत एक नवीन गोष्ट दिसली. ती म्हणजे अनेक गोरे स्त्री-पुरुष. आणि त्यापैकी कोणाचाही पोषाख 'साहेबी' नव्हता. पुरुषाचा पोषाख सैल पायजमा, लांब नेहरूसदरा, दाढी-मिश्या आणि मानेपर्यंत वाढलेले केस. किंवा भगवी छाटी आणि भगवा सदरा. डोके मुंडन केलेले. आणि मागे शेंडी. गाठ मारलेली. कपाळावर उभे केशरी गंध. बायकांचा पोषाख बहुतेक मळखाऊ रंगाचा. नुसता पायघोळ परकर आणि चोळी, एवढाच होता. केसाचा सैल अंबाडा. कोणीही ओठ-गाल रंगवलेले नव्हते. किंवा दुसरे कोणतेही प्रसाधन केलेले नव्हते. आपल्या बायकांच्या कडेवर मुले असतात तशी काही बायकांच्या कडेवर होती आणि हे सगळे स्त्री-पुरुष गर्दीत वाट काढीत आपल्यासारखेच सहजपणे जात-येत होते. आणि असे चारदोन नाही तर बरेच लोक दिसले.

हे दृश्य मला अनपेक्षित—जवळजवळ धक्का देणारे—होते. आणि आनंद देणारेही होते हे स्वातंत्र्याचे एक फळ होते. स्वातंत्र्यामुळे साहेबाचा 'साहेब'-पणा गेला होता. ते साध्या माणसासारखे वागत-वावरत होते.

हरिद्वारपासून कनखल जवळच आहे, आणि हरिद्वारला गेल्यावर कनखलला जाणार नाही हे शक्यच नव्हते. शिवाय कनखलचे मला अधिक महत्त्व वाटते. दक्ष प्रजापतीने आरंभलेल्या यज्ञाला आमंत्रण नसताना सती आली. तिथे बहिणींनी आणि बापाने तिचा अपमान केला. शंकरासाठी हविर्भाग न ठेवून त्याचा अपमान केला. हे दोन्ही अपमान सहन न होऊन तिने योगाग्नीने आपला देह नष्ट केला. ते महास्थान कनखलला आहे. तिथेच पुढे दक्षाचा शिरच्छेद झाला. त्या यज्ञाचा विध्वंस झाला नंतर त्याला बोकडाचे शिर मिळाले. आणि त्यानेच नंतर शंकराला यज्ञात मानाचे स्थान दिले. आर्य आणि अनार्य ह्यांच्यामधल्या घोर संघर्षाचे आणि समन्वयाचे साक्षी असे ते स्थान आहे. आपल्या पुराणात ज्या अनेक स्त्रिया आहेत त्यात सतीचा तेजस्वीपणा आणि स्वाभिमान काही वेगळाच आहे. तिच्याही स्वाभिमानाचे ते साक्षी आहे.

साहजिकच पुन्हा कनखलला जायची मला इच्छा होती. आणि मी गेलोही. पण जो प्रकार हरिद्वारला तोच कनखलला. पूर्वी आलो तेव्हा हरिद्वारपासून

कनखलपर्यंत वस्ती अगदी तुरळक होती. वाटेने मोठमोठ्या बागा, वाड्या आणि मंदिरे होती. दसनामी, सत्‌नामी, निरंजनी, निर्वाणी, उदासी अशा वेगवेगळ्या पंथाच्या गोसाव्यांचे, रस्त्यापासून आत आखाडे होते. आणि झाडांखाली, धुनीशेजारी, अंगाला राख फासलेले, फक्त लंगोटी लावलेले, तांबारलेल्या डोळ्यांचे आणि उग्र मुद्रेचे गोसावी बसलेले दिसले होते.

ह्या वेळी पाहतो तो हरिद्वारपासून कनखलपर्यंत रस्त्याच्या दोहो बाजूंना एकसारख्या इमारती उभ्या झाल्या होत्या. झाडे, मैदाने नाहीशी झाली होती. आखाडेही अदृश्य झाले होते आणि त्याबरोबरच गोसावी देखील. हरिद्वार-कनखल जोडले गेले होते आणि दोन्ही मिळून एक शहर झाल्यासारखे दिसत होते. त्या वेळी ज्या 'आश्रमभूमयः' होत्या त्या 'नगरभूमयः' झाल्या होत्या.

दक्षाच्या यज्ञभूमीकडे म्हणून जेव्हा आम्हाला टांगेवाल्याने नेले तेव्हा तर मी थक्कच झालो. यज्ञभूमी होतीच कुठे? तिथे एक भव्य दक्षेश्वर मंदिर बांधले गेले आहे आणि मंदिराच्या सभामंडपात एक संगमरवरी दगडांनी बांधून काढलेले कुंड आहे. पूर्वी आलो होतो तेव्हाही तिथे एक दक्षमंदिर होते, पण छोटेसे. भोवतालची जागा मोकळी होती. पण आता यज्ञाची भूमी फरसबंद आणि सगळी जागा नवीन बांधकामाने बंदिस्त करून टाकली आहे. आता जे कोणी ते मंदिर आणि ते कुंड पाहतात ते कौतुकाने म्हणतात, 'देखो, कैसा अच्छा मंदिर बना है.' पण मला ते बघवले नाही. आता ते त्या यज्ञाचे आणि सतीच्या आत्मदहनाचे स्मारक राहिले नाही. ज्याने ते मंदिर बांधले त्याचे स्मारक झाले आहे. त्याचे नाव आणि सर्व तपशील शिलालेखावर कोरूनच ठेवला आहे तिथे.

हरिद्वार आणि कनखल ह्या ठिकाणी जी 'सुधारणा' पाहिली तशीच सुधारणा हृषीकेशलाही पाहायला मिळेल का? अशी शंका मनात आली आणि तिथे गेल्यावर तसा प्रत्यय आलाच. मुनिकी रेतीपर्यंत जातानाच, तिथे पूर्वी नसलेल्या, वेगवेगळ्या प्रांतातल्या लोकांच्या धर्मशाळा आणि आश्रम दिसले. म्हणजे इथेही मोकळ्या जागा भरून गेल्या होत्या. मुनिकी रेतीपासून थेट लछमन झूल्या-पर्यंत गेलो, तरी एकाही माकडाने आमच्या टांग्यावर झेप घेतली नाही, की हातातले सामान हिसकण्याचा प्रयत्न केला नाही. कारण तसे करायला माकडे मुळी आता नव्हतीच तिथे. माकडांचा त्रास नाही असे पूर्वी कधीही

होत नव्हते. टांगेवाल्याला विचारले तेव्हा तो म्हणाला, 'चिनी सरहद्दीकडे लष्कराच्या गाड्या जाऊ लागल्यापासून माकडं नाहींशीच झाली आहेत. ती येतच नाहीत इकडे.'

माकडे होती तेव्हा त्याचा उपद्रव वाटत होता. पण ती नसल्यामुळे काहीतरी चुकल्यासारखे वाटू लागले घरात मुलाचा आरडाओरडा, दंगा नकोसा वाटावा, पण मुले नसली म्हणजे उदास-ओके वाटावे, तसे वाटले.

लछमन झूल्यावरून गंगा ओलांडून आपण पलीकडच्या तीरावर जातो. तिथून आपल्या उजव्या हाताकडल्या सगळ्या तीर-भागाला 'स्वर्गाश्रम" म्हणतात. ह्या तीरावर आल्यावरोबर पूर्वी समोर बदरी विशालजीचे छोटेसे मंदिर दिसत असे. ते आता दिसत नव्हते. पूर्वी आजुबाजूला काही नव्हते. तिथे आता रस्त्याच्या दोन्ही बाजूना दोन-दोन, तीन-तीन मजली इमारती उभ्या होत्या. आणि त्याच्या भिंतीवर 'डाबर आमला हेअर ऑइल', 'बैद्यनाथ प्राणदा', 'हवावाण हरडे' ह्याच्या ज्याप्रमाणे हात दोन हात उंच अक्षराच्या जाहिराती इतर शहरात रंगवलेल्या असतात तसे गीतेतले श्लोक आणि इतर धार्मिक वचने रंगविलेली होती. ह्या इमारतींपैकी काही मंदिरे होती आणि काही धर्मशाळा होत्या. जणू काय खुद्द हृषीकेशमध्ये पुरेशी मंदिरे आणि धर्मशाळा नव्हत्या!

ह्या तीरावर आपण आलो म्हणजे आपल्या डावीकडला रस्ता हिमालयाच्या यात्रेचा आहे. उजवीकडला रस्ता आपण परत जिथे नावेत बसून गंगा ओलांडतो तिकडे जातो. पूर्वी आलो होतो तेव्हा ह्या सगळ्या मैल-दीड मैल रस्त्यावर दोन्ही बाजूना दाट झाडी होती. त्यातच मधून मधून साधकांसाठी बांधलेल्या झोपड्या होत्या. काही झोपड्यांभोवती जंगल बाजूला सारून छोटीशी फुलबाग केलेली होती, तर काही जंगलाने वेढलेल्या होत्या. काही ठिकाणी साधक बसलेले दिसत होते. मधून-मधून जंगली गुलाबाची झाडे होती. सगळी वाट शीतल, प्रसन्न आणि सुखकर होती. एक फलाहारी बाबाचे मंदिर आणि दुसरा आत्मप्रकाशजींचा आश्रम, ह्याखेरीज वाटेत तिसरी इमारत नव्हती.

आत्ताही वाटेत इमारती नव्हत्या. पण जंगल खूपच पातळ झाले होते. 'साधकां'च्या झोपड्या, त्याच्या समोरच्या फुलबागा काहीच राहिले नव्हते. साधकही नव्हते. मात्र रस्त्याच्या बाजूला सुमारे शभर-शभर पावलावर सहा-सात माणसे सहज बसू शकतील अशी सिमेंट-कॉंक्रीटची ऐसपैस बाके कॉंक्रीटच्या

बैठकीत बसवण्याचे काम चालले होते. प्रत्येक बाकावर ते देणाऱ्या शेठजींचे नाव-गाव कोरलेले होते बहुतेक शेठ मुंबईचेच दिसले. काही थोडे कलकत्त्याचे होते म्हणजे ह्या सगळ्या भागाचे आश्रमाचे स्वरूप नाहीसे होऊन त्याला एखाद्या शहरातल्या पार्कचे स्वरूप आले होते.

विश्रांतीसाठी बसवलेल्या ह्या बाकाप्रमाणेच आणखी एका गोष्टीने लक्ष वेधले. वाटेवर ठिकठिकाणी 'चोटीवाला की चाय पियो' असे सांगणाऱ्या पाट्या झाडांवर खिळ्यांनी ठोकलेल्या दिसल्या. मला वाटले, 'लिप्टन की चाय पियो', 'आहुजा की चाय पियो' अशासारखी एखाद्या कंपनीची जाहिरात असावी. तरी पण चहाची जाहिरात कशाला, असा प्रश्न पडलाच. त्याचे उत्तर लवकरच मिळाले. परत येताना नावेत बसण्यासाठी जिथे जावे लागते त्या घाटाकडे जाणाऱ्या उताराला लागल्याबरोबर पुन्हा दोन्हीकडे इमारती दिसू लागल्या डावीकडे गोरखपूरच्या 'गीता प्रेस'ची प्रशस्त इमारत आहे. तिने गंगेच्या तटाची नैसर्गिक शोभा गिळून टाकली आहे. उजवीकडे रांगेने तीनचार हॉटेले आहेत.

तिथेच एका हॉटेलासमोर एका उंच आसनावर धोब्याच्या मळकट कपड्याच्या मोटेसारखा अवाढव्य आणि थलथलीत देहाचा पधरा-सोळाचा एक मुलगा मांडी घालून बसलेला होता. तोंडासकट सगळ्या अंगाला भस्मासारखा राखट रंग फासलेला, ओठ रंगवलेले, डोळ्यात काजळ घातलेले, आणि डोक्यावर वीतभर लांब शेंडी, नारदाच्या शेंडीसारखी उभी! अत्यंत बीभत्स दृश्य होते. पण त्या मुलाला स्वतःच्या त्या सोंगाचे फार कौतुक वाटत होते आणि तो येणाऱ्या-जाणाऱ्याकडे पाहून तोंड पसरून दात दाखवीत वीतभर हसत होता. हा तो 'चोटीवाला'. हे त्या झाडावरच्या जाहिरातीचे गावढळ आणि हिडीस मूळ. आणि हे ध्यान स्वर्गाश्रमात, गिऱ्हाइके ओढण्यासाठी! सगळ्या हॉटेलांचा मिळून गर्दीचा गजबजाट, बोलण्याचा कलकलाट आणि कपबश्यांचा खडखडाट इतका चालला होता की, कान किटत होते आणि अंगावर शहारे येत होते.

हॉटेले आहेत, परोठे आहेत, 'आलू की टिकिया' आहेत, आलूछोले आहेत, चहा तर आहेच. सगळ्या 'मॉडर्न' सोयी आहेत. पण स्वर्गाश्रम कुठे आहे? पन्नास-साठ वर्षांपूर्वी काका कालेलकर इथे स्वर्गाश्रमात साधना करण्यासाठी राहिले होते. त्या वेळी त्यांना अन्नछत्रात फुकट मिळालेल्या चपात्यांचा व्यापार करणारे साधक आढळले होते. आता तर चपात्यांचा व्यापार करण्यासाठी प्रत्यक्ष व्यापारीच इथे येऊन स्थायिक झाले आहेत. आणखी काही वर्षांनी

बदरी विशालजीपासून इथपर्यंतच्या रस्त्याची नरसोबाची वाडी होऊन जाईल. आणि मग स्वर्गाश्रम कुठे आहे हे कोणी विचारणार नाही. विचारण्याची कोणाला गरजही वाटणार नाही. कारण इथे कधी 'स्वर्गाश्रम' होता हे कदाचित कोणाला माहीतही नसेल. गंगा मात्र भगीरथाने आणली तेव्हापासून जशी वाहते आहे, तशी वाहत राहील. तिचा तो हिरवा-दुधाळ प्रवाह खळाळत-फेसाळत राहील. निदान तशी आशा बाळगू या.

# बुंदेलखंडी बायका

कुटुंबावरच्या कर्जाचा भार शक्य तर हलका करावा ह्या उद्देशाने वरसईकर विष्णुभट गोडसे जेव्हा हिंदुस्थानात, म्हणजे उत्तर हिंदुस्थानात, ग्वाल्हेर-झाशीकडे जायला निघाले, तेव्हा त्याना परावृत्त करण्याकरता 'हिंदुस्थान फार दूर आहे. तिकडे आपले लोक थोडे आहेत. जाण्याचे रस्ते फार अवघड आणि दग्या-धोप्याचे आहेत. तिकडे आपले लोक भांग पितात.' वगैरे अनेक कारणे त्याच्या घरच्या माणसानी सागितली. त्यातच तिकडल्या 'स्त्रिया नादास लावणाऱ्या असतात.' असेही एक कारण सागितले. तेव्हा 'आपण सर्व बाबतीत नीट काळजीपूर्वक वागू, शिवाय वडील काकाही बरोबर आहेत.' असे आश्वासन देऊन ते हिंदुस्थानात गेले. पुढे झाशीला गेल्यावर त्या शहरासंबधी लिहिताना ते म्हणतात, 'झाशी बुदेलखडातला भाग असल्यामुळे तेथील स्त्रिया सुरेख व विशेषेकरून विशाल व काळ्याभोर डोळ्याच्या असतात. पुरुषांत षढत्व बरेच आढळते. यामुळेच स्त्रियास मोकळीक फार असते. सध्याकाळी हातात रुप्याचा पेला घेऊन देवदर्शनाच्या निमित्ताने बाहेर पडावे व कोणा सोद्याकडे जाऊन यावे अशा चालीचा डका शहरात पुष्कळ होता.'

मी झाशीचा किल्ला पाहून शहरातही थोडासा हिंडलो. पण विष्णुभटजींनी केलेल्या वर्णनाशी जुळेल असे काही मला कुठेच दिसले नाही. पण मी ते फारसे मनावर घेतले नाही. कारण झाशीहून पुढे मी बुदेलखडाच्या अगदी गाभ्यात, म्हणजे खजुराहोला, चाललो होतो. दहाव्या-अकराव्या शतकामधल्या शभर-दीडशे वर्षांच्या अवधीत चंदेले राजपूत राजानी आपल्या त्या राजधानीच्या शहरात जी मदिरे बांधली आणि ज्याच्यावर दाखवू नये ते दाखवले आहे असे म्हणतात ती मदिरे पाहण्यासाठी.

संध्याकाळच्या गाडीने झाशीहून निघालो. रात्री नऊ-साडेनऊच्या सुमाराला हरपालपूर स्टेशनावर उतरलो. रात्र स्टेशनातच काढली. सकाळी सहाच्या सुमाराला बसने खजुराहोला जायला निघालो. मे महिन्याचे उन्हाळ्याचे दिवस, उत्तर हिंदुस्थानचा मुलख, त्यामुळे खूप रखरख जाणवणार ह्याची कल्पना होती. पण वेळ सकाळची होती. सुदैवाने रस्ता चागला होता. डोंगराजगलांतून जात

होता आणि रस्त्याच्या दुतर्फा आणि आसपास सगळीकडे झाडे होती. बहुतेक मोहाची आणि पळसाची. खजुराचे एकही नव्हते. त्यामुळे उन्हाचा त्रास विशेष जाणवला नाही. पण उतारूंच्या बोलण्याचा कलकलाट होताच. बसमध्ये काही स्त्रियाही होत्या. पोषाख वगैरेवरून त्या बुंदेलखंडीच दिसत होत्या. पण त्यातल्या कोणीही गोडसे भटजींना झाशीत दिसल्या तशा नव्हत्या.

चार-साडेचार तासानी खजुराहोला पोहोचलो. बसमधून उतरून पाहतो तो, ज्याच्यासाठी आलो होतो ती मंदिरे समोरच उभी होती. राखट-निळ्या आकाशाच्या पार्श्वभूमीवर. शांत, निवांत, निःशब्द. ताबूस-पिंगट रंगाची. काही ठिकाणी थोडीशी काळवंडलेली. खजुराहो हे नाव "खर्जुरपूर" वरून आले आहे असे म्हणतात. पण खर्जुरपूर तरी का हे मात्र मला कळेना. कारण खजुराची सोडा, पण शिंदीची झाडेसुद्धा तिथे नव्हती आणि हजार वर्षांपूर्वीही असतीलसे वाटत नाही. कारण खजुराच्या झाडाना अनुकूल जमीन, हवामान इथे नाही. एके काळी आटपाट आठ चौरस मैलांचा विस्तार असलेल्या खजुराहो या राजधानीची आजची वस्ती म्हणजे एका तळ्याच्या एका कोपऱ्यावरचे लहानसे खेडे. बाकीच्या विस्तारात जुन्या वास्तूंचे ढासळून पडलेले ढिगारे आणि उभी आहेत ती मंदिरे. जेमतेम वीस-बावीस. त्यातलीदेखील पाच सात पाहिली म्हणजे सगळी पाहिल्यासारखे होते. कारण कमी–अधिक मानाने सगळी सारखीच, एकाच शैलीची आहेत.

मंदिराना जवळजवळ पुरुषभर उंचीचे प्रशस्त ओट्यासारखे जोते आहे. त्यावर मंदिर आहे. त्याचा खालचा भागदेखील बराच उंच आहे आणि त्यात जाण्यासाठी दहा-बारा पायऱ्या चढाव्या लागतात. स्वतःच्याच लहान-लहान प्रतिकृतींनी चारी बाजूनी वेढलेले मुख्य शिखर त्याच्यामधून वर आल्यासारखे दिसते. त्याच्यावर कळस. एखाद्या मोठ्या कमळाच्या कळीच्या वरवर निमुळत्या होत जाणाऱ्या पाकळ्यांच्या मधून सर्वांच्या आतल्या पाकळ्याचे टोक वर आलेले दिसावे तसे. म्हणून मुख्य शिखराला दिलेले 'मूलमंजिरी' हे नाव सार्थ वाटते. पुढल्या मंडपाची रचनाही जवळजवळ तशीच असते, पण ती शिखरांइतकी उभट, निमुळती नसतात. सबंध मंदिराकडे पाहिले म्हणजे त्याचे सौंदर्य नाजूक, जनानी, ललित वाटते.

मंदिरांचे अर्धमंडप, मंडप, महामंडप चहूबाजूंनी उघडे आहेत. क्वचित कांही ठिकाणी दोन खांबांमध्ये जाळीदार दगडी पडदा आहे. ज्या गाभाऱ्यांच्या

भोवती प्रदक्षिणा मार्ग आहे, त्याच्या बाहेरच्या भिंतींना डाव्या उजव्या आणि मागच्या बाजूला मवोमव पुढे गेलेले चौकोनी सज्जे आहेत. त्यामुळे मदिरांत मद प्रकाश असतो आणि सगळीकडल्या लहान-मोठ्या मूर्ती, कोरीव कामे, वगैरे पाहता येतात.

प्रत्येक मदिरात आत बाहेर शेकडो मूर्ती आहेत. जी दाखवू नयेत आणि पाहू नयेत म्हणतात ती संभोग-शिल्पे अर्थात आहेतच. तशीच प्रणयी जोडप्याच्या चुवनालिंगनाचीही आहेत. पण सर्व मूर्तिशिल्पे लक्षात घेतली तर अशाची सख्या फार थोडी आहे. मदिर हे सृष्टीचे किंवा मानवी संसाराचे प्रतीक मानले गेले आहे. ससारात मनुष्य जी जी कामे करतो, जे जे व्यवसाय करतो, ते बहुतेक सर्व या मदिरात मूर्तिरूपाने शिल्पित झाले आहेत. एका ठिकाणी शिल्पी किंवा विश्वकर्मा आपले संकल्पनाचित्र एका फळ्यावर रेखाटतो आहे, असे दाखविले आहे. त्याच्या एका शिष्याने त्याचा फळा योग्य तो कोन करून वरून ठेवला आहे. त्याचे इतर शिष्य आणि दुसरे लोक हे त्याचे काम पाहताहेत. दुसऱ्या एका शिल्पात एक पाथरवट छिन्नी-हातोड्याने एका दगडाच्या ठोकळ्याला आकार देताना दाखवला आहे. कदाचित मूर्ती घडवीत असेल. त्याच्याच शेजारी एक मोठा दगड दोरखडाने एका दाडीला बाधून, ती दाडी खाद्यावर घेऊन, सात आठ गडी तो त्याच्याकडे आणताहेत असे शिल्प आहे. तो दगड किती जड आहे ते त्या गड्याच्या कवरा किती वाकल्या आहेत त्यावरून दिसून येते. आणखी एका शिल्पात वरेचसे लोक ढाली, तरवारी, धनुष्य, वाण, भाले, आणि वरोवर कुत्री वगैरे घेऊन शिकारीला चाललेले दाखवले आहेत, आणि दुसऱ्या शिल्पात कदाचित त्यानीच मारलेली शिकार, एक भला मोठा रानडुक्कर, मागले पाय एकत्र बांधून, पायाच्या मधून दाडी घालून, काही माणसे तो वाहून आणताहेत असे दृश्य आहे. काही ठिकाणी लोक मिरवणुकीने जाताना दिसताहेत. हत्ती-घोड्यावर स्वार होऊन शस्त्रसज्ज होऊन काही सैनिक युद्धाला निघाले आहेत. युद्ध जुपले आहे. घाव बसल्यामुळे काही योद्धे जमिनीवर, तर काही हत्ती-घोड्यांवर वसल्या जागीच उताणे पडले आहेत, असे दाखवले आहे. हत्ती-हत्तींची, हत्ती-वाघाची झुंजही काही ठिकाणी दाखवली आहे. तपस्वी तप करतो आहे. शिक्षक वर्ग भरवून शिष्याना पाठ देतो आहे. काही ठिकाणी नर्तकांचा आणि वादकाचा ताफाच आहे. कोणी नाचताहेत, कोणी मृदग वाजवताहेत, कोणी टाळ, कोणी मुरली. कुठे एखादी नर्तकी नृत्याला तयार

होण्यासाठी एक पाय उचलून चाळ बांधते आहे. ते करताना तिकडेच लक्ष द्यावे लागल्यामुळे तिचे तोंड थोडे चंबूसारखे झाले आहे. एक स्त्री नुकतीच झोपेतून उठल्याप्रमाणे आळस देत आहे. कदाचित ती मदालसा असेल. एक स्त्री न्हाल्यानंतर केस कोरडे करते आहे. एकीने खेळण्यासाठी चेंडू हातात घेतला आहे. एक आरशात पाहून कुंकू लावते आहे. एक डोळ्यात सुरमा घालते आहे. एकीच्या पायात काटा मोडला आहे, तो ती पाय दुमडून वर उंचलून हलक्या हाताने काढते आहे. तिच्या बोटांची वळणे चेहऱ्यावरचा भाव पाहण्यासारखा आणि जिवंत आहे. एकीच्या पायावर विंचू चढला आहे. भारतीय मंदिरात सहसा न दिसणारी आई आणि मूल ह्यांचीही शिल्पे इथे आहेत. एका शिल्पात एक मूल आईने मांडीवर घेतले आणि दुसरे तिच्या समोरच रांगते आहे. एका शिल्पात आईने मुलाला हातावर घेतले आहे, तर आणखी एका शिल्पात आई मुलाला पाजीत आहे. एका स्त्रीच्या उजव्या हातात उंच धरलेल्या फळांचा घोस आहे. आणि तिच्या डाव्या हाताच्या मनगटावर पोपट आहे. त्याला ती तो दाखवते आहे. एका शिल्पात अंगावर येणाऱ्या माकडाला भिऊन एक स्त्री आपल्या पतीला बिलगली आहे आणि आपल्या हातातल्या काठीने तो त्या माकडाला दूर लोटीत आहे. माकडाने स्त्रीच्या अंगावर झेप घेतल्याचे प्रसंग प्रत्यक्ष जीवनातही पुष्कळ घडतात. त्या स्त्रीने भिणे आणि बिलगणे अगदी यथातथ्य आहे.

असे जीवनातले बहुतेक सर्व अनुभव, व्यवसाय आणि प्रसंग इथल्या मंदिरांच्या आतल्या-बाहेरच्या भिंतींवर, खांबांवर, जिथे जागा मिळेल तिथे शिल्पित केलेले आहे. त्यामुळे आपण संबंध मानवी जीवनच पाहत आहो असे वाटते. काही काही संभोग-शिल्पे मोठी आहेत खरी आणि काही लोकांना त्याबद्दल जुगुप्सा वाटते हेही खरे आहे. पण तसे वाटण्याचे कारण नाही. एक म्हणजे मिथुन आणि मैथुन हे मानवी, किंबहुना प्राणिमात्रांच्या, जीवनातला उत्साह वाढवणारे आणि त्याचे सातत्य टिकवणारे महत्त्वाचे घटक आहेत. शिवाय एकेकाळी, विशेषतः मध्ययुगात, आपल्या संबंध देशभर शक्तीची उपासना प्रचलित होती. अशी मिथुने आणि संभोग-शिल्पे इथेच नाही, तर गुजरातमधील मोढेऱ्याच्या सूर्यमंदिरापासून ओरिसातल्या कोणार्कच्या सूर्यमंदिरापर्यंत भारताच्या मधल्या पट्ट्यातल्या मंदिरात कोरलेली दिसतात. महाराष्ट्रात आणि दक्षिणेतही दिसतात. मैथुन हा शक्तिसाधनेतला एक महत्त्वाचा विधी आहे. कालांतराने एकीकडे ह्या

साधनेतल्या परिभाषेला सोज्वळ अर्थ दिला गेला असला, आणि दुसरीकडे त्यांत दुर्व्यवहार शिरला असला, तरी मुळात साधना करणारे तो संभोग म्हणून करीत नव्हते. आणि त्याकडे इंद्रियसुखाच्या दृष्टीने पाहत नव्हते. साहजिकच त्यात गुप्तता होती. पण त्यासंबंधी लपवा-छपवी नव्हती. शिवाय खजुराहो हे कौल आणि कापालिक ह्या शाक्त पंथाचे मध्ययुगात मोठे केन्द्र होते.

आणखी एक गोष्ट म्हणजे जीवनात सर्व सुख-दुःखे भोगीत असताना किंवा भोगूनसुद्धा ही सुखे भोगणे म्हणजे मानवी जीवनाचे सार्थक नसून मानवी देहात वसणारा आत्मा आणि विश्वात वसणारा परमात्मा ह्याचा साक्षात्कार करून घेणे हे जीवनाचे साध्य आहे, हे सुखभोग बाह्य आहेत, हे ओळखणे. ह्या कल्पनेनुसार मंदिर हे मानवी संसाराचेच नव्हे, तर विश्वाचे प्रतीक आहे. कारण मंदिरावर माणसाची शिल्पे आहेत, तशी ब्रह्मादि देवांची, विष्णूच्या अवतारांची, पुराणातल्या प्रसंगांची, देवासुर युद्धाची, समुद्रमंथनाची, चंद्र-सूर्यादि ग्रहांची, यक्ष–गंधर्व–किन्नर–विद्याधरांची, अप्सरांची, नद्यांची, वृक्षवल्लींची पशुपक्ष्यांचीही शिल्पे आहेत. ह्या बाह्य पसाऱ्याच्या आत–गाभाऱ्यात–इष्ट-देवतेची म्हणजे परमार्थाने परमेश्वराची दृश्य प्रतिमा असते. बाह्य जीवन पाहून आणि पाहत–पाहत आपण गाभाऱ्यात, निवांत शांततेत प्रतिष्ठित झालेल्या देवतेचे दर्शन घ्यायचे असते. त्यावेळी बाहेरचे सर्व मागे टाकायचे असते.

मुख्य पाच–सात मंदिरातल्या मूर्ती म्हटल्या, तरी त्यांची संख्या हजारांनी भरेल. सगळी मंदिरे एकाच वेळी बांधली गेली नाहीत. दीडशे–दोनशे वर्षांच्या काळात ती बांधली गेली. कित्येक स्थपती आले गेले असतील. सगळेच शिल्प-कार सारखेच कुशल नसतील. सगळेच दगड सारख्याच गुणवत्तेचे असतील असे नाही. साहजिकच सगळ्याच मूर्ती सारख्याच सुंदर आहेत असे नाही. पण ज्या काही थोड्या अत्यंत रेखीव, प्रमाणबद्ध बांध्याच्या, सर्वांगसुंदर, भावदर्शी चेहऱ्याच्या मूर्ती आहेत त्या बहुतेक महादेव, विश्वनाथ आणि लक्ष्मण ह्या मंदिराच्या मंडपाच्या, महामंडपाच्या ब्रॅकेट्सवर आहेत. त्या मात्र पुन्हा पुन्हा लक्ष वेधून घेतात. बाकी बऱ्याच मूर्ती, किंबहुना बहुतेक, विरूप म्हणता येतील अशा आहेत. संभोग-शिल्पातल्या तर जवळजवळ सुरूप नाहीतच. कंबरेपासून खालच्या भागाकडे शिल्पकाराने लक्षच दिले नसावे असे वाटते. गुडघ्याच्या वाट्यांची जागा दाखवली आहे, तेवढे सोडले तर नितंबाला, मांड्यांना, पोटऱ्यांना, घोट्यांना, पावलांना काही आकारच नाही. केळींच्या उलट्या

उभ्या केलेल्या बुध्यांसारखे वरून खाली निमुळते होत जाणारे हे पाय सरळ-सोट आहेत. एका युरोपियन कलासमीक्षकाने म्हटलेले आठवते की, 'भारतीय मूर्तिशिल्प, विशेषतः स्त्रीमूर्तिशिल्प, "लिटररी" म्हणजे साहित्यनिष्ठ असते. चंद्रासारखे मुख, धनुष्यासारख्या बाकदार भुवया, कमलदलासारखे किंवा माशांसारखे लांब डोळे, कुंभासारखे स्तन, कदलीस्तंभासारखे पाय असे जे संस्कृत साहित्यात नायिकेचे वर्णन आढळते त्याला शिल्पात मूर्तरूप दिलेले असते.' आपल्या मूर्तिशिल्पात खरोखरच असे दिसते. खजुराहोच्या बाबतीत विशेष दिसते ते म्हणजे, मूर्ती घडविताना शिल्पकारांनी आपले सगळे कौशल्य कबरेपासून वरच्या भागावर केन्द्रित केलेले आहे आणि तेही मुखावरच्या भावदर्शनावर.

प्रणयी जोडप्याच्या चुंबनालिंगनाच्या शिल्पात हे विशेष जाणवते. अशा सर्व शिल्पांतल्या स्त्रीच्या मुखावर आतुरता, उत्कटता, तल्लीनता आणि निमीलित नेत्रांनी सूचित केलेली स्पर्शसुखसमाधी दिसते. त्याच्यावरून दृष्टी बाजूला करवत नाही. आपल्या प्रियकराच्या गळ्यात हात घालण्यासाठी अंग थोडेसे उचलून त्याच्याकडे वर केलेले तिचे मुख, आणि हे करीत असताना कबरेपासून वर तिच्या पाठीला आलेले वळण, शिल्पकाराने इतक्या कौशल्याने दाखवले आहे की, भुवयांचा कृत्रिम, अतिरिक्त बाकदारपणा, डोळ्यांची आणि जिवणीची ओढून दाखवल्यासारखी लांबी, असल्या विरूपीकरणाकडे आपले लक्षच जात नाही. अशा चेहऱ्याच्या स्त्रिया प्रत्यक्ष जीवनात दिसल्या तर आपण त्यांच्याकडे पुन्हा वळून सोडाच पण एकदासुद्धा पाहणार नाही, पण इथे शरीराचे लयबद्ध वळण आणि मुखावरचे भाव यांवरच लक्ष खिळून राहते.

खरे म्हणजे खजुराहोच्या किंवा आपल्या सगळ्याच मंदिराच्या शिल्पाबद्दल हे म्हणता येईल. वास्तवाचे यथातथ्य दर्शन घडवणे हा त्या शिल्पकारापुढला मुख्य उद्देश नसून मिळेल तेवढ्या जागेत मूर्ति-निर्माणाच्या नियमांनुसार शिल्प बसवणे हा त्याच्यापुढला प्रश्न होता. वस्तुदर्शन झाले पाहिजे आणि उपलब्ध जागेत एक आकृतिबंधही निर्माण झाला पाहिजे. त्यासाठी शरीराला वळवण्याचे काम त्यांनी इतक्या कुशलपणे केले आहे की एक आकृतिबंध म्हणून शिल्पाकडे पाहिले तर विरूपण गौण ठरते. बऱ्याच संभोग-शिल्पांच्या बाबतीतही हे खरे आहे. पुरुषायिताचे जे शिल्प विश्वनाथ मंदिरात आहे ते एका अर्थी शाक्त साधनेचे एक अंग आहे आणि शिल्प म्हणून तो एक आकृतिबंध आहे.

वेगवेगळी पाहिली तर सगळी मूर्तिशिल्पे प्रत्यक्षाची कलात्मक प्रतिरूपे आहेत. आणि सबंध मंदिर हेच एक शिल्प आहे अशा दृष्टीने पाहिले तर ती त्या वास्तूची अलंकरणे आहेत आणि त्यांतली बरीच दृश्ये आपल्या दृष्टीने खरोखर अलंकरणेच आहेत. कारण आपण तिथे जातो ते देवदर्शनासाठी नाही. तिथे शिल्पित केलेले बरेचसे जीवन आपले जीवन नाही. बऱ्याच देवदेवता आपल्या श्रद्धेचा विषय नाहीत. म्हणून आपण बरेचसे तटस्थ राहू शकतो. तसे तटस्थ राहणे आपल्याला शक्य झाले पाहिजे.

संभोग करणारी जोडपी, प्रणयी जोडपी, विविध कृत्यात मग्न असलेल्या स्त्रिया, ह्या सगळ्या परस्परात किंवा आपल्यातच लीन आहेत. तुम्ही त्यांच्याकडे पाहता की नाही इकडे त्यांचे लक्ष नाही. 'मी वळुन पाहतो पुन्हा पुन्हा। हा काय गडे माझाच गुन्हा ॥' असे म्हणत आपण मात्र त्यांच्याकडे पाहत असतो. पण विश्वनाथ मंदिरातली एका मुलीची मूर्ति थोडी वेगळी आहे, मुलगी सोळा-सतरा वर्षांची असावी. अप्रतिम डौलदार बांधा आहे. इतरत्र बहुधा न आढळणारा मांड्यापोटऱ्यांचा आकार वळणदार आहे. ती खरी आहे पाठमोरी. नुकतीच न्हालेली आहे. केसांतले पाणी पिळून काढते आहे. ती पाठमोरी आहे तरी आपण तिच्याकडे पाहतो आहो, हे तिला कळले आहे. कसे कोण जाणे, पण एरव्हीसुद्धा स्त्रियांना कळते तसे! म्हणून ती कंबरेखालचा भाग तसाच पाठमोरा ठेवून वळली आहे. त्यामुळे पाय कात्रीच्या पात्यांसारखे एका-पुढे एक आले आहेत. एका पायाची टाच किंचित् उचलली गेली आहे. वरचे अर्धांग आणि तोंड आपल्याकडे वळले आहे. भुंवया उंचावल्या आहेत. मान खाली न करता पायाशी सरपटणाऱ्या एखाद्या क्षुद्र प्राण्याकडे पाहावे, तसे उंचावरून, नुसती दृष्टी खाली वळवून, ती पाहत आहे. सरळ, आटपशीर नाक, जणू 'कोण?' असे विचारण्यासाठी किंचित, किंचितच, उघडल्यासारखी चिमुकली जिवणी आणि जिवणीला साजेशी वळणदार हनुवटी. खरोखरच 'कोण तुम्ही? असं काय पाहता?' असे ती आपल्याला विचारील असे वाटावे इतकी जिवंत. पुन्हा पुन्हा दृष्टी तिच्याभोवती घोटाळत राहते.

आपण मनाशीच म्हणतो, 'बाई ग, तू जर हाडामासाची असतीस तर तुझं रूप इतकं अलौकिक असूनसुद्धा, किंबहुना म्हणूनच, तुझ्याकडे असं सारखं-सारखं पाहणं असभ्यपणाचं झालं असतं हे खरंच आहे. पण तू हाडामासाची नाहीस. नवतरुणीच्या उमलत्या लावण्याचा कलात्मक आविष्कार आहेस. आणि तुझ्या-

कडे पुन्हा पुन्हा पाहावे म्हणूनच शिल्पकाराने तुला घडवल आहे. अगदी तुझ्याइतकी जिवत नाही तरी अत्यत भावदर्शी चेहऱ्याची आणखी एक युवती तिकडे घटाई मंदिरात आहे आणि ह्या जवळपासच्या मंदिरातही अशा कोणी कोणी आहेत.' असे आपण मनाशी म्हणत असतो आणि तिच्याकडे पाहत असतो.

अशा ह्या बुंदेलखडी बायका. त्या आपल्याला नादी लावतात पण आपल्या गळ्यात पडत नाहीत. आपल्या डोळ्याच्या वाटेने सरळ अंत:करणात शिरतात आणि तिथेच राहतात. नेहमीसाठी. विष्णुभट गोडशानी बुंदेलखडातल्या ह्या बायका पाहिल्या नसाव्यात. पाहिल्या असत्या तर त्यांनी काय म्हटले असते?

# रोजनिशी भुवनेश्वरची

**२५ डिसेंबर, १९६०**

आम्ही भुवनेश्वरला पोंचलो तेव्हा रात्रीचे साडेदहा झाले होते. सकाळी साडेअकरा वाजता वॉल्टेअर-हावडा एक्स्प्रेसने वॉल्टेअरहून निघालो होतो. मुबईहून भुवनेश्वरला वॉल्टेअरमार्गे जायचे म्हणजे मुबईहून दिल्लीला नागपूरमार्गे जाण्यासारखे आहे. पण रेल्वेने गोल प्रवासाची तशीच आखणी करून दिली आहे. काल संध्याकाळी रायपूर सोडले. तिथून आज सकाळी साडेनऊ वाजता वॉल्टेअरला पोचेतो वाटेतच पहाट झाली होती.

तिथून दिवसभरच्या प्रवासात इकडचा प्रदेश पाहत होतो. आपला पश्चिमे-कडला जसा 'पश्चिम घाट' तसा इकडे 'पूर्व घाट' आहे. इथे डोंगर आहेत, पण ते सह्याद्रीसारखे प्रचंड नाहीत, खडकाळ नाहीत, भीषण नाहीत, आणि त्याची एखाद्या भिंतीसारखी रागच्या रांग नाही. मधून रांगा, मधून सुटे डोंगर, असे आहे. पाण्याचीही विपुलता दिसली. ठिकठिकाणी लहान-मोठी तळी आहेत. माडाची खूप झाडे आहेत. एकंदरीत प्रदेश रमणीय आणि प्रसन्न वाटला.

आमचे प्रवासाचे वेळापत्रक तारीखवार आखलेले होते आणि मुक्कामाच्या आणि आगगाडीतल्या जागाच्या रिझर्व्हेशनसाठी आधीपासून पत्रे पाठवलेली होती. भुवनेश्वरला पोचताच स्टेशनमास्तराकडे जाऊन जिथे पत्र पाठवले होते, तिथे 'जागा राखून ठेवली आहे का', हे विचारण्याची विनती केली. स्टेशन-मास्तर भले गृहस्थ दिसले. त्यानी चौकशी केली. जागा राखून ठेवलेली नव्हती. त्यानी आपण होऊन आणखी एकदोन ठिकाणी फोन केले. पण उद्या काहीतरी सरकारी समारभ असल्यामुळे कुठेही जागा रिकामी नव्हती. इतक्या रात्री गावात कुठे जायचे म्हणून शेवटी रात्र वेटिंगरूममध्येच काढली.

**२६ डिसेंबर, १९६०**

सकाळी उठल्याबरोबर कळले की, गावात जाण्यासाठी साडेसात वाजताच एक बस सुटते.

वेटिंगरूममध्येच एक सद्गृहस्थ होते ते म्हणाले, 'तुम्ही बिंदुसरोवराजवळ "दुद्वावाल्याच्या धर्मशाळे"त जा. चांगली आहे.

त्याप्रमाणे गेलो. वरच्या मजल्यावरची स्वच्छ, मोठी, हवेशीर खोली मिळाली. मधे मोठा चौक. मागे मोठ्या प्रशस्त जागेत आखीव-रेखीव बाग. मोठी विहीर शौचकूपही स्वच्छ. 'एखाने स्नान करा निषिद्ध' वगैरे काही सूचना बंगालीत लिहिलेल्या दिसल्या. एके काळी बंगाल, बिहार आणि ओरिसा मिळून एकच प्रांत होता. त्या वेळचा बंगालीचा प्रभाव अजून गेला नसावा.

आघोळ वगैरे उरकून समोरच एका दुकानात चहा घ्यायला गेलो. चहा करण्याची पद्धत अगदी शास्त्रोक्त. आपल्याकडल्या हॉटेलातल्यासारखे चहा, साखर, दूध पातेल्यात एकत्र उकळत ठेवलेले नसते. एका फडक्यावर चहा आणि साखर घालून वर उकळते पाणी ओततात नंतर त्यात दूध घालतात ग्लासे ऊन पाण्याने धुऊन मागितली, त्याप्रमाणे दिली. पण फडके चहा गाळून गाळून तपकिरी झालेले. आणि चहा करणाऱ्याला हत्तीरोग. म्हणजे एकूण स्वच्छता बेताचीच. किंबहुना नाहीच.

'बिंदुसरोवरात सर्व तीर्थांचे पाणी एकत्र आलेले आहे, त्यामुळे तिथे स्नान करण्याने फार पुण्य मिळते'. असे आम्ही घेतलेल्या वाटाड्याने सांगितले, पण असे पुण्य मिळण्याची सोय महाराष्ट्रातही अनेक ठिकाणी असल्यामुळे बिंदु-सरोवरात स्नान नाही केले तरी चालेल असे आम्ही ठरवले.

नंतर वाटेत चालताना पाहतो तर दर चारपाच लोकांमध्ये एक तरी हत्तीरोगी दिसे. वाटाड्या म्हणाला, 'पुरीत हत्तीरोगाचा फैलाव फार आहे. तिथून हे लोक रोग इथे आणतात ' त्याने आणखी माहिती दिली, 'भुवनेश्वरात उडिया ब्राह्मण कोणी नाहीत. एका राजाने बौद्धांचा वादात पराभव करण्यासाठी कनौजहून दहा हजार ब्राह्मण आणले. इथले सगळे ब्राह्मण कनौजी आहेत.'

भुवनेश्वर हे त्रिभुवनेश्वराचे स्थान आहे. सध्या पुरी येथे असलेल्या जग-न्नाथाच्या मनात 'आपण भुवनेश्वरात राहावे' असेच होते. पण त्याची एक अट होती. इथे एक लक्ष मंदिरे बांधली गेली पाहिजेत. पण एक लक्षाला एक मंदिर कमी पडले म्हणून तो पुरीला गेला. आता इथे नव्याण्णव हजार नऊशे नव्याण्णव मंदिरे नाहीत, पण धडकी-पडकी मिळून सातआठशे तरी आहेत म्हणतात. आणि ती सगळी सातव्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत बांधली गेलेली आहेत. त्यामध्ये शाक्त, शैव आणि वैष्णव अशा तीनही पंथांची मंदिरे

आहेत. सहाव्या-सातव्या शतकात बौद्ध पथाला उतरती कळा लागली आणि शैव-शाक्त पुढे सरसावले. काही शैव मदिरांत बौद्धपथाची निदर्शक हरिणे, बुद्धाचे धर्मचक्र, आणि पद्मासनस्थ बुद्धासारखा लकुलीश शिव असे बौद्ध मदिरांवर उघडउघड शैव सस्कार केलेले दिसतात.

इथे आणखी एक गोष्ट जाणवते ती अशी की, दुसऱ्या कोणत्याही नगरात सतत सहासात शतके बांधली गेलेली आणि त्यातली बरीच चागल्या स्थितीत उभी असलेली इतकी मदिरे नाहीत. शिवाय इथे आरंभापासून शेवटापर्यंतचा दोनच शैलींच्या मदिरबांधणीचा विकास पाहता येतो. वाराणसी आणि मथुरा येथे पुष्कळ मदिरे आहेत, पण त्यात शैलीचे वैशिष्ट्य असे नाही. खजुराहो येथे शैलीवैशिष्ट्य आहे, पण मदिरे संख्येने इतकी नाहीत. आणि कालावधी ही इतका मोठा नाही. धडकी-पडकी सगळी मदिरे पाहणे आम्हाला शक्यच नव्हते. तेव्हा आम्ही वाटाड्याला सांगितले, 'दोनतीन तासात पाहून होतील इतकी, पण जुन्यातल्या जुन्यापासून तेराव्या शतकापर्यंतची मदिर दाखव.'

आम्ही पुढे निघालो तर कोकणात आल्यासारखेच वाटले. रस्ता सगळा तांबडमातीचा. आजूबाजूला चोहीकडे आंब्याची, काजूची, फणसाची झाडे. आणि पाणदीसारख्या रस्त्याच्या दोन्ही बाजूना कोकणातल्यासारखेच जाभ्या दगडाचे गडगे. आणि शिवाय ओरिसात देवळाला 'देऊळ'च म्हणतात. ओरिसातल्या मंदिराच्या वास्तूची रचना मुख्यत दोन प्रकारची आहे 'रेखा देऊळ' आणि 'पिढा देऊळ.'

गाभाऱ्यात जिथे देवाची मूर्ती असते त्याच्या वरची वास्तू हे देवाचे शरीर मानले आहे. देव हा आत्मा. ही वास्तू उच असते आणि हळूहळू वरवर आतल्या बाजूला वळत जाते. शरीराप्रमाणेच ह्या वास्तूचे 'पावले', 'पोटऱ्या', 'मांड्या' असा कबरेपर्यंतचा भाग. नतर शरीराचे 'धड' (त्याला 'गंडी' म्हणतात). माणसाचे शरीर खांद्यापाशी आत वळून मानेकडे जाते तसा गंडीचा सर्वात वरचा भाग आत वळतो. त्यावर मध्यभागी 'कठ', त्याच्यावर भोवती अनेक कगोरे असलेला गोल, पेढ्यासारखा वसकट 'आमलक', त्याच्यावर तवा पालथा घातल्यासारखे टोपण आणि त्यावर कळस. कळसाच्या वर ज्याचे देऊळ असेल त्या देवाचे त्रिशूळ, चक्र वगैरे चिन्ह. उच चढत जाणाऱ्या या शैलीच्या वास्तूला 'रेखा' देऊळ म्हणतात आणि गडीपासून वरच्या भागाला 'विमान'.

'रेखा देऊल'च्या म्हणजे गाभाऱ्याच्या द्वारासमोर आणि त्याला लागूनच एकाच रेषेत क्रमाने लहान होत जाणारे चौकोनी मंडप असतात. संपूर्ण ओडिसी मंदिराला असे तीन मंडप असतात. आरंभीच्या काही मंदिरांना गाभाऱ्यासमोरचा एकच मंडप आहे. त्याला 'जगमोहन' म्हणतात. त्याच्या पुढच्याला 'नटमंडप' आणि शेवटल्याला 'भोगमंडप'. ह्यांनाही 'देऊल'च म्हणतात आणि त्याचीही कल्पना मानवी शरीराचीच आहे. पण पायऱ्याच्या वर ह्या देवळाचे शिखर उंच चढत जात नाही. ते आडव्या पट्ट्यांचे असते आणि पिरॅमिडप्रमाणे वर निमुळते होत जाते. शेवटी 'आमलक' आणि 'कळस' असतो. त्यालाही पाच-पाच, सहा-सहा पट्ट्यांनंतर अंतर सोडून दोन किंवा तीन मजले केलेले असतात, ह्या शैलीला 'पिढा देऊल' म्हणतात. ओरिसा शैलीतल्या मंदिरांचे वैशिष्ट्य कळण्यासाठी हा तपशील कळणे आवश्यक आहे.

आधी आम्ही परशुरामेश्वराचे मंदिर पाहिले. ह्याचे 'विमान' थोडेसे बैठे, फतकडे आणि बोजड वाटते. 'गंडी'वर नक्षीकाम, कोरीवकाम फारसे नाही. आणि त्याच्यासमोर 'पिढा' पद्धतीचे 'जगमोहन'ही नाही. त्याच्याऐवजी लांबट चौकोनी सभागृह आहे. त्याच्या मधल्या भागावर दुपाखी उतरते छप्पर आहे. आणि त्याच्या वळचणीखाली काही अंतर सोडून बाहेरच्या दोन बाजूच्या भागांवर उतरत्या पाख्याचीच छपरे आहेत. गोव्यातल्या जुन्या पद्धतीच्या मंदिरावर असतात तशी. चौथऱ्यावर मात्र प्राणी, मूर्ती वगैरे कोरलेल्या आहेत. हे सातव्या शतकातले आहे.

नंतर मुक्तेश्वर आणि सिद्धेश्वर ही मंदिरे पाहिली. मुक्तेश्वराचे मंदिर निखालस ओरिसा शैलीचा प्रारंभकाल दर्शविते. पण परशुरामेश्वरासारखे ते बैठे-बोजड वाटत नाही. त्याच्यासमोर 'पिढा' पद्धतीचे 'जगमोहन' आहे. आणि इतर कुठेही न पाहिलेले वैशिष्ट्य म्हणजे प्राकाराच्या प्रवेशद्वारावर अर्धवर्तुळाकार कमान आहे. मुसलमानपूर्व हिंदू वास्तूत अशा कमानी दिसत नाहीत. ही दगड रचून बांधलेली नाही, तर एका दगडालाच अर्धवर्तुळाचा आकार देऊन केली आहे. मुक्तेश्वर मंदिर अगदी प्रमाणबद्ध आहे. चौथरा आणि विमान अधिक अलंकृत आहेत. निरनिराळ्या देवदेवतांच्या, प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या आकृती व फुले-वेली कोरलेल्या आहेत.

तिथून जवळच शेतांच्यामध्ये राजाराणी मंदिर आहे. हे भुवनेश्वरातले विशेष प्रसिद्ध मंदिर आहे. लिंगराजाच्या खालोखाल विमानाची उंची एकुणसाठ फूट

आणि समोर फक्त 'जगमोहन' आहे. ह्या मंदिराचे शिखर (विमान) मध्य-प्रदेशातल्या खजुराहोतल्या मंदिराच्यासारखे आहे.

खजुराहोतल्या मंदिराचे शिखर हे त्याच्याच छोट्या प्रतिकृतींनी—'अग-शिखरां'नी—वेढलेले असते. अनेक लहान लहान अगशिखरांच्या पुंजक्यातून मुख्य शिखर वर येत आहे असे दिसते. त्यामुळे खजुराहोच्या मंदिरांची शिखरे तळापासूनच वर निमुळत जातात. त्याचे एक नाजुक जनानी सौंदर्य आहे ओरिसातल्या मंदिराची शिखरे भरदार, जोमदार, मर्दानी वाटतात. त्याना उंच जोते नसल्यामुळे ती जमिनीवर वजन ठेवल्यासारखी दिसतात. खजुराहोतल्या-प्रमाणे राजारानी मंदिराच्या शिखराभोवती अशी थोडी अगशिखरे आहेत, पण ओरिसा शैलीचे वैशिष्ट्य सुटलेले नाही. सबंध मंदिर प्रमाणबद्ध आहे. आणि मूर्ती, इतर आकृती किंवा कोरीव काम नाही अशी रिकामी जागा कुठेही नाही.

खजुराहोच्या मंदिराचे कौतुक आणि प्रसिद्धी फार झाली आहे. ती अगदीच अनाठायी आहे असे नाही. पण तिथल्या स्त्रीपुरुषाच्या आकृतींत कंबरेवरच्या भागावर, विशेषत: वक्ष स्थळावर, शिल्पकारानी जितके कौशल्य वापरले आहे तितके कंबरेपासून खालच्या भागावर वापरलेले नाही. तिथल्या बहुतेक आकृतींचे पाय सरळसोट खाली निमुळत जातात. कंबरेपासून गुडघ्यापर्यंत आणि पोटऱ्या धरून घोट्यापर्यंत पायाना जी डौलदार गोलाई असते ती त्यात नाही. आणि काही मूर्ती तर बेढबच आहेत.

ओरिसातल्या मंदिरावरच्या प्रत्येक मूर्तीचा बांधा अधिक प्रमाणबद्ध, अधिक डौलदार, अंगलटीची वळणे अधिक लयबद्ध आहेत. राजारानीच्या मंदिरात हे उत्कृष्टपणे प्रकट झालेले आहे. इथेही मिथुने आणि संभोग-शिल्पे आहेत. पण इथे आपले लक्ष शिल्पकाराच्या कौशल्याकडे जाते आणि सबंध देऊळ पाहताना एक उत्कृष्ट शिल्प पाहिल्याचा आनंद होतो. मंदिराच्या 'राजा-रानी' ह्या नावाचा कोणत्याही राजाराणीशी संबंध नाही. 'राजरानिया' ह्या नावाच्या स्थानिक दगडानी हे देऊळ बांधलेले आहे, म्हणून 'राजारानी'.

लिंगराजाचे मंदिर गावात आहे. ह्याचे 'विमान' एकशे अठ्ठेचाळीस फूट उंच आणि 'जगमोहन' पचाण्णव फूट उंच आहे. कोणार्क सोडले तर ओरिसा शैलीतले हे सर्वोत्कृष्ट मंदिर बाराव्या शतकातले आहे. हाच भुवनेश्वर किंवा त्रिभुवनेश्वर. ओरिसा शैलीतील वास्तुकलेचा, मूर्तिकलेचा, कोरीव कामाचा इथे परमोत्कर्ष झाला आहे. हत्तीवर उभा असलेला सिंह (गजबिडाल), माणसावर

उभा असलेला सिंह (नरविडाल), निरनिराळ्या स्थान-मानाच्या स्त्रीमूर्ती, कोणी आपले वस्त्र हळूच उचलून धरीत आहे, कोणी आरशात पाहत आहे, कोणी टोकदार खिळ्याने फळीवर पत्र लिहीत आहे, अशा कितीतरी 'नायिका' आहेत मिथुने आणि संभोग-शिल्पेही आहेत विमानावर कोरीव काम नाही अशी एक तसूभरही जागा नाही.

ह्या 'विमाना'वरही अगशिखरे आहेत पण ती अगदी मोजकी आणि बांधकामाचा भाग झालेली आहेत. 'विमाना'वरचे उभे पट्टे आणि 'भूमी'चे आडवे पट्टे परस्परांना छेद देऊन एकसुरीपणा घालवतात आणि त्यांच्या वेग-वेगळ्या पातळ्यामुळे आणि कोरीव कामामुळे छायाप्रकाशाच्या दृष्टिवेधक चित्राकृतीही निर्माण होतात.

विमानाच्या उजव्या मागच्या आणि डाव्या भिंतीवर गणेश, कार्तिकेय आणि पार्वती ह्या शंकराच्या पार्श्वदेवताच्या मूर्ती आहेत, त्या फारच भव्य, सुंदर आणि डौलदार आहेत. पार्वतीच्या अंगावरच्या वस्त्रावर विणकामात केल्यासारखी नक्षी आहे आणि तिच्यात हरणे वगैरे प्राण्यांच्या आकृती कोरलेल्या आहेत त्या पाहतच राहाव्या असे वाटते.

लिंगराजाचे मंदिर हे केवळ शिवाचे मंदिर नाही ते हरि-हराचे मंदिर मानले जाते. म्हणजे ह्या मंदिरात शैव आणि वैष्णव ह्या पंथाचे ऐक्य साधले आहे. परशुरामेश्वर, मुक्तेश्वर, राजारानी आणि लिंगराज ही चार मंदिरे पाहिली म्हणजे ओरिसा शैलीच्या मंदिराचे सर्व टप्पे पाहिल्यासारखे होते.

त्यानंतर एका खाणावळीत मिळेल ते जेवण घेतले आणि थोडा वेळ विश्रांती घेऊन पाचसहा मैलावर उदयगिरी आणि खंडागिरी ह्या ठिकाणी दोन हजार वर्षांपूर्वीच्या गुंफा आहेत त्या पाहायला गेलो. त्यासाठी जाता-येताची टॅक्सी केली होती. टॅक्सीवाल्याशी बोलणे काढून त्याचे नाव विचारले. तो म्हणाला. 'बैजनाथ' मग आमचे आपसातले मराठी बोलणे ऐकून असेल, तो म्हणाला, 'आमची जात ब्राह्मण-क्षत्रिय. आम्ही नागपूरकडून आलो. आमची सोयरीक वर्ध्याकडे होते.'

हे बोलणे हिंदीत चालले होते. त्याला विचारले, 'मराठी येत का?'

तो म्हणाला, आम्ही मराठीच. आम्हांला मराठी तस समजत, पण बोलता येत नाही. घरी आजी आहे, तिला येत. आणि आमच्याकडे सुना येतात, त्यांना येतं.'

गुफा पाहून परत येताना भुवनेश्वरलाच ओरिसाच्या नव्या राजधानीच्या इमारती, बाजार वगैरे आहेत, तिथे कुठे काही चहा वगैरे मिळतो का पाहत होतो तर एक दक्षिण भारतीय हॉटेल दिसले. म्हटले, इडली डोसा काहीतरी मिळेल. म्हणून आत जाऊन बसून ऑर्डर दिली. पण त्याच्यावर उत्तर हिंदुस्तानी आळसाचा आणि अस्वच्छतेचाही फारच परिणाम झालेला दिसला. आम्ही वाट पाहून कटाळून बाहेर पडायची तयारी करू लागलो तेव्हा इडली आली. ती दगडासारखी घट्ट. शेवटी जे समोर आले ते घेतले आणि धर्मशाळेत परतलो.

२७ डिसेंबर, १९६०

सकाळी साडेसात वाजता एक स्टेशनवॅगन करून कोणार्कला गेलो. त्याच्या भव्यतेची, प्रमाणबद्धतेची, सौंदर्याची, तिथल्या मूर्तिशिल्पांची कीर्ती बरीच ऐकली होती. भुवनेश्वरहून बेचाळीस मैल अंतर आहे.

सबंध रस्ता केरळची आठवण करून देतो. तशीच रस्ताभर अंतराअंतरावर लहान लहान गावे, भाताची शेते, उसाचे मळे, माड, लहानमोठी असंख्य तळी, आणि बहुतेक तळ्यात माणकासारखी लाल, फुललेली कमळे. मध्येच कुठे थोडीशी पांढरी कमळेही दिसतात. त्यामुळे रंगवैचित्र्यही आले होते. रस्त्या-शेजारच्या, शेणा-मातीने स्वच्छ सारवलेल्या घराच्या भिंतींवर पांढऱ्या रंगात अनेक आकृती चितारलेल्या दिसत होत्या माणसे, झाडे, डोंगर, घरे. कुठे नुसते पुष्पगुच्छ, तर कुठे झाडांना फळे लागलेली. काही ठिकाणी काळ्या-तांबड्या रंगांत रांगोळीसारख्या आकृती काढलेल्या. सगळी चित्रे कल्पनेतून निर्मिलेली. ग्रामीण वन्यजातीय लोककलाकृतींसारखी. कोणत्याही प्रत्यक्ष वस्तूची प्रतिकृती नव्हे. आपण एखाद्या रस्त्याने जात नसून सौंदर्याने नटलेल्या देखा-ण्याच्या प्रदेशातून दृष्टिसुखाचा प्रसन्न, उल्हसित करणारा, अनुभव घेत जात आहो असे वाटत होते. आणि त्याला शिशिर ऋतूचा गारवा स्पर्शसुखाची जोड देत होता.

दोन तासात आम्ही कोणार्कला पोचलो. चहा घेतला, फराळ केला. आणि मग थोडे पुढे जातो तो एका विस्तीर्ण पटांगणात कोणार्कचे भव्य देऊळ एकदम प्रकट झाल्यासारखे उभे राहिले.

कोणार्कचे मंदिर हे पूर्व समुद्राच्या किनाऱ्यावरचे 'सूर्यमंदिर' आहे. सध्या दिसते ते मंदिर म्हणजे शंभर फूट उंचीचे पिढा शैलीचे 'जगमोहन' आहे.

त्याच्या मागच्या मुख्य 'रेखा' देवळाचे विमान नष्ट झालेले आहे. फक्त खालचा भाग उरला आहे आणि गाभाऱ्यात एक भव्य उंच ओटा आहे. सूर्याची मूर्ती नाही. ते उभे होते तेव्हा दोनशे सत्तावीस फूट उंच होते म्हणतात. पण जे आहे ते जगमोहनच पर्वतप्राय वाटते. इतकी भव्यता, इतकी प्रचंडता, इतका नेटका रेखीवपणा, सौंदर्य, दुसरीकडे पाहिल्याचे आठवत नाही. वेरूळचे कैलास लेणे ह्याच्यापेक्षा लहानच आहे त्याचे वेगळेपण—वैशिष्ट्य ते खडकातून इतके सुंदर कोरून काढले ह्यात आहे.

तेराव्या शतकाच्या मध्यावर बांधलेल्या ह्या सूर्यमंदिराची रचना रथासारखी आहे. त्याला चोवीस चाके आहेत. ते वर्षाचे चोवीस पधरवडे. प्रत्येक चाकाला आठ आरा आहेत, ते दिवस—रात्रीचे आठ प्रहर. आणि दोन आरांमधल्या कोनाला बरोबर दुभागणाऱ्या मणी ओवलेल्या सळईसारख्या आणखी आठ आरा आहेत. रथाला पुढे सात घोडे आहेत, ते आठवड्याचे सात दिवस.

'पिढा शैली'च्या ह्या 'जगमोहन'च्या शिखराला तीन 'भूमी' आहेत. सहा पट्ट्याची एक भूमी. नंतर काटकोनात आत गेलेला विभाजक. त्यावर सहा पट्ट्याची आणखी एक 'भूमी'. पुन्हा त्यावर एक विभाजक. शेवटी पाच पट्ट्याची 'भूमी'. त्यावर घटा', 'आमलक', 'कळस' वगैरे

कोनाकोपऱ्यांत, खाचाखोचात, आरावर, चाकाच्या धावावर जिथे जिथे म्हणून कोरीव काम करणे शक्य आहे, तिथे तिथे फुले, वेली, प्राणी, पक्षी, 'नायिका', मिथुने, संभोग—शिल्पे कोरलेली आहेत. गाभाऱ्याच्या बाहेरच्या भिंतीवर सूर्याची भव्य मूर्ती कोरलेली आहे. रथाचे प्रचंड घोडे असे कोरले आहेत की रथ ओढण्याचा ताण त्याना जाणवतो आहेसे वाटते घोडे, घोडेस्वार ह्याची ताकत व ऐट, मिथुनाच्या मीलनातली कामार्तता आणि भावनिर्भरता सारख्याच कौशल्याने दाखविली आहेत.

शिखराच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या भूमी'च्या मधल्या जागेत नर्तन-वादन करणाऱ्या 'नायिका'च्या मूर्ती उभ्या आहेत. त्याचा जिवंतपणा आणि वळणदार डौल खालून पटांगणातून तर दिसतोच, वर चढून त्यांच्यापर्यंत जाता येते. तिथे जाऊन पाहिल्यावर त्याच्या सौंदर्याचे बारकावे अधिकच जाणवतात. टाळ, झांजा, मृदंग, मुरली अशी वाद्ये वाजवणाऱ्या आणि नृत्य करणाऱ्या 'नायिकां'च्या अंगावरच्या वस्त्राना, गळ्यातल्या माळाना, कबरे-वरच्या अलंकाराना, टाळाना लावलेल्या गोंड्याना त्याच्या हालचालींमुळे

आलेली लयदार वळणे, मृदंगावर थाप मारण्यासाठी उचललेल्या बोटाची वळणे, त्यांच्या भुवयाचा कमानदार बाक, नाके आणि नाकपुडया ह्याची वळणे. त्याच्या जिवण्यांची सस्मित मुरड, मानेची ठेवण, त्यांचा प्रमाणबद्ध, रसरशील बाधा, ह्या सर्वांतून त्या जिवत, तन्मय, जीवनानदात मग्न झालेल्या आणि प्रसन्न दिसतात. असे वाटते की आपण पुरेसा वेळ थाबलो तर नर्तन-वादन सपल्यावर विसावण्यासाठी थांबतील तेव्हा त्या आपल्याकडे वळून आपल्याशी बोलू लागतील.

ह्या मूर्ती भिंतीच्या दगडाना चिकटून कोरलेल्या नाहीत. मुक्त—चारी बाजूनी सपूर्ण सुट्या आहेत. आणि गेली सातशे वर्षे ऊन, पाऊस, थडी, वारा अगावर घेत उभ्या आहेत. ह्या मूर्तींचा दगड खजुराहोच्यासारखा घट्ट चिकट-लेल्या कणाचा पिंगट वालुका-पाषाण नाही, किंवा हळेबीड-बेलूरच्यासारखा तकाकी घेणारा कठीण काळा दगडही नाही. तो खरबरीत आणि ठिपक्या-ठिपक्यांचा आहे. त्याला मध्ये-मध्ये छिद्रेही आहेत. तरी पण त्या शिल्पाच्या बारकाव्यात कुठेही उणीव जाणवत नाही. किंवा त्या कुठे झिजलेल्याही दिसत नाहीत. भोवतालच्या आवारात हत्ती, घोडे, सिंह, माणसे ह्याच्या असख्य मूर्ती, काही व्यवस्थित उभ्या केलेल्या, काही आडव्या पडलेल्या आहेत आणि प्रत्येक पाहण्यासारखी आहे. विशेषत: एका उंच ओट्यावर एका माणसाला पुढल्या पायांनी तुडवीत असलेला घोडा आणि त्याला धरून ठेवणारा (सध्या शिरोहीन) सैनिक. ह्या शिल्पातला जोम आणि आवरून धरलेला आवेश पाहण्यासारखा आहे. तसाच दुसऱ्या बाजूला सोंडेने एका माणसाला अलगत उचलीत असलेला एक हत्ती आहे. हे सगळे बारकाईने पाहायचे म्हटले तर काही तासच काय, काही दिवसही पुरायचे नाहीत.

कोणार्कचे मदिर हे एक भव्य स्वप्नसौंदर्य आहे. लिंगराजाचे मदिर हे भुवने-श्वरातल्या ओरिसा शैलीतल्या मदिरातले सर्वोत्कृष्ट मदिर असेल तर कोणार्कचे मंदिर हे सबंध ओरिसातले त्या शैलीतले सर्वोत्कृष्ट मदिर आहे. अतिसूक्ष्म आणि अतिभव्य शिल्पकौशल्याची इथे इतकी सुदर मिळणी झाली आहे की सूक्ष्माकडे दुर्लक्ष होत नाही आणि भव्यता डोळ्यावर आदळत नाही. शेवटी मनात ठसून राहते ते त्याचे एकात्म, भव्य, प्रमाणबद्ध रूपसौंदर्य, आणि मिळेल त्या लहान-मोठ्या जागेत लयबद्ध आकृतिरचना करण्याचे मूर्तिकाराचे कौशल्य.

भुवनेश्वरला परतलो तेव्हा दोन-अडीच वाजले होते. कुठेही जेवण मिळाले

नाही. बाजारात केळी मिळाली ती घेतली आणि जवळ फराळाचे होते त्यावर भागवले.

साडेतीन वाजता बसने जगन्नाथपुरीकडे रवाना झालो. रस्ता बराचसा कोणार्कसारखाच आहे. बस पुरीच्या दिशेने पुढे चालली होती पण मन मागे भुवनेश्वरात आणि कोणार्कमध्ये रेंगाळत होते.

# दारुब्रह्म जगन्नाथ

२७ डिसेंबर, ६०

भुवनेश्वराहून दुपारी साडेतीनच्या बसने जगन्नाथ पुरीकडे रवाना झालो. सदतीस मैल अंतर आहे. सपाटी इतकी आहे की पुरी दहा मैल अंतरावर असतानाच जगन्नाथमंदिराचे शिखर दिसू लागले. मात्र गाव जवळ आले तसे ते दिसेनासे झाले. पुरीला पोचेतो पाच वाजले. भुवनेश्वराप्रमाणे इथेही आम्ही दुदवाल्याच्याच धर्मशाळेत उतरलो. पटवर्धन नावाच्या उपाध्यायाचा कुलकर्णी नावाचा एजंट आम्हाला भेटला. त्यालाच आम्ही वाटाड्या केले.

धर्मशाळेत सामान ठेवल्यानंतर धर्मशाळेसमोरच दुकाने पाहत हिंडलो. तिथे ताव्यापितळेची-काशाची भांडी, पुजेची उपकरणे, दगडाच्या मूर्ती, दगड्या, दगडी भांडी वगैरे अनेक प्रकारच्या वस्तू होत्या. नंतर रात्रीचे जेवण धर्मशाळे-शेजारीच एका मारवाड्याच्या ढाब्यात केले. स्वच्छ आणि स्वस्त होते. तीन दिवसात पहिल्यांदा चांगले जेवण मिळाले.

२८ डिसेंबर, १९६०

सकाळी चहा, आंघोळ, वगैरे झाल्यावर रिक्षा करून टेम्पल रोडने समुद्रावर गेलो. खरे म्हणजे समुद्र जवळच आहे. पण आधी कल्पना नव्हती. वाटेने सूचीसाही म्हणून चांभार-हाट लागला. त्यांत लहानमोठ्या पर्सेस, कंबरपट्टे वगैरे सापाच्या चामड्याच्या बऱ्याच वस्तू दिसल्या. सहज चौकशी केली तेव्हा कळले की, सापाची चामडी बहुतेक मद्रासकडून येतात.

समुद्रकिनारा खूप स्वच्छ, रुंद, सुंदर आणि मैलचे मैल लांब आहे. इथे बसून सकाळी सूर्य उगवताना पाहणे हा एक अपूर्व अनुभव असेल. किनाऱ्या-नेच श्रीमंत लोकांचे बंगले, मोठमोठी हॉटेले आहेत. इथे सुखवस्तू स्थानिक बंगाल्यांची बरीच वस्ती आहे. वाळवंटात मिठाई वगैरेची दुकाने आहेत. लहान लहान होड्या आहेत. त्या चालवणाऱ्या कोळ्यांच्या टोप्या ऊंच टोकदार, आणि रंगीत होत्या. रविवर्म्याच्या चित्रात दिसतात तशा.

तासभर समुद्रावर फिरून पायीच परत निघालो. वाटेत मध्येमध्ये दोन

दुकानाच्या मधल्या बोळकडीत उभी असलेली बारा-चवदा वर्षांची पोरे एकदम पुढे येत आणि 'सर, लव्ह पिक्चर्स?' असे म्हणून आम्ही काही बोलण्या-पूर्वीच तळहाताएवढ्या संगजिऱ्याच्या तुकड्यावर कोरलेली मैथुनाची चित्रे आमच्यासमोर धरीत. नागव्या मुलींची किंवा जोडप्याची पिक्चर पोस्टकार्डे काही शहरात चोरून विकतात त्यासारखाच हा प्रकार.

सरळ मग जगन्नाथमंदिराकडे गेलो. देवळाजवळ दुकानाची खूपच गर्दी आहे. आसपास पडकी घरे, बखळी आणि घाण आहे. दुकानातून प्रसादाचे साखर-फुटाणे, लाडू, मिठाया आणि विशेष म्हणजे प्रसादाचा वाळलेला भात मिळतो.

सिंहद्वारातून आत गेलो. देऊळ खूप भव्य, प्रचंडच, आहे. एकशेवीस फूट उंच जगमोहन आणि दोनशेचवदा फुट उंच मुख्य देवळाचे शिखर आहे. पंड्याचा त्रास आणि यात्रेकरूंची अतोनात गर्दी जाणवली. पण एजंट कुळकर्णी आमच्याबरोबर होते त्यांनी आम्हाला आत घुसवले आणि थेट गाभाऱ्यात नेले समोर एका उंच जोत्यावर पाचसहा फूट, कदाचित अधिकच, उंचीच्या खूप जाड, ठोकळेवजा अशा तीन लाकडी मूर्ती आहेत. मूर्ती कसल्या! ठोकळेच आहेत. अगदी बेढब. पण डोळ्यात भरून उरण्याइतके मोठे. त्यातला आपल्या उजवीकडला जगन्नाथ. त्याचेच हे मंदिर. त्याच्या उजवीकडे सुभद्रा. आणि तिच्या उजवीकडे म्हणजे आपल्या डावीकडे बलराम. त्यातली सुभद्रा इतर दोघांपेक्षा एखादा फूट कमी उंच. जगन्नाथाच्या तोंडाचा रंग काळा. सुभद्रेच्या तोंडाचा पिवळा आणि बलरामाचा तोंडाचा पांढरा. त्या ठोकळ्यावर नाकाच्या जागी किंचीतसा उंचवटा दाखवलेला. तोंडाच्या जागी दोन तीन अर्धवर्तुळाकार रेषा रंगवलेल्या. डोळे म्हणजे प्रचंड वर्तुळे. पाय, कान, वगैरे काही नाही. हात फक्त जगन्नाथाला आणि बलरामाला. तेही दोन भुंडे दांडे मान असावी तिथून पुढे आलेले. जगन्नाथाच्या शेजारी एक भले मोठे चक्र एकंदर परिणाम भयानकाचाच होता एखाद्या वन्य जातीचे प्रचंड देव पाहिल्यासारखे वाटत होते. याच देवाची वर्षातून एकदा रथयात्रा निघत असते. तिच्यासाठी लाबलाबून लाखो लोक इथे येतात, रथाच्या दोराला आपला हात लागावा यासाठी धडपडत कित्येक चेंगरून मरतात. कित्येक चेंगरून मराया-साठीच येतात. कारण त्याहून थोर भाग्य दुसरे नाही.

दर्शन घेऊन यात्रेकरु बाहेर पडू लागले म्हणजे पंड्ये त्याच्या पाठीवर

वेताच्या छडीने मारतात. तो जगन्नाथाचा प्रसाद असतो. पुरीत वेताचे वेटोळे विकत घेऊन ते मथुरेजवळ वृंदावनात दाऊजीच्या (बलरामाच्या) मंदिरात वाहायचे अशी पद्धत आहे. अशी वेताची वेटोळी घेतलेले शे-पाऊणशे लोक आम्ही भुवनेश्वरात पाहिले होते.

जगन्नाथाचे देऊळ भुवनेश्वरातल्या लिंगराजासारखेच भव्य आहे. आणि इथेही तशीच 'नायिका', मिथुने आणि संभोग-शिल्पे वगैरे आहेत. पण ती रेखीव नाहीत. वास्तविक बाराव्या शतकातले म्हणजे ओरिसा शैलीच्या उत्कर्षकाला-तले हे मंदिर. पण इथल्या मूर्ती बेढब वाटतात. आवारात इतर देवळांची खूप गर्दी आहे. मुख्य देऊळ एका बाजूने पडू लागले आहे. त्याला लोखंडी खांबाचा आणि तुळ्यांचा आधार दिला आहे. हे सगळे मूळ वास्तुशी विसंगत आहे. ठिकठिकाणी कबुतरानी घरे केली आहेत. त्याच्या विष्ठेची आणि इतरही घाण देवळाभोवती बरीच आहे. बऱ्याच मूर्ती रंग लावून विद्रूप करुन टाकल्या आहेत. त्यामळे एकण परिणाम शन्य. किंबहुना विरस करणारच होतो. भुवनेश्वर आणि कोणार्क नंतर तर हे विशेषच जाणवते.

दोरखंडानी वेढलेल्या पिंडीसारखे दिसणारे मोठमोठे कंबरभर उंच दगड आवारात ठिकठिकाणी आहेत. ते 'असुर' आहेत असे कुळकर्णींनी सांगितले. आवारातल्या अनेक देवळात एक गोपाळकृष्णाचे देऊळ आहे. त्यात एक कंदर्परथाचे शिल्प कोरलेले आहे. 'कंदर्परथ' म्हणजे गोपींनी एकीशेजारी एक, एकीवर एक, असे एकमेकींच्या आधाराने उभे राहून रथासारखी रचना केली आहे आणि त्याच्या आत एका गोपीवर कृष्ण बसला आहे. म्हणजे एकीकडे अ-नागर आदिवासी अनघड ओंडका जगन्नाथ आणि दुसरीकडे केवळ शिल्पातच शक्य अशी गोपींची रचना करून त्याच्यामध्ये बसलेला अतिनागर कृष्ण अशी दोन टोके इथे एकत्र आली आहेत. अशा रथाची कल्पना वात्स्या-यनाच्या कामसूत्रांत नाही, किंवा असे शिल्प खजुराहो—कोणार्कमध्ये नाही.

ह्याच जगन्नाथ मंदिरात जयदेव कवी आपले 'गीतगोविंद' गात असत आणि ते व त्याची पत्नी पद्मावती गायन—नर्तन करीत असत. जयदेवाच्या गीतगोविंद काव्यातसुद्धा कृष्णाच्या संभोग व विप्रलंभ शृंगाराचे सर्व प्रकार नादमधुर शब्दात आणि विविध रागात (काही ठिकाणी) अत्यंत उत्तानपणे वर्णिलेले आहेत, पण त्यातही 'कंदर्परथाचे' सूचक असे वर्णन नाही. हे शिल्प शिल्पकाराच्या कल्पनेची निर्मिती आहे आणि कृष्णभक्तांचे ते प्रिय दृश्य असावे.

मात्र शिल्प म्हणून एकीत एक गुतवलेल्या त्या आकृती अत्यत प्रेक्षणीय आहेत. भक्ताची कल्पनाशक्ती किती आणि कोणती रूपे घेईल त्याला मर्यादा नाही.

सर्व देवळे पाहून झाल्यावर बाहेर पडून आम्हीही शेजारच्या दुकानातून प्रसादाचे लाडू विकत घेतले. इतरही काही खरेदी केली आणि परत धर्मशाळेत येऊन मारवाड्याच्या ढाब्यात जेवलो. जेऊन धर्मशाळेत येतो तो मधल्या चौकात शेदीडशे लोक लाबोळ्या पोहऱ्यासारख्या खापराच्या भाड्यातून वरण-भाताचा जगन्नाथाचा प्रसाद खात बसलेले दिसले.

इकडे पाथरवटाना पथुरिया म्हणतात. पुरीतल्याच नव्हे तर संबंध ओरिसा-तल्याच मदिरांतले दगड घडण्याचे आणि मूर्ती कोरण्याचे काम त्या पथुरियानीच केलेले आहे. काल संध्याकाळी बाजारात सुंदर, डौलदार बाध्याच्या, लयदार वळणाच्या, पिवळसर रंगाच्या दगडाच्या मूर्ती पाहिल्या होत्या. पुरीत 'पथुरियासाही' नावाची त्याची स्वतत्र वस्ती आहे, आणि तिथे हे काम होते असे कळले. तेव्हा म्हटले बाजारात मूर्ती घेण्यापेक्षा जिथे त्या बनवल्या जातात तिथेच जाऊन त्या घ्याव्या म्हणून 'पथुरियासाही'कडे निघालो.

दुपारचे बारा वाजून गेले होते. मोठा रस्ता सोडून आडव्या रस्त्याला लागलो, तर सगळीकडे शुकशुकाट. घरे-दारे बद. हिवाळा असल्यामुळे ऊन भगभगीत नव्हते, पण सावल्या अधिकच काळ्या दिसत होत्या. त्यामुळे छाया-प्रकाशाचा विरोध विशेष जाणवत होता. वाटेने कुठे अगाचे मुटकुळे करून डोळे मिटून पेंगत पडलेले एखादे कुत्रे, किंवा सगळ्या जगाबद्दल बेफिकीरपणा दाखवीत स्वस्थपणे रवथ करीत बसलेली गाय दिसत होती. पण माणूस मात्र क्वचितच जातायेताना दिसे. असेच अधूनमधून दिसणाऱ्या एखाद्याला विचारीत विचारीत आम्ही अखेर 'पथुरियासाही'त पोचलो. दोहो बाजूना दहापधरा घरे असलेली एक आळी होती ती एका महाराण्याचे नाव कळले होते, त्याचे घर, विचारपूस करीत, गाठले पण महाराणा घरी नव्हते. आणि कोणी मूर्तीही घडीत नव्हते.

मग साही'त थोडेसे हिंडलो. विलक्षण शांतता होती, दोनचार घराच्या ओट्यांवर एक-एक, दोन-दोन, पथुरिया जगन्नाथाच्या मंदिराच्या लहानमोठ्या प्रतिमा संगजिऱ्यांत कोरीत बसलेले दिसले. पण आम्हाला त्या नको होत्या. एक तर प्रवासात त्या साभाळणे कठीण, आणि शिवाय आग्र्याहून आणलेल्या ताजमहालाच्या प्रतिमाचे घरी आणल्यावर जे होते तेच ह्याचे व्हायचे.

आम्हाला हव्या होत्या तशा दगडाच्या मूर्ती कोणी घडीतही नव्हते आणि कुठे तयारही नव्हत्या. पण गल्लीबोळात हिंडून का होईना, पथुरियासाही पाहायला तर मिळाली! एवढे समाधान बरोबर घेऊन आम्ही धर्मशाळेत परतलो.

थोडी विश्रांती घेऊन मूचीसाहीत गेलो. तिथे काही चामड्याच्या वस्तू घेतल्या. खादीभांडारात जाऊन चांदीची जाळीदार कर्णफुले वगैरे घेतली. पण एकंदरीत भुवनेश्वरातल्याप्रमाणेच इथेही गिऱ्हाइकाबद्दल बेपर्वाईच. सध्याकाळी धर्मशाळेसमोरच्याच बाजारातून आम्हाला हव्या असलेल्या दगडाच्या मूर्ती, दगडाच्या इतर वस्तू, ताब्यापितळेची भांडी वगैरेंची खरेदी केली आणि रात्रीच्या पुरी-हावडा एक्स्प्रेसने पुरीहून कलकत्त्याला रवाना झालो.

मनात विचार जगन्नाथासंबंधीच चालले होते. हा देव कोणाचा? केवळ ब्राह्मणाचा खासच नाही. इथे कोणत्याही प्रकारची शिवाशीव नाही. कोणाच्याही हातचा प्रसाद कोणालाही चालतो. इथे पद्धत अशी आहे की, देवाची सेवा शबराच्या वंशजानीच करावी. कवी विद्यापतीच्या ब्राह्मणपत्नीच्या वंशजानीच पुरोहितपण करावे. आणि कवी विद्यापतीच्या शबरपत्नीच्या वंशजांनीच स्वयपाक करावा.

म्हणजे हा देव शबरांचा आणि वैष्णवाचा आहे. त्यातही प्राधान्य शबराना कोणी म्हणतात, त्यात बौद्धाचाही संबध आहे. कारण पुरी हे बौद्धांच्या महायान पथाचे केंद्र होते. त्याच्या मते बलराम, सुभद्रा आणि जगन्नाथ हे बुद्ध, धम्म आणि संघ याचे निदर्शक आहेत आणि जगन्नाथाच्या शेजारचे चक्र हे बुद्धाचे धर्मचक्र आहे.

जगन्नाथासंबधीच्या कथाही गुंतागुंतीच्या आहेत. एक कथा अशी आहे की, जगन्नाथाचे मदिर नीलाचल नावाच्या टेकडीवर आहे. (ते आता जाणवत नाही). तिथे एका शबराजवळ इद्रनीलमण्याची एक सुदर मूर्ती होती. राजाने ती त्याच्याजवळ मागितली पण ती त्याने दिली नाही. राजा अस्वस्थ झाला. पण रात्री त्याच्या स्वप्नात दृष्टात झाला की, 'रोहिणी कुडात तुला एक ओंडका मिळेल. तो आणून त्याची तू मूर्ती घडवून घे.' ओंडका सापडला पण शबराचा हात लागला तेव्हाच तो उचलला गेला. नतर मूर्ती करणाऱ्याने अट घातली की, 'संबध मूर्ती तयार होईपर्यंत मध्येच मी ती कोणाला पाहू देणार नाही.

पण राजाने हट्ट धरून ती पाहिली तेव्हा ती अर्धवट घडवलेली होती. मूर्तिकाराने काम बंद केले. ती अर्धवट घडवली गेलेली मूर्ती म्हणजेच जगन्नाथ. दुसरी कथा अशी की, शबराचा बाण तळपायात घुसून कृष्णाला मृत्यू आला. त्यानंतर त्याच्या देहाला अग्निसंस्कार केला तेव्हा अग्नीने त्याच्या सगळ्या देहाचा स्वीकार केला नाही, कारण कृष्णाने बऱ्याच वेळा कपटाचरण केलेले होते. पण कित्येक दिवस चिता जळत ठेवली तरी धड काही जळेना. नंतर आकाशवाणी झाल्यावरून शव समुद्रात सोडण्यात आले. समुद्रातून वाहत सध्या जिथे पुरी आहे तिथे ते समुद्रकिनाऱ्याला लागले. तोपर्यंत त्याचा लाकडाचा ओंडका झाला होता. तोच जगन्नाथ. बलराम आणि सुभद्रा मागून आले.

जेव्हा आषाढ हा अधिक मास असतो तेव्हा नव्या ओंडक्याच्या नव्या मूर्ती बनवून त्याची प्रतिष्ठापना करतात आणि जुन्या मूर्ती एका विहिरीत टाकतात. ह्या नव्या मूर्तींना 'नवकलेवर' म्हणतात. ही नवकलेवरे बसवण्याच्या वेळी जगन्नाथाच्या जुन्या मूर्तीच्या पोटातून एक वस्तू काढून नव्या मूर्तीच्या पोटात ठेवून तोंड बंद करतात. या विधीला 'परिवर्तन' म्हणतात. हे काम करणाऱ्या माणसाचे डोळे आधी कापडाची पट्टी बांधून बंद करतात आणि त्यावर पुरीच्या राजाच्या राजमुद्रेचे ठसे उठवतात. तसेच त्याच्या हातांनाही जाड फडकी गुंडाळतात. त्यामुळे आपण कोणती वस्तू काढीत आहोत हे त्याला कळत नाही. कोणी म्हणतात तो बुद्धाचा अवशेष आहे. कोणी म्हणतात तो शाळिग्राम आहे. आणखी कोणी म्हणतात ते ब्रह्म आहे. एकूण ते एक गूढच आहे.

असे हे भारतातल्या चार धामांपैकी पूर्वेकडले धाम 'पुरी', आणि असा हा तिथला 'पद अंगुलि नाहि हाथ। दारुब्रह्म जगन्नाथ ॥'

# तळघरातल्या सुंदरी

मराठी वाङ्मयाच्या इतिहासाच्या प्रत्येक पुस्तकात 'जेणे रसातळउणु मत्स्यरूपें वेद आणियले। मनुशिक्क वाणियले। तो संसारसायरतारण मोहतो रात्रो नारायण।' हे पद घेतलेले असते. ते कल्याणीच्या सोमेश्वर चालुक्याच्या 'मानसोल्लास' अथवा 'अभिलषितार्थचिंतामणि' ह्या ग्रंथातले आहे. सहज कुतूहल म्हणून तो ग्रंथ चाळून पाहिला तेव्हा तो एक ज्ञानकोशच आहे असे दिसून आले. त्यात इतरही पदे आहेत. तसेच 'धवळे आणि 'ओव्या' ह्या मराठी छंदाचाही उल्लेख आहे. त्या काळी, म्हणजे बाराव्या शतकात, महाराष्ट्रातल्या स्त्रिया कांडताना ओव्या म्हणत असत असे दिसते. कारण 'ओवी गेया तु कण्डने।' असे त्यात म्हटले आहे. 'आणि विवाहे धवलो गेयो।' अशीही ओळ आहेच. आणि हे उल्लेख महदंबेचे धवळे आणि ज्ञानेशाची ओवी लिहिली गेली त्याच्याही सव्वाशे वर्षे आधीचे आहेत.

असा हा ग्रंथ जिथे रचला गेला ती कल्याणी पाहावी असे मी कितीतरी वर्षे मनाशी म्हणत होतो. अखेर एकदा हैदराबादला गेलो असताना कल्याणीला गेलो.

मे महिन्याचे दिवस होते. दुपार नुकतीच उलटून गेली होती. बसमधून उतरल्यावर जवळच्याच एका दुकानाच्या ओट्यावर, दुकानदाराची परवानगी घेऊन, मी थोडा वेळ हुश्श करीत बसलो. वॉटर बॉटलमधल्या पाण्याने तोंड धुतले. जवळ फराळाचे होते, त्यातले थोडेसे खाल्ले. पाणी प्यायलो. ताजेतवाने वाटले. हॅव्हरसॅक आवरायला लागलो. तेवढ्यात दुकानातले एक गृहस्थ म्हणाले, 'कुठून आलात हो?'

'हैदराबादहून.'

'काय काम आहे इथं?'

'तसं काही काम नाही. तुमचं हे गाव—तुमची कल्याणी पाह्यला आलो.

आणखी असेच थोडेसे बोलणे झाले. दुकानातला एकजण दुसऱ्याला म्हणाला, 'आ, अवरु येन् हेळ्तारऽ नीव येन् केळतिरी? नान् हेळतिनि निमगे. अवरु पुणे अथवा मुबई आगबेकु. आरे मात ह्यांग आडतार केळोल्ल्या?'

कल्याणी कर्नाटकात आहे. तिथल्या लोकांना मराठी येते. पण त्यांची भाषा कानडी आहे.

मग माझ्याकडे वळून तो म्हणाला, 'तुमच मराठी आमच्यासारख नाही. तुम्ही पुण्याचे की मुंबईचे?'

मी म्हटले, 'मी हल्ली मुंबईला असतो. पण मूळचा हैदराबादचाच आहे. आणि आता हैदराबादहूनच तुमची कल्याणी पाहायला आलो.'

'माणिक प्रभू इथल्लेच की. सदानदबाबाच मठ पाहून जा. आणखी काय म्हणजे, पीर बादशहाच मसजिद आहे. किल्ला आहे '

बोलणे आवरते घेऊन मी गाव पाहायला निघालो. दुकानदाराने दाखवलेल्या वाटेने पीर बादशहाच्या मसजिदीकडे निघालो.

मी कल्याणी पाहायला आलो होतो, पण काय काय पाहायला मिळेल ह्याची मला कल्पना नव्हती. कारण औरंगजेबाने आपल्या दक्षिणेतल्या मोहिमेत जे अनेक पराक्रम केले त्यांत त्या वेळी विजापूरकराच्या ताब्यात असलेली कल्याणी जमीनदोस्त, बेचिराख केली होती. काही गावे उद्ध्वस्त होतात आणि उद्ध्वस्तच राहतात. काही पुन्हा उठून उभी राहतात. कल्याणी पुन्हा उभी राहिली होती. पण तिचे मूळ रूप किती शिल्लक असेल! कदाचित फक्त रस्ते मुळातले असतील. किंवा तेही नसतील.

मी चालू लागलो तशी माझ्या आगेमागे दहापाच लहानमोठी शाळकरी मुले गोळा झाली. आणि माझा खाकी प्रवासी पोशाख, हॅव्हरसॅक, वॉटर बॉटल, गळ्यातून लोंबणारा कॅमेरा ह्यांच्याकडे डोळे विस्फारून पाहत माझ्याबरोबर चालू लागली. त्यांच्याशी बोलत, गावाबद्दल काहीतरी विचारीत चाललो होतो. कुठे एखादा हिंदू शिल्पाचा खांब, एखादी तुळई दिसते का म्हणून रस्त्याच्या डाव्या-उजव्या बाजूला पाहत होतो. थोडेसे चालून गेल्यावर मी त्या मुलांना विचारले,

'पीर बादशहा मसजिद अजून किती लांब आहे?'

मी कशाबद्दल विचारतो आहे हे न कळल्यासारखे प्रश्नार्थक चेहरे करून ती माझ्याकडे आणि एकमेकाकडे पाहू लागली. मी काय विचारले, कशाबद्दल विचारले हे जणू त्याना कळलेच नव्हते. जाताजाता थोड्या वेळाने मी एका मशिदीच्या दाराशी जाऊन पोचलो. तिथे एक मध्यम वयाचा मुसलमान उभा होता. त्याला मी विचारले. तो म्हणाला,

'ही काय. हीच पीर बादशहाची मसजिद. आप कहांसे आए?'

'हैदराबादसे.' आणि मुलांकडे पाहून म्हणालो, 'तुम्ही इथले आणि तुम्हांला ही मसजिद ठाऊक नाही?'

जणू काय मला माहिती दिल्याप्रमाणे ती म्हणाली, 'ही तर आमची शाळा!'

मोलिएरच्या नाटकातल्या त्या सद्‌गृहस्थाला जसे आपण रोज बोलतो तेच गद्य हे ठाऊक नव्हते, तसेच आपण जिथे रोज चारपाच तास बसतो तीच पीर बादशहाची मसजिद हे त्या मुलांना माहीत नव्हते. आता माहीत झाल्याने विशेष फरक पडला असेही दिसले नाही.

तो दारातला गृहस्थ माझ्याबरोबर आत आला आणि पटागणातल्या एका थडग्याजवळ नेत मला सांगू लागला,

'यह पीर बादशहा का चिल्ला है. मजार नीलगा शरीफ में है.'

पण माझे लक्ष त्याच्याकडे नव्हते. त्याच्याशी काही तरी बोलत मी मशिदीकडे पाहत होतो. मशीद चागली प्रशस्त आणि भक्कम आहे हे पाहिल्याबरोबर दिसलेच.

मशिदीचे खांब, तुळया वगैरे साहित्य हिंदू शैलीचे दिसत होते. 'मानसोल्लासा'त इमारती कशा बाधाव्या, मूर्ती कशा घडाव्या, चित्रे कशी रंगवावी, रगाचे मिश्रण कसे करावे ह्याचीही माहिती आहे. चालुक्यांच्या कल्याणीचेच हे अवशेष असतील का?

याज्ञवल्क्य स्मृतीवर 'मिताक्षरा' ही सुप्रसिद्ध टीका लिहिणारा विज्ञानेश्वर कल्याणीचाच होता. ज्ञानेश्वराने रामदेवराव यादवाची जशी स्तुती केली आहे, तशीच विज्ञानेश्वराने विक्रमाङ्कदेव चालुक्याची केली आहे. आणि कल्याणीबद्दल तो म्हणतो, 'नासीदस्ति भविष्यति क्षितितले कल्याणकल्पपुरम्।' विज्ञानेश्वर तर कल्याणीचाच होता. पण काश्मीरात जन्मलेल्या आणि केरळापर्यंत हिंडून आलेल्या बिल्हण कवीलाही विक्रमाङ्कदेवाची राजसभा आणि त्याची ही राजधानी कल्याणीच आवडली. आणि इथेच तो स्थायिक झाला. कल्याणीबद्दल तो म्हणतो, 'रात्रीच्या वेळी इथल्या उच्च प्रासादांतल्या दिव्याच्या प्रकाशामुळे आभाळाला काजळाची कळा येते. इथल्या स्त्रियांच्या गौरवर्ण मुखकातीमुळे चद्र लोपल्यासारखा होतो आणि तो कुठे आहे असा रोहिणीला भ्रम पडतो.'

मला वाटेने गौरवर्ण स्त्रिया कुठे दिसल्या नाहीत आणि उच्च प्रासादही दिसले नाहीत. पण मी पाहत होतो ते खांब कदाचित त्या प्रासादाचेच असतील!

मी मशीद पाहत फिरत असतानाच मी नवखा आहे आणि गाव पाहायला आलो आहे हे ओळखून तिथेच असलेले एक हिंदू गृहस्थ पुढे झाले आणि म्हणाले,

'पलिकडेच मागच्या बाजूला शहा खैरुद्दीनच विहीर आहे. पाहायच असल तर दाखवतो.'

पीर बादशहाचा चिल्ला दाखवणारा मुसलमान गृहस्थ एव्हाना नाहीसा झाला होता. 'विहिरीत काय पाह्यच ?' मी मनाशी म्हटले. पण त्या गृहस्थाना म्हटले, 'चला !' नाही तरी कल्याणीत आपल्याला नेमके काय पाहायला मिळणार आहे हे मला कुठे ठाऊक होते ?

मोठी, लांबट चौकोनी आकाराची, पायऱ्यांची विहिरीसारखी विहीर होती. तशा विहिरी मी हैदराबादला पाहिल्या होत्या. पण पायऱ्या उतरत मी खाली जाऊ लागलो आणि अर्ध्यावर जाताच एकदम आठनऊ शतके मागे खेचला गेलो. विहीर शभर-दीडशे वर्षांपूर्वीच बांधलेली आहे. पण तिच्या भिंतीत तीन-चार फूट उचीच्या सुदर मूर्ती ठिकठिकाणी बसवलेल्या आहेत. आणखी खाली उतरायचे विसरून मी त्यांच्याकडेच पाहत राहिलो. त्रिभग, अर्ध्या उठावाच्या अभंग मूर्ती आहेत. औरंगजेबाच्या हुकमावरून त्याच्या लोकानी गाव बेचिराख केले असेल. पण हुकमाची तामिली करणाऱ्यांनी मूर्ती फोडून त्याची खडी केली नाही ही केवढी मेहेरबानी म्हटली पाहिजे ! विहीर मुसलमानाने बांधलेली आहे. त्याला मूर्ती निषिद्ध. त्याने कोणत्या हेतूने तिथे मूर्ती बसवल्या असतील कोण जाणे ! पण त्या प्राचीन मूर्ती तिथे सुरक्षित राहिल्या आहेत एवढे खरे. पीर बादशहाच्या मशिदीतले खाब त्या काळातल्या मदिराचे, आणि मूर्तीही कदाचित त्याच काळातल्या मदिरांतल्या असतील !

तिथून ते गृहस्थ माझे वाटाड्येच झाले. माझ्याबरोबर हिंडायला ते रिकामे कसे ह्याचे नवल वाटून मी त्यांना सहज त्याचे नाव विचारले. ते म्हणाले, 'हणमतराव.' मी म्हटले, 'उद्योग काय करता ?' तेव्हा कळले की ते काहीच उद्योग करीत नाहीत. 'काहीच न करता चालत कस ?' हे विचारण्याचे मनात आले, पण विचारले नाही. मनाशीच म्हटले, 'त्याच चालत असल तर आपल्याला काय पंचाईत ? आणि गप्प बसलो.

विहीर पाहून वर आल्यावर हणमतराव म्हणाले, 'किल्ला पाहायला जायच आहे. वाटेवरच "परुषकट्टे" आहे. ते पाहून किल्ल्याकडे जाऊ '

'"परुषकट्टे" हे काय आहे?'

'ते एक स्थान आहे. तिथं बसून बसवेश्वर दानधर्म करीत असत. स्थान तेच आहे, पण मूळच वास्तू पाडून त्याच्या साहित्यातून मुसलमानांनी शेजारीच "मसजिद कसाबा" (कसाबाची मसजिद) बांधल आहे.'

खरेच! चालुक्यांची कल्याणी 'बसवकल्याणी' ही आहे. वेद, जातिभेद, स्त्री-पुरुषभेद, विटाळ-चांडाळ न मानणारा महानुभाव पंथ तेराव्या शतकात महाराष्ट्रात स्थापन झाला. पण त्याच्याही आधी बाराव्या शतकात ही मते मांडून शिवाय, ज्याने त्याने आपल्या आवडीचा व्यवसाय करावा आणि फक्त आवश्यक तेवढे द्रव्य मिळवावे असे सांगणारा, 'कायकवे कैलासा' अशी श्रमप्रतिष्ठा सांगणारा, लिंगायत पंथ बसवाने ह्या कल्याणीतच स्थापला

'परुषकट्टे' हा एका वाड्यातला एक ओटा आहे वाड्याला आज तरी बांधकामाचे वैशिष्ट्य काही नाही. पण मन आठ शतके मागे जाते. बसवाला जैनांचा आणि ब्राह्मणाचा फार विरोध झाला आणि अखेर त्याला कल्याणी सोडावी लागली.

'परुषकट्टे' आणि 'मसजिद कसाबा' पाहून किल्ल्याकडे जाताना मी हणमंतरावांना विचारले, 'बसवेश्वरांनी आपल्या "शिवानुभव मंडपा"त अक्क महादेवीला प्रवेश दिला म्हणतात. तो मंडप कुठं होता? आता तिथं काय आहे?'

'मी ब्राह्मण आहे. मला लिंगायतांचं इतकं ठाऊक नाही.'

किल्ल्याकडे जाताना रस्त्याच्या बाजूला एक मशीद होती. हणमंतराव म्हणाले, 'हे "मसजिद सियासंग," म्हणजे काळ्या दगडाचं मसजिद.' काळ्या दगडाचीच आहे.

हिचेही सगळे खांब, तुळ्या वगैरे जुन्या हिंदू मंदिराच्या आहेत. पीर बादशहाच्या मसजिदीसारख्या.

मी हणमंतरावांना म्हटले, 'आपण इतक्या मशिदी पाहिल्या. त्यांचे दगड सगळे हिंदूंच्या मंदिराचेच आहेत. एखादं जुनं मंदिर शिल्लक आहे का कल्याणीत?'

ते म्हणाले, 'एक सोमेश्वराचं देऊळ आहे. तिथं एक तळंही आहे. पण ते गावापासून फार लांब आहे. ते पाहून येईपर्यंत फार उशीर होईल. तुमची बस चुकेल. आपल्याला अजून किल्ला पाहायचाय.'

आमचे हे बोलणे चालले आहे तोच आम्ही किल्ल्यासमोर येऊन पोचलो. आत खूप मोठे पटांगण आहे. बाजूच्या ओवऱ्यांत काही उभ्या, काही आडव्या, काही धड अशा मूर्ती ठेवलेल्या आहेत. चालुक्याचा, कलचुरींचा आणि मुसलमानांचा इतिहास मनापुढून सरकत होता. मी पुन्हा पुन्हा मागेपुढे होत, जवळून-लांबून मूर्तींकडे पाहतो आहे हे लक्षात येऊन किल्ल्यात शिरल्यापासून आमच्याबरोबर फिरणारा पहारेकरी मला म्हणाला, 'आप और बुत देखना चाहते हैं?'

'हैं और बुत?'

'हां. लेकिन पहले किलेके अंदर चलके एक मंदिर और महलात देख लीजिये. देर हो रही है.'

किल्ल्यात एक पूर्वाभिमुख देऊळ होते. त्याची मुसलमानांनी मशीद केली होती. आता पोलीस-ॲक्शननंतर तिचे पुन्हा देऊळ करण्यात आले आहे.

किल्ल्यातले सगळे महाल चुना लावून स्वच्छ केलेले होते. भिंतीवर एखादे चित्र किंवा जमिनीवर सतरंजीचा एखादा तुकडाही नव्हता. मी ऐकले होते की कल्याणीचे नवाब रसिक आणि चित्रकलेचे शौकीन होते. त्यांचे एकही दृश्य चिन्ह तिथे नव्हते. मात्र त्या रिकाम्या महालातून हिंडताना मला दुसरीच आठवण झाली

कर्नल मेडोज टेलर कल्याणीला आला असताना तिथल्या नवाबाची बायको भर रस्त्यात त्याच्या घोड्यासमोर आडवी आली आणि 'नवरा आपल्याला छळतो, मारतो, त्याचा बंदोबस्त करा.' अशी त्याला विनवणी करू लागली. ही नवाबीण निजामाची मुलगी होती! ती सरळ निजामाकडेच तक्रार घेऊन का गेली नाही? असे विचार मनात चालले होते. तेवढ्यात आम्ही पुन्हा पटांगणात आलो.

माझ्या पुढे होऊन पहारेकऱ्याने तिथल्या दरबारगाहच्या पुरुषभर उंच जोत्याखालचे एक दार कुलूप काढून उघडले आणि मला आत जायला सांगितले. मी क्षणभर थबकलो. त्या विस्तीर्ण पटांगणात, त्या सबंध वास्तूत तो पहारेकरी, हणमतराव आणि मी असे तिघेच होतो. त्यातून मी अगदी नवखा. सूर्य मावळायला आलेला, आणि पहारेकरी म्हणतो, 'आत जा.' एखाद्या रहस्यमय, भयजनक कादंबरीच्या पानांत शिरतो आहे असे मला वाटले. मी मागेपुढे करतो आहेसे पाहून तोच पुढे झाला आणि त्याने मला आत नेले.

एकुलत्या एका दारातून सूर्यास्तापूर्वीचा सौम्य प्रकाश आत येत होता. आधी मला काही दिसले नाही. मग थोडेथोडे दिसू लागले. एक लांबच लांब दालन होते. त्याच्या दोन्ही अंगांना कमीअधिक भग्न अवस्थेतल्या अनेक लहानमोठ्या, डौलदार, प्रमाणबद्ध मूर्ती दिसत होत्या. काही पडलेल्या, काही टेकून उभ्या केलेल्या, राखट झालेल्या काळ्या दगडाच्या जुन्या मूर्ती. पण किती रेखीव! मला अलीबाबाच्या गुहेत गेल्यासारखे वाटले. मात्र इथे जड-जवाहीर, सोन्यामोत्यांनी भरलेले रांजण नव्हते. इथे फक्त मूर्ती होत्या. अली-बाबाला पुन्हा पुन्हा येऊन, 'तिळा उघड' म्हणून गुहेत शिरून, त्या गुहेतली संपत्ती पोती भरभरून गाढवावर लादून नेता येत होती. मला मात्र त्या संपत्तीकडे काही मिनिटे फक्त पाहणे शक्य होते. तेवढे मी होईल तितके मनसोक्त करीत होतो. बहुतेक मूर्ती स्त्रियांच्याच होत्या. शहा खैरुद्दीनच्या विहिरीच्या भिंतीत बसवलेल्या मूर्ती आणि इथल्या ह्या मूर्ती एकाच काळातल्या असतील कदाचित!

एक एक मूर्ती पाहताना एका त्रिभंग मूर्तीने माझे लक्ष विशेष वेधून घेतले. लहानशीच होती. अडीच-तीन फूट उंचीची असेल. कोपरात दुमडून वर घेतलेल्या तिच्या डाव्या हाताच्या मनगटावर एक पोपट बसलेला होता. आणि कमानदार भुवयांची, रेखीव नाका-डोळ्यांची, सुबक जिवणी-हनुवटीची, डौलदार बांध्याची ती तरुणी मान वाकडी करून अर्धमिटल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहत होती. तिच्या प्रियकराकडून आणलेला एखादा संदेश ती लक्षपूर्वक ऐकत असेल का? की आपल्या प्रियकराकडे पोचवण्यासाठी ती एखादा संदेश त्याला देण्याच्या विचारात असेल? की नुसतीच आपण लहानपणापासून पाळलेल्या, लहानाचे मोठे केलेल्या, त्या पोपटाचे कौतुक करण्यासाठी त्याला मनगटावर घेऊन उभी असेल?—काही असो, आपल्या ऐटदार ठाणमाणाने तिने माझे लक्ष वेधून घेतले एवढे खरे. तिच्या गळ्यापासून, वक्षःस्थलावरून, नागमोडी वळणावळणाने उतरत नाभीपर्यंत आलेले नाना प्रकारचे हार; कानांतली, दंडावरची, मनगटांवरची भूषणे, आणि त्यांची भरगच्च बारीक कलाकुसर पाहिल्यावर ती तरुणी नवोढा राजवधू किंवा राजकन्याच असावी ह्याबद्दल शंका बाळगण्याचे कारणच नव्हते.

दारातून फारच थोडा प्रकाश आत येत होता. आणि तोही कमी होत चालला होता. तिच्या सख्या-दासी थोड्या मागे, पण जवळच कुठेतरी अस-तील. होत्या खऱ्या. पण नीटशा दिसत नव्हत्या. राणीवशातसुद्धा राणीच्या

किंवा राजकन्येच्या दासी जवळपासच पण थोड्याशा मागेच नसतात का? तसेच. दिवसाची वेळ असती आणि मलाही वेळ असता तर त्या तळघरात आणखी पुढे जाऊन तिथे आणखी किती शिलासुंदरी आहेत ते पाहिले असते. पण आता जवळजवळ दिसेनासे होऊ लागले होते. बस सुटण्याची वेळ जवळ येत चालली होती. बस चुकवून चालले नसते. लवकर बाहेर पडणे भागच होते. त्या तळघरातल्या राणीवशात अर्धे मन गुंतलेले ठेवून मी बाहेर पडलो.

'मानसोल्लासा'त मराठी पदे घालणाऱ्या, 'धवळे' आणि 'ओवी' ह्या मराठी छंदाचा, मराठी माणसाच्या खेळाचा, सणाचा उल्लेख करणाऱ्या सोमेश्वर चालुक्याची कल्याणी मला पाहायची होती. ती मला पाहायला मिळणार नाही हे मला ठाऊक होते. मी नुसती त्या कल्याणीची भूमी पाहायला आलो होतो. सोमेश्वर चालुक्याची नसेल, पण चालुक्याची कल्याणी मला दिसली. पीरबादशहा आणि सियासंग या मसजिदींचे दगडी खांब आणि तुळ्या, शहा खैरुद्दीनच्या विहिरीच्या भिंतीतल्या आणि दरबारगाहच्या तळघरातल्या त्या सुंदर मूर्ती, ह्याच्या रूपाने चालुक्याची कल्याणी अजून तिथे आहे. ती मी पाहिली. हे काय थोडे झाले?

सगळा गाव-ओलांडून पुन्हा बस-स्टॉपकडे जाऊ लागलो तेव्हा मला पुन्हा पहिल्याने ज्या दुकानाच्या ओट्यावर मी विसावलो होतो, त्या दुकानावरूनच जावे लागले. मला पाहून दुकानदाराने विचारले,

'पाहिलात की आमचं कल्याणी?'

'पाहिलो.' मी कानडी-मराठीत उत्तर दिले. पण काय पाहिले ते मी त्याला सांगितले नाही. त्यानेही विचारले नाही. कल्याणीच्या किल्ल्यातल्या त्या तळ-घरात अनेक सुंदरी कोंडून ठेवलेल्या आहेत ते त्याला माहीतही नसेल. आणि असले तरी काय? त्याच्या लेखी त्या सुंदरी म्हणजे पाचपन्नास फुटक्यातुटक्या जुनाट दगडी मूर्ती. बस्स!

• ६ •

# दूरदेशचे पाहुणे

माझ्यासमोर टेबलावर एक फोटो आहे. आहे वर्तमानपत्रातूनच कापलेला. त्यात एक बदक पोहताना दाखवलेले आहे. खाली मजकूर आहे : दर हिवाळ्यात सायबेरियाहून नवेगावबांधच्या तळ्यावर येणाऱ्या शेकडो बदकांपैकी एक. आपल्या गावठी बदकापेक्षा चोच थोडी मोठी दिसते आहे. कदाचित् खरेच मोठी असेल. कदाचित् फोटोत तशी दिसत असेल. कोण जाणे.

दर हिवाळ्यात सायबेरियातून, तिबेटातून, मध्य आशियातून, हजारो मैलांवरून वेगवेगळ्या जातींचे हजारो पक्षी हिंदुस्थानातल्या तळ्यावर येतात आणि हिवाळा संपला की परत जातात. आपण मात्र देशातल्या देशात जाऊन ते पाहत नाही हे काही बरे नाही. तेव्हा म्हटले, एकदा नवेगावबांधला गेले पाहिजे.

पण नवेगावबांधला जायचे म्हणजे नागपूरला गेले पाहिजे. तेवढ्यासाठी मुद्दाम काही आपण नागपूरला जाणार नाही. कधी गेलो तर मात्र नवेगावबांधला जायचेच असे ठरवले होते. एकदा नागपूरला गेलो असताना तिथल्या लोकांना विचारले. म्हणाले, 'दीड-दोनशे मैल लांब आहे. बसने गेले पाहिजे. तिथे राहण्याची सोय आहे. पण परवानगी आधीपासून काढावी लागते.' वगैरे वगैरे. [illegible] राहिले. आणखी एकदा गेलो तेव्हा दुसरे एक गृहस्थ म्हणाले, 'नवेगावबांध ना? वा', छान बेत आहे. एक स्टेशन वॅगन घेऊन आपण [illegible] आपल्या हातात आहे. तिथे फॉरेस्टचा उत्तम राजेशाही बंगला आहे. फॉरेस्टमध्ये आपली ओळख आहे. बंगला रिझर्व्ह करून टाकू. मस्त मजा येईल.' ती मजाही शब्दातच राहिली. परंतु दरम्यान योगायोगाने नवेगावबांधलाच वन-विभागात अधिकारी असलेल्या पक्षिमित्र मारुतिराव चितमपल्लींची आणि माझी ओळख झाली. त्यांना मी माझा बेत सांगितला. ते म्हणाले, 'फारच चांगले. जरूर या. मी सगळी सोय करीन.'

त्यामुळे पुन्हा नागपूरला गेलो तेव्हा तिथल्या कोणाला न विचारता, मारुतिरावांनाच पत्र लिहिले आणि मी आणि माझी पत्नी अमुक दिवशी येत आहोत असे कळवले. त्यांचेही, नवेगावला कुठे उतरायचे, त्यांच्या घरी कसे पोचायचे ते सविस्तर कळवणारे उत्तर आले.

सध्याकाळी पाच-साडेपाचपर्यंत नवेगावबाधला पोचता येईल अशा बेताने 'जलद' बस पकडण्यासाठी एस० टी० स्टँडवर पोचलो. 'चौकशी'-खिडकीत बससबधी चौकशी केली. थेट नवेगावबांधला जाणारी बस नव्हती. साकोली-पर्यंत जाणारी होती.

मी विचारले, 'ही बस साकोलीला केव्हा पोचेल ?'

'पोचेल दोन-सव्वादोनपर्यंत.'

'पुढे ?'

'पुढे अर्ध्या-अर्ध्या तासाने गाड्या आहेत. काही चिंता करू नका.'

सुदैवाने बस प्लॅटफॉर्मला लागलेली होती. कडक्टरही प्लॅटफॉर्मवरच होता. माझा पोशाख वगैरे पाहून म्हणा किंवा तोच सभ्य होता म्हणून म्हणा, मी पुढे झाल्याबरोबर त्याने मला तिकिटे दिली आणि कुठल्या सीटवर बसायचे तेही सागितले. जागा चांगल्या होत्या. बसच्या पुढल्या भागात, खिडकीशी.

मी कडक्टरचे आभार मानीत होतो आणि त्याने परत दिलेले पैसे मोजीत होतो. अरेच्या! त्याने एक रुपया कमी दिला होता. मी परत त्याच्याकडे गेलो आणि त्याला म्हटले, 'तुम्ही एक रुपया कमी दिलात.'

तो हसत म्हणाला, 'साहेब, तुम्ही जटलमन माणस. एक रुपयाच काय इतक ? चहापाण्याला राहू द्या ! रिझर्व्हेशन केल असतत तर एक रुपया दिला असता की नाही ?'

भोवताली लोक जमू लागले होते. 'जटलमन माणूस' असल्यामुळे एक रुपयाकरता हुज्जत घालून देखावा करणे मला बरे वाटेना. त्याचेही म्हणणे खरे होते. आदल्या दिवशी येऊन रिझर्व्हेशन केले असते तर रिक्षाचा जाण्या-येण्याचा खर्च झाला असता, वेळ गेला असता आणि शिवाय इतक्या चागल्या जागा मिळाल्या असत्याच असे नाही. कडक्टरने आपल्यावर मेहेरबानीच केली असे मी स्वतःला सागितले आणि जागेवर जाऊन बसलो.

बस वेळेवर सुटली पण साकोलीला पोचेतो पावणेतीन झाले. म्हणजे अडीच वाजता पुढची बस होती, ती गेलेली असणार. आता मिळाली तर तीनची मिळेल. खाली उतरून नवेगावबांधच्या पुढच्या बसची चौकशी केली तेव्हा कळले की, अडीचची बस गेलेली नाही. ओझे उतरले. म्हटले : अडीचची बस अजून गेलेली नाही म्हणजे थोडी उशिरा, पण अडीचचीच मिळेल. निदान दिवसाउजेडी पोचू

तीन झाले. साडेतीन झाले. चार-साडेचार झाले तरी नवेगावबांधला जाणारी अडीचच्या वाजताची बस आली नाही. मध्ये एकदोन बसेस आल्या. आम्ही तिकडे धावलो. पण त्या आमच्या नव्हत्या. मिनिटा-मिनिटाने उशीर होतोसे वाटत होते. टोळक्या-टोळक्यानी गर्दी वाढत होती. आमची चिंताही वाढत होती. थंडीचे आखूड दिवस. आता केव्हाही पोचलो तरी पोचेतो अंधार होणार. निर्जन अरण्याचा अपरिचित प्रदेश. नवेगावबांधच्या बस-स्टॉपपासून मारुतिरावांचे घर किती लांब ते नक्की माहीत नाही. रात्रीच्या वेळी भलत्यासलत्याला विचारावे तरी पंचाईत. म्हणजे देशातलेच असूनसुद्धा एका परीने आम्ही दूर-देशाचे पाहुणे आहो असे वाटू लागले.

अखेर पाच वाजता नवेगावची बस आली. आता आम्हाला चिंता पडली की सगळे उतारू तिच्यावर तुटून पडणार. त्या गर्दीत आम्हाला आत प्रवेश कसा मिळणार आणि आत शिरलोच तर जागा कशी मिळणार ? तिथे जे दोन-अडीच तास बसलो होतो, त्या अवधीत नवेगावला कुठे उतरायचे ? गाव किती लांब आहे ? तिथे उतरणारे कोणी आहे का ? असे जवळपासच्या प्रवाशाना विचारीत होतो. कुणी काही, कुणी काही उत्तर देत होते. अखेर एक तरुण मुलगा नवेगावचा निघाला. एस० एस० सी० झालेला होता. मारुतिराव चितमपल्लींची त्याला माहिती होती. नवेगावबांधचा डेपो नवेगावपासून पुढे लांब होता. पण आपले गाव मागे टाकून दोन मैल पुढे नवेगावबांध डेपोपर्यंतच नव्हे, तर मारुतिरावांच्या घरापर्यंत तो आमच्याबरोबर यायला तयार झाला.

बस आल्याबरोबर त्याने आधी आमच्यासाठी जागा अडवल्या. आम्हाला जागेवर बसवले आणि आमची तिकिटेही काढून आणली. अडचणीच्या वेळी मदत करणारा कोणीतरी भेटतो एवढे खरे.

रात्री साडेसातच्या सुमाराला आम्ही मारुतिरावांच्या घराच्या दारात उभे राहिलो. घर बस-स्टॉपपासून फार लांब नव्हते. पण आत होते आणि सहज सापडण्यासारखे नव्हते. आणि खरोखरच परिस्थिती अशी होती की बस-स्टॉपवर आम्हा तिघांखेरीज कोणीही उतरले नव्हते. आणि आम्ही दोघेच असतो तर चौकशी करायला चिटपाखरूही भेटले नसते. आम्हांला पोचवल्यावर तो मुलगा लगेच परत जायला निघाला. त्याचे कोणत्या शब्दात, कसे आभार मानावे तेदेखील आम्हाला कळेना. तो गेल्यावर मारुतिराव म्हणाले, ‘अहो, हा

नवेगावच्या अत्यंत श्रीमंत व्यापाऱ्याचा मुलगा. हा तुमच्याबरोबर इथपर्यंत आला हे विशेषच म्हटलं पाहिजे.'

'आमचं नशीब थोर म्हणायचं. दुसरं काय?' मी म्हटले.

थोड्याशा इकडल्यातिकडल्या गप्पा झाल्यानंतर जेवण झाले आणि आम्हांला दिलेल्या आमच्या हॉलिडे होमच्या खोल्याकडे आम्ही गेलो.

जानेवारीची रात्र, दिवसभराच्या प्रवासाचा शीण, आणि नुकतेच झालेले ताजे-गरम जेवण, त्यामुळे अंथरुणावर अंग टाकून डोक्यावरून पांघरूण घेताच झोप लागली.

सकाळी जाग आली ती पक्ष्यांच्या वेगवेगळ्या आवाजांनी. उठून बाहेर आलो तो समोर शंभर-पन्नास पावलांवर तळे. पूर्व दिशा उजळू लागली होती. लवकरच सूर्योदय होणार असे दिसत होते. म्हणून चहा हवा होता तरी त्यासाठी न थांबता तसेच निघालो. तळ्याच्या काठाकाठाने चाललो तसे लव्हाळ्याच्या बेटांतून, गवताच्या पुंजक्यांतून, आमची चाहूल लागल्यामुळे पक्षी पंख फडफड-वीत बाहेर पडले. जणू आम्ही त्यांना पकडणारच होतो. जमिनीचा एक उभा पट्टा तळ्यात बराच आतपर्यंत गेला आहे. त्याच्या टोकाशी जाऊन उभे राहिलो. तळ्याच्या करड्यानिळ्या पाण्यावर लाटा नाचत होत्या. त्यात डोंगरांचे प्रतिबिंब पडले होते. पाणपक्षी अजून उठले नसावेत. थोड्याच वेळाने दोन डोंगरांच्या मधून सूर्याचा भला मोठा लाल गोळा वर येताना दिसला. 'जणू तापलेला उठे लोहगोल' ही लहानपणी वाचलेली ओळ आठवावी असाच लाल होता. आम्ही तळ्याच्या मध्यावर नाही, पण बरेच आत उभे होतो. काल पौर्णिमा होती. आज चंद्र थोडा उशिरा मावळत होता. तोही दिसत होता. त्यालाही फिकट सोनेरी रंग आला होता. उगवणारा चंद्र आणि मावळणारा सूर्य–किंवा उलट–एकाच वेळी एकाच जागेहून फक्त कन्याकुमारीला पाहता येतो असे म्हणतात. तो आम्ही पाहिला होता. पण तसेच दृश्य इतके लांब न जाता, इथे नवेगावबांधलाच पाहायला मिळेल असे वाटले नव्हते. पण पाहत होतो. आणि भोवतालच्या डोंगरांमुळे क्षितिज अगदी जवळ आल्यामुळे असेल, पण सूर्य आणि चंद्र हाताशी असल्याइतके जवळ वाटत होते.

काल रात्री तळ्याचा विस्तार, भोवतालचे डोंगर आणि जंगलाची दाटी ह्याची आतासारखी कल्पना आली नव्हती. नैनिताल, अबू, सावंतवाडी अशा बऱ्याच

ठिकाणी डोंगरांनी वेढलेली तळी पाहिली होती. प्रत्येकाचे स्वरूप वेगळे आहे. सूर्याच्या प्रतिबिंबाच्या सोनेरी होड्या गर्द निळ्या लाटावरोवर नाचत होत्या. पक्षीही उडू लागले होते. त्याच्याकडे पाहताना वेळ कसा गेला ते कळले नाही. पण लवकरच त्याची जाणीव झाली. त्या दिवशी तिथे संक्रांतीचा मेळा होता. म्हणून जवळपासच्या शाळातली मुले सहलीला आली होती. ती हळुहळू आम्ही होतो तिथे आली. त्यानी आपल्याबरोबर पिपाण्या, बॅण्डवाजे, डफ, वासऱ्या आणल्या होत्या. त्यांचे आवाज सुरू झाले. ही वाजत्री आपल्यासाठी आहेत ह्याची कल्पना नसल्यामुळे सायबेरियन् किंवा कोणतीच बदके तिथे येईनात. उलट, त्या गोंगाटामुळे होते तेही पक्षी पळाले. तिथे अधिक उभे राहण्यात काही अर्थ नव्हता. शिवाय उशीरही होत होता.

झटपट चहा-आघोळ वगैरे उरकून आम्ही फिरायला निघालो. तळ्याच्या काठाने जीपने जाता जाता मारुतिराव सांगत होते, 'हे तळं अकरा चौरस किलोमीटर क्षेत्रफळाच आहे. कोळी जातीच्या लोकांनी शेतीच्या उपयोगासाठी ते बांध घालून तयार केल. आता आपण पवनीला माधवराव पाटलांकडे थोड्या वेळासाठी जातो आहो. त्याच्याच घराण्याच्या मालकीच आहे ते. हे माधवराव म्हणजे एक वेगळाच माणूस आहे. ते उत्तम शिकारी आहेत. पन्नास वाघ मारले आहेत त्यांनी. पण तीनचार वर्षांपूर्वी मी त्यांची आणि सलीम अलींची ओळख करून दिली, तेव्हापासून त्यानी शिकार सोडली. इतकच नाही, तर ते आता नवेगावबाधच्या 'सलीम अली वाइल्ड लाइफ प्रिझर्वेशन को-ऑपरेटिव्ह सोसायटी'चे अध्यक्ष आहेत.

'मुंबईला जाऊन अॅक्वर्थ लेपर असायलममध्ये राहून ते कुष्ठरोगावर उपचार करायच शिकून आले आणि इथं त्या रोग्यांवर उपचार करतात. शिवाय आसपासच्या गावातल्या लोकाना आपल्या खर्चाने औषध देतात.'

एव्हाना आम्ही माधवरावाच्या वाड्यापाशी आलो होतो. देवडीतून अगणात शिरतो तो समोर ओटीवर एक गृहस्थ बसलेले दिसले. मारुतिराव म्हणाले, 'हेच माधवराव.' जवळजवळ पन्नाशीचे वय, चेहऱ्यावर कोरल्यासारख्या रेषा, पांढरे केस, हजामत थोडी वाढलेली, अंगात स्वेटर आणि खाली धोतर. दिसायला साधे पण मनात ठसेल असे व्यक्तिमत्त्व होते. आम्ही जवळ गेल्यावर मारुतिरावानी आमची परस्पर ओळख करून दिली. माझ्याजवळ पुन्हा माधवरावाची तारीफ केली. पण त्याचा चेहरा आपण कोणी विशेष नाही असा होता. शेजारी चार-

पाच वर्तमान पत्रे, दोन-चार मासिके पडलेली होती. आत भिंतीवर वाघाची, हरणाची कातडी होती. कोपऱ्यात बंदूकही होती. एका टेबलावर औषधाच्या बाटल्या होत्या. अंगणात चारदोन माणसे येऊन बसलेली होती.

थोडा वेळ त्याच्याकडे बसून चहा घेऊन आम्ही पुन्हा तळ्याकडे निघालो. आम्हाला सायबेरियाहून आलेली बदके पाहायची होती. शेतांच्या बांधांवरून, गवताच्या केसाळ किरमिजी तुऱ्यांना अंग घाशीत, त्यातले काही तोडून घेत, फर्लांग दोन फर्लांग चालून आम्ही अगदी तळ्याच्या काठाशी आलो. हे तळ्याचे अगदी दुसरीकडले टोक होते. इथे माणसाची मुळीच वर्दळ नव्हती. पण बदके कुठे होती? मारुतिरावांनी दाखवले. लांब दोनतीनशे फुटांवर काळसर-तपकिरी रंगाचे तीसचाळीस ठिपके रांगेत तरंगत चाललेले दिसले. नुसत्या डोळ्यांनी आम्हाला फक्त बदकांच्या आकाराचे ठिपके सरकताना दिसत होते. इतर काही पक्षी इकडेतिकडे उडत होते. पण एकंदरीत तळे अगदी मोकळे होते.

काही वर्षांपूर्वी डिसेंबरातच मी अहमदाबादजवळच्या 'नळ' सरोवरावर गेलो होतो. पांढरी, तपकिरी, काळी बदके, फ्लॅमिंगो, स्टॉर्क, करकोचे, पेलिकन ह्यांची तिथे कुंभमेळ्याला जमावी तशी गर्दी होती. सगळे तळे आणि तळ्यावरचे अंतराळ त्यांच्या हॅाँक्-हॅाँक्, क्रॉंव-क्रॉंव अशा आवाजांनी, पंखांच्या फडफडाटाने कोंदाटल्यासारखे झाले होते. तळ्याच्या आणि आभाळाच्या निळाईवर त्यांचे करड्या, गुलाबी, पांढऱ्या रंगांचे फराटे चितारल्यासारखे दिसत होते. आणि तळ्यात अनेक लहानमोठी बेटे होती. त्यावरच्या झाडांझुडपांवर पाणपक्ष्यांचे थव्यांच्या थवे बसत-उडत होते.

इथले नवेगावचे तळेही सुंदर, विस्तीर्ण होते. नळ सरोवराला नव्हते ते भोवताली झाडांनी झाकलेले डोंगर होते. पण इतके थोडे पक्षी पाहून माझी निराशाच झाली. मी तसे बोलूनदेखील दाखवले जणू काय इथे पक्षी कमी होते हा मारुतिरावाचाच दोष होता!

मारुतिरावांनी आम्हाला त्यांचे बायनॉक्युलर्स दिले. ते लावल्यावर मात्र बदकांची रांग अगदी जवळ—दहापंधरा फुटांवर—आली आणि त्यांचे रंग, रूप स्पष्ट दिसले. आणि बायनॉक्युलर्सच्या काचांत तळ्याचा विस्तार मर्यादित झाल्यामुळे त्यांची संख्याही गर्दी केल्यासारखी वाटली.

ताडोबाला जशी जनावरे दाखविण्याची सोय आहे तशी इथे नाही. पण नील-गायी, सांबर, चितळ, काळवीट, भेकरे वगैरे इथे असलेली जनावरे मजबूत

तारांच्या जाळ्या लावलेल्या खूप मोठ्या आवारात मोकळी सोडलेली आहेत. त्यामुळे जवळजवळ रानटी अवस्थेत ती इथे पाहायला मिळतात. एका मोठ्या पिंजऱ्यात इथे आढळणारे पक्षीही आहेत.

नवेगावबांधला दूर देशचे पाहुणे जितके पाहायला मिळतील असे वाटले होते तितके पाहायला मिळाले नाहीत हे खरे आहे. पण नवेगावबांधला गेलो नसतो तर माधवरावासारखा लोकविलक्षण माणूस पाहायला मिळाला नसता, आपल्या देशाच्या कोणत्या कोपऱ्यात कशी माणसे अबोलपणे काम करीत असतात हे कळले नसते. मारुतिराव चितमपल्लींबरोबर एक दिवस राहायला मिळाले ते मिळाले नसते आणि त्याच्या पशुपक्ष्यासंबधीच्या आणि इतर व्यासंगाची कल्पना आली नसती. आणि थोडे का होईना, पण सायबेरिया-सारख्या दूर देशाहून आलेले पाहुणे तिथे पाहिलेच की नाही ! हे काय थोडे आहे ? आता इतक्या लांबून येऊन आम्ही त्यांना पाहून गेलो हे त्यांना कळले असेल की नाही कोण जाणे. नाहीतरी आपण धडपडत, धावतपळत, धापा टाकीत जाऊन, लांबून येणाऱ्या मोठ्या लोकांना पाहतो ते त्यांना थोडेच कळते ? आपली सगळी धडपड-धावपळ 'आत्मनस्तु कामाय' असते. तसेच हे. नाही का ?

# परतीचा प्रवास

एस० टी०ची बसची व्यवस्था ही प्रवाशाच्या सेवेसाठी आहे हे आपल्याला सगळ्याना ठाऊक आहे. बसच्या दोन्ही अंगावर एस० टी०चे बोधचिन्ह गोल शिक्क्यासारखे रंगवलेले असते त्यातच हे लिहिलेले नाही का? पुन्हा एस० टी०ने प्रवास कराल तेव्हा ते पाहायला विसरू नका. ती प्रवाशांच्या 'सोयीसाठी-सुखासाठीही' आहे हे मात्र अध्याहृत समजायचं. कारण एस० टी० मधल्या 'एस' ह्या अक्षरात 'सर्व्हिस' शब्द बसतो. 'कम्फर्ट' आणि 'कन्व्हीनियन्स' हे 'सी'ने सुरू होणारे शब्द बसू शकत नाहीत. त्यामुळे एस० टी०चा निरुपाय आहे. पण सोय आणि सुख अध्याहृत आहे ह्यात शका नाही. म्हणूनच आपले एस० टी०चे बहुतेक प्रवास सुखाचे आणि सोयीचे होतात. शिवाय प्रवासाला निघायच्या आधी आपण विघ्नहर्त्या गजाननाला नमस्कार करून विनवीत असतो की, 'देवा गजानना, कृपा करून आमचा प्रवास निर्विघ्न होईल असं कर रे बाबा.' बहुतेक वेळा तो आपली प्रार्थना ऐकतो. पण एखादे वेळी कानामागे टाकतो असे दिसते. आमच्या बाबतीत एकदा असेच झाले!

दरवर्षी हिवाळ्यात हजारो मैलाचा प्रवास करून सायबेरियातली बदके भंडारा जिल्ह्यातल्या नवेगावबांधच्या तळ्यात येतात. ती एकदा जाऊन पाहिली पाहिजेत असे वाटत होते. अनेक वर्षे बेत करीत करीत या वर्षी आम्ही तो अमलात आणला नागपूरहून नवेगावबांधला जाऊन त्या बदकांचे दर्शन घेतले. आता नागपूरला परत यायचे.

थेट नागपूरला जाणारी बस दुपारी दीड वाजता नवेगावला गाठायची होती. त्या बेताने जेवणे उरकली. आमचे मित्र मारुतिराव यांनी आपल्या जीपने आम्हाला नवेगावला पोचवले. एक वाजला होता. जीप बांधला परत गेली. अर्धा तास चव्हाट्यावर कुठे बसायचे म्हणून आम्ही समोरच्या चेक-पोस्टच्या नाक्याच्या पडवीत जाऊन तिथल्या बाकावर बसलो.

चौकीदाराने विचारले, 'कुठ जायच?' मी म्हटले, 'दीड वाजता थेट नागपूरला जाणारी बस येईल ना? तिन नागपूरला जायचय.'

'थेट नागपूराची बस तर दोन दिवसापूर्वीच बंद झाली. आता येईल ती बस साकोलीपावेत जाईल. तठी तुम्हाला नागपूरची बस भेटल.'

म्हणजे नवेगावला थेट नागपूरला जाणारी बस मिळेल ही मारुतिरावांची माहिती चुकीची ठरली आणि नवेगावबांधला येताना बस बदलण्याचे जे दिव्य साकोलीला करावे लागले होते, ते आता पुन्हा परतीच्या प्रवासातही करावे लागणार! थेट बस बंद केल्याचे एस० टी०ने वर्तमानपत्रातून जाहीर केलेले असणारच. ते आपल्या कर्तव्यात कसे चुकतील? पण एक तर आम्ही गेल्या दोन दिवसात वर्तमानपत्रे पाहिली नव्हती आणि पाहिली असती तरी एस० टी०ची ही बातमी कशाला पाहिली असती? चूक अर्थात् आमचीच, एस० टी०ची नाही.

'ही बस आता किती वाजता येईल?'

'कोनाले माल्मम कवी येईन? त्याह्यचा काई भरोसा असते काय? येईन तर आता येईन, नाहीतर येईन घट्या दो घट्यांनी.'

एखादा प्रियकर जसा हातात फूल घेऊन 'शी लव्ह्ज मी. शी लव्ह्ज मी नॉट,' असे म्हणत एकेक पाकळी तोडून टाकीत आपल्या प्रेयसीचे आपल्यावर प्रेम आहे की नाही याची अटकळ बांधीत असतो, तसे मीही एखादे फूल हाताशी असते तर 'बस आता येईल, उशिरा येईल' असे म्हणत एकेक पाकळी तोडून टाकली असती. पण हाताशी फूल नव्हते, म्हणून मनाशी तसा जप करीत बसलो.

प्रवासात अधेमधे बस पकडायची म्हणजे एकंदरीत एक दिव्यच असते बहुधा आपण उभे असतो तिथून पाच-पचवीस पावले मागे किंवा पुढे बस उभी राहते. मग खांद्यावर, हातात, बगलेत सामान घेऊन आपण बसकडे धावायचे. बसमधले लोक कोणी कारणाने, कोणी विनाकारण उतरत असतात. चढणारे चढण्याच्या घाईत असतात. आपल्यासारखेच. त्यांच्याशी धक्काबुक्की करीत आत शिरायचे. शिरल्यावर जाणाऱ्या-येणाऱ्याचे धक्के खात उभ्याने प्रवास करायचा. त्याला आता शरीराची आणि मनाचीही तयारी नाही. त्यामुळे बस येईल तेव्हा आत कसे शिरायचे ही आणखी एक चिंता. जसजसा वेळ जात चालला तसतशी चव्हाट्यावर गर्दी फुगत चालली. आणि आमची मने खचत चालली.

आम्ही बसलो होतो तेवढ्यात दोनचार मोटरसायकली गावाकडे गेल्या-आल्या. एवढ्या आडबाजूला लहान गावात मोटरसायकली आहेत तेव्हा गाव

चांगलेच सधन असावे असा अंदाज केला. हा जंगलभाग आहे. जंगल कॉण्ट्रॅक्टर, लाकडाचे व्यापारी गावात असले पाहिजेत.

मी चौकीदाराला विचारले. तो म्हणाला, 'गावात दोनचार भल्ले श्रीमंत लोक आहेत; त्यांचेच पोरं आहेत हे. मालदार लोक आहेत.

एकंदर आर्थिक सुबत्ता पाहून बरे वाटले.

प्रवासी नसल्यासारखे दिसणारे चारदोन तरुण चव्हाट्यावर टोळके करून उभे होते. दोघांच्या बगलेत ट्रॅन्सिस्टर होता. म्हणजे हेदेखील चांगले सुखवस्तू असले पाहिजेत. ते ऑस्ट्रेलियात चाललेल्या भारत-ऑस्ट्रेलिया क्रिकेट मॅचची 'कॉमेण्ट्री' ऐकत होते. त्यांनी कदाचित कधी क्रिकेटची मॅच पाहिलीही नसेल. भारतीय खेळाडूही पाहिले नसतील. आणि ऑस्ट्रेलियन तर नसतीलच. पण प्रत्यक्ष खेळ पाहताहेत अशा उत्साहाने आणि एकाग्रतेने ते कॉमेण्ट्री ऐकत होते. आम्ही बसल्याजागी आम्हालाही ती ऐकू येत होती इतका मोठा ट्रॅन्सिस्टरचा आवाज होता. आपल्या खेळाडूने चौकार-षट्कार मारला की ते आनंदाने आरोळ्या ठोकीत. तो बाद झाला की ह्यांना अत्यंत वाईट वाटे. जग किती लहान झाले आहे. आणि सहानुभूती किती व्यापक!

वेळ जात होता आणि नव्हताही. चेक-पोस्टच्या कुंपणाच्या तारेजवळ एक बाभळीचे झुडूप उंच वाढले होते. एक बकरी मागल्या दोन पायांवर उभी राहून मान उंच करून बाभळीचा पाला लपलप् करीत खात होती. आणि तिची दोन पिले तिच्या आचळांना लुचत होती. त्यांचा वेळ चांगला चालला होता. त्यांना कसली घाई नव्हती. प्रतीक्षा नव्हती.

दोन-सव्वादोन झाले. नवेगावबांधच्या बाजूने कॉलेज-विद्यार्थ्यांसारखे दिसणारे तीनचार तरुण येताना दिसले. बहुतेक तेही बससाठीच येत असतील कदाचित् त्यांचे साहाय्य होईल असे आम्हाला वाटले. मनात आले, त्यांना विचारावे. हिनेही दुजोरा दिला. मी जवळ जाऊन त्यांना विचारले. ते बस-साठीच आले होते. त्यांना म्हटले, 'ह्या एवढ्या गर्दीतून धक्काबुक्की करीत बसमध्ये शिरून जागा मिळवणं आम्हांला जमेलसं दिसत नाही. तुम्ही आम्हाला जागा मिळवायला मदत कराल का?'

खरे म्हणजे मी थोडेसे भीतभीतच विचारले. अनोळखी आणि त्यात पुन्हा कॉलेज-विद्यार्थी.

ते म्हणाले, 'काही काळजी करू नका. आम्ही तुम्हाला बसवून देऊ. कुठ आहे तुमच सामान ? आमच्याकडे द्या.'

आमचे बोलणे होत आहे तो बस येत असल्याचा आवाज आला आणि मागोमाग वळणाआडून बस आलीच आणि विद्यार्थ्यांनी खरोखरच म्हटल्या-प्रमाणे बसायलासुद्धा जागा मिळवून दिली.

प्रवास चालू झाला. वाटेत एका गावात देवीची जत्रा होती. तिथे अर्धा तास थांबून बस साकोलीला पोचली. पण थेट बस-स्टॉपकडे न जाता गावात बाजारपेठेत थांबली. थांबली ती हलेच ना. नागपूरची बस ध्यायची तर बस-स्टॉपवर जायला पाहिजे. ही बस अशीच इथे थांबून राहिली आणि नागपूरला जाणारी बस निघून गेली म्हणजे पुन्हा पंचाईत. बस अशीच किती वेळ थांबणार म्हणून विचारावे तर कंडक्टर, ड्रायव्हर कोणीच बसमध्ये नाही. खाली उतरून पाहतो तर आमच्या बसच्या ड्रायव्हरच्या शेजारच्या जागेतून आणि त्याच्या मागल्या बसच्या हौद्यातून सर्पणाची लाकडे काढून दोन सायकल-रिक्षात भरण्याचे काम चालले होते. दोन्ही रिक्षांमध्ये पुरुष-पुरुष उंचीची रास होईल इतकी लाकडे भरलेली होती. ती ड्रायव्हरची खासगी दिसत होती. त्यात अर्धा तास गेला. ही लाकडे कशी, कुठे, कोणाच्या परवानगीने भरली ? आणि इतकी अशी लाकडे प्रवासी बसमधून आणता येतात का ? हे कोणी कोणाला विचारायचे ? आणि कोण उत्तर देणार ? एस० टी० सेवा सरकारी झाल्यावरसुद्धा हे चालते. पूर्वी खासगी होती तेव्हा असले प्रकार चाललेले मी पाहिलेच होते. कोणी भाजीचे पोते आणले, दोनचार किलो काढून घे. कोणी पेरू, कांदे, शेंगा आणल्या, आपली पिशवी भरून घे. असे ड्रायव्हर-कंडक्टर संगनमताने करायचे. व्यवस्था बदलली, माणसे बदलली नाहीत.

लाकडे भरून झाली. कंडक्टर टण् टण् घंटा वाजवू लागला. ड्रायव्हर जागेवर येऊन बसला. पटकन् दार लागले. आणि फर्रर्र करून बस सुरू झाली. साकोलीच्या बस-स्टॉपवर आली. तिथे जाऊन नागपूरच्या बसची वाट पाहायची. ती केव्हा येणार हे कोणीही सांगू शकत नव्हते. येईल तेव्हा पुन्हा गर्दी. पुन्हा घाई. पुन्हा धक्काबुक्की. पण आम्ही नवेगावला कॉलेज-विद्यार्थ्यांची कास धरली होती, ती धरूनच ठेवली होती.

बस-स्टॉपच्या छपरीत गच्च गर्दी होती. एक लग्नाचे वऱ्हाड होते. त्यातल्या

बायका-पुरुषाच्या कोऱ्या कपड्यांचा आणि घामाचा वास नाकात दाटत होता. विडी-सिगरेटचा उग्र दर्प तर 'जेथे जातो तेथे सांगाती' होताच. बसमध्येसुद्धा. अखेर एकदाची बस आली. ती नागपूरला जाणारी आहे असे कोणीतरी 'अधिकृत' सांगितले. आम्ही धावत-धडपडत गेलो. जागा धरल्या. नेहमीप्रमाणेच सगळ्यांच्या मागून कण्डक्टर आले. आणि 'उतरा सगळे. बस नागपूरला जात नाही.' म्हणाले. पुन्हा सामान घेऊन उतरलो. बसचा कडक्टर म्हणजे जहाजाचा कप्तानच. त्याचा आदेश तो आदेश. अपील नाही. सवाल नाही.

अखेर पाच वाजता नागपूरला जाणारी बस आली. ती खरीच नागपूरला जाणारी निघाली. तिच्यातही विद्यार्थ्यांनीच आम्हांला जागा मिळवून दिली. आम्ही त्यांचे मनापासून आभार मानले. आता नागपूरपर्यंत निश्चिती म्हणून शक्य तितके सुखावून बसलो.

बस सुटली. आम्ही सुखात होतो. साडेपाच वाजता बस लाखनीला पोचली. आणि तिथे थांबली ती थाबलीच. कडक्टर म्हणाला, 'गाडी पुढे जाणार नाही. गाडीत बिघाड आहे.' 'भंडाऱ्याहून बस बोलवा', 'साकोलीहून बस बोलवा' असे उतारू कडक्टरला सागत होते. तो मख्ख. अधूनमधून बसेस येत होत्या. कडक्टर त्याच्या विनवण्या करीत होता. पण कोणीही कोणाला घ्यायला तयार होईना.

मारुतिरावांच्या कल्पनेप्रमाणे नवेगावबांधला दीड वाजता नागपूरची थेट गाडी मिळाली असती तर साडेसहा वाजेपर्यंत आम्ही नागपूरला पोचलो असतो. घरच्या लोकाना तोच अदाज दिला होता. आता तर इथे लाखनीलाच साडेसहा झाले. आणि आणखी किती थांबावे लागणार त्याचा काहीही अदाज लागत नव्हता. 'काय त्रास आहे?', 'कसली ही "प्रवाशाच्या सेवेसाठी" बसव्यवस्था!' असे प्रश्न-उद्गार झाले. सरकारला, सरकारच्या सर्व खात्यातल्या—एकूणच सर्व देशातल्या—भ्रष्टाचाराला, भांडवलशाहीला शिव्या देऊन झाल्या. व्यवसायांच्या सरकारीकरणालासुद्धा. जागतिक परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करून झाली. ह्या सर्वांची पुन्हा पुन्हा आवर्तने झाली. कॉलेजविद्यार्थी बेजबाबदार, बेशिस्त होत चालले आहेत. त्यांच्या मनात गुरुजनाबद्दल, वडीलमाणसाबद्दल आदर मुळीच राहिलेला नाही असे आपण म्हणतो. पण पाहा, आपल्याला या विद्यार्थ्यांनी कशी तत्परतेने मदत केली! चारदोन उदाहरणे पाहून सरसकट

मत बनवणे बरे नाही, असे स्वतःला सांगून झाले. पण आम्हांला घेणारी बस काही आली नाही.

आधीच जानेवारीचे हिवाळ्याचे दिवस. अंधार पडलेला. सात वाजले. साडेसात झाले. एक बस आली. तिने मात्र आम्हाला घेतले. इथेही विद्यार्थ्यांनीच आमच्या पुढे होऊन आमच्यासाठी जागा धरली, दरम्यान आम्ही कटाळत वाट पाहत होतो तेव्हा त्यांनी आम्हाला पेरूही आणून दिले होते. हे त्यांच्या मनाचे अधिकाचे मोठेपण.

साडेसातला आम्ही लाखनीहून निघालो ते रात्री दहा वाजता नागपूरला पोचलो. पूर्वी बस-स्टॉप नागपूर स्टेशनाजवळ होता. तिथून कुठेही जायचे तरी साधारण सारखे अंतर पडत होते. तिथपर्यंत जायच्या आधी वाटेत कोणाला उतरायचे असले तर उतरता येत होते. पण आता तो शहराच्या बाहेर पूर्वेकडे नेला आहे. त्यामुळे स्टेशन ओलांडून जाणाऱ्याला जवळजवळ दुप्पट लांब पडते. पण हा विचार स्वार्थी झाला. सध्याच्या स्टॉपमुळे रिक्षेवाले-टॅक्सीवाले यांना चार पैसे जास्ती मिळतात हा सामाजिक विचारही केला पाहिजे.

घरी पोचलो तोपर्यंत साडेदहा होऊन गेले होते. सात-साडेसात होऊन गेले तरी आम्ही का आलो नाही म्हणून घरचे लोक काळजी करीत होते. आम्ही आमचा बेत बदलला, की बसला काही झाले, असे त्यांचे ज्या वेळी तर्क चालले असतील त्या वेळी आम्ही नागपूरची बस केव्हा मिळेल याची लाखनीला काळजी करीत होतो. थेट नागपूरची गाडी, आम्हांला सोडा, पण मारुतिरावानासुद्धा न कळवता रद्द झाली; आणि ती एक तास उशिरा आली, सर्पण भरल्यामुळे साकोलीच्या बाजारात नको इतकी थांबली; बऱ्याच वेळानंतर नागपूरची बस मिळाली, ती लाखनीला बंद पडली; घरी पोचायला चार तास उशीर झाला, एवढ्याच गोष्टी घडल्या. बसची आणि ट्रकची टक्कर झाली नाही. एखाद्या पुलाच्या कठड्यावरून नदी-नाल्यात पडून बस उलटी झाली नाही. एखाद्या म्हशीच्या किंवा म्हातारीच्या अंगावरून गेली नाही. म्हणजे प्रवास तसा निर्विघ्नच झाला. म्हणून आम्ही त्या विघ्नहर्त्या गजाननाचे उपकार मानायला हवे होते. ते मनोमन मानलेच, आणि पुढेही कधी एस० टी०ने प्रवास करायची वेळ आली—ती येईलच—तर इतपतच अडचणी येऊ देत अशी त्याची प्रार्थनाही केली. मनातल्या मनात.

६६७ २४७३५



# रोजनिशी औरंगाबादची

बंगला नं० १
छावणी, औरंगाबाद
२६ मे, १९५०

आम्हाला इथे येऊन आता दोनतीन दिवस झाले आहेत. इथे एक कॉलेज काढायचा आमच्या सोसायटीचा विचार आहे. त्याच्या पूर्वतयारीसाठी चिटणीस आले आहेत. त्यांना मदत करायला म्हणून मी आलो आहे. एक कारकूनही आला आहे. आमचा दिनक्रम आता ठरल्यासारखा झाला आहे. सकाळी आठ-साडेआठाला न्याहारी होते. त्या वेळी चहा आणि त्याच्याबरोबर ब्रेड किंवा पाकर आणि ऑमलेट, फ्राइड एग्ज, किंवा स्क्रॅम्बल्ड एग्ज असतात. त्यानंतर इथे बंगल्यात, आसपास, नाहीतर गावात, असेल तसे दोनतीन तास काम. मग स्नान. इथे स्नानाला चांगला मोठा टब आहे आणि पाणीही भरपूर आहे. त्यामुळे भरलेल्या टबात अर्ध-बुडत्या, अर्ध-तरंगत्या अवस्थेत अंग मोकळे सोडून स्नान करण्याची खूप गंमत वाटते. ही चैन मुंबईत शक्यच नाही.

जेवण दुपारी बारा-साडेबाराला होते. आमचा 'कुक' चक्के पूर्वी सैन्यातल्या यूरपियन अधिकाऱ्याकडे काम केलेला आहे. त्यामुळे त्याला साहेब लोकांचे 'जेवण' करता येते; 'इंडियन' लोकांचा 'स्वयंपाक' येत नाही. भात अर्धवट शिजत आला म्हणजे वेळून टाकून तो फडफडीत करतो. पालेभाजी, फळभाजी कोणतीही असो, खूप पाणी घालून नुसती उकडतो आणि शिजली की पाणी ओतून टाकतो. तिच्यात मीठमसाला काही घालीत नाही. सागुती वगैरेसुद्धा नुसती शिजवतो. त्यामुळे 'भोज्येषु विगतस्पृहा' असे झालो आहो आम्ही. आमचे कारकून हाईम अष्टमकर हे बेने इस्राइल आहेत. त्यांना आमची सागुती चालत नाही. आणि त्यांना लागते ते 'कोशेर' इथे मिळत नाही. त्यामुळे त्यांचे आमच्यापेक्षाही अधिक हाल होताहेत. म्हणून मग जेवणानंतर आम्ही शेंगदाणे, फुटाणे असे काहीतरी खातो.

तसाच आज रोजच्यासारखा जेवणानंतर भाजलेल्या शेंगाचे दाणे खात व्हराड्यात आरामखुर्चीवर निजल्यासारखा पसरलो होतो. झोप केव्हा लागली

ते कळले नाही. खुर्चीच्या खालच्या बाजूला काहीतरी खसफसल्यासारखे वाटले आणि जागा झालो. खाली पाहिले एक खार बशीतली शेंग काढून घेऊन पुढल्या दोन पायात धरून त्यातले दाणे काढून खात होती. मागल्या दोन पायावर बसली होती. पाठीकडे वर उचललेल्या शेपटीचा झुबकेदार गोंडा मधून-मधून हलत होता. मी अगदी हालचाल केली नाही. तिला वाटावे, मी निजलोच आहे, किंवा हालचाल न करणारी एखादी निर्जीव वस्तूच आहे. थोड्या वेळाने कृष्णाजिन पसरल्यासारखी ती पालथी पडली. अगदी सपाट. मध्ये तीन काळे जाड पट्टे असलेली पाठ, चारी पाय चार बाजूंना ताणून पसरलेले आणि शेपूट सरळ जमिनीसरसे. मग झटकन उठली. कदाचित मला नकळत मी हललो असेन. तुरूतुरू धावली आणि समोरच्या खोलीच्या दोन भिंतींच्या बाहेरच्या बाजूच्या कोपऱ्यावर तसेच तुरूतुरू करीत शेपूट उडवीत चढली आणि वळचणीखाली दिसेनाशी झाली.

भिंतीला चुना लावलेला आहे. त्याच्यावर कोपऱ्याच्या दोन्ही बाजूंना नक्षी काढल्यासारखे ओरखडे पडले आहेत. ते कसले आहेत ते आधी मला कळले नव्हते. आता कळले!

मे महिन्याची अखेर आहे. देशावरच्या उन्हाळ्याचा मला अनुभव असल्यामुळे ह्या रखरखाटाचे आश्चर्य वाटत नाही. गावात तर त्याच्या भरीला धूळ आणि घाण आहे. इथे छावणीत ज्या भागात बंगले आहेत त्या भागात रखरखाट इतका जाणवत नाही. उलट इथे वेगळेच वातावरण आहे.

आमचा बंगला आहे तसेच आजूबाजूला बंगले आहेत. प्रत्येक बंगल्याला विस्तीर्ण आवार आहे. आणि प्रत्येक आवारात गुलमोहराची बरीच झाडे आहेत. सगळी खूप मोठी आहेत आणि सगळी ह्या वेळी फुललेली आहेत. काही झाडावरची फुले पिवळसर-तांबड्या रंगाची, तर काहींवरची झळझळीत गर्द शेंदरी रंगाची. जणू तो शेंदरी रंग फुलांच्या त्या राशींतून बाहेर येऊन चौफेर फाकतो आहेसे वाटते. काही झाडांवर पाने अधिक, तर फुले कमी आहेत, तर काहींवर फुलेच फुले आणि मध्येच पाने दिसताहेत. पिसासारखी पसरलेली हिरवीगार पाने आणि त्यावरचे ते भरगच्च शेंदरी झुबके. मोठा मजेदार रंगविरोध आहे. पाहतच राहावेसे वाटते.

जिकडेतिकडे कडुनिंबाची झाडेही पुष्कळ आहेत. त्याच्या बऱ्याच निंबोण्या

पिकून गळून पडल्या आहेत. त्याचा कडूगोड वास सगळीकडे भरला आहे. काहीं निंबोण्या अशा टरटरीत, टपोऱ्या, तुळतुळीत आणि फिकट पिवळ्या पण तेजस्वी आहेत की उचलून घेऊन कुरवाळाव्याशा वाटतात. आणि त्या कडू आहेत हे ठाऊक असूनदेखील एखादी तोंडात घालून चोखून-चाखून पाहावीसे वाटते. पाहतोदेखील.

निंबोण्याबरोबरच निंबाच्या झाडाखाली पानाचा आणि काड्याचा खच पडला आहे. त्यामुळे झाडाखालून चालताना मऊ गालिच्यावरून चालल्यासारखे वाटते.

**२७ मे, १९५०**

पोलिस-ॲक्शन झाल्यापासून बहुतेक सगळे बगले रिकामेच आहेत. चागले मोठेमोठे आहेत. आता ते बहुतेक गावातल्याच कुणाकुणाच्या मालकीचे आहेत. त्यांतलेच जवळपासचे आणि सोयिस्कर असे तीनचार बगले कॉलेजसाठी आणि स्टाफसाठी घ्यायचा विचार चालला आहे. ह्या भागातले रस्ते स्वच्छ आहेत. बगल्याची आवारे प्रशस्त आहेत. कॉलेजला अगदी योग्य आहेत.

'ठगाची जबानी', 'तारा', 'सीता', 'चादविबी' वगैरेंचा लेखक कर्नल मेडोज टेलर हा १८२४ मध्ये वयाच्या सोळाव्या वर्षी निजामाच्या सैन्यात नोकरीला लागला तो औरंगाबादलाच नोकरीवर रुजू झाला. त्याची बहुतेक नोकरी वऱ्हाड-मराठवाडा अशा मराठीभाषिक भागातच झाली आणि त्याने कामेही बरीच केली. त्याची आठवण म्हणून इथल्या एका रस्त्याला 'मेडोज टेलर रोड' असे नाव दिले आहे.

आम्ही एकदोन बगले पाहतो. मालकांना भेटतो. भाड्यासंबधी त्याच्याशी चर्चा करतो. त्यांत कोणाचे काही, कोणाचे काही लागेबांधे असतात. असाच परवा आम्ही एक बगला पाहिला. चांगला सोयिस्कर वाटला. मोठेमोठे हॉल आणि व्हरांडे होते. पण नतर कोणीतरी येऊन सांगितले, 'तो बगला घेऊ नका. भुताटकीचा आहे. तिथे रात्री दिवे लागतात. मडमा-साहेब नाचतात. मी तुम्हांला दुसरा चागला दाखवतो. त्याला मोठा "चमन" आहे. असा चमन तुम्हाला दुसऱ्या बंगल्यात मिळणार नाही! किराया पण कमी पडेल.'

आम्ही तो बगला बाहेरून पाहिला होता. पण बोललो नाही. काल संध्याकाळी आम्ही मागल्या व्हरांड्यात बसलो होतो. बोलता बोलता सहज त्या बगल्याकडे लक्ष गेले. आमच्या बाजूच्या सगळ्या खिडक्यातून लख्ख

उजेड दिसत होता. आम्ही चकित होऊन एकमेकाकडे पाहत राहिलो. चांगला सोनेरी उजेड होता. आत दिवे पेटलेले असावेत असा. पण पाहता पाहता प्रकाश गेला आणि तिन्हीसाजच्या वाढत्या अंधारात खिडक्या दिसेनाशा झाल्या. मग लक्षात आले सूर्य मावळत चालला होता. त्याचे शेवटचे किरण खिडक्यांच्या काचावर पडले होते. आणि सगळी तावदाने प्रकाशल्यासारखी दिसत होती. तीच भुताटकी ! आम्ही तो बंगला घ्यायचे ठरवले.

२८ मे, १९५०

आज सकाळी फिरायला बाहेर पडलो होतो. आमचे बंगले ज्या भागात आहेत, त्याच्या शेजारूनच एक ओढा वाहतो. त्याच्या आसपास पुष्कळ मोकळी जागा आहे. हिरवळ आहे. खूप झाडेझुडपे आहेत. त्यांत बहुतेक शिंदीची आहेत. अगदी कमरेएवढ्या बुटक्या झाडांपासून ते पुरुष दीड पुरुष उंचीच्या झाडांपर्यंत. सर्वच झाडाना शिंदीच्या फळाचे केशरी-सोनेरी लोंगर लागलेले आहेत. राखट-तपकिरी रंगाचे खवलेदार बुंधे, वरती केशरी सोनेरी फळांचे भरदार लोंगर आणि त्याच्या वर राखट-हिरव्या टोकदार पात्यांचा फवाऱ्या-सारखा चौफेर पसरलेला पिसारा. लोंगरांचा रंग डोळ्याना सुखावीत होता. चित्र काढावे असे दृश्य होते. मी लहानपणी हैदराबादला खजुराची झाडे पाहिली होती. त्यानाही असेच केशरी फळांचे लोंगर असतात. कच्चे खजूर खाल्ले होते. वाटले, शिंदीची फळेदेखील चाखून पाहावी. झाडांखाली बरीचशी फळे वाळून तपकिरी होऊन पडली होती. मी एकदोन पिकलेली आणि एकदोन वाळलेली चाखून पाहिली. चाखायला होते काय त्यात ? साल आणि बी. फक्त साल बीला अगदी चिकटू नये म्हणून दोहोंच्या मध्ये कागदासारखा पातळ गराचा थर होता. तुरट-गोडसर. 'आता अधिक खाऊचाखू नका' म्हणत होता.

दुपारी एक गृहस्थ भेटायला आले होते. बोलता बोलता म्हणाले, 'आपली ही खाम नदी आहे. हिच्या काठाकाठाने कॉलेज झाली, युनिव्हर्सिटी झाली की केंब्रिजसारखं होईल.'

मी म्हटले, 'आता आमचं कॉलेज निघणारच आहे. पुढे आणखी कॉलेज निघतील. पण औरंगाबादच्या नदीचं नाव "खाम" आहे आणि केंब्रिजच्या नदीचं "कॅम", म्हणून इथली युनिव्हर्सिटी केंब्रिजसारखी होईल, असं तुम्हांला वाटतय का ? होईलही, पण भाकित करण्याची घाई करू नये हे बरं!'

३० मे, १९५०

इथल्या पाणचक्कीची जहागीर जमीन आहे. कालेजसाठी ती सोयीची होईल का, मिळेल का, म्हणून पाहण्यासाठी पाणचक्कीवर गेलो होतो. एका दरवाजावरून स्फटिकासारख्या स्वच्छ पाण्याची चादर खळखळत खाली पडते आणि ते पाणी एका प्रशस्त हौदात जाते. तिथून ते खालच्या बाजूच्या आणखी एका मोठ्या हौदात जाते आणि तिथून शेजारच्या खाम नदीत.

टाकीच्या शेजारी एक मशीद आणि तिच्या मागच्या बाजूला शाह बाबा मुझफ्फरची कबर आहे. मशीद आणि मकबरा सगळीकडे असतात तसे स्वच्छ आहेत. कबरीवर शोभेसाठी म्हणून शहामृगाच्या अंड्यांच्या माळा छतापासून लोबत्या टागलेल्या आहेत. कबरीच्या बाजूला अंथरलेल्या जाजमाचे कोपरे दुमडू नयेत, उडू नयेत, म्हणून संग-मरमरचे शोभिवत, खाली चौकोनी, वर घुमटाकार मुतक्के–दडपणे–ठेवलेले आहेत. फार शात आणि प्रसन्न वाटले.

म्हणून रात्री पुन्हा पाणचक्कीवर गेलो. वरून मद चादणे पडले होते. हौदातल्या पाण्यात त्याला क्षणाक्षणाला नवनवे वळणदार आकार येत होते. शेजारच्या वडाच्या झाडाच्या फांद्या-पारब्या ओळबून पाण्याला जवळजवळ टेकल्या होत्या. त्यांच्या सावलीने काळ्या पाण्याचा काही भाग आणखीच काळा झाला होता. हौदातले लहानमोठे मासे मधूनच वरपर्यंत येऊन सुळकन् वेलाटी घेऊन पुन्हा जात तेव्हा त्यांची अगे क्षणभर चकाकत. आणि पाण्याच्या काळेपणाला लक्कन् रुपेरी झळाळी देऊन जात.

पाणचक्कीच्या प्रवेशद्वाराच्या, त्याच्या शेजारच्या मशिदीच्या, चुना लावलेल्या पाढ्याशुभ्र भिंती. हौदातले काळे पाणी. त्यावर पडलेली काळी सावली. मधूनच चकाकणारी चद्राची प्रतिबिंबे. मशिदीत मद प्रकाशत असलेला एकच एक दिवा. आणि पाण्याचा रुणझुणता खळाळ. तो अधार. ती शातता. तो एकात. आणि फक्त आम्ही दोघे. चिटणीस आणि मी.—एक गूढ, उदास, अतर्मुख व्हायला लावणारे वातावरण होते. तिथून उठावेसे वाटत नव्हते पण फार वेळ बमून राहाणेही शक्य नव्हते मनात विलक्षण खोल घुसून राहणारा अनुभव होता.

२ जून, १९५०

आता आणखी लोक आले आहेत. कॉलेजच्या कामांची निकड लागली

आहे. रेशन वाढवून घ्यायचे आहे. फर्निचर करायला दिले आहे ते काम कुठपर्यंत आले आहे ते पाहायचे आहे. टेलिफोन मिळवायचा आहे. ह्या सगळ्यासाठी गावात गेलो होतो. आल्यापासून पाहतो आहो. सरकारी कचेऱ्यातले, म्युनिसिपालिटीतले सगळे लहानमोठे अधिकारी मदत करायला तयार आहेत. इथल्या लोकाची बोलण्याची एक पद्धत आहे. कोणत्याही कामाबद्दल विचारले तर 'बारहाल आपल काम होऊन जाईल. बेफिकर राहा.' असे म्हणतात. काम चटकन होतेच असे नाही. कारण सरकारी-बिनसरकारी कामाची एक स्वतःची अशी गती असते. पण लोकाचा सद्भाव दिसतो.

दुकानातले लोकही असेच थोर मनाचे. आपण काही खरेदी केले आणि पुरेसे पैसे नाहीत असे दिसले, तर दुकानदार तत्परतेने आणि अदबीने म्हणेल, 'बादमें भेज दीजिये. पैसोंकी क्या फिकर है!' भाजीवाल्याकडून, फळवाल्याकडून खरेदी केली, पिशवी नसली, तर 'टोकरी हमारी ले जाइये. कभीभी लौटा दीजिये. कोई फिकर न कीजिये.' जणू आम्ही त्याचे जुने विश्वासाचे गिऱ्हाईकच आहो. इथे जुन्या नवाबी जमान्याची ही खासियत अजून मागे राहिलेली दिसते.

दुपारी शाहगंज भागात गेलो होतो. औरंगाबादेत हिमायत बाग म्हणून निजामाची एक बाग आहे. तिच्यात एकशे-आठ जातींचे आंबे आहेत असे म्हणतात. शाहगंज मशिदीजवळ एका ठिकाणी हे आंबे मिळतात असे कळले होते. म्हणून तिथे गेलो. एकशे-आठ काही नाहीत, पण दहाबारा प्रकारचे आंबे होते. त्यात 'सुंदर शाह', 'हुस्न आरा' अशा काव्यमय नावाचे आंबे होते, तसेच 'ऑम्लेट', 'अंडा' असे शाकाहाऱ्यांना निषिद्ध नावाचेही होते. सर्व जातींचे थोडे थोडे घेतले.

शाहगंजमधली मशीद भव्य, रेखीव आणि सुंदर आहे. आकार आणि समोरच्या पटांगणाचा प्रशस्त विस्तार ह्या दृष्टींनी मकई दरवाजाच्या आतली जुम्मा मसजिद हिच्या वरचढ म्हणता येईल. पण आहे त्या आकारातली प्रमाणबद्धता, भव्यता, मेहरपीदार कमानींचे रेखीव सौंदर्य, समोरच्या अंगणातला प्रशस्त हौद ह्या बाबतींत शाहगंजमधल्या ह्या मशिदीचा ठसा मनावर अधिक खोल उठतो. अठराव्या शतकाच्या आरंभी दिल्लीत सत्ता गाजवणाऱ्या सय्यद बंधूंपैकी हुसेन अलीखाने ही बांधली. हिच्या भव्यपणाची आणि सौंदर्याची अनेकांनी प्रशंसा केली आहे. एकाने म्हटले आहे : 'ही मसजिद म्हणजे एक सुंदर चेहरा आहे. आणि भोवतालचे जग हा त्याच्याभोवती रुंजी घालणारा भ्रमर आहे.' आत

खांबावर 'या ख़ालिक़', 'या क़ादिर', 'या ग़फ़्फ़ार', 'या गफ़ूर' अशी ईश्वराची नावे, गोल मोहरेत अक्षरे कोरावीत तशी, दगडात रेखीवपणे कोरलेली आहेत. मी इतक्या मशिदी पाहिल्या, पण अशी नावे कोरलेली मी इथेच पाहिली. कदाचित इतर ठिकाणी माझे लक्ष गेले नसेल.

३१ मे, १९५०

इथे सिव्हिल ॲड्मिनिस्ट्रेटर राजवाडे आहेत, त्याना भेटायला आज सकाळी चिटणीस आणि मी गेलो होतो. पोलीस-ॲक्शननतर महाराष्ट्रातून जे अधिकारी इकडे आले त्याच्यापैकी आहेत. रुबाबदार आहेत. चागले मोकळेपणाने बोलले. कॉलेजसाठी सगळी मदत करायला तयार आहेत.

इथल्या रेडियो-स्टेशनवर कवी वा० रा० कांत आहेत. त्याना आज संध्या-काळी फोन केला. दोनतीन वर्षांपूर्वी औरगाबादला आलो होतो. तेव्हा इथेच त्याची-माझी पहिल्यादा भेट झाली होती. त्यांना एकदा भेटायला हवे.

मी इथे आलो असल्याचे कळले म्हणून शकर सदावर्ते सध्याकाळी भेटायला आला होता. 'वैदिकधर्मप्रकाशिके'त आम्ही एका वर्गात होतो. सध्या तो जवळच रायरायाच्या जहागिरीत मॅजिस्ट्रेट आहे.

१ जून, १९५०

रेव्हिन्यू असिस्टंट अबादासराव आणि म्युनिसिपल सेक्रेटरी याडकीकर ह्यांच्याबरोबर आज संध्याकाळी प्लॉट पाहायला गेलो होतो. पाणचक्कीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूची जागा पाहिली. सोयिस्कर आहे. रस्त्याच्या उजवीकडल्या बाजूच्या जागेत एक चुनेगच्चीचा कलमदानी हौद आहे. भेगा पडल्या आहेत. मध्ये मध्ये रानझुडपे वाढली आहेत. पण आकार फार सुंदर, रेखीव आहे. केव्हा तरी त्यात पाणी खेळत असले पाहिजे. ही जागा जर कॉलेजसाठी घेतली तर हौदातली सगळी झुडपे काढून टाकून, भेगा भरून हौद पूर्वीसारखा करून घ्यावा आणि त्यात पुन्हा पाणी खेळते करावे, असे चिटणिसाना सुचवणार आहे.

जागा पाहून झाल्यावर गावात शेठ माणिकचद पहाडे ह्यांच्या घरी श्री० दिगबरराव बिंदू ह्यांना भेटलो. श्री० बिंदू ह्या भागातले मोठे पुढारी आहेत. निजामाविरुद्धच्या लढ्यात पुढाकाराने भाग घेतलेले. तिथेच इतरही काही

लोकांची भेट झाली. इथल्या प्रगतिपर महाराष्ट्रीयांनी पश्चिम महाराष्ट्राकडून, विशेषतः पुण्याकडून, प्रेरणा घेतलेली दिसते. लहाणपणी हैदराबादला आमच्या-कडे माझ्या नावावर 'भाला' येत असे त्याची आठवण झाली. माझ्या नावावर येण्याचे कारण वडील सरकारी नोकर होते. इकडच्या बऱ्याच लोकांचे शिक्षणदेखील पुण्याच्या शाळा-कॉलेजात झालेले आहे.

आमच्या कॉलेजसंबंधी श्री० बिंदूशी बोलणे झाले. ह्याच वर्षी स्वामी रामानंद तीर्थ नांदेडला 'पीपल्स कॉलेज' काढताहेत असे कळले. आमचे पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज आणि त्यांचे पीपल्स कॉलेज. नावाच्या सारखे-पणामुळे लोकांच्या मनात गोंधळ निर्माण होईल की काय अशी शंका वाटते.

४ जून, १९५०

आज नौखंडा शरीफ पाहायला गेलो होतो. हा एक जुना वाडा आहे. तिथल्या 'दीवाने आम'मध्ये पहिल्या निजामाचे तख्त आणि मसनद ठेवलेली आहे. मोगल सत्तेपासून स्वतंत्र होण्याचे ठरवले तेव्हा निजामुलमुल्काने औरंगाबादेत आपली गादी स्थापली ती नौखंडा शरीफमध्ये आणि तिथेच तो राहतही होता.

'दीवाने आम' म्हटल्याबरोबर आपल्याला दिल्ली-आग्र्याच्या किल्ल्यातल्या भव्य 'दीवाने आम'ची आठवण होते. पण इथला दीवाने आम म्हणजे अगदी सामान्य जहागिरदाराच्या दिवाणखान्याइतका, किंबहुना त्याहूनही लहान आहे. पण त्याला एक मर्यादित, रेखीव, प्रमाणशीर सौंदर्य आहे. त्याच्या डावीकडल्या खोल्या पडल्या आहेत. खोल्या लहानच आहेत. छत खाली कोसळले आहे त्या अवशेषांवरून भिंतींचा गिलावा, आतले कोनाडे, त्यांचे आकार यांची कल्पना येते. उजव्या बाजूच्या खोल्यात अजून लोक राहताहेत. त्या पाहिल्या म्हणजे पलिकडल्या खोल्यात पूर्वी किती अंधार असेल ह्याची कल्पना येते. वाड्याच्या मध्य मागल्या बाजूला भिंत आहे आणि खिडक्या नाहीतच.

दीवाने आम'च्या मधोमध एका मोठ्या संगमरमरी चौरंगावर काचेच्या मोठ्या चौकोनी टोपणाखाली झाकलेली निजामाची पहिली गादी ठेवलेली आहे. मागे एक आणि दोन बाजूला दोन असे तीन लोड आहेत. केव्हातरी हे लोड भरजरी असतील. आता कापड विरले आहे. धागे सुटले आहेत. अवकळा आली आहे. पण अडीचशे वर्षांपूर्वीच्या एका ऐतिहासिक घटनेची ती आठवण

आहे. आणि अजूनही वर्षातून एकदा निजामाच्या वंशजाच्या वतीने त्या गादीला कुर्निसात होतो म्हणतात.

दीवाने आम'समोर 'चमन' आहे. सोंगट्याच्या पटासारखे एकमेकांशी काटकोन करणारे चार रस्ते आणि बाजूच्या चार चौकोनात तऱ्हेतऱ्हेची झाडे. आताची बाग म्हणजे पूर्वीच्या बागेचा विनम्र अवशेषच आहे नौखंडा शरीफच्या वाड्याच्या मागल्या बाजूला गेले म्हणजे राहत्या वाड्याची सगळी भिंत सलग उभी असलेली दिसते. गच्चीच्या मुढेरीचे कंगोरेही दिसतात आणि वाड्याच्या विस्ताराची—म्हणजे विस्तार किती मर्यादित आहे ह्याची—कल्पना येते.

निजामुल्मुल्क नौखंडा शरीफमध्ये तख्तनशीन' झाला असला तरी तो त्याचा निर्माता नाही. अहमदनगरच्या निजामशाहाचा कारभारी मलिक अंबर याने ही वास्तू बांधली म्हणतात. मूळच्या खडकी या लहानशा गावाला त्यानेच शहराचे रूप दिले. शहराला ज्या नळाने पाणी पुरवण्याची त्याने व्यवस्था केली, तो नहरे अंबरी' अजून शहराला पाणी पुरवतो आहे.

७ जून, १९५०

आज 'किले अरक' आणि दिल्ली दरवाजाबाहेरची 'रौजा बाग' पाहून आलो. किले अरक' ही औरंगजेबाची निर्मिती. आज तिथे त्याच्या वेळच्या इमारती किती आहेत हे कळणे कठीण आहे. पाण्याचे कृत्रिम प्रवाह खेळव-ण्याची लाल किल्ल्यातल्याप्रमाणे सोय असावी असे काही उद्ध्वस्त अवशेषातून दिसते. त्याने बांधलेली आलमगीरी मसजिद मात्र लांबूनसुद्धा दिसते. खूप प्रचंड चौकोनी दुहेरी खांब आणि तीन-तीन वर्तुळखंडाच्या कमानी आहेत. घुमट खूप मोठे आहेत. त्यांना कंगोरे आहेत. पण सगळ्यांची मांडणी इतकी बेढब, बेडौल आणि प्रमाणरहित आहे की तशी दुसऱ्या कुठे मी तरी पाहिलेली नाही. तिच्याच जवळच्या रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एक जनाना मशीद आहे ती ह्या मशिदीपेक्षा अधिक प्रमाणबद्ध वाटते.

'रौजा बाग' मात्र पाहण्यासारखी आहे. दिल्ली दरवाजातून बाहेर पडून अर्धा-पाऊण मैल चालून गेले की, उजव्या बाजूला रस्त्यापासून आत चार छोटे-छोटे डौलदार घुमट दिसू लागतात. ते 'रौजा बाग'चे प्रवेशद्वार आहे. जवळ गेले म्हणजे त्याचा भव्यपणा डौल नजरेत भरतो. तांबड्या वालुका-पाषाणाची, मोगल शैलीतली अशी प्रवेशद्वारे दक्षिणेत सहसा आढळत नाहीत.

आत प्रशस्त चौकोनी आवार आहे. आणि समोर पलिकडल्या अंगाला उंच चबुतऱ्यावर मकबरा. तिथपर्यंत आग्र्याला ताजमहलमध्ये आहे त्यासारखे उथळ लंब-चौकोनी पाण्याचे टाके आणि दोहो अंगांना चुनेगच्ची रस्ता आहे. मकबऱ्याच्या चार कोपऱ्यावर चार घुमट आहेत. पण खुद्द कबरीवर म्हणजे मकबऱ्याच्या मध्यभागी मात्र घुमट नाही. तो जर असता तर मकबरा खूपच भव्य दिसला असता आणि त्याने लावून लक्ष वेधून घेतले असते. पण मुख्य घुमट का बांधला नाही, कोणी सांगितले नाही. सध्या ठिकाण तसे त्यक्तच आहे. बागेत झाडेही फारशी नाहीत. पण स्थान निवांत आहे. आणि मोगल मकबऱ्याचा एक साधा पण उत्तम नमुना आहे.

८ जून, १९५०

आज पहाटे एक-दीडच्या सुमाराला रुजाजी मला उठवायला आला. हा आमचा पहारेकरी. भीमासारखा दणकट आणि बळकट आहे. मध्यरात्री कशाला उठवायला आला म्हणून काळजी वाटली. तो म्हणाला, 'साहेबांनी दौलताबादच्या जंगलातून डुक्कर मारून आणलाय. पाहायचा असला तर बलावलय.'

चिटणीस शिकार करतात आणि त्यांच्याजवळ लायसन्स आहे हे मला ठाऊक होते. परवा दुपारी आमच्याच आवारात त्यांनी एक मोठा धनेश पक्षी मारला. काळ्या-जांभळ्या चोचीचा. पण काल ते शिकारीला जाणार होते किंवा गेले होते हे मला ठाऊक नव्हते.

न्हाणीघरात खूप गरम पाणी केले होते. आणि मधल्या दगडावर माणसाला आंघोळीला बसवावे तसे त्या मारून आणलेल्या डुकराला बसवले होते. तांबूस-राखट रंगाचा, धष्टपुष्ट असा, तीन-एक फूट लांब असा त्याचा तो मोठा-थोरला देह एखाद्या खडकासारखा दिसत होता. चिटणीस बाजूला उभे होते. दोनतीन माणसे डुकराच्या अंगावर गरम पाणी ओतीत होती. गरम पाणी ओतल्याने केस लवकर निघतात, असे कायसेसे कोणीतरी बोलत होते. मी नीट ऐकले नाही. विचारलेही नाही. थोडी भीती, थोडी शिसारी, थोडे कुतूहल अशा संमिश्र मनोवृत्तीने मी ते पाहत होतो. पहिल्यादाच पाहत होतो. फार वेळ पाहवले नाही. नंतर येऊन अंथरुणावर पडलो, पण झोपही लागली नाही. सारखा तो डुक्कर दिसत होता. मध्येच जिवंत झाल्यासारखा वाटत होता.

१० जून, १९५०

गेले दोनतीन दिवस थोडा थोडा पाऊस पडतो आहे. काल रात्री जरा अधिक पडला. आज सकाळी उठल्यावर पाहतो तर सगळीकडे कायापालट झालेला दिसला. बगल्याच्या आवाराभोवतालच्या मेंदीच्या झाडाचे राखट काटेरी खराटे झालेले होते. त्यांवर सगळीकडे नव्या पालवीचे अंकुर फुटून त्याना तातूस तकाकी आली आहे. काही पाने थोडी थोडी हिरवीही होत चालली आहेत. 'झपूर्झा'च्या अवस्थेत न जाताच 'कटकशल्ये बोथटली, मखमालीची लव वठली' ह्याचा दृक्प्रत्यय येतो आहे. आजूबाजूला पाहतो तो जिकडेतिकडे गवताच्या पोपटी-हिरव्या चोची जमिनीतून वर आल्या आहेत. जणू पावसाचे थेंब पडण्याची त्या जमिनीच्या खाली अगदी वाटच पाहत होत्या. आणखी दोन दिवस असाच पाऊस पडला तर मेंदी आणि मैदाने हिरवी होतील आणि रखरखाट नाहीसा होईल.

१२ जून, १९५०

आज दुपारी स्टेट होटेलमध्ये गेलो होतो. कुणाला तरी भेटायचे होते. होटेलच्या पिंपळपानी प्रवेशद्वारात उभा होतो. समोर लाब अतरावर गावाच्या पलीकडे डोंगररागेच्या पार्श्वभूमीवर बीबीचा मकबरा उठून दिसत होता. पण पावसाळ्यात जेव्हा डोंगर हिरवा होत असेल तेव्हा तो आणखी उठून दिसत असेल.

ह्या मकबऱ्याला 'दक्षिणेतला ताजमहाल' म्हणतात. तो ताजमहालची नक्कल आहे हे खरेच आहे! तसाच आराखडा. घुमटा-मनोऱ्यांची तशीच संख्या आणि रचना. पण ताजमहाल संपूर्ण संगमरमरी असल्यामुळे त्याला जशी सगळ्या ऋतूत, सर्व वेळी, मोत्यासारखी सौम्य झळाळी असते तशी ह्याला नाही. जिकडून वाऱ्यापावसाचा मारा होतो तिकडे तो काळा पडला आहे. शिवाय मधला मुख्य घुमट, त्याच्या शेजारचे चार घुमट, जवळचे लहान आणि लांबचे चबुतऱ्याच्या कोपऱ्यावरचे चार मोठे मनोरे, ह्यांचे आकार, उंची, अंतरे ह्यांत ताजसारखे परस्परप्रमाण नाही. त्यामुळे ताजमहालाचा जसा वृत्ती उंचावणारा आणि मन प्रसन्न करणारा परिणाम होतो, तसा ह्याचा होत नाही. आणि ही नक्कलच वाटते.

साने गुरुजींचे काल मुंबईत निधन झाल्याची बातमी आज सकाळी कळली. धक्काच बसला. तपशील कळला नाही मुंबईत परत गेल्यावर कळेल.

**१५ जून, १९५०**

उद्या मुंबईला परतणार. कॉलेजसाठी जमीन घ्यायची ती पाहून झाली थोडीशी अधाशीपणाने घेतलीसे वाटते. पण संस्थेची वाढही लक्षात घ्यायला पाहिजे. पुढल्या गरजा कुणी पाहिल्या आहेत? कदाचित घेतली हीदेखील कमी पडेल.

औरंगाबादच्या आठवणी संमिश्र आहेत. उंचावरून पाहिले तर गाव खळग्यात बसल्यासारखे दिसते. चढउतार फार आहेत. नुसते गुलमंडीतून शाहगंजमध्ये जायचे तरी तीनदा चढउतर करावी लागते. गाव ऐसपैस पसरलेले आहे. कुठेही हिंडताना जागोजाग काही उभी, काही अर्धी पडलेली, काही जमीनदोस्त झालेली घरे दिसतात. मध्येच मोठमोठी मैदाने आहेत. औरंगजेबाच्या अमदानीत शहर भरभराटीत होते तेव्हा उत्तरेतले अनेक राजपूत सरदार इथे राहत होते. जयसिंगपुरा, भावसिंगपुरा, करणपुरा, कुतुबपुरा, पदमपुरा, बेगमपुरा असे शहरात बावन पुरे होते म्हणतात (एलिचपुरातही बावनच होते). बादशहा गेले. त्याच्यानंतर सरदारही गेले. आता काही पुरे राहिले आहेत. काहींची नावेच राहिली आहेत. कुठे वस्ती आहे, कुठे नाही. कुठे कुठे बांगड्यांचे, चिनी मातीच्या, खापराच्या भांड्यांचे तुकडे सापडतात.

आठवण कशाकशाची राहील? गुलमंडीवरची गर्दी, सराफ्यातल्या काही घराच्या लाकडी दारावरची नाजुक नक्षी, नौखंडा शरीफ, पाणचक्की, शाहगंज मसजिद, मलिक अंबरने बांधायला घेतलेली आणि औरंगजेबाने पुरी केलेली जुम्मा मशीद, आणि खैरे ज़ारी ह्याची. औरंगजेबाने ह्या शहराला आपले नाव दिले. पण नजरेत भरणाऱ्या आणि आठवणीत राहणाऱ्या वास्तू आहेत त्या त्याच्यापेक्षा अधिक इतरांनी निर्माण केलेल्या.

पाहू पाहू म्हणताना काही ठिकाणे पाहायची राहून गेली. उदाहरणार्थ, ओडछ्याच्या पहाडसिंगाचा 'सुनहरी महल'. लांबून पाहिला. पण जवळून पाहायचा राहिला. तशीच औरंगाबादची लेणी. असो. पुन्हा कधी आलो तर पाहता येतील.

# वेरूळच्या वाटेने

वेरूळला जायला निघालो होतो. स्वतंत्र टॅक्सी केली होती. त्यामुळे वेळ बराचसा आमच्या स्वाधीन होता. म्हणून सरळ वेरूळला न जाता वाटेने मध्येमध्ये थाबून, मुख्य रस्ता सोडून, आडबाजूची पूर्वी न पाहिलेली ठिकाणे पाहावी असे ठरवले होते. त्यांत दोन मुख्य होती. एक 'चाद बोधल्याची समाधी' आणि दुसरे 'परियोंका तालाब'. दौलताबाद जवळ येत चालले तेवढ्यात रस्ता सोडून भर्रकन् टॅक्सी उजवीकडे वळली आणि गर्द झाडीत शिरली. जिकडेतिकडे सीताफळांची झाडे होती. आणि ती मोठ्या डोळ्यांच्या मोठमोठाल्या सीताफळानी लगडलेली होती. दुसरीही असतील पण तिकडे लक्ष गेले नाही. 'इकडे कुठे आलो?' असे विचारतो आहे तोच गाडी उभी राहिली. उतरून पाहतो तो समोर डाव्या बाजूला उंचावर पिंगट रंगाच्या वालुका-पाषाणाचा एक छोटा पण रेखीव मकबरा दिसला. हिरव्या झाडीच्या पार्श्वभूमीवर सुरेख दिसत होता.

ड्रायव्हर म्हणाला, 'यह मकबरा देख लीजिये.'

आम्ही वर चढून जातो तो तिथला सेवेकरी पुढे झाला आणि सेवेकरी बोलतात त्या पद्धतीने त्याने भराभर बोलायला सुरवात केली,

'हा मोमिन आरिफचा दर्गा आहे. दिल्लीहून दख्खनला ज्या सातशे पालख्या आल्या, त्यांत हे होते. इथं ईल नावाचा राजा होता, तो एलिचपूरला पळून गेला—'

तो मत्र म्हटल्याप्रमाणे सागत होता. आणि मी आजूबाजूला पाहत ऐकत होतो. मागे दुसरा एक मकबरा होता. सगळे गार, गर्द, शात होते.

'—पण त्याची इला नावाची बहीण होती, तिन एका रात्रीत सगळ कुराण पाठ केल आणि इस्लामचा स्वीकार केला. ही तिची कबर—'

असे म्हणून त्याने जोत्यावर जवळच मुसलमान स्त्रियांची असते तशी एक कबर दाखवली. आणि आमच्या तोंडावर-पाठीवर मोरचेलाने थापटल्यासारखे केले. त्याचा अर्थ, 'तुमच काम झाल. माझही काम मी केल. आता चांगलीशी दक्षिणा ठेवा आणि जा.'

त्याने सागितलेली हकीकत ऐकून माझ्या मनात विचारामागून विचार येऊ लागले एका रात्रीत सबंध कुराण पाठ करणारी ही इला अलौकिक बुद्धिमत्तेची आणि स्मरणशक्तीची असली पाहिजे ह्यात शंका नाही. आपल्याला एका रात्रीत व्यंकटेशस्तोत्र किंवा रामरक्षादेखील पाठ व्हायची नाही. तिची हकीकत सागण्यात त्याला तिच्या पाठांतरशक्तीचे आणि ग्रहणशक्तीचे कौतुक करायचे होते की, तिने इस्लामचा स्वीकार केला ह्या गोष्टीचे?

हे ईल आणि इला कोण? एलिचपूरला 'ईल' नावाचा एक राजा होता. त्याने इस्लामचा अपमान केला म्हणून त्याचा सूड घेण्यासाठी, लग्नाला उभा राहिलेला दूला रहिमानशाह गझनीहून सैन्य बरोबर घेऊन एलिचपूरला आला. तिथे ईल राजा आणि दूला रहिमानशाह ह्यांचे युद्ध झाले, त्यात दोघेही मारले गेले. त्याचे देह एलिचपूर शहराच्या बाहेर बिच्छन नदीच्या काठी पुरलेले आहेत. कुठे गझनी, कुठे एलिचपूर आणि घटना केवढी! पण असे प्रकार इस्लामच्या इतिहासात झालेले आहेत.

अळजापूरच्या, म्हणजेच एलिचपूरच्या, मनू नावाच्या राजाला एळ नावाचा एक मुलगा होता. त्या एळ राजानेच ज्याला आपण वेरूळ म्हणतो ते नगर बसवले. त्याचे नाव एळापूर. एळापूराचेच एलौर–एलूर–वेरूळ झाले. ही पुराणातली कथा. उर्दू-फार्सी लिपीत लिहिले तर एल, ईल, एळ, ईळ ह्यापैकी त्याचा कोणताही उच्चार होऊ शकतो.

म्हणजे आपल्या इतिहासात जरी एलिचपूरच्या एळ नावाच्या राजाचा उल्लेख नसला तरी पुराणात आहे. आणि मुसलमानाच्या इतिहासात तर आहेच. ह्या एळ राजाचे राज्य ह्या भागापर्यंत पसरलेले होते. 'एळ आहे तर एळाही असेलच,' असे मनाशी म्हणत सेवेकऱ्याला दक्षिणा देऊन मोमिन आरिफचा निरोप घेतला.

तिथे झाडावरची सीताफळे घेतली नव्हती म्हणून दौलताबाद किल्ल्याच्या पायथ्याशी विकायला बसली होती तिथून घेतली आणि किल्ल्याच्या समोर रस्त्यापासून फर्लांगभर आत चाद बोधल्याची समाधी आहे, ती पाहायला गेलो. 'धन्य चाद बोधले। ज्यानी जानोपत लोधले॥ त्याचे शिष्य झाले येकोपत॥' असे शेख महमदानी ज्याचे वर्णन केले आहे, ते हे एकनाथ पडितांचे परात्पर गुरू मुसलमान की हिंदू? त्याचे भक्त दोन्ही समाजांत आहेत. जनार्दनस्वामींना श्री दत्तात्रेयप्रभू मलगाच्या रूपात भेटले आणि त्या दोघांनी एका ताटात

मुसलमानी रिवाजानुसार भोजन केले. ते पाहून एकनाथांना फार विस्मय वाटला. पण सत्य कळल्यावर त्याची समजूत पटली. असे त्या वेळी अध्यात्ममार्गांत तरी हिंदु-मुस्लिमामध्ये सायुज्य-सामजस्य होते. चांद बोधल्याची समाधी हे त्याचे प्रतीक आहे. समाधी महीपतिबुवांनी भक्तलीलामृतात वर्णन केल्याप्रमाणे 'जैसी अविंधाची मदा[जा]र जाण। तैसेंच वर रचलें स्थान॥ हिंदु आणि यवन। समाधान पावले॥' अशी वर घुमट असलेली दर्ग्यासारखी बांधली आहे. भोवताली झाडी असल्यामुळे बाहेरून सहज दिसत नाही. आवार शांत, मोकळे, स्वच्छ आहे आणि तिथे हिंदु-मुसलमान असे दोन्ही धर्मांचे भक्त येतात. मशिदी आणि दर्गे बहुधा अतिशय स्वच्छ असतात, तसाच मोमिन आरिफचा आणि हा आहे.

तिथून खुल्दाबादकडे निघालो. खुल्दाबादच्या अलीकडे डाव्या बाजूला एक रस्ता जातो. त्या रस्त्याने आत मैल-दीड मैल गेल्यावर रस्ता संपतो तिथेच खाली, एखाद्या कड्याच्या तळाशी असावा तसा 'परियोंका तालाब'—पऱ्यांचा तलाव आहे असे कळले होते.

टोकाशी जाऊन टॅक्सी थांबली. उतरल्याबरोबर डोळ्यांना एका भल्या मोठ्या-गाडीच्या चाकाएवढ्या-शाळुंकेची ठेच लागली. शाळुंका अर्धीमुर्धी मातीतच होती. म्हणजे अनेक वर्षे—कदाचित शतके—ती तशीच तिथे पडलेली असली पाहिजे. तिच्यात तशीच मोठी पिंडी असेल. पण ती शाळुंकेत किंवा जवळपास कुठे दिसत नव्हती. बाजूलाच एकदोन अत्यंत सामान्य मकबरे होते. ती बहुतेक त्यापैकी एखाद्या मकबऱ्याच्या भिंतीत किंवा पायरीत त्या काळच्या रिवाजाप्रमाणे गेली असावी. हिंदु-मुस्लिम आध्यात्मिक सामजस्याच्या काळातच बहुधा हे घडले असावे!

आसपास आमच्याखेरीज चीटपाखरूही नव्हते. सगळीकडे निर्मनुष्य आणि निःशब्द होते. तसेच आणखी पुढे गेलो. टोकाशी पोचलो. खाली विस्तीर्ण तलाव दिसत होता. नुकताच पावसाळा सपला होता. त्यामुळे बरेच पाणी होते. भोवताली अधूनमधून झाडी आणि हिरवळ. पडक्या इमारतींचे अवशेष आणि ते निळे-करडे पाणी. तळ्यावर गुरे-माणसे कोणी नव्हती. जवळपास वस्तीच नाही. आकाशातून खाली उतरून निवांतपणे आणि निर्विघ्नपणे स्नान करायला पऱ्यांना अगदी योग्य ठिकाण आहे. पूर्वी कदाचित यादवांच्या

राजस्त्रिया आणि मुस्लिम सुलतानाच्या-नवाबाच्या बेगमा जलविहाराला येत असतील. त्या येईनाशा झाल्यानतर, आणि आसमत निर्मनुष्य झाल्यानंतर आता चांदण्यारात्री जलविहार करायला पऱ्या येत असतील म्हणून त्याला 'परियोंका तालाब' म्हणत असावेत, किंवा राजस्त्रिया आणि बेगमा सुंदरच असणार म्हणूनही म्हणत असावेत. पऱ्या नक्की येतात. पण कोणी पाहायचा प्रयत्न केला तर दिसत नाहीत म्हणतात. कशा दिसतील? दिसल्या तर माणसे त्याना परत स्वर्गात जाऊ देतील का?

येताना वाटेत एक काळ्या दगडाची रेखीव मसजिद दिसली होती. ती परतताना पाहिली. खरोखरच सुरेख आहे. पण तिथपर्यंत पोचायला काटेरी कुंपणातून वाट काढीत, तीनचार शेते तुडवीत आम्हाला जावे लागले. त्यामुळे पोचायला वेळ लागला आणि तोही जरुरीपेक्षा अधिक लागला. कारण शेतात ठिकठिकाणी उन्हात चकाकणारे लहानमोठे स्फटिकाचे दगड विखुरलेले होते. ते बरोबर घेतल्यावाचून पुढे जाववेना. आणि एक उचलून घ्यावा तर पुढे दुसरा त्याच्यापेक्षा अधिक चागला दिसावा असे चालले होते. सोनेरी सफरचदे उचलण्यात वेळ घालवणाऱ्या ॲटलांटासारखी आमची स्थिती झाली. आम्हांला शर्यत जिंकायची नव्हती एवढेच. पण वेळ गेलाच. एवढी मोठी मसजिद. त्या अर्थी केव्हातरी जवळपास चागली वस्ती असावी पण आता फक्त दोनचार घरे आहेत तीच त्या मसजिदीची जमात.

तिथून मुख्य रस्त्यावर येऊन खुल्दाबादला गेलो. तेरा-चवदाव्या शतकांत उत्तरेकडून दक्षिणेकडे इस्लामचा प्रचार करण्यासाठी जे सूफींचे तांडेच्या तांडे आले, त्या त्यांच्या येण्याला 'पालख्या आल्या' असे म्हणतात. सगळेच पालख्यांतून आले असा त्याचा अर्थ नाही. शेकडो सूफी आले तर त्यात काही थोडे पालखीपदस्थ असत. ह्या सूफींचे मुख्य केंद्र खुल्दाबाद होते. तिथून ते चारी दिशांना जात. त्यामुळे खुल्दाबादला दक्कनमधल्या इस्लामच्या प्रचाराच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्या काळातल्या कोणत्याही सूफी फकीराला मोठेपण द्यायचे झाले तर 'तो पालख्यांबरोबर आला' असे सांगतात. मोमिन आरिफबद्दल आम्हाला तेच सांगण्यात आले होते.

खुल्दाबादला आलेला पहिला मोठा सूफी संत म्हणजे मुतखिबुद्दीन जरजरी जरबख्श. तो वाटेल तेवढे द्रव्य धर्मासाठी देत असे म्हणून त्याला 'जरबख्श' म्हणजे 'द्रव्यदाता' असे नाव पडले. तो आला तेव्हा इथे मसजिद नव्हती.

'नमाज पंजगाना जमाअत से होती थी.'—लोक एकत्र जमून पाचही वेळच्या नमाजी खुल्या जागेत पढत असत, असे तिथल्या एकाने सांगितले.

हळू हळू खुल्दाबाद हे इस्लामचे धर्मक्षेत्रच झाले. अनेक थोर मुस्लिमांच्या कबरी इथे आहेत. ज़रज़री ज़रबख्शाची तर आहेच. ज्याचे नाव खानदेशातल्या बऱ्हाणपूरला देण्यात आले त्या शेख बुरहानुद्दीनची कबरही इथेच आहे. तो ज़रज़री ज़रबख्शाचा भाऊ. अहमदनगरच्या निज़ामशाहीचा शेवटला थोर मुत्सद्दी, सेनापती आणि कारभारी मलिक अंबर ह्याने आपल्या कबरीसाठी इथेच इमारत बांधून ठेवलेली होती. औरंगाबाद येथे आजही जी पाणीपुरवठ्याची योजना चालू आहे ती सतराव्या शतकात मलिक अंबरने चालू केलेली आहे. औरंगजेब, हैदराबाद संस्थानचा पहिला निज़ाम, गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीचा शेवटचा सुलतान अब्दुल्ला तानाशाह, बहमनी अमदानीतला गुलबर्ग्याचा प्रसिद्ध सूफी धर्मप्रचारक बंदेनवाज गेसू दराज ह्याचा बाप राजू कत्ताल, ह्या सर्वांच्या आणि इतर असंख्य लहानमोठ्या मुसलमानांच्या कबरी इथेच आहेत. म्हणूनच त्याला 'खुल्दआबाद' म्हणजे 'स्वर्गलोक' म्हणतात. सूफी संत आणि मुस्लिम राज्यकर्ते ह्यांच्या परस्परसहकार्याने इथून जो इस्लामचा प्रसार झाला त्याचे काही संस्कार कोसभरावरच्या वेरूळच्या लेण्यातल्या मूर्तींच्या नाकावर, स्तनावर आणि हातापायावर झालेले आहेत ते दिसतात. खुल्दाबाद हे असे महत्त्वाचे गाव आहे.

वेरूळला जायचे ते लेणी पाहायला. तिथला लेण्यांचा समूह हा एक असाधारण समूह आहे. अजिंठ्याला तीस लेणी आहेत, तर वेरूळला पस्तीस आहेत. पण विशेष म्हणजे दीड मैल लांबीच्या डोंगरात कोरलेल्या ह्या लेण्यांत बौद्ध, हिंदू आणि जैन अशा तिन्ही धर्मांची लेणी आहेत. आणि योगायोग असा की, बौद्ध बारा, हिंदू सोळा आणि जैन सात लेणी ओळीने आणि प्रत्येक धर्माची सलग आहेत. आणि त्यात चवथ्या-पाचव्या शतकापासून बाराव्या-तेराव्या शतकापर्यंतचा भारतीय शैलशिल्पाचा क्रमविकास ओळीने पाहायला मिळतो. अशाच क्रमाने ती कोरली गेली आहेत. हे जाणूनबुजून केले असेल असे नाही, पण आहे खरे. आणखी विशेष म्हणजे ह्या सगळ्यांचा मेरुमणी जे कैलास लेणे, ते कालदृष्ट्या आणि स्थलदृष्ट्याही ह्या लेण्यांच्या माळेच्या जवळजवळ मधोमध येते. आपण जात असताना पहिल्यानेच लागतात बौद्ध लेणी. ही सर्वांत

जुनी. ही भव्य आहेत. ह्यातल्या मूर्तीही भव्य आहेत. पण त्या साध्या आहेत आणि अलंकरणही बेताचे आहे. बौद्ध लेणी पाहून हिंदू लेण्यांकडे आले म्हणजे हिंदूच्या पुराणांतल्या देवदेवतांचे दर्शन होऊ लागते. एवढेच नव्हे, तर शिल्पाचे स्वरूपदेखील बदलू लागलेले दिसते. पूर्वीच्या मूर्तींचे रूप भव्य, पण साधे आणि जवळजवळ अनलंकृत होते. आता त्यांत तपशील आणि अलंकरण वाढू लागले आहे. मूर्तींची शरीरे अधिक वळणदार आणि डौलदार होऊ लागली आहेत. त्यात बारकावे येऊ लागले आहेत. आणि मूर्तींच्या संख्येला मर्यादा राहिलेली नाही. विष्णु-लक्ष्मीच्या आणि शंकर-पार्वतीच्या जशा सौम्य-प्रसन्न मूर्ती त्यात आहेत तशाच कालभैरवाच्या आणि महिषासुरमर्दिनीच्या प्रचंड विकराल आणि भयानक मूर्तीही आहेत. आणि बारा-चवदा हात उंच आणि भव्य आहेत तशा हात-दोन हात उंचीच्याही आहेत.

ह्या शिल्पकौशल्याचा परमोत्कर्ष झाला आहे कैलास लेण्यात. आत प्रवेश करतानाच समोर लाटांचे नर्तन चाललेल्या जलाशयात कमलासना गजलक्ष्मी दिसते. हे शुभदर्शन घेत आपण डावीकडे वळावे तो समोर गंगा, यमुना आणि सरस्वती ह्यांच्या बांधेसूद प्रसन्न मूर्ती दृष्टीस पडतात. शेजारीच आपल्या उजव्या हाताला प्रचंड हत्ती आणि एक स्तंभ दिसतो. त्याच्याकडे पाहतो न पाहतो तो दृष्टी जाते मुख्य मंदिराकडे आणि आपण स्तिमित होऊन पाहत राहतो. वरपासून खालपर्यंत खडक फोडीत चारी बाजूनी पुरेशी मोकळी जागा सोडून हे मंदिर वरून खाली अशा पद्धतीने कोरून काढलेले आहे. ते अगदी बांधून काढलेल्या मंदिरासारखे दिसते. कुठेही प्रमाण सुटलेले नाही. सूतभर देखील इकडेतिकडे झालेले नाही. एवढे मोठे मंदिर मनात उभारून कारागिराच्या हातून ते घडवून घेणाऱ्या कलाकाराची प्रतिभा स्तंभित करणारी आहे. स्वतः कलाकारालाही हे मंदिर निर्माण झाल्यावर नवल वाटले आणि 'एतन्मया कथमहो कृतम्' असा विस्मयोद्गार त्याच्या तोंडून निघाला. लहान-मोठ्या मूर्तींनी मंदिर अंतर्बाह्य अलंकृत केलेले आहे. अगदी अंधाऱ्या सभामंडपात देखील भिंतींवर, खांबांवर मूर्ती आहेत. मंदिराच्या आतबाहेर, तिन्ही बाजूच्या कड्याच्या कुशीत शंकरपार्वतीच्या, मातृकांच्या, लिंगोद्भव शंकराच्या, रामायण-महाभारतांतल्या पुराणातल्या प्रसंगाच्या, इतक्या मूर्ती आहेत की त्या पाहण्याला दोन डोळे पुरत नाहीत. हजार-बाराशे वर्षे उन्हा-पावसाचा, थंडी-वाऱ्याचा मारा सोशीत उभ्या असलेल्या ह्या मूर्तींपैकी काही झिजल्या

आहेत, काही झडल्या आहेत, काहींवर मूर्तिभंजकांच्या घणाचे घाव पडले आहेत; पण अशाही अवस्थेत त्याचे अंगसौष्ठव, त्याचा डौल, त्याचा वळणदारपणा, जिवंतपणा, आणि त्याचे मूळचे भाव जाणवल्यावाचून राहत नाहीत

ह्या मंदिराचे नाव आधी 'माणकेश्वर' होते. एळापूर वसवणाऱ्या एळ राजाला पूर्वजन्मीचा शाप होता. त्यामुळे रात्री त्याचे शरीर कृमिमय होत असे. आणि त्याची दुःखी पत्नी माणकावती त्याची रात्रभर राखण करीत राही. एकदा तिला दिसले की राजाचे बाकीचे शरीर नेहमीप्रमाणे कृमिमय झाले आहे, पण तोंड आणि हात-पाय मात्र चांगले राहिले आहेत. तिला अतिशय आनंद झाला. तिने राजाला आदल्या दिवशीच्या त्याच्या हालचालींसंबंधी खोदून खोदून विचारले तेव्हा तिला कळले की घृष्णेश्वराशेजारच्या जागेत गाईच्या खुरामुळे पडलेल्या एका खळग्यात साठलेल्या पाण्याने त्याने हात-पाय-तोंड धुतले होते, त्यामुळे ते चांगले राहिले होते. त्याच दिवशी ती राजाला घेऊन त्या ठिकाणी गेली. पण खळगा ठणठणीत कोरडा होता. ती निराश झाली नाही. तिने त्या ठिकाणी विहीर खणायला लावली आणि ती अन्नोदक ग्रहण न करता शंकराची प्रार्थना करीत बसली. साठाव्या दिवशी शंकर प्रसन्न झाले आणि विहिरीला उमाप पाणी लागले. राणीने त्या पाण्याने राजाला स्नान घातले. त्या रात्री त्याचे शरीर चांगले राहिले. राणीने घृष्णेश्वरावर सात दिवसांत मंदिर बांधवून घ्यावे असे राजाला सांगितले. राजाने कारागीर बोलावून त्याला कामगिरी सांगितली. पण त्याने घृष्णेश्वरावर मंदिर बांधण्याऐवजी डोंगरातून हे मंदिर कोरून काढले, म्हणून त्याला माणकेश्वर हे नाव पडले.

महानुभावपंथप्रवर्तक श्री चक्रधर स्वामी पुष्कळदा एळापुरात येऊन राहत आणि लेण्यात फिरायला येत तेव्हा ते 'माणकेश्वराचेया लेणेयासि बीजे' करीत. ह्याच लेण्याला रंगमहलही म्हणत, कारण एकेकाळी ते रंगवलेले होते. त्या रंगकामाचे काही अवशेष मंदिराच्या प्रवेशमंडपाच्या छतावर अजूनही दिसतात.

'कैलास'च्या पुढल्या-पुढल्या लेण्यातून शिल्पकलेचे स्वरूप आणखी बदलू लागलेले दिसते. 'सीता की न्हाणी' किंवा 'डुमर' लेणे हे शेवटले हिंदू लेणे आहे. ते मुंबईजवळच्या घारापुरीच्या लेण्याची अगदी प्रतिकृती वाटावी असे आहे. त्यातल्या शिल्पांचे विषयही घारापुरीतल्यासारखेच पार्वती-परिणय, अंधकासुरवध, तांडवनृत्यमग्न शिव, रावणकैलासोत्थापन असेच आहेत. पण घारा-पुरीतल्या शिल्पाचा लयबद्ध डौल, जोम आणि जिवंतपणा इथे नाही. कुठल्याही

शिल्पांत असते त्याप्रमाणे धारापुरीतल्या शिल्पांतही हालचालीतला एकच क्षण पकडला आहे. पण ते इतके जिवंत आहे की आधीच्या-नंतरच्या हालचाली आपल्याला दिसताहेत असे वाटते. ह्या लेण्यातली शिल्पे थिजल्यासारखी, बोजड, ताठर वाटतात आणि त्यांची मुद्रा भावहीन.

ह्यापुढची शेवटली चारपाच लेणी जैनांची आहेत. ह्यातल्या शिल्पांनी हिंदू शिल्पांपासून आणखीच वेगळे वळण घेतले. इथेही प्रचंड-भव्य आणि लहान-सुबक मूर्ती आहेत. इंद्र आहे. इंद्राणी आहे. तीर्थंकर आहेत. फुटेलशी वाटण्याइतकी फुगलेली पैशाची पिशवी हातात घट्ट धरून मांडीवर घेऊन बसलेला ढेरपोट्या कुबेर आहे. आणि हाडांचा सापळा बाहेर पडतो की काय असे वाटण्याइतके हाडकुळे दरिद्री कुटुंबही आहे हे शिल्प ताठर किंवा निर्जीव नाही. ते सुंदरही वाटते. पण तपशिलाचे बारकावे आणि अलंकरणाचा अतिरेक ह्यांनी ते जड-बोजड झाले आहे.

आठ-नऊ शतके व्यापणाऱ्या, वेगवेगळ्या धर्मांच्या शैल-शिल्पकलेचे वेग-वेगळे टप्पे दाखवणाऱ्या ह्या लेण्यात नाना देवदेवतांच्या, त्यांच्या अवतारांच्या, त्यांच्या विविध रूपांच्या, तसेच पशुपक्ष्यांच्या, लहानमोठ्या मूर्ती इतक्या आहेत की त्या केव्हाही आणि कितीही वेळा पाहिल्या तरी सगळ्या पाहिल्या असे वाटत नाही आणि शेवटी आपण बाहेर पडतो तेव्हा काय पाहिले, किती हिंडलो, कुठे आलो, हे आपल्याला कळेनासे होते.

असेच एकदा श्री चक्रधरस्वामींच्या मागे-मागे एका लेण्यातून दुसऱ्या लेण्यात हिंडता-हिंडता शेवटी सर्वज्ञ गोसावी आणि त्यांचा शिष्यपरिवार एका लेण्यातून बाहेर आले तो त्यांना समोर एक नगर दिसले. ते पाहून बाइसाने विचारले, 'बाबा, हे कवण नगर?' 'बाइ, हे एळापुर' 'हे काइ बाबा, इतुकी वाट आलो आणि हे एळापुरचि?' असेच आपल्यालाही वाटते.

लेण्याच्या समोर एळापुराकडे जाणारा रस्ता आहे. तेच शिवाजी महा-राजांच्या आजोबांचे पाटिलकीचे गाव वेरूळ, त्याच रस्त्यावर घृष्णेश्वराचे मंदिर आहे. मंदिर तांबूस रंगाच्या दगडाचे आहे आणि शंकराची पिंडीही तांबड्याच दगडाची आहे. एकदा शंकराच्या कपाळावर टिळा लावण्यासाठी पार्वतीने आपल्या तळहातावर केशर चुरून त्याची गोळी केली. ती शंकराला इतकी आवडली की त्याने तिच्यात आत्मतेज घातले. तेच घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग झाले. म्हणून ती तांबडी आहे. सध्याचे देऊळ अहल्याबाई होळकरणीने बांधलेले

आहे. तिने मंदिर तांबूस रंगाच्या दगडानी बांधावे ह्यात मोठेच औचित्य आहे. देवळाच्या शेजारी फक्त पावसाळ्यात वाहणारी एळा नावाची नदी आहे. ही एळा मोमिन आरिफच्या दर्ग्यातली ईल राजाची बहीण इला नव्हे. ही सूर्याची नात, श्राद्धदेवीची मुलगी, एळा आहे. तिची स्मृती चिरकाल राहावी म्हणून शंकराने तिला इथे नदीचे रूप दिले. नदीला पाणी नसले तरी नाव आहे आणि तिची स्मृती अजून जागी आहे.

—असा हा देवगिरीपासून एळापूर—एलौर—वेरूळपर्यंतचा प्रदेश. इतिहासातला ईल आणि इला आणि पुराणातला एळ आणि एळा इथे एकमेकांत मिसळली आहेत. मोमिन आरिफच्या दर्ग्यापाशी इतिहास आणि आख्यायिका होती. इथे वेरूळात इतिहास, पुराणे आणि आख्यायिका ह्यांचा त्रिवेणी संगम झाला आहे. ह्या संगमात बुडी मारून बाहेर पडताना एखाद्या स्वप्नातून बाहेर पडल्यासारखे वाटते. त्यातली बहुतेक दृश्ये हळूहळू विरून जातात. काही थोडी ठळक-ठसठशीत मनात राहतात. विश्वकर्मा, दशावतार, कैलास, सीता की न्हाणी, इंद्रसभा, घृष्णेश्वर आणि अशीच आणखी काही.

# रोजनिशी अहमदनगरची

**२० मार्च, १९७५**

आज दुपारी सव्वाचारच्या बसने पुण्याहून निघून वाटेत काही विघ्न न येता सव्वासात वाजता नगरला सुखरूप येऊन पोचलो. नगरच्या डॉ० केतकर हॉस्पिटलच्या डॉ० विमलाबाई केतकर ह्यांच्याकडे आम्हा दोघांना जायला हवे होते आणि माझी स्वतःचीही नगरला जायची पुष्कळ वर्षांपासूनची इच्छा होती. १९४४-४५ मध्ये केव्हातरी एकदा काही कामाच्या निमित्ताने नगरला आलो होतो आणि सातभाईंचा मळा किंवा अशाच कुठेतरी माझे एक स्नेही राहत होते त्याच्याकडे उतरलो होतो. पण नगर पाहिले असे नव्हते. ते पाहायचे होते.

हा माझा विचार मी केव्हातरी बोलून दाखवीत असे. तेव्हा लोक म्हणत, 'इतकं काय खास आहे नगरला? मुद्दाम जाण्यासारखं?'

मी म्हणे, 'तसं खास काही नाही. पण वाटतं, एकदा नगर पाहावं.'

खरे म्हणजे मला अनेक कारणासाठी नगरला जायचे होते. पण मुख्य म्हणजे मला भिंगारला जायचे होते. मी कुठेतरी वाचले होते की, औरंगजेबाचे भिंगारला निधन झाले, तिथे त्याचे काळीज पुरले आहे, आणि त्याचा देह दौलताबादच्या पलीकडे खुल्दाबादला दफन केला आहे. खुल्दाबादची त्याची बिनघुमटाची खुल्या आकाशाखालची कबर मी पाहिली होती. पण त्याचे काळीज जिथे पुरले आहे ती जागा मला पाहायची होती. दक्षिणेतली कुतुबशाही आणि आदिलशाही ह्या दोन शाह्या आणि मराठ्यांचे राज्य समूळ नष्ट करण्याची प्रतिज्ञा करून १६८३ मध्ये औरंगजेबाने भिंगारला तळ ठोकला होता. आणि चोवीस वर्षांनतर १७०७ साली तिथेच त्याचे निधन झाले. दोन्ही शाह्या नष्ट झाल्या. त्यातली एक लाच आणि फितुरी ह्यांच्या साहाय्याने. संभाजीचा क्रूर वध झाला. शाहू कैद झाला. पण मराठ्यांचे राज्य काही नष्ट झाले नाही. मराठे लढतच राहिले. बादशाही फौजांनी मराठ्यांचा एक किल्ला इकडचा घ्यावा, तर मराठ्यांनी दुसरीकडचा शाही फौजांकडून परत बळकावावा. असेच चालले होते. त्याचे काळीज जिथे गुंतले होते तिथेच पुरले जावे हा योगायोग गमतीचा होता.

आणि शिवाय जेव्हा काहीही नव्हते तेव्हा 'ते' होते असे म्हणतात त्याप्रमाणे जेव्हा अहमदनगर शहर उभे राहील असे इतिहासालाही स्वप्न पडले नव्हते त्यावेळी भिंगार हे एक महत्त्वाचे गाव होते. जुन्नर-देवगिरी. जुन्नर-पैठण ह्या मार्गावरचे गाव. तिथे अनेक मंदिरे होती. जवळपास लहान लहान गावे होती. महानुभाव पंथाचे प्रवर्तक 'आमचे गोसावी' अनेक वेळा भिंगारला आले होते. त्या भागातले, असे हे एकेकाळचे प्रसिद्ध गाव. म्हणूनही मला भिंगारला जायचे होते. हे सगळे मी लोकांना कशाला सांगू ?

आणखी मला नगरला जायचे होते ते तिथले फर्गसन गेट भागातले रे० नारायण वामन टिळक ह्यांचे घर पाहण्यासाठी. वेगवेगळ्या सामाजिक पातळ्यावरची काही ख्रिस्ती कुटुंबे पाहण्यासाठी, आणि नगरातली जुनी ख्रिस्ती 'देवळे' पाहण्यासाठी. आणि आणखी जे काय पाहता येईल ते पाहण्यासाठी.

म्हणून मी नगरला आलो आहे.

**२१ मार्च, १९७९**

मला रे० टिळकांचे घर, ख्रिस्ती कुटुंबे, ख्रिस्ती 'देवळे' वगैरे पाहायची होती. त्यात मला मदत करण्यासाठी मी नगरचे तरुण ख्रिस्ती कार्यकर्ते श्री० सुधीर शर्मा ह्यांना आधीच पत्र लिहून केव्हा येणार ते कळवले होते. त्याचा सकाळीच फोन आला होता. आजच दुपारनंतर सगळीकडे जायचे ठरले.

तीन-साडेतीनच्या सुमाराला श्री० शर्मा आले. आणि त्यांच्याबरोबर आम्ही निघालो. नगरची आठवण झाली की आधी रे० टिळकांची आठवण होते. खरे म्हणजे 'स्मृतिचित्रां'ची होते, आणि 'स्मृतिचित्रा'तल्या टिळकांची होते. त्यांची कविता आठवते. त्यांचे मराठी भाषेवरचे, महाराष्ट्रावरचे, देशावरचे, भारतीयत्वावरचे प्रेम आठवते. त्यांचे अव्यवहारी पण सरळ, निष्कपट, चटकन् तापणारे अन् तितकेच चटकन् निवणारे, क्षमाशील व्यक्तिमत्त्व चित्रासारखे मनासमोर उभे राहते. आधी आम्हाला श्री० शर्मांनी टिळकांची समाधी दाखवली. त्यांचे दहन वरळीच्या स्मशानभूमीत झाले. पण अस्थी इथे आहेत. समाधी साधी आहे. वर एक शिलालेख आहे. ज्या ह्यूम कुटुंबाचा आणि टिळक कुटुंबाचा जिव्हाळ्याचा संबंध होता, त्या ह्यूम कुटुंबापैकी काहींच्या समाध्याही शेजारी आहेत. आखीव-रेखीव झुडपे, झाडे वगैरे नाहीत त्यामुळे उदास वाटले. समाधीपाशी क्षणभर स्तब्ध उभे राहिलो आणि निघालो.

समाध्या पाहून टिळकांसंबंधी विचार करीत करीतच आम्ही मोडकांच्या घराकडे निघालो. मोडकांचे कुटुंब हे नगरातल्या ख्रिस्ती कुटुंबांपैकी अतिशय प्रसिद्ध, प्रतिष्ठित आणि अगदी जुन्यापैकी कुटुंब. कदाचित 'ॲरिस्टॉक्रॅटिक'च. असा निदान जे ऐकले-वाचले त्यावरून झालेला माझा ग्रह. शाहूराव मोडक हे रे० रामकृष्णपंत मोडकांचे चिरंजीव. मुंबईचे एकेकाळचे पोलीस कमिशनर ई० एस० मोडक हेही त्याच कुटुंबातले. पूर्वीची ओळख नाही. कोणाचे ओळखपत्र नाही. तसे त्यांच्याशी काही कामही नाही. एखादे नामांकित ठिकाण पाहायला जावे तसे जात होतो. पण ते ठिकाण नव्हते. तिथे माणसे होती. त्यामुळे थोडेसे संकोचत, दबकतच जात होतो. बरोबर श्री० शर्मा होते म्हणून त्यातल्या त्यात थोडा धीर होता.

आम्ही पोचलो. श्री० शर्मांनी आमची ओळख करून दिली. मोडक मंडळींनी आमची ऊठबस फार सौजन्याने, अगत्याने केली. घरातले साज-सामान खुर्च्या-कोचे, चित्रे, फोटो वगैरे पाहिल्यावर हे कुटुंब सुसंस्कृत, सुखवस्तू, दीर्घकाळचे सुप्रतिष्ठित आहे हे लगेच लक्षात आले. थोडा वेळ बसून आम्ही तिथून निघालो. त्यांच्या शेजारीच ओळीने केळकर, वैशंपायन, डोंगरे वगैरे त्यांचे नातेवाईक राहतात असे कळले. आम्ही आणखी कोणाकडे गेलो नाही. पण माझ्या मनात विचार आला मोडक, केळकर, करमरकर, टिळक, डोंगरे, गोरे, सावरकर, गद्रे, आठवले वगैरे किती म्हणून ब्राह्मण, कोकणस्थ ब्राह्मण, गेल्या शतकात ख्रिस्ती झाले! हे काही नोकरीच्या, द्रव्याच्या, प्रतिष्ठेच्या लोभाने ख्रिस्ती झाले नाहीत. त्यांच्यावर सामाजिक अन्याय होत नव्हता. मग ते ख्रिस्ती का झाले? ह्या प्रश्नाची उत्तरे मला आता इथे मिळणार नव्हती आणि चर्चा करून कोणी दिली असती की नाही ह्याची शंका होती. पण प्रश्न मनात उभे राहत होते.

तिथून आम्ही चांद सुलताना हायस्कूलसमोरचे १८३२ साली बांधलेले अमेरिकन मराठी मिशनचे चर्च पाहिले. खूप मोठे, मजबूत आहे. पण बंद असल्यामुळे आत जाऊन पाहता आले नाही. मग त्याच्याही आधीचे १८१३ साली बांधलेले नगरातले पहिले मराठी चर्च पाहिले. प्रवेशद्वारासमोर छोटी मुखशाळा आहे. चर्च विटांच्या भिंतींचे, लाकडी खांब-तुळ्या-वहालाचे, कौलारू पण चांगले रुंद प्रशस्त आहे. पहिले चर्च असावे तसे आहे. साधे. मला फार आवडले. जवळचे वाटले. लेण्टचे दिवस असल्यामुळे उपासना

चालली होती. वातावरण गंभीर होते. आम्हीही आत जाऊन थोडा वेळ इतरा-प्रमाणेच स्तब्ध उभे राहिलो. 'मंडळी' कोण आहेत विचारले नाही. पण बहुतेक लोक सामान्य मध्यम परिस्थितीतले दिसत होते.

ख्रिस्ती समाजात तत्त्वतः जातिभेद नाही. पण शैक्षणिक, आर्थिक आणि त्याच्या अनुषंगाने राहणीमानाचे आणि संस्काराचे भेद आहेतच. मोडकांच्या नंतर क्रमाक्रमाने खालच्या स्तरावरच्या दोन-तीन कुटुंबांत श्री० शर्मांनी आम्हाला नेले. त्यांतले एक गृहस्थ लष्करी नोकरीतून निवृत्त झालेले होते. त्यांचे घर समृद्ध दिसत होते. एकाचा टायपिंगचा क्लास होता. अशा प्रकारे नगरातल्या ख्रिस्ती समाजाचा उभा छेदच श्री० शर्मांनी दाखवला. प्रत्येक घरी आमची चांगली ऊठबस झाली.

सगळ्यात शेवटी आम्ही फर्गसन गेट भागात गेलो. रे० टिळक जिथे राहत होते तिथे. तिकडे जाताना 'स्मृतिचित्रात'ली सगळी चित्रे 'मी मी' म्हणून मनात पुढे येऊ लागली. बालकवी ठोंबऱ्याचे टिळकांकडे राहणे, त्याचा विद्याभ्यास, त्याची नोकरी, त्याची आणि लक्ष्मीबाईंची भांडणे, रुसवे, नंतर दिलजमाई, मग थोडी रडारड आणि लक्ष्मीबाईंनी ठोंबऱ्याला पोटाशी धरणे, म्हशीच्या पारडाचे दावे ठोंबऱ्याच्या कबरेला बांधलेले, आणि ठोंबऱ्यांनी पारडाला ओढण्याऐवजी पारडूच ठोंबऱ्यांना ओढते आहे, असे सोपानदेव चौधरींच्या एका कवितेतल्या-प्रमाणे 'गोळी पुढे अन् हरीण मागे' असा प्रकार; टिळकांचा धांदरटपणा, विसराळूपणा, वस्तू सापडली नाही की आकाडतांडव, 'सगळी माझ्याविरुद्ध आहेत' अशी तक्रार आणि चूक उमगली की लगेच क्षमा मागणे. लक्ष्मीबाईंच्या 'कादंबरी'वरचा ठोंबऱ्याचा चार ओळींचा अभिप्राय. कागदाला कागद चिकटवून

> 'अहमदनगर, फर्ग्युसन गेट, टिळकांची वाडी, मधले घर,
> माठानजीक, जात्याशेजारी लहानसे अंथरूण. त्यावर निजलेल्या
> लक्ष्मीबाईंच्या उशानजीक, ता० ३–३–१४.'

असे पत्त्यापासूनच लांब केलेले ताराबाईला हवे असलेले ठोंबऱ्याचे पत्र. थोडक्यात म्हणजे 'स्मृतिचित्रा'तले नगरचे सगळे प्रसंग मनात आले. जिथे हे सगळे घडले. तिथे आता आपण जात आहो. लक्ष्मीबाई आणि ठोंबरे ह्यांचे परस्परप्रेम हे एक अद्‌भुत नाते होते. त्याचे साक्षी असलेले घर आता आपण पाहणार आहो ही जाणीव, अंतःकरण जड करीत होती, भरून टाकीत होती, उत्सुक करीत होती, उल्लसितही करीत होती.

रात्र झाली होती. खरे म्हणजे आम्ही आमच्या फेरीला इथून आरंभ करायला हवा होता असे वाटले. पण तसे केले असते तर टिळकांच्या समाधीपर्यंत जायला अंधार झाला असता आणि समाधी दिसलीच नसती. शर्मांनी केले ते बरोबरच केले होते.

एका आवारात डाव्या अंगाला, चाळीसारख्या एकीला एक चिकटलेल्या, ओळीने सातआठ खोल्या आहेत. त्यातल्या मधल्याच तीन खोल्या टिळकांच्या होत्या. रस्त्यापासून वीतभर उंच अंगण आहे. सध्या ह्या खोल्या श्री० ससारे नावाच्या गृहस्थाच्या मालकीच्या आहेत. जमिनीत शहाबादी फरशीचे तुकडे बसवलेले आहेत. टिळक राहत होते तेव्हा ही शेणाने सारवायची जमीन होती. लक्ष्मीबाईंनी पाळलेल्या म्हशीचे शेण त्याना त्या वेळी त्या कामी उपयोगी पडत असेल. तिहीपैकी एक खोली ससाऱ्यांनी भाड्याने दिली आहे. त्याच्याकडल्या दोन खोल्यांपैकी एक राहती आणि शेजारची स्वयपाकाची आहे. तिथे स्वयपाक चालू असल्याचे नाकाला तीव्रपणे जाणवत होते.

खोल्या अगदी लहान, दहा × दहा किंवा दहा × बारा फूट असतील. ह्या खोल्यात रे० नारायण वामन टिळक, महाराष्ट्राचे मुलां-फुलांचे कवी, आणि त्यांचा सगळा गोतावळा राहत होता. श्री० ससाऱ्याशी इकडलेतिकडले थोडेसे बोललो. आणि मग काही मिनिटे स्तब्ध उभे राहिलो. मनातली घालमेल सावरीत. पाहण्यासारखे काय होते? आणि विचारण्यासारखे तरी काय होते? आठवण्यासारखे मात्र पुष्कळ होते. ते आठवत होतेच. थोडा वेळ तसेच थाबून आम्ही तिथून निघालो. दारातून बाहेर पडल्यावर मी दाराच्या डावी-उजवीकडे पाहिले. म्हटले, 'ह्या घरात रे० नारायण वामन टिळक राहत होते' असे सागणारी पाटी दिसते का? दिसली नाही. कृष्णपक्षातली रात्र होती. अधार झाला होता त्यामुळे कदाचित दिसलीही नसेल. मराठी ख्रिस्ती मडळी तशी पाटी लावणार नाहीत असे कसे होईल?

तिथून श्री० शर्मांनी आम्हाला डॉ० विमलाबाईंच्या घरापाशी सोडले. आजची संध्याकाळ सगळी ख्रिस्ती संध्याकाळ होती. फार चागली गेली—कारणी लागली.

**२२ मार्च, १९७९**

आज संध्याकाळी भिंगारला औरंगजेबाचा दर्गा पाहायला गेलो. भिंगार

गाव मागे टाकून बरेच पुढे गेल्यावर मुख्य रस्त्याच्या डाव्या बाजूला लांबवर चुन्याने रंगवलेली एका आवाराची भिंत दिसली. तिच्या मधोमध एक मेहरपी आणि तिच्या आत एक साधी अशी दुहेरी कमान असलेला दरवाजा होता. तिथपर्यंत जायला रस्ता असा केलेला दिसला नाही. गाड्यांच्या जाण्या-येण्यामुळे पडलेली चाकोरी तेवढी होती. तीसुद्धा काही ठिकाणी दोन्ही बाजूंना खोल खड्डे आणि मध्ये जेमतेम गाडी जाऊ शकेल एवढा पट्टा अशी होती. आमच्या ड्रायव्हरने अगदी सावधगिरीने, कौशल्याने गाडी चालवून आम्हाला तिथपर्यंत सुखरूप नेले. मला वाटते, हा दर्गा पाहायला बुद्धया कोणीही जात नसावेत. हिंदू तर नाहीच. मलादेखील लोक म्हणालेच, 'तिथे काय पाह्यच आहे एवढ ?

गाडीतून उतरून आम्ही आत शिरतो तो साधारण चोवीस-पचवीस वर्षांचा एक तरुण पुढे येऊन आमच्याबरोबर चालू लागला. गाडी, आमचा पोशाख वगैरे पाहून आम्ही कोणीतरी विशेष असावे असे कदाचित त्याला वाटले असेल. आणि कोण आले असावे म्हणून चकितही झाला असेल. मी त्याच्याशी मराठीत बोलायला सुरुवात केली. तो उर्दूत उत्तरे देऊ लागला.

मी विचारले, 'तुम्ही कुठले राहणारे?'

'औरंगाबाद की तरफके.'

'मग तुम्हाला मराठी चागलं बोलता येत असेल, यायला पाहिजे.'

'नही. वैसे समझ लेता हूं. लेकिन अच्छी तरह बोलने नही आती.'

मी मनात म्हटले, महाराष्ट्र निर्माण झाल्याला जवळजवळ वीस वर्षे झाली. त्याच्या आगेमागे हा जन्मला. महाराष्ट्रातच आणि महाराष्ट्राच्या गाभ्यात राहणारा. पण ह्याला मराठी बोलता येत नाही. ह्याच्याआधी मला खुल्दाबादलाही हाच अनुभव आला होता.

'मरहटीकी क्या जरूरत है ? उर्दूसे काम चल जाता है.' तिथल्या औरंगजेबाच्या कबरीशेजारच्या मशिदीतल्या मदरशातला एक मुदर्रिस मला म्हणाला होता.

मी मग त्याच्याशी उर्दूतच बोलू लागलो. म्हणालो, 'बादशहा आलमगीरचं काळीज जिथे पुरलेलं आहे ती जागा मला पाहायची आहे. त्यासाठी मी मुद्दाम इथे आलो आहे.'

तो म्हणाला, 'बादशहा आलमगीरचं काळीच—आंतडी वगैरे इथे काही पुरलेलं नाही.' हे ऐकून मला निराशेचा हलकासा धक्काच बसला.

बोलत बोलत आम्ही आवाराच्या मधोमध असलेल्या एका मोठ्या चबुतऱ्यावर चढून आलो. त्याच्या मध्यभागी एका चौकोनी चौथऱ्यावर एक लहानशी कबर होती. तो बोलतच होता—

'इथे बादशहाच्या शवाला स्नान घालण्यात आलं आणि नंतर ते खुल्दाबादला नेऊन तिथे त्याचं दफन करण्यात आलं. तिथे त्याची कबर आहे.'

मी म्हटले, 'मी पाहिली आहे. मी ऐकलं होतं की इथे त्यांचं काळीज पुरलं आहे.'

'जी नहीं.'

चबुतऱ्याच्या पश्चिमेला एक प्रशस्त मसजिद आहे. आणि पूर्वेला तशीच प्रशस्त बारादरी. आवारही चांगले ऐसपैस आहे. दर्ग्याच्या चारी बाजूंना दृष्टी पोचते तिथवर मैदानच मैदान पसरले आहे. औरंगजेबाच्या छावणीच्या हजारो तंबू–राहुट्या तिथे सहज उभ्या राहू शकल्या असतील.

कबर इतकी लहान आहे की जवळजवळ क्षुद्रच वाटते. खरे म्हणजे ती कबर नाहीच ते एक स्मारक आहे. औरंगजेब आधीच लहानखुरा होता. त्यात मरणाच्या वेळी एक्याण्णव वर्षांच्या वयाच्या ओझ्याने वाकलेला आणि राज्याच्या भवितव्याबद्दलच्या चिंतेने त्रस्त झालेला होता. चौदा भावंडांपैकी एकटाच मागे राहिलेला होता. कबर पाहताना त्याची सबंध कारकीर्द मनासमोर उभी राहिली. ती यशस्वी म्हणावी की अयशस्वी? राज्याचा विस्तार प्रचंड वटवृक्षासारखा झाला होता. चहूकडे त्याला फुटलेल्या पारंब्या जमिनीत घुसून पक्क्या झाल्या होत्या आणि मुख्य खोडाला मात्र आतून कीड लागत चालली होती.

आम्ही कबर वगैरे पाहतो आहो एवढ्यात दहा-बारापासून अठरा-वीस-पर्यंतच्या वयाची चाळीस-पन्नास मुले आमच्याभोवती जमली होती.

'हे कोण आहेत?' मी विचारले.

'इथे आमची "मदरसा अरबिया दारुल् उलूम अहमदनगर" ह्या नावाची धर्मशिक्षणाची शाळा आहे. "दारुल् उलूम देवबंद"ला ती संलग्न आहे. त्याचाच अभ्यासक्रम आम्ही इथे शिकवतो.'

'काही नवीन विषय शिकविता की नाही? देशाचा इतिहास, जगाचा भूगोल वगैरे?' मी विचारले.

'इथे आम्ही फक्त कुराणाचं आणि इस्लाम धर्माचं शिक्षण देतो.'

'हे सगळे विद्यार्थी कुठून कुठून आलेले आहेत? एकंदर किती आहेत?

शाळा कधी स्थापन झाली? आणि शिक्षण संपल्यावर हे पुढे काय करणार?'

'हा आमचा मदरसा १९६२ मध्ये स्थापन झाला. इथे जवळजवळ चारशे विद्यार्थी आहेत. कर्नाटकापासून सगळीकडले. त्याच राहण, जेवण, कपडालत्ता सर्व खर्च 'वक्फ' करत. वयाच्या आठव्या-दहाव्या वर्षी येतात. आणि वीस-बाविसाव्या वर्षी शिक्षण सपल म्हणजे आपापल्या गावाला परत जातात. तिथे इस्लामच्या प्रचाराच काम करतात.'

'म्हणजे शिक्षणाच सगळ वय हे फक्त इस्लामच शिक्षण घेण्यात घालवतात. नवीन, सध्याच्या परिस्थितीबद्दल, देशापुढल्या प्रश्नांबद्दल काही शिकत नाहीत.'

तो काही बोलला नाही. नतर त्याने मला मदरशाची लायब्ररी दाखवली. त्यात बहुतेक कुराणे आणि त्यावरची भाष्येच आहेत. मदीनेहून आणवलेल्या एका भाष्याची किंमत दोन हजार रुपये आहे.

मी त्याला विचारले, 'मौलाना आझादाचे कुराणाच भाष्य आहे का?'

कच्चे कारले दाताखाली आल्यासारखे त्याचे तोंड झाले. मी काय ते ओळखले.

मौलाना आझाद हे त्याच्या दृष्टीने 'सच्चे' मुस्लिम नाहीतच.

औरंगजेबाचे जिथे निधन झाले ते ठिकाण मला पाहायचे होते. ते मी पाहिले आणि बाहेरच्या जगातल्या चालू परिस्थितीतल्या कोणत्याही घडामोडींचा विद्यार्थ्यांना परिचय करून न देणारी संस्था, जी तिथे असेल ह्याची कल्पनाही नव्हती, ती संस्थाही पाहिली. समाधान झाले आणि अस्वस्थही वाटले.

परतताना वाटेत नगरचा किल्ला पाहिला. बाहेरूनच. कारण तिन्हीसाजा होत आल्या होत्या. आणि हळूहळू का होईना, अधार सरसावत होता.

पधराव्या शतकाच्या शेवटी शेवटी बहमनी सलतनत खिळखिळी होऊ लागली आणि प्रातोप्रांतीचे सुभेदार स्वतंत्र होण्याच्या प्रयत्नाला लागले. त्यातच जुन्नरचा सुभेदार मलिक अहमदही होता. बाटल्यामुळे मुसलमान झालेला, पाथरीच्या कुलकर्ण्याचा मुलगा, तमामट वल्द बहिरूमट हा मलिक अहमदचा बाप. हा तमामट बाटल्यावर हसन झाला आणि बहमनी दरबारात वर चढत चढत निजामुलमुल्क बहिरी, आणि मलिक नायब झाला. बापाच्याच कारकिर्दीत मलिक अहमद जुन्नरचा सुभेदार झाला आणि मुलुख बळकावीत सवता सुभा स्थापण्याच्या उद्योगाला लागला. त्याचे पारिपत्य करण्यासाठी सुलतानाने पाठवलेल्या सैन्याचा त्याने ह्याच जागी पुरता धुव्वा उडवला. म्हणून

त्याने त्याला विजय मिळवून देणाऱ्या ह्या जागी हा किल्ला बांधला. तो स्वतंत्र झाला आणि आतापर्यंत मलिक अहमद होता तो निजामशाहीचा संस्थापक अहमद निजामशहा झाला. ही गोष्ट १४९० सालची.

नंतर त्याने विचार केला की, आपल्या राज्याला हे ठिकाण मध्यवर्ती आहे तेव्हा इथेच एक नवे शहर वसवावे आणि राजधानी जुन्नरहून इथे आणावी. ते शहर म्हणजेच १४९४ साली वसलेले अहमदनगर. ही जागादेखील शकुनाची. कारण इथे त्याने सशाच्या मागे लागलेल्या आपल्या कुत्र्यावर सशालाच उलटताना पाहिले. (पुण्याचा शनवारवाडा, चंद्रपूरचा किल्ला आणि सोलापूरचा किल्ला हे उभे राहण्यापूर्वी तिथेही अशाच, ससा कुत्र्यावर उलट-ल्याच्या, कथा आहेत. किती अद्भुत योगायोग! की असे घडतच असते असे म्हणावे ?)

विजापूरला जशी मलिक मैदान तोफ आहे तशीच इथेही ह्या किल्ल्याशेजारी आहे. मलिक मैदान तोफही नगरातच ओतली गेली. १८०३ साली जनरल वेलस्लीने नगरचा किल्ला घेतला आणि इथे तोफेशेजारीच एका चिंचेच्या झाडा-खाली त्याने न्याहारी केली, असे तिथे एका पाटीवर लिहिलेले आहे. पण किल्ला त्याला सहजासहजी घेता आला नाही. भिंगारच्या देशमुखाने चार हजार रुपये घेऊन किल्ल्याची माऱ्याची जागा त्याला दाखवली. तेव्हा त्याला किल्ला घेता आला. गझनीच्या महमूदाला सोरठी सोमनाथाची वाट दाखवणाऱ्या हिंदू सेनापतीने घालून दिलेला कित्ताच भिंगारच्या देशमुखाने गिरवला. त्यात नवीन काही नव्हते !

किल्ला म्हणजे किल्ल्याचा हा नखाएवढा भाग पाहूनच घराकडे परतावे लागले. समाधान वाटले नाही. हा किल्ला चांदबीबीने मोठ्या हिंमतीने चार महिने मोंगलांविरुद्ध लढवला. चार वर्षांनी पुन्हा तसाच प्रसंग आला तेव्हा तिच्याच लोकांनी तिला ठार केले आणि किल्ला मोंगलांच्या ताब्यात गेला.

ह्या किल्ल्याने किती म्हणून राजकीय कैदी पाहावे? मोरोबादादा फडणीस बावीस वर्षे ह्या किल्ल्यात कैद होते. त्यांना कैदेत टाकणाऱ्या नाना फडणि-सांनाही ह्या किल्ल्यात काही महिने कैदी म्हणून राहावे लागले. ह्याच किल्ल्यात कोल्हापूरच्या शिवाजी महाराजांना त्यांच्या इंग्रज संरक्षकांनी मारलेल्या लाथेमुळे मृत्यू आला. आणि अगदी अलीकडे पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, शंकरराव देव वगैरे राजकीय पुढारीही इथेच कैदेत

होते. त्या किल्ल्याच्या दगडाना जिभा असत्या तर कित्येक कैद्यांची उघडपणे न सांगितली गेलेली दुःखे-यातना त्यांनी सांगितल्या असत्या. नगरचा किल्ला राजकीय व्यक्तींना कैदी म्हणून ठेवण्यासाठीच बांधला होता की काय असे वाटू लागते.

२३ मार्च, १९७९

आज सकाळी 'अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय' पाहायला गेलो. नगरला आल्यावर काही लोकाना विचारले होते, 'इथे पाहण्यासारख्या इमारती वगैरे काही आहेत का?' तर बहुतेकांनी सांगितले, 'इथे पाहण्यासारखं काही नाही. मात्र इथे एक ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय आहे ते वाटल्यास पाहा.' आणि मी ते पाहायला गेलो. आधी कोणाला कळवण्याचा प्रश्नच नव्हता. छोटी पण चांगली नवीन इमारत आहे. डायरेक्टर आलेले नव्हते. तासाभराने येतील असे कळले. मग मीच सगळीकडे हिंडून संग्रहालय पाहिले. अहमदनगरात आणि इतरत्र मिळालेल्या कितीतरी प्राचीन वस्तू तिथे आहेत. दगडाच्या आणि धातूच्या निरनिराळ्या देवदेवतांच्या लहानमोठ्या सुंदर प्राचीन मूर्ती. पंधरा-सोळाव्या शतकापासूनची रंगीत चित्रे; निरनिराळ्या आकारांची लहान-मोठी भांडी, दिवे, उपकरणे, तरवारी, खंजीर, चिलखते, प्रागैतिहासिक वस्तू, हस्तलिखिते, जुनी कागदपत्रे वगैरे असंख्य वस्तू आहेत. आणि विशेष म्हणजे मला भिंतीवर निजामशाहीतल्या मशिदी, महाल, दर्गे वगैरे इमारतींची रंगीत चित्रे आणि काही फोटोही दिसले.

'अरेच्या', मी मनाशी म्हटले, 'लोक म्हणतात इथे काहीच पाहण्यासारख्या इमारती नाहीत आणि ह्या आहेत तर काय! सगळ्याच सुस्थितीत नाहीत. पण आहेत!'

एवढ्यात डायरेक्टर सुरेश जोशी आले. त्याना बाहेरच कोणीतरी मी आल्याचे सांगितले होते. त्यानी आल्याबरोबर आधी मला वाट पाहावी लागल्या-बद्दल दिलगिरी व्यक्त केली. त्यांचे सौजन्य, बोलता बोलता दिसून आलेली त्यांची तत्परता, आपल्या विषयासंबंधीची आस्था, माहिती आणि जिज्ञासा ही पाहून त्याना भेटल्याचा मला फार आनंद झाला. मी त्याना अहमदनगरातल्या इमारतींविषयी विचारले तेव्हा ते म्हणाले,

'काही इमारती गावात, काही गावाशेजारी आहेत. पण काही कोस-दोन

त्यानं त्याला विजय मिळवून देणाऱ्या ह्या जागी हा किल्ला बांधला. तो स्वतंत्र झाला आणि आतापर्यंत मलिक अहमद होता तो निजामशाहीचा संस्थापक अहमद निजामशहा झाला. ही गोष्ट १४९० सालची.

नतर त्याने विचार केला की, आपल्या राज्याला हे ठिकाण मध्यवर्ती आहे तेव्हा इथेच एक नवे शहर वसवावे आणि राजधानी जुन्नरहून इथे आणावी. ते शहर म्हणजेच १४९४ साली वसलेले अहमदनगर. ही जागादेखील शकुनाची. कारण इथे त्याने सशाच्या मागे लागलेल्या आपल्या कुत्र्यावर सशालाच उलटताना पाहिले. (पुण्याचा शनवारवाडा, चद्रपूरचा किल्ला आणि सोलापूरचा किल्ला हे उभे राहण्यापूर्वी तिथेही अशाच, ससा कुत्र्यावर उलट-ल्याच्या, कथा आहेत. किती अद्भुत योगायोग! की असे घडतच असते असे म्हणावे?)

विजापूरला जशी मलिक मैदान तोफ आहे तशीच इथेही ह्या किल्ल्याशेजारी आहे. मलिक मैदान तोफही नगरातच ओतली गेली. १८०३ साली जनरल वेलस्लीने नगरचा किल्ला घेतला आणि इथे तोफेशेजारीच एका चिंचेच्या झाडा-खाली त्याने न्याहारी केली, असे तिथे एका पाटीवर लिहिलेले आहे. पण किल्ला त्याला सहजासहजी घेता आला नाही. भिंगारच्या देशमुखाने चार हजार रुपये घेऊन किल्ल्याची माऱ्याची जागा त्याला दाखवली. तेव्हा त्याला किल्ला घेता आला. गझनीच्या महमूदाला सोरठी सोमनाथाची वाट दाखवणाऱ्या हिंदू सेनापतीने घालून दिलेला कित्ताच भिंगारच्या देशमुखाने गिरवला. त्यात नवीन काही नव्हते!

किल्ला म्हणजे किल्ल्याचा हा नखाएवढा भाग पाहूनच घराकडे परतावे लागले. समाधान वाटले नाही. हा किल्ला चांदबीबीने मोठ्या हिंमतीने चार महिने मोंगलाविरुद्ध लढवला. चार वर्षांनी पुन्हा तसाच प्रसंग आला तेव्हा तिच्याच लोकानी तिला ठार केले आणि किल्ला मोंगलाच्या ताब्यात गेला.

ह्या किल्ल्याने किती म्हणून राजकीय कैदी पाहावे? मोरोबादादा फडणीस बावीस वर्षे ह्या किल्ल्यात कैद होते. त्याना कैदेत टाकणाऱ्या नाना फडणि-सानाही ह्या किल्ल्यात काही महिने कैदी म्हणून राहावे लागले. ह्याच किल्ल्यात कोल्हापूरच्या शिवाजी महाराजाना त्याच्या इग्रज संरक्षकानी मारलेल्या लाथेमुळे मृत्यू आला. आणि अगदी अलीकडे पडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, शकरराव देव वगैरे राजकीय पुढारीही इथेच कैदेत

कोसांपासून पाच कोसापर्यंत लांब आहेत. तुमचा मुक्काम किती दिवस आहे? शक्य असेल तर आपण दिवस ठरवू. मी स्वतः तुम्हाला सगळीकडे नेईन.'

मी म्हटले, 'एकंदरीत नगर आणि परिसर नीट पाहायचा तर पाच-सात दिवस तरी लागतीलसं दिसत. मला इतक राहता येणार नाही.'

'तुम्ही पुन्हा या. मी तुम्हाला सगळ दाखवीन.'

वस्तुसंग्रहालयाशेजारीच राजे शहाजी आणि त्यांच्या पत्नी जिजाबाईसाहेब ह्यांच्या अर्धपुतळ्याची प्रतिष्ठापना केली आहे. मला निरोप देताना श्री० जोशी ह्यांनी ते दाखवले. शहाजी राजाचे चित्र उपलब्ध आहे, त्यामुळे त्यांचे साम्य दाखवणारा अर्धपुतळा करणे तसे कठीण नव्हते. पण जिजाबाईसाहेबांचे चित्र उपलब्ध नाही. त्यामुळे त्यांचे रूप सिद्ध करायचे तर त्यांचे जे चरित्र, कर्तृत्व आणि चारित्र्य इतिहासातून माहीत झाले आहे त्याच्या आधारावरच करावे लागणार. ज्या शिल्पकाराने त्यांचा अर्धपुतळा तयार केला आहे त्याने त्यांचे करारी, प्रभावी, महत्त्वाकांक्षी व्यक्तिमत्त्व त्यांच्या चेहऱ्यावर उत्तम प्रकारे वठवले आहे. पाहताच आदर वाटतो.

सकाळ फार चांगली गेली.

२४ मार्च, १९७९

आज दुपारी पावणेचारच्या बसने अहमदनगर सोडले. विठ्ठलराव घाटे आपल्या 'दिवस असे होते' ह्या पुस्तकात म्हणतात, "आमचे अहमदनगर हे जुन्याचे थडगे आहे." त्यांच्या ह्या म्हणण्यात एक दुःखाची छटा आहे. त्याचा अर्थ बाजूला ठेवून मला असे म्हणावेसे वाटते की, त्यात काही वाईट नाही. बऱ्याच जुन्या गोष्टींची थडगीच बांधायला हवीत. त्या थडग्यावरच किंवा त्याच्याशेजारीच नवे इमले उभे राहतात. आणि आपल्याला कान असले तर ती थडगी खूप काही सांगू शकतात. नगरात थडगी आहेत पण एलिचपूर आणि विजापूर ही जशी जमीनदोस्त इमारती इतस्ततः पसरलेल्या ओसाड मैदानाची आणि थडग्यांची शहरे आहेत तसे नगर नाही. निदान मला वाटल नाही.

अहमदनगरच्या किल्ल्याने अनेक थोर आणि महत्त्वाकांक्षी व्यक्तींच्या कर्तृत्वाचा कोंडमारा झालेला पाहिला. तर उलट अहमदनगर शहराने अनेक थोर व्यक्तींचे कर्तृत्व फुललेले किंवा फुलताना पाहिले. त्यांतले कोणी बाहेरून

नोकरीच्या निमित्ताने काही दिवसासाठी नगरला आलेले होते, तर कोणी नगरचेच होते. रा० ब० लोकहितवादी, रा० बा० शंकर पांडुरंग पंडित, रा० ब० लालशंकर उमियाशंकर ह्यानी थोड्याच अवधीच्या वास्तव्यात आपल्या कर्तृत्वाची नगरावर छाप पाडली, तर १८९२ साली शिकागोमधल्या ज्या सर्व-धर्म-परिषदेत स्वामी विवेकानंदानी हिंदू धर्मावर व्याख्यान दिले त्याच परिषदेत ब्राह्म धर्मावर व्याख्यान देणारे प्रार्थनासमाजिस्ट इंग्लिश-भाषाप्रभू बळवंत भाऊ नगरकर हे नगरचेच. ग्रामीण जीवनाचे 'क्लॅसिक' मानल्या गेलेल्या 'गावगाडा'चे कर्ते त्रिंबक नारायण आत्रे नगरचेच. आणि अली-कडल्या काळात महाराष्ट्राच्या राजकीय-सांस्कृतिक जीवनात अग्रभागी असलेले रावसाहेब आणि अच्युतराव पटवर्धन देखील नगरचेच. आणखी कितीतरी मला माहीत नसलेले कर्तृत्ववान लोक नगरने दिले असतील. नगर एरवी दुष्काळी असेल, ह्या बाबतीत नाही.

नगरात पाहता आले ते पाहिले. पण काही ठिकाणे पाहता आली नाहीत त्याची रुखरुख राहिली. नगरचे प्रार्थनासमाजाचे मंदिर पाहायचे राहिले. आता तिथे कोणी जात नसेल. कदाचित ते बंदच असेल. पण त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे. मंदिर बांधून तयार झाले तेव्हा त्याच्या प्रवेशसमारंभाला डॉ० भांडारकर आणि न्या० मू० रानडे मुद्दाम आले होते. विठ्ठलराव घाट्यांचे लहानपण नगरला गेले. त्यांचे आजोबा कोंडो राणोजी घाटे राहत असत ते नव्या पेठेतले घर पाहायला हवे होते. पटवर्धनाचा वाडाही पाहायला हवा होता. आणि विशेष म्हणजे शहा शरीफचा दर्गा पाहायला हवा होता. त्याच्याच कृपाप्रसादामुळे—त्याने दिलेला आपल्या तोंडातला विडा प्रसाद म्हणून खाल्ल्यामुळे—मालोजीराजे भोसल्याच्या पत्नीला दोन पुत्र झाले . शहाजी आणि शरीफजी. भावनाना थोडा उचबळा देऊन बोलायचे तर पुढे शिवाजी-महाराजानी स्थापन केलेल्या 'हिंदवी स्वराज्या'चे ते मूलस्थान. पुन्हा नगरला गेलोच तर ते आधी पाहीन.

# ॐ नमोजी आद्या

आम्ही नेवाशाला चाललो होतो, तेव्हा ज्ञानदेवानी आपल्या 'ज्ञानदेवी'त गणेशाला संबोधून उच्चारलेले अगदी आरंभीचेच 'ॐ नमोजी आद्या' हे शब्द आठवणे स्वाभाविक होते. ज्ञानदेवानी 'आद्या' हा शब्द गणेशाला उद्देशून वापरला, पण मी मात्र तो ज्ञानदेवाना उद्देशून वापरीत आहे. आता ज्ञानदेवाना नमन करण्याआधी 'ॐ' वापरणे उचित की अनुचित असा प्रश्न पडत असेल तर तो 'ॐ' तिथून वेगळा करावा आणि काही लोक आपल्या पत्राच्या माथ्यावर श्री'च्या जागी 'ॐ' लिहितात तसा तो मी लेखारंभी लिहिला आहे असे समजावे. ज्ञानदेवांना मी 'आद्य' म्हटले ते मराठीचे आद्य ग्रंथकार म्हणून. त्याच्या आधी मराठीत ग्रंथरचना झाली नव्हती असे नाही. पण माधुर्य, मार्दव, प्रसाद, लालित्य, वाणीचा अखंड सुखावह ओघ इत्यादी गुण असलेली, शब्दालंकार आणि अर्थालंकार यांनी नटलेली साहित्यगुणयुक्त रचना करणारे ते पहिले म्हणून त्याना नमोजी आद्या.'

तसे नेवासेही अनेकपरींनी आद्य'च आहे. समुद्रमंथन झाले तेव्हा समुद्र त्याच्या अगदी जवळ होता. अर्थात् त्या वेळी त्याला 'नेवासे' हे नाव नव्हते. देवी-दैत्यी सागर-मंथन केल्यावर त्यातून जी चौदा रत्ने निघाली त्यात अमृत आणि सुरा ही दोनदेखील होती. त्याची वाटणी करायची ठरली, तेव्हा देवाची एक पंगत बसली आणि समोर दैत्याची. वाढपाचे काम अर्थात् स्त्रियाचेच. तेव्हा विष्णूने मोहिनीच्या रूपाने ते आपल्याकडे घेतले आणि एका हातात अमृतकुंभ आणि दुसऱ्या हातात सुराकुंभ घेऊन तिने वाढपाला आरंभ केला खरे म्हणजे समुद्रमंथन देवानी आणि दैत्यानी असे दोघांनीही केले होते, तेव्हा अमृत आणि सुरा या दोहोंचाही एकएक घोट देवाना आणि दैत्यांना मिळायला हवा होता. पण मोहिनी देवाना अमृत आणि दैत्यांना सुरा देत आहे हे पाहून राहू, चंद्र आणि सूर्य याच्या मध्ये जाऊन बसला. ते मोहिनीच्या लक्षात न येऊन तिने त्यालाही अमृत दिले. ते तो प्यायला. ही गोष्ट चंद्राच्या लक्षात आली आणि त्याने डोळ्याने खूण करून ते मोहिनीच्या लक्षात आणून दिले. मोहिनी क्षणभर गोंधळली. पण तिचा निश्चय झाला आणि

तिने चक्र फेकून राहूचा शिरच्छेद करायचे ठरवले. परंतु स्त्रीरूपात असल्याने तिला चक्राला आवाहन करता येईना. तेव्हा तिने (म्हणजे विष्णूने) अर्धरूप पुरुषाचे (म्हणजे विष्णूचे) घेतले आणि चक्राला आवाहन करून ते राहूवर सोडून त्याचा शिरच्छेद केला. हे सगळे होण्याला मी लिहिलो आहे इतकाही वेळ लागला नाही. चूक लक्षात येताच हे सर्व घडले. शिरच्छेद झाल्याबरोबर राहूचे शिर उडून आकाशात गेले, त्याचा केतू झाला आणि राहू समुद्राकडे धावू लागला. तेव्हा शंकराने त्याचा पाठलाग करून त्याच्या पोटात त्रिशूळ खुपसला. पण अमृत बाहेर येईना, तेव्हा त्याने आणखी चपळाई करून राहूच्या कंठनाळात आपला अंगठा घातला. त्यासरशी त्याने गिळलेले अमृत उसळून बाहेर पडून वाहू लागले. तीच अमृतवाहिनी नेवाशाजवळून वाहणारी 'प्रवरा.' अमृताची वाटणी आणि राहूच्या गळ्यातून अमृत उसळून बाहेर येणे या दोन्ही घटना इथेच पहिल्यादाच आणि एकदाच घडल्या.

अमृताची आणि आपली कधीकाळी भेट होते ती पुराणातरी. अमृत कोणी पाहिलेले नाही. सुरा मात्र आपल्या नित्य परिचयाची आहे. आणि आपण माणसे अशी बेरकी आहोत की आपण पूजा देवांची करतो आणि अनुकरण दैत्यांचे

तारकासुराने स्वर्गातून देवांना हाकलले, तेव्हा विष्णूच्या कृपेने त्यांना इथे निवास मिळाला म्हणून हे त्यांचे निवासक्षेत्र–'नेवासे'–झाले. तारकासुराच्या वधानंतर निर्वासित देव पुन्हा स्वर्गात परत गेले असतील, पण 'मोहनीराज' मात्र इथेच राहिले आणि निवास–'नेवासे' हे नावही कायम राहिले. ज्ञानदेवांनीही याला 'त्रिभुवनैकपवित्र। अनादि पंचकोश क्षेत्र' असे म्हटले आहे. तेव्हा अशा स्थानाला 'नमोजी आद्या' म्हणणे हे साहजिकच नव्हे, तर उचितही आहे.

कायगाव टोक्याकडे जाणारा रस्ता सोडून आमची गाडी नेवाशाच्या रस्त्याला लागली तेव्हा हिरवीगार शेते, उसाचे मळे, बागा वगैरे दिसू लागली. 'ज्ञानेश्वर सिमेंट वर्क्स', 'ज्ञानेश्वर महाविद्यालय' अशा पाट्या दिसू लागल्या. म्हटले, जवळच कुठेतरी 'ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना' असेलच. लक्षात आले की आपण नेवाशाच्या सीमेत आलो. मग मी गाडीतून बाहेर डोकावून जाणाऱ्या-येणाऱ्यांच्या पायाकडे पाहू लागलो. मी कुठेतरी वाचले किंवा ऐकले होते की हे देवाचे निवासस्थान, महालयक्षेत्र, असल्याने त्याच्या हद्दीत आल्यावर लोक पायतणे काढून, हातात घेऊन चालतात. पण तसे काही दिसले नाही.

तेव्हा म्हटले, तो नियम केव्हा तरी मागे घेतला गेला असावा. किंवा कायदे असतात, पण ते पाळलेच पाहिजेत असे नसते, तसे याही नियमाचे झाले असावे.

आमची गाडी गावात शिरली, ती थेट 'मोहिनीराजा'च्या मंदिराच्या मागेच जाऊन उभी राहिली. या दगडी मंदिराचे जोते जवळजवळ पुरुषभर उंच आहे आणि मंदिर रस्त्याच्या मध्यभागी असे उभे आहे की त्याच्या दोन्ही बाजूंनी जेमतेम एक बैलगाडी जाऊ शकेल एवढाच रुंद रस्ता आहे. एकेरी रहदारीचा नियम इथे नसला आणि एकाच वाटेने समोरासमोर दोन गाड्या आल्या तर दोन बोकडाच्या गोष्टीतल्यासारखा प्रसंग उद्भवत असेल. त्या गोष्टीत एका बोकडाने शहाणपण दाखवून खाली बसून दुसऱ्याला आपल्याला ओलांडून जाऊ दिले. पण गाड्यांच्या बाबतीत हे कसे शक्य आहे? अशा वेळी नेवाशाचे गाडीवाले काय हिकमत लढवीत असतील ते त्यांनाच माहीत!

देवळाला उजवी घालून समोरच्या बाजूने पायऱ्या चढून वर गेलो. सभामंडप चांगला प्रशस्त आहे. पण देवळात आतूनबाहेरून विशेष प्रेक्षणीय असे काही नाही. अहिल्याबाई होळकर यांचे दिवाण सरदार चंद्रचूड यांनी दोनशे वर्षांपूर्वी बांधलेले हे देऊळ भक्कम मात्र आहे. वस्त्रांनी झाकलेली असल्यामुळे मूर्ती पाहायला मिळाली नाही. पण म्हणतात की ती विष्णूची 'अर्धनारी' मूर्ती आहे, आणि फार सुंदर आहे राहूवर चक्र सोडण्यासाठी धारण केलेल्या रूपातली, शंख, चक्र, गदा आणि अमृतकुंभ हातात असलेली, पुराणातल्या त्या महान आणि एकमेव घटनेची स्मारक.

देवळाच्या आसपासचा रस्ता, घरे वगैरे परिसर देशावर असतो तसा रखरट-मातट आहे. सूर्य डोक्यावर येऊ पाहत होता. उन्हाची दिशा अशी विचित्र होती की, पुढल्या बाजूने देवळाचा फोटो घेणे शक्य नव्हते. म्हणून मागल्या बाजूने या नाही तर त्या घराच्या उतरत्या-निसटत्या ओट्यावर-पायऱ्यावर चढून फोटो घेता येतो का, हे पाहत होतो. एका ठिकाणी उभे राहून कसे तरी एकदोन फोटो घेतले

देशावरचे मार्चमधले दुपारच्या सुमाराचे ऊन म्हणजे उन्हच! अशा वेळी शेजारीच राहणाऱ्या एका सुशिक्षित, सुसंस्कृत कुटुंबाकडले अकल्पितपणे लाभलेले गोड आणि गार आतिथ्य घेऊन आम्ही ज्ञानदेवांनी जिथे ज्ञानेश्वरी सांगितली ते मंदिर पाहायला गेलो.

आवाराच्या आत पाचसातशे लोक सहज बसतील असा प्रशस्त सभामंडप

दिसला. मदिर, सभामडप वगैरे सर्व नव्यानेच बाधलेले आहे. पायऱ्या चढून सरळ पुढे जाऊन पाहतो तो गाभाऱ्यात जिथे देव असतो, तिथे ज्ञानदेवांनी ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी सांगितली तो खांब तीनचार हात उंचीचा दिसला. पण आश्चर्य म्हणजे खांब तिरका आहे. त्याची कोणतीही समग्र बाजू आपल्याला दिसत नाही. एक कोपरा दिसतो. त्याच्यावर मंदिर बांधताना तो असा तिरका का राहू दिला, हे कळत नाही. खांबाच्या एका बाजूवर लेख कोरलेला दिसतो. तो अर्थातच गाभाऱ्याच्या दारात उभे राहून वाचता येत नव्हता. जवळ गेलो असतो तरी वाचता आला असता असे नाही. कारण तो झिजून बराच अस्पष्ट झालेला आहे. मात्र तो ज्ञानदेवासंबंधी किंवा ज्ञानेश्वरीसंबंधी नसून देवळात नंदादीप लावण्यासाठी दिलेल्या दानासंबंधीचा आहे असे कळले.

तो खांब पाहताना मनापुढे चित्र उभे राहिले अर्जुनाच्या ओळीत बसण्यायोग्य श्रोते सभामंडपात बसले आहेत, त्यात प्रमुख निवृत्तिनाथ आहेत, आणि ज्ञानदेव मधून नम्रता दाखवीत, मधून आत्मविश्वास प्रकट करीत, मधून 'अवधारिजो' म्हणून श्रोत्यांचे लक्ष वेधीत आणि वारंवार निवृत्तिनाथांच्या कृपेचा आणि प्रेरणेचा उल्लेख करीत अस्खलित, लयबद्ध वाणीने गीतेवर भाष्य करीत आहेत! मनात आले, त्यांची भाषा इतकी मधुर, मृदुल आहे, तर त्यांचा आवाज कसा असेल?

तेवढ्यात मागच्या बाजूने कॅसेटवरचे कोणाचे तरी प्रवचन ऐकू येऊ लागले आणि ज्ञानदेवांच्या आवाजासंबंधीचा विचार तुटला. दहापंधरा खेडवळ स्त्री-पुरुष तन्मयतेने कॅसेटवरचे प्रवचन ऐकत होते. त्यांना आवडणाऱ्या अशा कोणातरी हरिभक्तिपरायणाचेच ते असेल.

आधी हे शंकराचे मंदिर होते, असाच उल्लेख आहे. सध्याच्या गाभाऱ्याच्या बाहेर डाव्या बाजूला एका मोठ्या कोनाड्यात एक मोठी शाळुंका आणि पिंडी ठेवलेली आहे, ती मूळचीच असावी आणि उजवीकडे अलीकडे नव्यानेच बसवलेल्या विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्ती आहेत.

मुसलमानांनी मूळचे शंकराचे देऊळ पाडून तिथे मशीद बांधली आणि ते तिथे नमाज पढू लागले. ती इमारत सध्याच्या खांबाच्या मंदिराच्या मागे जवळच आहे. अनेक वर्षे कोर्टकचेऱ्या होऊन इमारतीवरचा हिंदूंचा हक्क शाबीत झाला आणि सर्व वास्तू, जमीन वगैरे हिंदूंकडे आली.

इमारत तीन कमानींची, मजबूत आहे. वर मजला बांधून आता तिथे ग्रंथालय

केलेले आहे. खालच्या भागात एक दत्ताची मूर्ती बसवलेली आहे. आत जाताच इमारतीचे खाब हिंदू मंदिराचे असल्याचे स्पष्ट दिसते. मुसलमानाची पद्धत अशी असे की, देऊळ पाडल्यावर गाभाऱ्यात जिथे देव असेल तिथे मशिदीची मधली कमान बाधायची आणि तिच्या दोन बाजूंना मशीद जेवढी बाधायची असेल त्या मानाने दोन किंवा चार कमानी बाधायच्या. म्हणजे मशीद तीन, पाच अशा कमानींची होते.

ही इमारत आणि सध्या जिथे खाब आहे, त्यात फार अंतर नाही. कदाचित तो खांब मूळच्या मंदिराच्याच सभामंडपाचा खाब असावा. नवीन मंदिर बाधताना मशिदीसकट सर्व जागेचे उत्खनन केले असते तर मूळ देवळाचा जमिनीवरचा आराखडा दिसला असता आणि देऊळ किती मोठे होते, सभामंडप किती मोठा होता, त्यात किती श्रोते बसू शकले असते, हे सर्व कळले असते आणि कदाचित तसेच मंदिर पुन्हा उभारता आले असते. ते अधिक योग्य झाले असते.

मंदिरापासून काही अंतरावर लाडमोड टेकाडावर प्रवरेच्या तीरावर उत्खनन झाले आहे आणि तिथे इसवी सन पूर्व अडीच लक्ष वर्षांपासून तो इसवी सनाच्या तिसऱ्या-चवथ्या शतकापर्यंतचे अवशेष सापडले आहेत. सोपाऱ्याहून पैठणकडे जाणाऱ्या व्यापारी रस्त्यावरचे 'नेवासे' हे एक मोठे गाव होते. इसवी सनाच्या आरंभकाळातील रोमन नाणी, काचेची आणि मातीची भांडी, मूर्ती, मद्यकुंभ, अर्चनाकुंडे वगैरे तिथे सापडली. त्या वस्तू आता तिथे नाहीत, पण निदान ती जागा पाहावी म्हणून राखट-काळ्या मातीचे ढिगारे चढत-उतरत चालू लागलो. पण ऊनही चढत चालले होते. चालणे कठीण वाटू लागले होते. उंचवट्याचा माथा केव्हा गाठता येईल याचा अंदाज येत नव्हता म्हणून शेवटी परत फिरलो.

नेवाशाला हा प्राचीन इतिहास आहेच पण आधुनिक मराठी साहित्याच्या इतिहासातले एक छोटे पानही नेवाशाला चिकटले आहे, रा० सा० गोविंद वासुदेव कानिटकर हे सबजज्ज म्हणून तीनचार वर्षे नेवाशाला होते. गोविंदराव आणि काशीबाई कानिटकर याच्या आयुष्यातले ते सगळ्यात स्थिर आणि सगळ्यात सुखाचे दिवस होते. या दापत्याचा आणि हरिभाऊ आपट्यांचा याच अवधीत परिचय झाला होता आणि तो दृढ होत चालला होता. या अवधीत हरिभाऊ आपटे दीड-दोन महिने नेवाशाला त्याच्याकडे येऊन राहिले होते. त्यांच्या

रात्ररात्रभर गप्पा होत असत. साहित्य, साहित्यशास्त्र, इतिहास, आधुनिक शास्त्रे, समाजसुधारणा, स्त्रीशिक्षण असे अनेक विषय त्यात येत. गोविंदराव दिवसा कोर्टात गेले म्हणजे हरिभाऊ काशीबाईंकडून इंग्रजीचे वाचन करून घेत, त्याना संस्कृत, शाकुंतल शिकवीत. गोविंदरावाना व्हायोलिन वाजवण्याची आवड असे. अशा रीतीने काव्य-शास्त्र-संगीताचा आनंद उपभोगण्यात ते त्याचे दिवस गेले. समाजसुधारणेच्या प्रारंभीच्या काळात जेव्हा नवऱ्याच्या आग्रहामुळे आणि त्यांची मर्जी राखण्यासाठी, क्वचित स्वतःची इच्छा नसताना-सुद्धा, स्त्रिया नुकत्याच लिहायवाचायला शिकू लागल्या होत्या, जेव्हा स्त्री-पुरुषांनी एकत्र बसून गप्पा-चर्चा करण्याची कल्पनासुद्धा लोकाना करवत नसे त्या काळातला गोविंदराव, काशीबाई आणि हरिभाऊ याचा निर्मळ आणि मनमोकळा वाङ्मयस्नेह हे मराठी साहित्याच्या आणि सामाजिक सुधारणेच्याही इतिहासातले एक सुंदर पान आहे.

नेवासे हे त्याचे साक्षी. हेही कदाचित नेवाश्याचे आणखी एक आद्यत्व. इथे येऊन आपण समुद्रमथनापासून एकोणिसाव्या शतकापर्यंतचा प्रवास केला, ह्या विचाराने मनात एक प्रकारची धन्यता वाटत होती. मनाच्या त्या अवस्थेतच नेवाश्याचा निरोप घेतला.

# घाटशिळेवरि उभी

एकट्या माहूर क्षेत्रात नऊ कोटी पाचशे अडुसष्ट तीर्थे आहेत. तिथले सर्वतीर्थही त्यात धरले आहे की त्यातून वगळले आहे माहीत नाही. तसेच नऊ कोटी पाचशे अडुसष्ट ही नेमकी संख्या कशी मोजली तेही सांगता येत नाही. त्यामधले दशलक्ष, लक्ष, दशसहस्र, सहस्र या जागी शून्ये का हे तरी कोणी सांगावे? शिवाय माहूरचे माहात्म्य काशीक्षेत्रापेक्षा 'जवभर' अधिकच आहे. तेव्हा इतकी तीर्थे असलेल्या आणि इतके माहात्म्य असलेल्या माहूरला जाऊन रेणुकेचे दर्शन घेतल्यानंतर आणखी तुळजापूरला जाऊन भवानीचे दर्शन घेण्याची आवश्यकता काय असे कोणालाही वाटेल. वाटो बापडे, पण तुळजापूरच्या भवानीचे माहात्म्य काही वेगळेच आहे. कर्दम मुनींच्या निधनानंतर त्यांची तरुण आणि सुंदर पत्नी अनुभूती तपश्चर्येला बसली, तेव्हा तिच्या रूपावर लुब्ध होऊन कामांध झालेल्या कुकुर दैत्याने तिला आलिंगन देण्याचे धाडस केले नसते आणि भयभीत झालेल्या अनुभूतीने भवानीला काकुळतीने आवाहन केले नसते, तर तुळजापूर तुळजापूर झालेच नसते. अनुभूतीने आवाहन करताक्षणीच त्वरित तुरजा-तुळजा-भवानी इथे यमुनाचलावर प्रकट झाली आणि आपल्या गणांसह, सर्व शक्तींनिशी, कुकुर दैत्याशी तुंबळ युद्ध करून त्याचा वध केला आणि अनुभूतीच्या विनवणी-वरून, तिथेच, म्हणजे सध्या जिथे आहे तिथे, महिषासुरमर्दिनीच्या रूपाने राहिली.

युगामागून युगे लोटली. कैकेयीला केव्हातरी दिलेल्या वचनाचा परिणाम म्हणून रामाला सीता-लक्ष्मणासह वनवासाला जावे लागले. सुवर्णमृगाच्या मागे राम गेल्यामुळे रावणाला सीतेला पळवून नेण्याला फावले. आणि परत आल्या-वर आश्रमात सीता नाही हे पाहून उद्भ्रांत आणि विमनस्क होऊन 'सीते, सीते' अशा हाका मारीत, सीतेचा शोध करीत, तो या ठिकाणाजवळ आला. तेव्हा त्याची दया येऊन भवानीने त्याला दर्शन दिले, आश्वासन दिले, वर दिला. सीता दक्षिणेला गेली म्हणून त्याला दक्षिण दिशा दाखविली आणि ती 'रामवरदायिनी' होऊन तिथेच तिच्या मुख्य स्थानापासून काही अंतरावर उभी राहिली. जेमतेम कोसभरसुद्धा राम गेला नसेल तर त्याची गंमत करण्यासाठी ती

घाटशिळेवर सीतेचे रूप घेऊन उभी राहिली. तिला वाटले, रामाला वाटेल आपली सीता सापडली. पण तिला पाहताच ती सीता नसून घटकेपूर्वी आपल्याला वर देणारी देवीच आहे हे रामाने ओळखले आणि 'तू का, आई?' असे तिला मराठीत विचारले. मराठीच ती. त्याने तसे विचारल्यावर ती 'तुकाई' झाली. आणि आपली सर्वांची ती तुकाईच आहे.

भोसल्यांची ती कुळदेवता आहे. शहाजीराजे, शिवाजीराजे, शाहूराजे यानी आणि पेशव्यांनीही तिची आराधना केली. तिला नवस केले, वस्त्रालंकार दिले. शिवाजीराजावर तर तिचा विशेष लोभ. प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी तिने त्याना दृष्टांत आणि आशीर्वाद दिला. अफझलखानाचे संकट दूर होईल असे आश्वासन दिले. भवानी तलवार दिली. 'तुळजापूर ठाकेना। चालली पश्चिमेकडे॥ पारघाटी जगन्माता। सद्य येऊनि राहिली॥' अशी त्याच्यासाठी प्रतापगडावर येऊन राहिली. आयुष्याच्या शेवटी शेवटी श्रीशैल्याला गेले असताना महाराजांना आतुर वैराग्य प्राप्त होऊन त्यानी आपले शिरकमल मल्लिकार्जुनाच्या चरणी अर्पण करण्याचा निश्चय केला, तेव्हा त्यांना तिने त्यापासून परावृत्त केले. त्यामुळे महाराज आपल्याला आणखी काही वर्षे लाभले.

'दुष्ट संहारिले मागे। ऐसे उदंड ऐकिले॥ परंतु रोकडे काही। मूळ सामर्थ्य दाखवी॥' अशी समर्थ रामदासानी केलेली आळवणी तिने ऐकली आणि शिवाजी राजा घडवला, वाढवला. अशी ही महाराष्ट्राची लाडकी देवी मोठ्यांची आणि लहानांचीही. 'तुझा तू वाढवी राजा' ही रामदासाची हाक ऐकणारी, तशीच एखादीच्या नणंदेचे कारटे फारच किरकिर करू लागले तर एका रोडग्याच्या बोलीवर त्याला खरूज देणारी, राजेमहाराजापासून तेली-तांबोळी, महार-मांगापर्यंत सर्वांची वरदायिनी देवी. तिचे दर्शन न घेऊन कसे चालेल?

शिवाय भवानीने इथेच राहायचे ठरवताच गंगा, यमुना, नर्मदा, कावेरी इत्यादी भारतातल्याच नद्या नव्हेत तर भूतलावरची सगळी तीर्थे इथे आली. त्यात माहूरचीही आलीच असतील. आणि ती सर्व एकाच वेळी एकत्र येऊन मिसळली तेव्हा जो कल्लोळ झाला त्याचे तिथे 'कल्लोळतीर्थ' झाले. त्या तीर्थाच्या नुसत्या दर्शनानेच पूर्वजन्मीची आणि या जन्मीची सर्व पापे दग्ध होतात. त्यात स्नान केल्याने जे पुण्य मिळते ती अधिकाची प्राप्ती. त्यानंतर पुनर्जन्म न विद्यते.'

पण अशा थोर ठिकाणी जाण्यालाही योग यावा लागतो. तो धाराशिवाला गेल्यामुळे आला. तुळजापूर जवळ येत चालले. वाटेतच 'रामवरदायिनी' पाहिली. थोड्याच वेळात मदिर आलेसे वाटले. त्याचे भले थोरले दार दिसले. पण मंदिर कुठे होते ? अंबे-जोगाईतले अंबेचे मदिर जमिनीसारखे आहे. कोल्हापूरचे महालक्ष्मीचे जवळजवळ पुरुषभर उचीच्या जोत्यावर आहे. माहूरचे रेणूकेचे तर डोंगराच्या माथ्यावरच आहे, आणि भवानीचे ? तिचे मदिर एका निरुद खोऱ्यात जवळजवळ अर्ध्या उतारावर आहे. पायरी-पायरी उतरतो आहे. हळूहळू मंदिर दृष्टीच्या कक्षेत येत आहे. पायऱ्यांच्या दोन्ही बाजूंच्या भिंतीवर दगडात हत्ती कोरलेले आहेत. ते सागतात की, मंदिराचा काही भाग तरी प्राचीन आहे. पायऱ्या संपता-संपता समोर होमकुंड दिसले. आणि वर लक्ष गेले, ते तिथेच खिळून राहिले. तिथे समोर सभामंडपाच्या आडव्या भागावर शिंदेशाही पगडी घातलेला, पीतावर नेसून उपरणे वगैरे अंगावर घेतलेला गणपती लोडाला रेलून पाय पसरून बसलेला दिसला. शेषशायी विष्णू दिसतो तसा. विष्णूच्या पायांजवळ लक्ष्मी बसलेली असते तशी त्याच्या पायगती मराठी पद्धतीचे लुगडे नेसलेली एक स्त्री आहे. ती ऋद्धी किंवा सिद्धी असावी. त्या आळीपाळीने सेवा करीत असतील. उशागती एक पुरुष आहे. गणपतीचे हे ध्यान पूर्वी कुठेही पाहिलेले नव्हते. पार्वतीच्या न्हाणीच्या दाराशी पहारा करण्याची आता गरज नाही. शंकराला आपली ओळख पटलेली आहे. त्यानेच तर हे हत्तीचे शिर बसवले. दुसरा कोणी आडदांड भवानीला त्रास द्यायला आलाच तर आवारात भैरव वैगेरे गण त्याचा समाचार घ्यायला आहेतच. तेव्हा आपण आराम करायला हरकत नाही असाच बहुधा त्याने विचार केला असावा.

ते ध्यान मनात साठवीत पटांगणात उतरलो, कल्लोळ तीर्थाच्या दर्शनाने पापक्षालन करून घेतले. गायमुखातून पाण्याचा धोधाटा बाहेर पडताना पाहिला. हे पाणी थेट काशीच्या गगेतून इथे येते. शका असेल तर गरीबनाथाची कथा ऐकावी. गरीबनाथ हे देवीचे परमभक्त. त्यांचा-तिचा नित्य संवाद होई. ते एकदा तिला म्हणाले, 'मला काशीला जायच आहे.' ती म्हणाली, 'काशीला कशाला जातोस ? काशीची गगा इथे गायमुखातून बाहेर पडते.' तरी पण त्यानी हट्ट धरला. देवीने एका काठीला लिंबू बांधून ती त्यांच्या हाती दिली आणि म्हटले, 'जा काशीला अन् टाक ही गगेत.' ते काशीला गेले. त्यांनी तिथे गगेत स्नान केले, आणि ती लिंबू बांधलेली काठी गगेत

टाकली. ते तुळजापुराला परत आले आणि गायमुखाकडे पाहत उभे राहिले. काय आश्चर्य ! लिंबू बांधलेली काठी गायमुखातून बाहेर आली ! त्यांनी ती काशीत गंगेच्या प्रवाहात कुठे टाकली? ती बंगालमध्ये सागरसंगमात न जाता ते तुळजापुराला परत आल्यानंतर तिथे कशी आली ते देवीलाच विचारले पाहिजे. तेवढी जवळीक असेल त्याने विचारून पाहावे.

तीर्थे पाहत पाहत आवारातून हिंडत होतो. मंदिरे पाहत होतो. त्यात एक मातंगीचे मंदिर आहे. मातंग नावाचा असूर मातला. तेव्हा त्याचा वध करण्या-साठी देवीने मातंगीचा अवतार घेतला. तिचे हे मंदिर. तिथला पुजारी महार आहे. माहूरलाही मातंगीचे मंदिर आहे. आवारातच 'चिंतामणी' म्हणून मोठा, गोल दगड आहे. 'चिंतामणी' दगडाला स्पर्श करून वंदन केले. मागायचे काही नव्हतेच. पण 'चिंतामणी' आपल्याला पाहायला कुठे मिळणार, तो इथे मिळाला म्हणून. आणखी काय पाहण्यासारखे आहे म्हणून बघत होतो, तर महाराष्ट्रातल्या एका नामांकित विद्यापीठातल्या एका विभागाचे प्रमुख प्राध्यापक आणि त्यांच्या पत्नी सोवळ्याची वस्त्रे नेसून प्रदक्षिणा घालीत होते, आणि त्याच वेळी हातांतल्या कळशीतून पत्नी हळदीचा आणि प्राध्यापक कुंकवाचा सडा फरशीवर शिंपीत होते. अशा त्यांनी तीन प्रदक्षिणा घातल्या. प्राध्यापक परिचित नव्हते पण माहितीचे होते. तेही दृश्य मनात ठसण्यासारखेच होते.

प्रदक्षिणा करून मंदिरात आलो. शिखर मराठेशाहीतल्या मंदिरासारखेच आहे. पण सभामंडपाचे खांब आणि त्याची रचना हेमाडपंती आहे. खांबावर बरेच कोरीव काम आहे. चित्रे आहेत. पण बरीच झिजलेली आहेत. त्यावरूनही मंदिर प्राचीन असावे असे वाटते. सभामंडपात भक्तांची गच्च गर्दी होती. कुठे मुलांचे जावळ काढण्याचा विधी चालला होता, कोणी गाणी गात होते, कोणी पूजेसाठी पुढे जायला धडपडत होते. गाभाऱ्यासमोरही गर्दीच होती. देवीच्या मूर्तीवर नेहमी वस्त्रालंकार घातलेले असतात. त्यामुळे फक्त मुखवटा दिसतो. मूळ सबंध मूर्ती सहसा पाहायला मिळत नाही. पण आमचे भाग्य की आम्ही गेलो त्याच वेळी देवीला पंचामृतस्नान घालणे चालले होते. त्यामुळे संपूर्ण अनावृत मूर्ती पाहायला मिळाली. देवी अष्टभुजा आहे. तिच्या सहा हातांत निरनिराळी आयुधे आहेत. एका डाव्या हातात मानवरूपी महिषासुराचे मुंडके केसांनी धरलेले आहे आणि एका उजव्या हातातला त्रिशूळ त्याच्या शरीरात खुपसलेला आहे. एक पाय मेलेल्या महिषासुराच्या देहावर ठेवलेला आहे. त्याच्या शेजारीच

धडापासून वेगळे केलेले त्याचे मुडके पडलेले आहे. देवीच्या शिरावरच्या मुकुटात योनीसह शिवलिंग आहे. तिच्या उजवीकडे मार्कंडेय मुनी आहेत आणि डावीकडे खाली डोके वर पाय अशी अनुभूती आहे. उजव्या-डाव्या खांद्यावर चंद्र-सूर्य आहेत. जवळजवळ कबरभर उंचीची ही मूर्ती दिसायला साधारणच आहे आणि बरीच झिजलेली आहे. पण एरवी सहसा दिसत नाही ते तिचे पूर्ण मूळ रूप पाहायला मिळाले हेच विशेष.

मंदिराच्या मागल्या बाजूला शिवाजी दरवाजा आहे. त्यातून बाहेर पडून खोऱ्यातून खोल खाली उतरून बरेच चालून गेल्यावर रणछोड भारतीबुवाचा मठ आहे. तिथे गेले नाही तर तुळजाभवानीचे दर्शन अपुरे राहते. रणछोड भारतीबुवा शंकराचा प्रत्यक्ष अवतार होते. त्याच्याबरोबर सोंगट्या खेळण्यासाठी देवी रोज रात्री मठात येत असे. शंकर-पार्वतीला सोंगट्या खेळण्याची किती आवड आहे ते आपल्याला ठाऊकच आहे. भारतीबुवांनी जिवंत समाधी घेतली. पण अजूनही रोज रात्री ती तिथे येते. मठात समोरासमोर दोन लोड ठेवलेले आहेत. मध्ये बैठकीवर सोंगट्याचा पट मांडून ठेवलेला आहे. देवी रात्री येते. भारतीबुवाही येतात. दोघे सोंगट्या खेळतात. आणि पहाटे पूजेची वेळ झाली की देवी वर मंदिरात परत जाते. मागे एकदा ती खेळण्यात इतकी रमली की दोन दिवस मंदिरात परत गेली नाही. नंतर भानावर आली तेव्हा गेली आणि पूजारी भोप्यावर बोलावले का नाही म्हणून फार रागावली तेव्हा ते म्हणाले, 'आईसाहेब, आपण खेळात गुंतला असताना आम्ही मध्येच आपल्याला कशी हाक मारायची?' तेव्हा तिने सांगितले, मी खेळात कितीही गुंतले असले तरी पूजेची वेळ झाल्यावर मला हाक मारीत जा.' देवीची आज्ञा ती! तेव्हापासून पहाटे पूजेची वेळ झाली की, शिवाजी दरवाज्याच्या बाहेर येऊन भोपे 'आईसाहेब, पूजेची वेळ झाली.' अशी आरोळी मारतात. तेव्हा देवी मठापासून मंदिरातल्या गाभाऱ्यापर्यंत भुयार आहे त्या वाटेने गाभाऱ्यात परत येते. ते भुयार अर्थातच आपल्याला दिसत नाही आणि कोणी दाखवीतही नाही.

खरे म्हणजे केवळ सोंगट्या खेळण्यासाठी देवीला रोज रात्री-पहाटे कोंदट भुयाराची लांब उतर-चढ करण्याची काही आवश्यकता नाही. कारण देवीच्या गाभाऱ्याच्या अगदी समोर, सभामंडपाच्या दुसऱ्या टोकाला शंकराची पिंडी आहे. रात्री शेजारती होऊन गेली, जिकडेतिकडे दारे बंद झाली म्हणजे नुसता

मंडप ओलांडून शंकरापाशी जाऊन तिला सोंगट्या खेळता आल्या असत्या. पण तिला ते नको असेल. दिवसभराच्या भक्तांच्या, पूजकाच्या, नवसबोल्याच्या, नवसफेड्याच्या गर्दीचा कलकलाट, कचकचाट, गजबजाट, गलबलाट, याचे कर्णकटू प्रतिध्वनी तिथे रात्रभर उमटत असतील. तेव्हा काही थोडी तरी शांतता मिळावी म्हणून ती मंदिरापासून दूर भारतीबुवाच्या शांत निवांत मठात रात्र काढण्यासाठी जात असावी. खरेच अगदी शांत आहे तो मठ. ऐन दुपारची वेळ होती तरी आम्ही गेलो तेव्हा एकदेखील माणूस तिथे नव्हता. कोणी सेवक तरी मठासाठी असेल की नाही असा प्रश्न पडावा इतके शांत.

सगळे पाहून झाले होते. आता परतायचे होते. पण मनात एक इच्छा होती. शिवाजी महाराजांपासून, कदाचित त्यांच्याही आधीपासून आणि नंतर, सातारकर छत्रपती, कोल्हापूरकर छत्रपती, पेशवे अशा अनेक थोरा-सपन्नांनी सोन्या-रत्नांचे अलंकार, वस्त्रे, पात्रे देवीला दिली असतील. त्यातले काही थोडे, अगदी काही थोडे, अलंकार आपल्याला पाहायला मिळतील का? कसे मिळतील? पण तेही शक्य झाले. त्या दिवशी देवी विशेष प्रसन्न असली पाहिजे. कदाचित आदल्या रात्री भारतीबुवाबरोबर खेळताना सगळे डाव तिनेच जिंकले असतील एरव्हीसुद्धा शंकर-पार्वती खेळतात तेव्हा बहुधा पार्वतीच डाव जिंकते. आणि आपल्याला खेळ जमत नाही असे पाहून चिडून शंकर डाव उधळून उठून चालू लागतो. पण आदल्या रात्री तसेही झाले नसेल. म्हणूनच वाटते, देवी त्या दिवशी विशेष प्रसन्न असेल.

म्हणूनच आम्हाला दागिने पाहायला मिळाले. त्या दिवशी कोणीतरी मोठे सरकारी अधिकारी तिथे आले होते. त्यांना दाखवण्यासाठी दागिने काढले होते. माझ्यासंबंधी थोडेसे सांगून, माझा सभ्यपणा त्यांना पटवून, मी त्यांच्या-बरोबर दागिने पाहायची संधी मिळवली. बोटात, मनगटात, दंडात, कानात, नाकात, गळ्यात घालायच्या सोन्याच्या, मोत्यांच्या, रत्नांच्या असंख्य अलंकारांच्या राशीच्या राशी पसरलेल्या होत्या. दोन डोळ्यांनी आपण क्षितिजापर्यंत पसरलेली पृथ्वी पाहू शकतो आणि अनंत आकाशातली नक्षत्रे पाहू शकतो. म्हणून दोन डोळ्यात त्या राशी मावू शकल्या. तुरीच्या डाळीएवढ्या आकारा-पासून तो बोराएवढ्या, काही त्याहूनही मोठ्या, वेगवेगळ्या आकाराचे, पैलूंचे हिऱ्या-माणका-पाचूंचे दागिने त्यात होते. नथीतला एकेक मोत्याचा दाणा सिमला वाटाण्याएवढा मोठा होता. शिरपेच, किरीट, टिका, ठुशा, सरी,

चंद्रहार, बोरमाळ, वाकी, पोच्या, अंगठ्या होत्या. मोत्यांच्या दुहेरी-तिहेरी माळा होत्या, त्यातल्या मोत्यावर इंद्रधनुष्यातले सातही रंग झळाळत होते. पण मोत्याचे आकार मात्र एखाद्या हलवायाच्या दुकानात नुकत्याच कामाला लागलेल्या दहाबारा वर्षांच्या नवशिक्या पोराने टाकलेल्या लहानमोठ्या बत्ताशासारखे वेडेवाकडे होते. ते पाहवले नाहीत. पुतळ्याच्या माळाही कितीतरी होत्या. त्या त्या पुतळ्यावर ग्रीक देवदेवतांचे स्पष्ट ठसे उठलेले होते.

इसवी सन पूर्व चवथ्या शतकात मॅसिडोनियाच्या शिकंदराने भारतावर स्वारी केली. त्यानंतर ग्रीक लोक भारतात येत-जात होतेच. मागे राहिले ते इसवी सनाच्या चवथ्या शतकापर्यंत भारतीयात सामावून गेले. त्याचा ठसा भारतीय मूर्तिशिल्पावर राहिला तसा आपल्या स्त्रियांच्या गळ्यातल्या अलंकारांवरही राहिला. भोप्यांनी आम्हांला दाखवले ते सगळे दागिने शिवाजी महाराजांनी देवीला दिलेले होते. ते त्यांनी आपल्या कारभाऱ्याच्या हस्ते भोप्यांना दिले असतील. पण त्यांनी त्यांना आधी हात लावला असेलच. अधिकाऱ्याच्या परवानगीने मीही त्यांना हलक्या हाताने स्पर्श केला. महाराजांच्या बोटांनी ज्यांना स्पर्श केला त्यानाच अतिशय आदराने मी केलेला स्पर्श बोटांच्या टोकापासून थरथरत जाऊन थेट काळजात ठसला. आणि काही वेळ तरी त्या बोटांनी दुसऱ्या कशाला स्पर्श करण्याला मन धजेना.

बालेघाटातल्या पठारावरच्या तुळजापूराला येणे शक्य झाले होते. प्रभु रामचंद्राची वरदायिनी, समर्थ रामदासाची कुलस्वामिनी, शिवाजी महाराजांची श्रीभवानी, आणि सगळ्या महाराष्ट्राची तुकाई पाहिली. तिथून निघताना, शिंदेशाही पगडी घालून शेषशायीसारखा लोडाला रेललेला गणपती, भवानी देवीची संपूर्ण मूळ स्वरूपातली मूर्ती, कल्लोळतीर्थ, भारतीबुवाच्या निर्मनुष्य मठातला सोंगट्यांचा पट आणि सोवळ्याने हळदीकुंकवाचा सडा घालीत प्रदक्षिणा करणारे सपत्नीक प्राध्यापक यांच्या आठवणी, कलायडोस्कोपमधल्या पुन्हा पुन्हा जागा बदलणाऱ्या पण नेत्रवेधक आकृतींसारख्या मनात फिरत होत्या. निरोप घेताना देवीजवळ काही मागितले नाही. मनाशीच म्हटले 'आतापर्यंतच्या माझ्या आयुष्यात जे काही मला द्यावस वाटल ते तू दिल असशीलच. आणि उरलेल्या आयुष्यात आणखी जे काही द्यावसं वाटेल तेही देशीलच. मग मागायच काय ? आणि कशासाठी ?'

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मुंबई शाखा (स्थळ प्रत)



# पुढली मजल

१ जानेवारी, १९२६

काल सकाळपासून संध्याकाळपर्यंत मुंबई जितकी पाहता आली तितकी पाहिली. मुंबईहून निघणाऱ्या रस्त्याचे मैल जिथून मोजतात ते सेंट टॉमसचे कोटातले कथीड्रल, त्याच्या शेजारचा तो रुंद पायऱ्याचा भव्य टाउन हॉल, फाउंटन, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम, अपोलो बंदर, राजाबाई टॉवर, हायकोर्ट वगैरे इमारती पाहिल्या. गिरगावातून हिंडलो. भायखळा, राणीचा बाग, लालबाग परळ, वगैरे भागातून गेलो. मुंबईत सायकलवरून कसे हिंडता येईल ह्याची आरंभी थोडीशी धास्ती वाटत होती. पण मग लक्षात आले की, आपली बाजू सांभाळली आणि थोडेसे सावध राहिले तर ते फारसे कठीण नाही.

पुन्हा आदल्या दिवसाप्रमाणेच दादरला रात्र काढली आणि आज सकाळी उठून, म्हणजे मुंबईला आल्याच्या तिसऱ्या दिवशी, चहा वगैरे उरकून आठ वाजण्याच्या सुमाराला बापू आणि मी पूर्वी ठरल्याप्रमाणे पुण्याकडे रवाना झालो. इंदूरहून मुंबईपर्यंत आमच्याबरोबर आलेले श्री० कीर्तिकर मुंबईलाच राहणार होते त्याप्रमाणे राहिले. माटुंग्याहून शीवकडे जाताना पोलीस-स्टेशनाकडे नजर गेली. कृतज्ञ मनाने त्याचा निरोप घेतला. ह्याच रस्त्याने दोन दिवसांपूर्वी मुंबईत आलो तेव्हा रात्रीची वेळ होती. आमच्या तीन सायकली मिळून दोनच दिवे होते. म्हणून इथे पोलिसांनी आम्हाला अडवले, पण आम्ही इंदूरपासून मुंबईपर्यंत सायकलीने आल्याचे त्यांना सांगितले. आमचे धूळभरले रूप, प्रवासी वेष वगैरे पाहून त्याचा पोलिसी कठोरपणा मावळला. त्यांनी आम्हाला तसेच पुढे जाऊ दिले. इतकेच नाही, तर पुढे कोणी अडवले तर 'आम्ही सोडलय् असं सांगा.' असेही सांगितले. पुढे दादरला मुक्कामावर पोचेपर्यंत कोणी अडवायला भेटलेच नाही हे वेगळे. म्हणून त्या पोलिस-स्टेशनाबद्दल कृतज्ञता. मुंबईत आलो तेव्हा रात्र होऊन अंधार पडलेला असल्यामुळे आसपासचे फारसे दिसले नव्हते. आताही दिसत नव्हते. कारण पाहण्यासारखे काही नव्हतेच. इमारती फारशा नव्हत्या. रस्त्यावर दोन्ही बाजू मोकळ्याच होत्या. थोड्याच वेळात आम्ही शीव स्टेशनाजवळ रेल्वेचा पूल

ओलांडून कुर्ल्याच्या वाटेला लागलो. म्हणजे मुंबई सुटली. इंदूरहून सुरू झालेल्या आमच्या सायकल-प्रवासाचा एक मोठा टप्पा संपून दुसऱ्या टप्प्याला आरंभ झाला होता.

आम्ही कुर्ल्याच्या वाटेला लागलो तेवढ्यात रेल्वे-लाइनीकडून एक कर्कश, भसाडा आणि पसरट भोंगा ऐकू आला. वळून पाहतो तो एक बिनएंजिनाची गाडी कुर्ल्याहून मुंबईकडे चालली होती. ती विजेची गाडी. विजेच्या लोकल गाड्या नुकत्याच मुंबईपासून कुर्ल्यापर्यंत चालू झाल्याचे आम्ही ऐकले होते. पण पाहिली आता पहिल्यांदाच. ती बिनएंजिनाची गाडी म्हणजे एखादा बिन-तोंडाच्या श्वापदासारखी दिसत होती. आणि तसे ते श्वापद धाडधाड करीत चालताना मोठे विचित्र, अस्वाभाविक वाटत होते. ह्या गाड्या एकदम थांबतात आणि त्याना एकदम गती येते असे मुंबईत आम्हांला लोकानी सांगितले होते, त्याची त्या वेळी आम्हाला आठवण झाली.

कुर्ल्याहून घाटकोपरच्या बाजारपेठेच्या गर्दीतून विक्रोळी, भांडूप मागे टाकीत दोन दिवसापूर्वीच्याच रस्त्याने आम्ही ठाण्यात पोचलो. इथे आग्र्याकडे जाणारा रस्ता सोडून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्याला लागलो.

प्राचीन काळातले श्रीस्थानक, मार्को पोलोच्या वेळचे मोठे बंदर, पोर्तुगीज राजवटीतले आणि त्या राजवटीतल्या ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराचे ठाणे हे महत्त्वाचे केंद्र. ह्या वेळी अगदी गचाळ आणि घाणेरडे दिसत होते. घरे जवळ-जवळ आणि लहान. रस्ते अरुंद आणि खडबडीत. त्यांच्या दोन्ही बाजूंची गटारे उघडी आणि चोंदलेली. पण किल्ल्यापाशी आलो तसे मोकळे मैदान लागले आणि बरे वाटले. ह्याच किल्ल्यातून, खाडीच्या बाजूला उडी टाकून, त्रिंबकजी डेंगळे ब्रिटिशांच्या कैदेतून पळाला होता. 'झुडपाच्या मागे तीरंदाज लपले आहेत. झाडाखाली घोडा उभा आहे. तिथे पचावन्न घोडे आहेत आणि चौपन्न घोडेस्वार आहेत. पचावन्नावा स्वार घोड्यावर चढला की दख्खनचे भाग्य पुन्हा उजळेल.' असे गाणे गात गात, इंग्रज अंमलदाराच्या एका मराठा मोतद्दाराने त्याला इशारा दिला, आणि तो इशारा ओळखून त्रिंबकजी पळाला. पुढे इतिहास बदलला असता तर, कुणी सांगावे, त्या त्याच्या धाडसाची, शिवाजी महाराजानी मिठाईच्या पेटाऱ्यात बसून आग्र्याच्या किल्ल्यातून आपली सुटका करून घेतली तिच्याशी तुलना झाली असती.

त्या किल्ल्याकडे आणि त्याच्या मागच्या खाडीच्या भागाकडे पाहत पाहत

कळव्याच्या पुलावरून आम्ही पुढे चाललो. त्रिंबकजीवरून दुसरा बाजीराव पेशवा, त्याच्यावरून त्याच्या वेळचे पुणे, त्याच्यावरून मराठी राज्याची अखेर, असे आमचे बोलणे चालले होते, आणि चाकाखालचा रस्ता मागे पडत होता. कळव्याहून पुढे पारसीकच्या डोंगराला वळसा घालून आम्ही रेल्वे-लाइन ओलांडली आणि मुंब्र्याकडे चाललो.

ठाण्याला येईतो दहा-साडेदहा झाले होते. तिथेच एका हॉटेलात आम्ही काहीतरी खाल्ले होते. मुंबईहून बरोबर काही घेतले नव्हते. कारण तिथे करून देणारे कोणी नव्हते. मग मध्ये कुठेही न थांबता तळोजे, पनवेल, चौक, ह्या गावावरून खोपोलीकडे चाललो. चौक हे नेताजी पालकरांचे गाव. तिथे त्यांच्या घराचे जोते आहे असे ऐकले होते. पण पाहायला गेलो नाही.

खोपोलीला पोचेतो संध्याकाळ झाली. गावात बापूचे एक नातेवाईक होते. त्यांच्याचकडे रात्रीचा मुक्काम व्हायचा होता. मुक्कामावर पोचल्यावर सायकली ठेवून हातपाय धुतले आणि चहा घेऊन बाहेर पडलो. कारण गावात नाना फडणिसानी बांधलेले एक मोठे तळे होते, ते बापूच्या मनातून मला दाखवायचे होते. तळे चागले मोठे विस्तीर्ण अष्टकोणी आहे. शेजारी एक छोटेसे देऊळ आहे. शात चांदण्यात देखावा चागला दिसत होता. आम्ही तिथे थोडा वेळ बसलो. पण आमच्या मनातून शक्य तर टाटाचा विजेचा कारखाना पाहायचा होता. एवढ्या रात्री पाहायला मिळेल की नाही ह्याबद्दल शका वाटत होती. पण तसेच गेलो, आणि कारखान्याच्या दारात उभे राहिलो. सुदैवाने तिथले एंजिनियर महाराष्ट्रीयच होते. आम्ही विद्यार्थी होतो आणि खूप लाबून सायकलीने प्रवास करीत आलो होतो ही आमची मोठी आणि मुख्य शिफारस. त्यानी आम्हाला कारखाना दाखवायचे कबूल केले, आणि सरासरी पुरुष-सव्वापुरुष उंचीच्या एका चाकाजवळ आमच्या शेजारी उभे राहून 'टाटाची तीन तळी आहेत' ह्या शब्दानी बोलायला आरंभ केला. ते अस्खलितपणे कितीतरी वेळ बोलत होते

' ड्यूक्स नोजजवळ आमचं फोअर-बे आहे. तिथ पाणी मोठ्या नळात शिरत आणि एकदम सतराशेचाळीस फूट खाली कोसळत ' आम्ही ज्या चाकापाशी उभे होतो, त्याला हत्तीच्या कानाचे द्रोण केले तर ते जेवढे होतील तेवढ्या आकाराच्या दुहेरी ओंजळी रहाटगाडग्याच्या माळेसारख्या लावलेल्या होत्या आणि 'ह्या टर्बाइन्स तीस हजार अश्वशक्ती निर्माण करतात '

आमच्या कानावर एंजिनियरसाहेबांचे शब्द पडत होते 'पायलन्सवरून ही वीज—एक लक्ष व्होल्ट्सची—परळच्या रिसीव्हिंग स्टेशनमध्ये नेली आहे ' डोंगरावरून नळातून येणारे पाणी त्या रहाटगाडग्यातल्या ओंजळींत पडून चाके प्रचंड वेगाने मिनिटाला सोळाशे फेरे किंवा अशाच काहीतरी गतीने फिरतात, आणि त्याचा विजेच्या निर्मितीशी काहीतरी संबंध आहे, एवढेच आम्हाला समजले. आणि केव्हाही कोणीही सांगितले असते तरी तेवढेच समजले असते! आम्हाला अवेळी कारखाना पाहायला मिळाला ह्याचाच आनंद (आणि अभिमानही) वाटत होता. एकंदरीत दिवस चांगला गेला, ह्या आनंदात घरी परतलो. आणि जेवण उरकून झोपेच्या अधीन झालो.

२ जानेवारी, १९२६

सकाळी उठून पाहतो तो सह्यपर्वत एखाद्या प्रचंड भिंतीसारखा गावाला अगदी खेटून उभा असलेला दिसला. इतक्या जवळ इतका मोठा डोंगर पाहून थोडेसे दबल्यासारखे वाटू लागले. गावाच्या सगळ्या हालचालींवर ह्या डोंगराची नजरच नव्हे तर नियंत्रणही असेल. पावसाळ्यात सगळा डोंगर वेगवेगळ्या हिरव्या-पिवळ्या रंगाच्या छटांनी सर्वांग रंगून जात असेल आणि त्यातच त्याच्या आकाशाला भिडणाऱ्या अजस्र देहावरून, लहानमोठे ओहळ-धबधबे कुठे रेंगाळत वाहत, कुठे कोसळत, असतील आणि सगळे गाव त्यात न्हाऊन निघत असेल. पावसाळा संपत आला की नाना प्रकारची, नाना रंगांची रानफुले ह्या डोंगरात फुलत असतील आणि त्यांच्या वासाने सारे खोरे कोंदाटून जात असेल. आणि उन्हाळ्यात डोंगर तापत असेल तेव्हा गाव तगमगत असेल. ह्या वेळी जानेवारीत डोंगराची हिरवी विस्तार-शोभा अजून पूर्ण नाहीशी झाली नव्हती. पण हळूहळू हे कमी होणार आहे हे दिसत होते.

नेहमीप्रमाणे चहा-न्याहारी उरकून आम्ही आठ-साडेआठाच्या सुमाराला पुन्हा वाटेला लागलो. पण दोनतीन फर्लांग गेलो नाही तोच घाटाचा चढ सुरू झाला आणि खाली उतरून सायकली हातांनी रेटीत नेणे भाग पडले. इंदूरहून मुंबईला येईपर्यंत आम्हाला अधूनमधून लहानमोठे चढ लागले तरी एकंदरीत वाट उताराचीच होती. पण आता भोरघाटाचा पाचसहा मैलांचा उरावर आलेला चढ रेटायचा होता. आमच्याजवळ सामान जवळजवळ मुळीच नव्हते, तरी सायकली ढकलीत तो चढ चढणे फार जड वाटत होते. त्यात

पुन्हा पायाची चालायची सवय अगदी गेली होती. पाच मैल चढून जायला आम्हांला अडीच-तीन तास लागले.

लोणावळ्याजवळचे तळे, कार्ल्याच्या लेण्याकडे जाणारा रस्ता, ही मागे टाकीत पुढे चाललो. जिथे इंग्रजाचा आणि मराठ्यांचा लढा झाला (आणि जो इंग्रजानीच पुढे धुडकावून लावला) ते वडगाव, दाभाड्याचे तळेगाव, शेलार-वाडी वगैरेवरून खडकीतून पुण्याला पोचेतो संध्याकाळचे चार-साडेचार व्हायला आले.

आम्ही पुण्यात शिरलो ते नव्या पुलावरून थेट शनवारवाड्याच्या दिल्ली दरवाज्याकडे तोंड करून. ज्या गावाला रेल्वेस्टेशन असते त्या गावात दुसऱ्या एखाद्या रस्त्याने शिरणे, हे गावाचे व्यवहार चालू असताना त्याला नकळत मागल्या दाराने अनौपचारिकपणे—अचानकपणे—शिरल्यासारखे वाटते. तसेच हे आमचे पुण्यात शिरणे होते. निदान माझे कारण बापू पुण्याचाच होता. मी मात्र जाणतेपणी असा पहिल्यादाच पुण्याला येत होतो.

'मी पहिल्यांदाच पुण्याला येत होतो', ह्या एवढ्या वाक्याने मी काय करीत होतो हे स्पष्ट होणार नाही. पुणे म्हणजे नुसते एक पुणे नव्हते. पुणे म्हणजे शिवाजी लहानपणी जिथे राहिला—खेळला—वाढला, जिथे त्याने खिडकीतून पळून जाणाऱ्या शाइस्तेखानाच्या हाताची बोटे कापली, ते पुणे; पेशव्याचे पुणे; नाना फडणिसाचे पुणे; थोरल्या बाजीरावाचे पुणे; नारायणराव पेशव्याचा जिथे वध झाला, जिथे सवाई माधवराव दिवाणखान्या-तल्या गादीवर पडायच्या ऐवजी 'चुकून' खालच्या हौदातल्या कारंजावर पडले आणि प्राणाला मुकले; जिथे अंगातली चोळी काढून भर दिवसा, भर रस्त्याने, श्रीमंताच्या वाड्यात कोण जाते ह्याबद्दल घरंदाज स्त्रियात पैज लागायची आणि घरंदाज घरची स्त्री ती पैज जिंकायची (असे म्हणतात) ते पुणे, चिपळूणकराचे पुणे; टिळक-आगरकराचे पुणे; सुधारकाचे पुणे; सना-तन्याचे पुणे, शाळा-कॉलेजाचे पुणे; विद्यार्थ्यांचे पुणे, वेगवेगळ्या संस्थाचे पुणे; पुढाऱ्याचे पुणे, अशी अनेक पुणी होती आणि ती सगळी पुन्हा एकाच पुण्यात होती.

पुण्यासंबंधी लहानपणापासून कितीतरी ऐकलेले होते. पुणे म्हणजे विद्येचे माहेर, पुण्याचे लोक विद्वान्, पुण्याचे लोक शिष्ट, पुण्याचे लोक फार हुशार, पुण्याचे लोक फार लबाड, 'काय बाई पुण्याची तारीफ, लवंगा निघाल्या

बारीक' असे पुण्याची तारीफ करणारे एक गाणेही लहानपणी ऐकले होते. 'शिकायला जायचे तर पुण्याला जावे'. हे वाक्य तर सारखे कानावर पडत असे. आमचे हैदराबादचे काही विद्यार्थी पुण्याला शिकायला येत असत. त्या एवढ्या गोष्टीने आमच्या अंगावर कौतुकाद्भुताचे रोमांच उभे राहत. आपल्याला पुण्याला शिकायला जाता येत नाही ह्याचे वैषम्य वाटायचे. आम्हांला डोक्यावर शेंडी ठेवायला लागायची. पुण्याला शिकायला गेलेले विद्यार्थी शेंडीचा घेर कमी करीत आणि त्याच्या जोडीला केस ठेवीत, त्याचे आम्हांला कौतुक वाटे आणि त्यांना मिळत असलेल्या स्वातंत्र्याचा हेवा. त्याचे पाहून आम्ही कोणी केस वाढवायचा प्रयत्न केला तर लगेच मोठी माणसे म्हणत, 'तो पुण्याला शिकतोय, तू शिकतोयस् का?'

आहिताग्नी राजवाड्यांच्या एका व्याख्यानात पुन्हापुन्हा 'का वै भुवनस्य नाभिः।' असा प्रश्न आणि त्याच्या मागून 'यज्ञो वै भुवनस्य नाभिः।' असे उत्तर येत असे. या धर्तीवर 'का वै महाराष्ट्रस्य नाभिः।' असा प्रश्न कोणी विचारला असता तर 'पुणे वै महाराष्ट्रस्य नाभिः।' असे त्याचे उत्तर कोणीही पुणेकराने चटकन् उठून (किंवा बसल्याबसल्यासुद्धा) दिले असते. अशा त्या महाराष्ट्राच्या नाभीत मी शिरत होतो.

खडकी मागे पडली आणि पुणे जवळ आले असे बापूने सांगितले तेव्हाच त्या विचाराची-कल्पनाची माझ्या मनात कालवाकालव चालू झाली होती. नवा पूल उतरून शनवारवाड्याच्या जवळ आलो, आणि शनवारवाडा उजवीकडे टाकून कसब्यातून जिजाबाईचा लाल महाल (म्हणजे त्या महालाची जागा) आणि शनवारवाडा ह्यांच्यामधून बुधवाराकडे जाऊ लागलो.

वाड्याजवळून जाताना मी बापूला विचारले,

'नारायणरावांचा जिथे खून झाला तो वाडा, सवाई माधवराव जिथून कारंजावर पडले तो दिवाणखाना, ते कारंज आत असेलच.'

'छे छे. आता काही नाही. मात्र सध्या थोडीशी साफसफाई वगैरे चालली आहे.'

पुढे गेल्यावर तो उजवीकडे हात करीत म्हणाला, 'हा नाना वाडा.'

'म्हणजे?'

'म्हणजे नाना फडणिसाचा. इथे न्यू इंग्लिश स्कूल आहे.' आणखी पुढे गेल्यावर म्हणाला, 'हा माणकेश्वराचा वाडा.'

बुधवारचौकात बुधवारवाड्याची जागा त्याने दाखवली.

बापू हे एकेक दाखवू लागला, सांगू लागला, तसे मला इतिहासातल्या आणि वर्तमानकाळातल्या पुण्यातून एकाच वेळी जात असल्यासारखे वाटू लागले. तसेच आम्ही बाहुलीच्या हौदावरून मंडईकडे चाललो, आणि मध्येच एका उजवीकडल्या बोळात शिरलो. ह्या बोळातल्याच एका घरात पुण्यातला आमचा मुक्काम व्हायचा होता.

३ जानेवारी, १९२६

दोन दिवसांच्या मुक्कामात जेवढे पुणे दाखवता येईल तेवढे बापूने दाखवले. तो नूतन मराठीचा विद्यार्थी. साहजिकच त्याने आपली शाळा आधी दाखवली. समोरची हुजूरपागा दाखवली, शेजारचा हरिभाऊ आपट्यांचा आनंदाश्रम दाखवला. त्याचे शिक्षक लक्ष्मणशास्त्री लेले ज्या घरात राहत असत ते घर दाखवले. गायकवाड-वाडा दाखवला. लकडीपूल दाखवला. ब्राह्मणाचे तसेच ब्राह्मणेतराचे अशी दोन्ही ओंकारेश्वरे दाखवली. 'पुण्यातली स्मशानं', बापूने सांगितले. फर्ग्युसन (की फर्गसन्!) कॉलेजही दाखवले. महाराष्ट्र मंडळ, स० प० कॉलेज आणि पर्वतीही दाखवली.

फर्गसन कॉलेजकडून परत लकडीपुलाकडे येताना पुलाशी आल्यावर समोर आणि आजूबाजूला पाहिल्याबरोबर क्षणभर मी थबकलो. गावाशी अगदी सलगी करीत जाणारी मुठा नदी (तिचे नाव इतके रूक्ष का?), पलीकडली चढत जाणारी जमीन, मागची पर्वतीची टेकडी, आणखी पलिकडचा सिंहगड. नदीच्या दोन्ही बाजूचे लांबवर गेलेले आणि निळ्या धूसरतेत विलीन झालेले डोंगर! ह्या हिवाळ्यातही हा सगळा देखावा इतका रमणीय दिसत होता, मग पावसाळ्यात आणि त्यानंतर किती सुंदर दिसत असेल! पुण्याला नुसता मन गुंतवून ठेवणारा इतिहासच नाही तर डोळे गुंतवून ठेवणारा आसमंतही लाभला आहे.

पुण्यात येऊन मंडई पाहिली नसती तर महाराष्ट्राच्या गाभ्यात येऊन त्या गाभ्याचा गाभा पाहिला नाही असे झाले असते. पुण्याच्या कॉलेजांच्या खालो-खाल किंवा त्याच्यापेक्षा अधिकच (अर्थात् सर्वसामान्य लोकात) पुण्याच्या मंडईची प्रसिद्धी आहे. चाकाच्या आऱ्यासारख्या तिच्या रचनेमुळे आत गेलेल्या नवख्या माणसाला कुठून बाहेर पडायचे ते कळत नाही. त्यात पुन्हा भाजी-

पाल्याच्या, कांदे-बटाट्याच्या, फळफळावळींच्या रांगांतले दुकानदार चहूबाजूंनी हाका मारून मागेपुढे जाऱ्ये करायला लावतात. त्यामुळे त्याला अधिकच गोंधळल्यासारखे होते.

पुण्याच्या शहरपणाचा माझ्या मनावर फारसा परिणाम झाला नाही. मी हैदराबादचा होतो. आणि हैदराबाद पुण्यापेक्षा कितीतरी मोठे आहे. तिथे चारमिनार, मक्का मशीद, हायकोर्ट यासारख्या भव्य इमारती आहेत. नागपूर आणि इंदूर हीदेखील पुण्यासारखीच मोठी शहरे आहेत. मात्र पुण्यातून हिंडताना काही ठिकाणी, विशेषत' शनवारपेठ-नारायणपेठातून जाताना, मला इंदूरच्या कृष्णपुऱ्यातून जात असल्यासारखे वाटले. तीच उंच जोती, काही घरापुढे तसेच ओटे, तशाच पुढच्या खोल्या आणि तशाच माड्या. फरक इतकाच की, पुण्याच्या रस्त्यातून ब्राह्मणाच्या बायका-मुली जातायेताना दिसतात, तशा इंदूरच्या रस्त्यात सहसा दिसत नाहीत. असेच इकडेतिकडे पाहत जात असताना सहज एका माडीकडे नजर गेली, तर एक बाई अंबाडा घालता घालता खिडकीशी येऊन रस्त्याकडे पाहत असलेली दिसली ते पाहून मी चटकन मान खाली वळवली. असे दृश्य इंदुरात दिसले असते असे वाटत नाही!

असे सांगतात की पूर्वीच्या काळी, युद्धात पराक्रम गाजवून किंवा बायको मिळवून राजा (किंवा राजकुमार) आपल्या राजधानीला परत आला म्हणजे नगरातल्या सगळ्या (?) बायका हातातली कामे तशीच टाकून—किंवा तशीच करीत करीत, म्हणजे भाकरी थापीत असतील तर पिठाने माखलेल्या हातांनी, पोतेरे घालीत असतील तर शेणखळ्याने भरलेल्या हातात पोतेऱ्याचा बोळा घेऊन, पायांना आळता लावीत असतील तर तो अर्धवट लावलेल्या पावलाचे ठसे जमिनीवर उठवीत, वेणीफणी करीत असतील तर वेणीचे पेड तसेच हातात धरून, काजळ घालीत असतील तर एकाच डोळ्यात अर्धवट काजळ घातलेल्या, वस्त्रांतर करीत असतील तर ते करीतच, त्याला पाहण्यासाठी दारा-खिडक्याकडे धावून येत. पण आम्ही काही युद्ध जिंकून आल्याच्या किंवा बायको जिंकून आणल्याच्या थाटात पुण्याच्या रस्त्यातून मिरवीत नव्हतो. तेव्हा ती बाई आम्हांला पाहण्यासाठी खिडकीत आली असेल हे शक्य नव्हते. म्हणजे मग तिचे ते तसे येणे नैमित्तिक नसून नित्याचे असले पाहिजे. पण तसे अनुमान तिच्याच काय, कोणत्याही बाईबद्दल

काढणे आमच्या मनातसुद्धा आले नसते. म्हणूनच तर हात वर केलेली तशी ती दिसताच मी चटकन मान खाली घातली. पण पुण्याच्या बायका-मुली एकदरीतच चौकस आणि धीट असाव्यात असे मात्र वाटले. कारण कितीतरी वेळा त्या मागे वळून आमच्याकडे पाहताहेत असे दिसले. त्याचे कारण बहुधा आम्ही आमच्या प्रवासी पोषाखामुळे 'स्मार्ट' पुणेकर सायकलस्वाराच्या मानाने त्याना फारच वेगळे म्हणजे बेंगरूळ दिसलो असू हे असावे.

पुण्यात सायकल चालवणे हे मुंबईत सायकल चालवण्यापेक्षा कठीण आहे असे मला दिसून आले. मुख्य रस्त्यातून, तेही अरुदच, फुटणारे किंवा त्याना येऊन मिळणारे लहानमोठे रस्ते-बोळ दर दहापाच पावलांनी आडवे येत आणि वळणापलीकडून किंवा समोरून येणाऱ्याशी टक्कर होईल की काय अशी सारखी भीती वाटे. माझी आपली समजूत अशी की, सायकलवाल्याने घंटा वाजवली की, पायी चालणाऱ्याने त्याला वाट करून द्यायची. पण पुण्यात तसे नाही. (निदान माझा तसा ग्रह झाला.) पायी जाणारे जसे जात असतील तसे त्यांना जाऊ देत, आपण त्याच्यामधून शिताफीने सायकल काढायची अशी तिथली रीत आहे. तिथे सायकलवाल्याच्या दृष्टीने रस्त्याने जाणाऱ्या गाई-म्हशी आणि माणसे सारखीच मी नवखा म्हणून अतीव सावधगिरीने सायकल चालवी. बापू पुण्याचा त्यामुळे तो पुढे निघून जाई आणि मी जत्रेत वाट चुकलेल्या मुलासारखा भांबावून जाई. पुण्यातल्या ह्या सायकलस्वारीत मला काहीही अपघात झाला नाही त्याचे श्रेय माझ्या कौशल्याला नसून पुण्यातल्या समंजस वाटसरूना आणि तरबेज सायकलस्वारांना आहे आणि त्याबद्दल मी त्याचा आजन्म ऋणी राहीन.

पुण्याला आम्ही आलो तेव्हाच इंदूरहून सुरू केलेला आमचा सायकलचा प्रवास संपला होता. सातआठ दिवस मजल-दरमजल चाललेल्या प्रवासातला पुणे हा शेवटचा टप्पा होता. दोन दिवसानी पुण्याचा मुक्काम संपला. आता आमचा प्रवास पुन्हा सुरू होणार. पण तो परतीचा. पुणे सोडताना मी पुण्याचा निरोप घेतला. पुण्यानेही मला उलट निरोप दिला आणि देताना म्हटले 'पुन्हा ये.'

# एक सकाळ : भगवी आणि गार

पुणे, २३ मे, १९७६

'सभोगातून समाधीकडे' हे पुस्तक तुम्ही वाचले आहे का? भल्याभल्यांनी त्याची भलावण केली आहे, म्हणून विचारले. नाही वाचलेत? काही बिघडले नाही. मीदेखील वाचले नाही. पण नाव वेधक आहे की नाही? समाधीपर्यंत आपण पोचू की न पोचू, पण पहिल्याच शब्दाने आतल्या आत उचंबळून येऊन सुखावल्यासारखे आणि त्याच शब्दावर रेंगाळत एकदम समाधी लागल्यासारखे वाटते की नाही? शब्दाचे काम झाले. जाहिरातीत ज्या कौशल्याने शब्द वापरतात तेच कौशल्य इथे दाखवले आहे. अशी कुशल शब्दरचना करणारा माणूस शब्दप्रभू असला पाहिजे ह्यात शंका नाही. पुणेकर बुद्धिवंताच्या कौतुकाचा, कुचेष्टेचा आणि क्रोधाचाही विषय झालेल्या त्या भगवानाचे दर्शन घ्यावे असे फार दिवस वाटत होते. मग त्याच्यासंबंधी काही माहितीही मिळवीत गेलो. डोक्यावर पीक कॅप घातलेले, फेल्ट हॅट घातलेले, फुलाचे चक्र घातलेले, आणि काहीच न घातलेले, तसेच पॅंट-बुशशर्ट घातलेले, कफनी घातलेले त्याचे अनेक फोटो पाहिले. विविध वेषभूषेचा हौस असलेला दिसतो! मी म्हटले.

आणि करियर? तत्त्वज्ञान घेऊन एम० ए० त पहिल्या वर्गात पहिला. काही वर्षे प्राध्यापक, मग 'आचार्य' आणि नंतर (म्हणजे आता) 'भगवान'. शाक्य गौतमाला जसा पिंपळाच्या झाडाखाली 'बोध' झाला तसे ह्यांनाही 'बकुळीच्या' झाडाखाली 'ज्ञान' प्राप्त झाले. त्यांचे हजारो शिष्य जगभर पसरलेले आहेत. ते रोज सरासरी दोन हजार पृष्ठे मजकुराचे आणि महिन्याला दीडशे ते दोनशे ग्रंथांचे वाचन करतात; वगैरे वगैरे. सगळेच अलौकिक!

आपण इतक्या वेळा पुण्याला जातो, केव्हातरी भगवान रजनीशांना पाहिले पाहिजे, हे सारखे मनात यायचे. पण जमायचे कसे? 'भगवाना'चा आश्रम कोरेगाव पार्कला. कोरेगाव पार्क म्हणजे 'निवृत्तांचे नंदनवन'. ज्यांना काही काम नसते असे छोटेबडे 'निवृत्त' संस्थानिक आणि निवृत्त अमलदार ह्यांची वसाहत. डेक्कन जिमखान्यासारखी, मोजक्या लांबीरुंदीची चिंचोळी आवारे असलेल्या बंगल्यांची वसाहत नाही, तर प्रत्येक बंगल्याभोवती कमीत कमी तीन

एकर जागा मोकळी सोडलीच पाहिजे असा नियम असलेली! पुण्याला गेलो म्हणजे नारायणपेठेत उतरणारा मी ह्या नंदनवनापर्यंत पोचणार कसा!

पण एकदा योग आला. माझे पुण्याचे एक मित्र म्हणाले, 'रामभाऊ, उद्या रविवार आहे. आपण रजनीशाचं प्रवचन ऐकायला जायचं का? गाडीने जाऊ.'

प्रसन्न झालेल्या देवाने 'वरं ब्रूहि' म्हणण्यापेक्षाही हे अधिक होते. मनातली इच्छा ओळखून 'तथास्तु' म्हणण्यासारखे होते हे. मी म्हटले,

'वा! जायचं म्हणजे काय? कितीतरी दिवसापासून माझ्या मनात आहे की आपण एकदा रजनीशांना पाहावं, म्हणजे त्यांचं "दर्शन" घ्यावं.'

आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ती दोघे आणि आम्ही दोघे अशी त्यांच्या गाडीने साडेसातच्या आत पोचायच्या बेताने निघालो. कारण बरोबर आठ वाजता प्रवचन सुरू होते.

कोरेगाव पार्क जसे जवळ येत गेले, तसा सगळा परिसर बदलत चालला. घरे विरळ होत चालली, हिरवळी आणि झाडी वाढत चालली. आणि आपण पुण्याच्या जवळपास आहो असे वाटेनाच.

लवकरच ब्लू डायमंड हॉटेलच्या शेजारी आम्ही 'भगवान रजनीश आश्रमा'च्या महाद्वारापाशी पोचलो. जवळजवळ पुरुषभर उंचीचे काळसर तपकिरी रंगाचे, चकाकणारे, चौकटीचौकटीचे दार होते. चौकोनाच्या प्रत्येक कोनावर सोंगट्यासारखे वर आलेले पितळेचे चकचकीत खिळे होते. दोन्ही बाजूला पहारेकऱ्यासाठी चौक्या होत्या. हा सगळा थाट पाहून आपण एखाद्या आध्यात्मिक आश्रमात जात नसून राजवाड्यात जात आहो असे वाटत होते. आम्ही गेल्यावर दार उघडले. आत प्रशस्त स्वच्छ आवार होते. तेवढ्यात एक गृहस्थ पुढे आले आणि म्हणाले,

'मे आय् हेल्प यू?'

आम्ही हातानेच नम्र नकार दर्शविला आणि पुढे चाललो. आजूबाजूला सगळीकडे लहानमोठ्या झाडाझुडुपांचे हिरवे रान होते. खाली हिरवळ पसरलेली होती. फुललेल्या पळसाच्या रंगाचे फिकट गडद भगवे ल्यालेल्या स्त्री-पुरुषांचे लहान-मोठे घोळके मधून-मधून दिसत होते. वसंत ऋतू आला म्हणजे आईन, किंजळ, साग, सावर ह्यांच्या रानांत मध्ये मध्ये मुळापासून शेंड्यापर्यंत भगवे-केशरी झालेले पळस दिसतात. कुठे एक-एक, दोन-दोन, तर कुठे पाच-पाच, सात-सात.

तसे दिसत होते. आम्ही पुढे पुढे जात चाललो तसे भगव्याचे प्रमाण वाढत चालले. कोणी कफनी, कोणी सदरा-पायजमा, कोणी पँट-बुशशर्ट पण सगळे भगवे किंवा भगव्यांच्याच छटा. स्त्रियादेखील मॅक्सी, परकर-ब्लाऊझ, साडी-ब्लाऊझ, टेरीन, कॉटन, रेशीम कसलाही वेष असला तरी त्याचा रंग भगवा. हे सगळे साधक-साधिका. आणि प्रत्येकाच्या गळ्यात तुळशीची माळ आणि तिच्या मधोमध रजनीशाच्या मुखवट्याचा फोटो असलेले लॉकेट. पोषाखाच्या कापडावरून गरिबी-श्रीमती (गरिबी नाहीच) ओळखू येत होती. गोऱ्या साधक-साधिकांच्या पोषाखाचे कापड मात्र अधिक साधे होते.

भारतीय साधक एकमेकाना भेटले की म्हणत,

'नमस्कार जी.'

'नमस्कार.'

'खूष ?'

'आपके राज में सब खूष.'

प्रवेशासाठी प्रत्येकी पाच रुपयांचे तिकीट होते. तिकिटे घेतली. आत जायला अजून थोडा अवकाश होता. दार उघडले नव्हते. म्हणून इकडेतिकडे पाहत हिंडू लागलो. तेवढ्यात काहीतरी संवाद ऐकू आला, म्हणून मी मागे वळून पाहिले.

'यह नही चलेगा.' एक भरदार, स्थूल भगवा दुसऱ्या तितक्याच स्थूल भगव्याला म्हणत होता. 'वा: ! यह कोई बात है ? पाच सौ रुपये आपने लिये हैं. मैं पाचसौ पूरे लूंगा. मै ऐसे सौ-सौ नही लूंगा.'

तो दुसरा भगवा त्याच्या बुशकोटाच्या खिशात एक शभराची नोट कोंबीत होता. त्यासंबंधीच ते बोलत होते.

'भई, अभी तो यह सौ ले लो. बाकीके बादमें दूंगा.'

'नई भई नई. यह अपना नोट ले लो.'

तो नोट खिशातून काढीत होता. आणि तो दुसरा ती परत खिशात कोंबीत होता.

हा खासगी आणि अनाध्यात्मिक व्यवहार आपण पाहणे बरे नाही, म्हणून मी मान वळवली. पण नोट बहुधा खिशात गेली असावी.

समोरून एक सुखवस्तू मध्यमवयस्क भगवे जोडपे येत होते. माझ्या मित्राने त्याची-माझी ओळख करून दिली. 'आपलं नाव ?' 'आपल ?' 'कुठं असता ?'

वा, वा !' 'ओळख झाली, फार आनद झाला.' ओळख झाली. ते दुसरीकडे गेले. माझे मित्र म्हणाले,

'फार मोठी असामी आहे. परवाच शेंगदाण्याच्या एका सौद्यात दोन मिनिटात पाच लाख रुपये मिळवले. रजनीशाचे मोठे एकनिष्ठ भक्त आहेत. त्याच्यावर रजनीशाचा फार लोभ आहे.'

आणखीही ओळखी झाल्या. डॉक्टर, एजिनियर, आर्किटेक्ट, बॅरिस्टर, कॉंट्रॅक्टर, व्यापारी. कोणाचीही प्राप्ती दरमहा दहाबारा हजाराच्या खाली नसेल.

'लवकरच इथ पलीकडे दोन हजार लोक बसतील असा अडरग्राउड ऑडि-टोरियम बाधणार आहो. ओ नो. मनी इज नो प्रॉब्लम. इट सिंप्ली पोअर्ज इन.' एक साधक सांगत होते.

एकाशी बोलता बोलता मी अरविंदांचा उल्लेख केला.

'छा, छा, छा, त्याच ते वेगळ आहे. आमच अगदी वेगळ. नाही, नाही, ते तसं सागता येणार नाही.'

काही वर्षांपूर्वी मी गुरुदेव रानड्यांच्या 'दर्शना'ला गेलो होतो. तेव्हाही असाच त्याच्या शिष्यांपाशी अरविंदांचा आणि रमण महर्षींचा उल्लेख केला होता. तेव्हाही असेच :

'छा, छा, छा, त्याच ते वेगळ आहे. आमच अगदी वेगळ.'

आणि त्याबरोबरच हातांनी खूणा करीत, 'अरविंद, रमण महर्षी वगैरे भोवतीभोवतीच फिरताहेत. आमच्या गुरुदेवानी थेट गाभ्यात प्रवेश केला आहे.' असा आशय दर्शवला. मनात आले, अरविंद-रमणांच्या शिष्याना विचारले तर तेही कदाचित असाच पण उलट्या रोखाने अभिप्राय व्यक्त करतील.

गुरूचे मोठेपण कोण जाणे, पण शिष्याची स्पर्धा मनात ठसण्यासारखी होती. रस्त्यापासून थोडीशी आत एक इमारत दिसत होती. तिच्या तळघरातून किंकाळ्या, चीत्कार, हूः हूः असे कानठळ्या बसवणारे, भेवडावणारे आवाज येत होते. जवळच एक देशी साधक होते. त्याना मी खुणेनेच 'हे काय आहे?' असे विचारले

पण तेवढ्यात आत जाण्याची वेळ होत आली. आणि आम्ही तिकडे निघालो. Lao Tsu House असे सुबक सोनेरी अक्षरात नाव लिहिलेले प्रवेशद्वार होते. त्यातून आत जाताना विकत घेतलेली तिकिटे परत करावी लागली.

आम्ही एका फरसबद पायवाटेने चाललो होतो. सगळीकडे फळझाडे, फुलझाडे ह्यांची अगदी गर्दी होती. मे महिना होता. पण जवळजवळ थंडी वाटावी इतके गार होते. पायवाटेच्या एका बाजूला बैठ्या खोल्या होत्या. त्याच्या उघड्या खिडक्यांतून आत दोऱ्यांवर वाळत घातलेल्या लगोट्या, लगोट, गर्जीफ्रॉक, चड्ड्या, परकर, काचोळ्या दिसत होत्या. सगळ्या भगव्या.

डावा-उजवा वळण घेत चाललो होतो. काही ठिकाणी झाडाच्या फांद्या जमिनीपर्यंत लवल्या होत्या. काही वाटेत आडव्या आल्या होत्या. त्या टाळीत, बाजूला सारीत, त्याना डोके घाशीत चाललो होतो. तेवढ्यात माझ्या कंबरेपाशी लाब, जाड, लोंबणारे काही तरी धासल्यासारखे लागले. थोडेसे घाबरूनच पाहिले. दोन-अडीज हात लाब, पडवळासारखी जाड, गर्द हिरवी शेवग्याची शेंग होती. भय गेले. पण मी थक्क झालो. शेतकी खात्याच्या भाजीपाल्याच्या प्रदर्शनातसुद्धा मी कधी एवढी मोठी राक्षसी शेवग्याची शेंग पाहिली नव्हती. आणखी पाहतो तर आणखी तशाच शेंगा जवळजवळ जमिनीपर्यंत लोंबत होत्या. कोण माळी असेल अशी बाग करणारा? असे मनाशी विचारतो आहे, तोच आम्ही Chuang Tsu सभामडपापाशी येऊन पोचलो.

दोन तृतीयांश वर्तुळाकार प्रशस्त मडप होता. मधोमध मागे भिंत आणि भिंतीला लागून अर्धगोलाकार संगमरवरी ओटा. अजून गर्दी झाली नव्हती. लोक हळूहळू येत होते. टेकून बसता यावे म्हणून मी कडेच्या एका खाबा-पाशी गेलो. त्याच्या एका अगाला एक गोरा साधक बसलेला होता. फिकट गोरा रंग, निळे डोळे, ताबूस-तपकिरी जटा आणि दाढीमिशा. रिकाम्या बाजूकडे बोट दाखवीत मी त्याला विचारले,

'इथ कोणी बसलंय का?'

त्याने खादे हलवल्यासारखे केले, आणि अतराळात दृष्टी लावलेलीच होती ती आणखी स्थिर केली. मुद्रा निर्विकार.

मी रिकाम्या बाजूला टेकून बसलो. एव्हाना आणखी लोक आले. पण मडप गच्च भरला नव्हता. मधून मधून मोकळ्या जागा होत्या. सांगणे कठीण आहे, पण एकंदरीत सिंधी, गुजराती, मारवाडी, पजाबी हेच जास्त होते. स्त्रिया-पुरुष सगळे भगवे. आमच्यासारखे बिनभगवे आणि मराठी थोडेच.

आठ वाजायला एखादे मिनिट असेल. मागल्या भिंतीच्या एका टोकाकडले

दार एका दरवानाने उघडले. लगेच भगवान रजनीश बाहेर आले. स्थूल मध्यम बांधा, निमगोरा वर्ण, प्रत्येक केस वेगळा विंचरलेला असावा अशी, छातीपर्यंत आलेली, तुकतुकीत काळी-पांढरी दाढी. मनगटापर्यंत आलेल्या सैल बाह्याची पायघोळ भगवी कफनी, हातात कागदाची गुडाळी, असे ते सावकाश पावले टाकीत येऊन तिथल्या सिंहासनासारख्या खुर्चीवर विराजमान झाले.

त्याच्या मागोमाग एक सडपातळ (हडकुळीच) बाई आली. अंगासरसे लपेटलेले भगवे वस्त्र. डोक्याला घट्ट बांधलेला भगवा रुमाल. फिकट गोरा रंग (तिथल्या बहुतेक सगळ्याच गोऱ्या साधक-साधिका फिकट आणि रोडच दिसल्या). त्या बाईने स्वच्छ आणि मधुर आवाजात काही प्राकृत श्लोक म्हटले आणि मागोमाग भगवान उवाच. आजचा विषय होता, 'अहिन्सा.'

दृष्ट द्रष्टव्य. पुष्कळ दिवसाची इच्छा पुरी झाली.

प्रवचनाला आरंभ झाल्यावर काही साधक, विशेषत. गोरे, पाय पसरून उताणे निजले. काही उपडे, काही कुशीवर, कोणी नुसतेच पाय पसरले, कोणी पद्मासन घातले, कोणी वीरासन, ज्याला जो प्रकार आवडेल त्याने तो पत्करावा. कुठे बाई पुरुषाच्या मांडीवर डोके ठेवून निजलेली, तर कुठे पुरुष बाईच्या मांडीवर. नजरेत एकप्रकारची धुंदी. बेपर्वाईच. मी चकितच झालो. (मग हे लोक इथे आले कशाला?) त्यातले कोणी घोरू लागतील की काय असे वाटले.

मघाशी विव्हळणे, किंकाळणे, हूहू:कार ऐकले होते. त्याबद्दल कळले की ते 'ध्याना'चे प्रकार होते. पहिला प्रकार म्हणजे शक्य तितक्या मोठ्याने सर्वांगाने 'हू' 'हू:' करून ओरडायचे. अगदी थकेपर्यंत, पण निदान अर्धा तास. सर्व वेळ मन भगवान रजनीशावर केंद्रित करायचे. त्यानतरचे प्रकार म्हणजे ओरडायचे, किंकाळ्या फोडायच्या, विव्हळायचे, शक्य तितक्या मोठ्याने, सर्वांगाने, थकेपर्यंत. निदान अर्धा तास. सर्व वेळ मनात ध्यान भगवान रजनीशाचे. असेच आणखीही प्रकार होते. अशी ध्याने केल्याने मनावरची सगळी दडपणे दूर होतात, मनातल्या सर्व ग्रंथी सुटतात, मुक्त होतात. ही साधना आहे. 'रिलॅक्स'. प्रवचनाच्या सभामंडपातले हे लोळणे, हातपाय पसरणे हाही 'रिलॅक्स'चाच—ध्यानाचाच—एक प्रकार असावा.

रजनीशांची बुद्धिमत्ता, विद्वत्ता, व्यासंग, वाचन ह्याबद्दल ऐकले होते. तेव्हा म्हटले त्यांची शब्दयोजना समर्पक आणि वेधक, वाणी स्वच्छ आणि आकर्षक असावी. पण प्रवचन चालू झाले आणि माझा विलक्षण अपेक्षाभंग झाला.

रजनीशाची वाणी सदोष होती. ते 'शास्त्र'चा उच्चार 'सास्त्र', 'जरा'चा संस्कृत 'जरा'सारखा (म्हणजे म्हातारपण), 'शांती'चा 'सान्ती', 'शब्द'चा 'सब्द', 'प्रकृती'चा 'प्रकर्ती' असा करीत होते. ते उच्चार मला ऐकवतच ना. किंबहुना काही वेळा त्याच्या अशा उच्चारामुळे ते काय म्हणत होते तेच मला कळत नव्हते. एखाद्या महाराष्ट्रीय प्रवचनकाराने असे उच्चार केले असते तर त्याला अडाणीच म्हटले असते. एखाद्या गाडगेबाबाने केले तर त्याचे नवल वाटत नाही. पण समजा, सोनोपत दांडेकरांनी केले तर? प्रवचनात बऱ्याच वेळा ते 'जीव का बद्ध अपनाही बद्ध होता है' असे सांगत होते. ते काय म्हणताहेत ते बराच वेळ मला कळेचना. मग संदर्भावरून एकाएकी कळले की 'जीवका वध अपनाही वध होता है' असे ते म्हणताहेत. दुसऱ्याचे वाईट करण्याचा विचार जरी मनात आला तरी ती हिंसाच. कोणाचेही वाईट चिंतिले तर ते आपल्यावरच उलटते. म्हणून कोणाचे वाईट चिंतू नये, इत्यादी इत्यादी.

उपदेश चांगलाच होता. जे कोणी इतपतही विचार करीत नसतील, किंवा ऐकत-वाचीत नसतील त्यांना तर फारच उपयुक्त होता. चित्रपटनिर्माते आपल्या प्रेक्षकांचे जे वय मनात धरून चित्रपट काढतात, तेच आपल्या श्रोत्यांचे वय समजून 'भगवाना'चा हा उपदेश चालला होता, एवढेच.

माझे काही त्या प्रवचनाकडे लक्ष लागेना. लोक वाटेल तसे आडवे तिडवे पडले होते तेही मला बघवेना. अशा प्रसंगी असे वागणे मला ओंगळ वाटले. भगवानांना कसे बघवते मला कळेना. कशासाठी आपण आलो आणि काय मिळाले?

पण भोवतालच्या झाडीने आणि वातावरणाने मात्र माझे लक्ष वेधून घेतले. वेगवेगळ्या झाडांच्या फांद्यांचे वेगवेगळे आकार आणि हिरवेच पण वेगवेगळे रंग. पाने-फांद्या एकमेकींत मिसळल्यामुळे त्यांना मिळून आलेले मोठे आकार आणि सगळ्याच झाडांच्या एकत्रित आकाराचा आवारात पसरलेला विस्तार. पिवळी, पांढरी, तांबडी, गुलाबी अशी कुठे एकेकटी तर कुठे गुच्छ बनून झाडावेलींना लगटलेली फुले. त्यांचा मंद संमिश्र सुगंध. कोकिळ-बुलबुल-साळुंक्या ह्यांचे गोड स्वर आणि ते फार गोड होऊ नयेत ह्यासाठी जणू व्यंजन म्हणून मधेच येणारे कावळ्यांचे 'काव काव'. मे महिन्यातली सकाळची आठ-साडेआठची वेळ, त्या उन्हाला तिथल्या झाडीने दिलेली हिरवी झाक (की हिरव्या प्रकाशाला

उन्हाने सोनेरी छटा दिली होती ?) सभामडपात येणारा प्रकाश हिरवा-सोनेरी होऊनच येत होता आणि तिथल्या भगव्याला एक झळाळी देत होता. त्या उजळ—प्रसन्न रंगगधांनी अवकाश आणि अत.करण अगदी भरून टाकले होते. प्रवचनासाठी नाही पण ह्यासाठी इथे पुन्हा यावे असे वाटले. आणि आल्याचे सार्थक झाले असेही वाटले.

भगवान म्हणत होते, 'ही माळ मी तुम्हाला कशासाठी देतो ? हे भगव कशासाठी ? हे लॉकेट कशासाठी ? प्रवचन संपत आले होते. 'हे भगवं सागत की तुम्ही संन्यासी झाला आहात. पण हा सन्यास म्हणजे सर्वसगपरित्याग नाही. तर संसारात राहून, आपल्या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडीत, विरक्त वृत्तीने राहायच. ही माळ आणि हे लॉकेट कशासाठी ? प्रत्येक कर्म करताना तुम्हांला माझी आठवण व्हावी, मी तुमच्या सन्निध आहे अस तुम्हाला वाटाव, आणि तुमच्या हातून कुकर्म होऊ नये ह्यासाठी.'

प्रवचनाच्या शेवटी रजनीशानी आशीर्वाद दिल्यासारखे दोन्ही हात वर केले आणि ते उठून ज्या दाराने बाहेर आले होते त्या दाराने आत गेले. ते बसले होते ती खुर्चीही त्याच्या मागोमाग त्याच दाराने आत नेण्यात आली.

लोकांची पागापाग होऊ लागली. काही निजलेले उठून चालू लागले. काही त्या अर्धगोलाकार ओट्याजवळ गेले. तिथे त्यानी ओट्याच्या पायथ्याशी खाली गुडघे आणि वर ओट्यावर डोकी टेकली आणि डोक्यापुढे ओट्याच्या फरशीवर हात लाब पसरले. 'त्वमेव शरण मम' म्हणत असावेत.

आम्ही परत निघालो. वाटेने पाहिले, तर गोऱ्या साधक-साधिका जातायेता एकमेकाच्या गळ्याभोवती नाहीतर कबरेभोवती हात घालीत जवळ ओढून मिठी मारीत, किंवा गालाची, ओठाची चुबने घेत आणि आपल्या वाटेने पुढे जात. नि.शब्दपणे, निर्विकार चेहऱ्यानी. पण नजरा कधीकधी धुद दिसत. काही मुग्या रांगेने एका दिशेने जात असतात, दुसऱ्या काही समोरून येत असतात. परस्परविरुद्ध दिशानी येणाऱ्या मुग्या एकमेकींच्या मिशा क्षणभर गुतवतात, सोडवतात आणि आपल्या वाटेने पुढे जाऊ लागतात, तसेच. अगस्पर्शातून परस्परांना एखादा गूढ सदेश देत असतील, कोणी सागावे !

मधूनमधून काही लतामडपातल्या शिलासनांवर तरुण गोरी जोडपी वाक् आणि अर्थ ह्यांच्याप्रमाणे एकरूप होऊन आत्मतुष्ट अशी बसलेली आहेत, दोघांचीही भावमथर दृष्टी खजुराहोच्या शिल्पांतल्या मिथुनाच्या दृष्टीप्रमाणे

परस्परात लीन झाली आहे, अशीही दृश्ये दिसत होती. 'हाही साधनेचाच प्रकार आहे काय?' असे विचारावेसे वाटले. पण कोणाला विचारायचे? प्रवचनाच्या सभामंडपात त्या साधकाने शिकवलेला धडा मी विसरलो नव्हतो. आणि नाहीतरी असा प्रश्न विचारणे थोडेसे अवघडच.

आश्रमात येणारे गोरे साधक सगळे सारखेच संपन्न नसतात असे दिसले. कारण एका ठिकाणी काही गोऱ्या साधक-साधिका भाज्या चिरणे, कणीक भिजविणे, डाळ-तांदूळ निवडणे अशी कामे करीत असताना दिसल्या.

आश्रमाच्या भव्य महाद्वारातून बाहेर पडलो तेव्हा प्रवचनाचा असा मनावर ठसा राहिला नव्हता, पण तिथला स्वच्छ विस्तीर्ण परिसर, प्रसन्न सोनेरी-हिरवा गारवा, मंद संमिश्र सुगंध आणि वसंत ऋतूमध्ये रानाच्या हिरव्या विस्तारात फुललेले भगवे पळस कुठे एक-एकटे कुठे समुदायाने दिसतात, तसे त्या आश्रमाच्या हिरव्या विस्तारात विखुरलेले साधकांचे भगवे समुदाय, ह्याचा ठसा मात्र खोल उमटला तो अजून तसाच आहे.

• १५ •

## 'थोडं मायेचं'

वसईच्या अलिकडल्या नायगाव स्टेशनावर आम्ही उतरलो आणि खाली मैदानात येऊन बससाठी रांगेत उभे राहिलो. आमच्या पुढे पाचपचवीस लोक उभे होते. तसेच मागेही येऊन उभे राहिले. लांब पश्चिमेकडे दृष्टी गेली. सूर्य मावळला नव्हता; पण पश्चिमेकडे कलला होता. त्यामुळे उन्हाला सोनेरी झळाळी आली होती. श्रावणमासाचा भर होता. 'श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे' ह्या बालकवींच्या ओळींची आठवण व्हावी, असेच सगळीकडे हिरवे-हिरवे होते. गवत, वेली, झुडपे, झाडे आणि अधूनमधून त्यावर दिसणारी पिवळी-तांबडी लहानमोठी फुले.

आम्हाला घ्यायला श्री० वेन्सी डिमेलो आलेले होते ते आमच्याबरोबर होते. बसच्या रांगेत, बसमध्ये चढल्यावर, आमच्याकडे पाहून लोक डिमेलोंना खुणेने विचारीत : 'पाहुणे कोण ?' बसने जाणारे सगळे एका गावचे. सगळे एकमेकांना ओळखणारे. आम्हीच तेवढे परके. डिमेलो सांगत, 'उद्या पापडीला "सुवार्ता"च्या लेखकाचा मेळावा आहे, त्यासाठी आले आहेत मुंबईहून.'

स्टेशनाकडून निघालेली बस नायगाव कोळीवाड्यातून जाऊन पुढे पालीबंदर स्टॉपवर थांबली. आम्ही तिथे उतरलो. श्री० डिमेलो, माझी पत्नी आणि मी. दहावीस पावले चालून गेल्यावर श्री० डिमेलो एका घराकडे वळले आणि फाटक उघडून पुढे झाले. त्यांच्या मागोमाग जाताना माझे लक्ष वर गेले. घराचे नाव 'स्नेहालय'! 'स्नेह' आणि 'आलय' हे शब्द काही हिंदूंच्याच मालकीचे नव्हेत की ते इतर धर्मांच्या लोकांनी वापरू नयेत. पण तसे वापरल्याचे सहसा दिसत नाही. डिमेलोंच्या घराचे नाव 'व्हिला डिमेलो' किंवा 'डिमेलो कॉटेज' असते तर नवल वाटले नसते; पण 'स्नेहालय' नाव पाहून नवल वाटले. तसेच आतल्या आत आनंददेखील वाटला.

वसईचे ख्रिस्ती म्हणजे गोव्याचे ख्रिस्ती नव्हेत, हे मला ठाऊक होते. गोव्यातल्या ख्रिस्त्यांपैकी बरेच लोक अजून मनाने तरी पोर्तुगीज राजवटीतून बाहेर आलेले नाहीत, आणि आपण भारतीय झालो हे काहीतरी चमत्कारिक घडले असे त्यांना वाटत असावेसे दिसते. पण वसईचे ख्रिस्ती पोर्तुगीज जोखडातून

अडीचशे वर्षांपूर्वीच सुटले आणि वसई प्रांत इंग्रजाकडे आल्यानंतर वसईतल्या इतर महाराष्ट्रीयांप्रमाणे ते ब्रिटिश सरकारची प्रजा झाले. आणि इतर महाराष्ट्रीयांप्रमाणेच त्यांनी मराठी ही आपली भाषा मानली आणि राखली, असे मी ऐकत होतो. त्याचा प्रत्यय मला 'स्नेहालय' हे नाव पाहून आला.

आम्ही पायऱ्या चढून ओटीवर जाऊन बसलो. थोड्या वेळाने एक बारा-चवदा वर्षांची मुलगी बाहेर आली. आपले नाव सांगून, नमस्कार करून शेजारच्या खुर्चीवर बसली. थोड्या वेळाने आत गेली. पुढे काहीच घडेना.

फादर फ्रान्सिस दिब्रिटो ह्यांनी जेव्हा मला 'सुवार्ता'च्या लेखकांच्या मेळाव्यासाठी वसईला येण्याचे आमंत्रण केले, तेव्हा आमंत्रण तर मी आनंदाने स्वीकारले, पण त्यांना म्हटले,

मी आणि माझी पत्नी आम्ही दोघही येऊ. पण आमची दोघांचीही इच्छा एक रात्र एखाद्या ख्रिस्ती कुटुंबात राहावे अशी आहे. अशी संधी आम्हाला एरव्ही मिळायची नाही.'

फादर दिब्रिटो जराही न थांबता म्हणाले,

'हे सहज होईल.'

डिमेलोंच्या घरी आलो तेव्हा आम्हाला वाटले, आमची राहायची व्यवस्था ज्या कुटुंबात व्हायची ते हेच. पण आम्हाला आल्याला दहा-पंधरा-पंचवीस मिनिटे झाली तरी आम्हांला कोणी 'ही तुमची खोली. कपडे-बिपडे बदलायचे असले तर बदला. हातपाय धुवा.' असे म्हटले नाही. आम्ही थोडे अस्वस्थ होऊ लागलो.

तेवढ्यात वेन्सींचे बंधू आले आणि आमच्याशी अगदी जुनी ओळख असल्याप्रमाणे बोलू लागले, ते सरळ राजकीय-सामाजिक प्रश्नांवर. त्यांच्या बोलण्यात खांडेकर, फडके, पेंडसे, जयवंत दळवी ह्यांच्या कादंबऱ्यांचे, साने गुरुजींचे, संदर्भ येऊ लागले. 'साधना' साप्ताहिकही आले. आणि भाषा तुम्ही-आम्ही बोलतो ती—तशी. मी एखाद्या ख्रिस्ती माणसाशी बोलतो आहे की पुण्या-मुंबईच्या सुशिक्षित हिंदूशी (ब्राह्मणाशी म्हणायलाही हरकत नाही) असा मला संभ्रम झाला. त्यांचे बोलणे ऐकल्यावर मग फादर एलायस रॉड्रिग्ज ह्यांनी यूरोपमधल्या ख्रिस्ती पवित्र स्थानांच्या केलेल्या आपल्या प्रवासवर्णनात ज्ञानेश्वर-तुकाराम ह्यांची वचने सहजपणे वापरल्याचे किंवा मंगळसूत्राची उपमा दिल्याचे आश्चर्य वाटले नाही.

वेन्सींनी आम्हाला आपले घर दाखवले. ओटीवरच्या दारातून आत गेले की मध्ये वाट, आणि उजवीकडे एक खोली एवढी मोकळी जागा. घरात घेण्याजोगे कोणी भेटीला आले तर त्यांनी इथे बसायचे मधल्या वाटेच्या समोरच्या टोकाला परसात जायचे दार. आणि वाटेच्या दोन्ही अंगाना खोल्या. मधल्या वाटेच्या आरंभीच उंचावर देव्हारा (अल्तार) होता. त्यात 'माउली'ची सुबक मूर्ती होती. आणि वर लहानसा विजेचा नंदादीप.

पण आम्ही घर पाहायला आत गेलो त्याच्या आधी घरातली बायकामंडळी —आई-सुना-मुली—आम्हाला सामोरी आली. त्यांनी आम्हाला नमस्कार केला. आमची परस्परओळख करून देण्यात आली. त्यांच्यापैकी दोन तरुण स्त्रिया (बहुधा आमच्याच गाडीने) मुबईहून नोकरीवरून आल्या होत्या. लग्न न झालेल्या आणि झालेल्याही तरुण शिकलेल्या स्त्रिया मुबईला नोकरीला जातात. कोणी शिक्षिका, कोणी कारकून. आलेल्या पाहुण्याची घरातल्या माणसाशी—बायकांशीसुद्धा—ओळख करून देण्याची ही पद्धत मला आपल्यापेक्षा वेगळी वाटली. आईंनी आमची विचारपूसही केली.

थोड्या वेळाने 'काप्या' शहाळ्याचे पाणी, बिस्किटे, फळे वगैरे खाणे झाले. भोवती फिरून आवार पाहिले. परसात पागारा, आंबा वगैरे झाडे होती. भाजीच्या वेली होत्या. अळू होते. आवार पाहून झाल्यावर वेन्सी म्हणाले,

'आपल्याला आता दुसरीकडे जायचय.'

म्हणजे फादर दिब्रिटोंनी आमची सोय केली ती इथे नव्हे तर !

बाहेर पडल्यावर वाटेने जाता जाता लांब शेतात झाडीत एक दुमजली बंगला दिसला. आणि रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला एका आवारात एक मसजिद.

'हा बंगला इथल्या काजीचा. गुजरातच्या सुलतानाच्या वेळचा आहे असं म्हणतात. (असेल-नसेल, पण जुना आणि वेगळा दिसत होता खरा ) वसईत मुसलमान अगदी थोडे आहेत. त्या सगळ्याचे हे काजी.'

आम्ही रस्ता सोडून पायवाटेला लागलो. दोन्ही बाजूना शेती होती. त्यात भाताच्या लावण्या चाललेल्या होत्या. आमच्याकडे पाहून लोक—बायका-पुरुष—तोच प्रश्न विचारीत, 'कुठले पाव्हणे ? कुठं चालले ?'

उत्तर तेच, 'मुबईचे.' पण त्यात आता भर पडली, 'तवारीसकडे चाललो.'

शेताच्या पलीकडे दोहो बाजूना पावसाचे पाणी पिऊन जड झालेली गर्द काळसर झाडी. कधी ती वाटेच्या अगदी अंगावर झेपावल्यासारखी जवळ येई

तर कधी लाब जाई. सगळीकडे 'हिरवी शेते, हिरवे रान' असे दृश्य होते. हिरव्याच्याच असंख्य छटा.

दोहो बाजूना शेते असली तर त्याच्यामधली मेर होऊन, जवळ आलेली कुंपणे असली तर त्याच्यामधली पाणद होऊन आणि घरे आली तर बोळ होऊन वाट पुढे पुढे गेली होती आणि त्या वाटेने आम्ही दोघे वेन्सींच्या मागून चालल्लो होतो.

मध्येच एखाद्या ठिकाणी शेतांच्या पलीकडे, झाडांच्या अंधारलेल्या गर्दीत, तीस-चाळीस हात व्यासाचे, वरपर्यंत पाणी आलेले, किंचित् अंधारलेले, थोडीबहुत भीतीच वाटावी असे तळे दिसे. एकदा आमचे तिकडे लक्ष गेलेले पाहून वेन्सी म्हणाले,

'ही बावखळ आहे. ती बांधलेली विहीर नाही. हिला पावसाळ्यात वरपर्यंत पाणी असते. इथं बायका धुणी धुतात. अंग धुतात.'

तिथली ती निर्जनता, ती झाडाची गर्दी, त्यानी दिलेला आडोसा पाहून माझ्या मनात आले, विवाहपूर्व आणि विवाहबाह्य प्रणयचचला लीला करण्याला आमंत्रण करणारीच ही ठिकाणं आहेत. कायतान दोडतींच्या गोष्टीतल्याप्रमाणे एखादा आडदांड तरुण सालस, सुंदर तरुणीवर हात टाकण्याला इथे सहज प्रवृत्त होईल.

अंधार वाढत चालला होता. रस्ता नीट दिसेनासा होऊ लागला होता. वेन्सींवर लक्ष ठेवून आम्ही त्याच्या मागे चालल्लो होतो. मध्येच पाच-दहा घरे लागली. त्याच्यामधून डावे-उजवे करीत आम्ही ऑगुस्तीन तवारीस ह्याच्या घरापाशी आलो. एव्हाना सात वाजले होते. तसे आम्ही फार चालल्लो नव्हतो, पण अनोळखी वाट, श्रावणातली ढगाळ अंधारी संध्याकाळ, आणि वाटेने आम्हीच तिघे, त्यामुळे पुष्कळ चालल्लो आणि खूप उशीर झाला असे वाटले.

तवारीसाचे घर अधिक मोठे होते. अधिक संपन्न, सुखवस्तू दिसत होते. आम्ही आल्याचे वेन्सींनी कळवले आणि श्री० तवारीसनी आम्हाला एकदम आतल्या बैठकीतच नेले. तिथे मऊ गाद्यांचा ऐसपैस सोफासेट होता. मध्ये प्रशस्त बैठे टेबल होते. एका बाजूला रेडियोग्रॅम आणि रेकॉर्ड-प्लेअर होता. मधल्या वाटेच्या कोपऱ्यावरचा 'अल्तार'ही थोडा मोठा आणि कलाकुसरीचा होता.

इथे आमचा रात्रीचा मुक्काम ठरवलेला असावा असे मी मनाशी म्हटले.

आम्ही बसल्या जागी स्थिरावतो तेवढ्यात तवारीस बंधूंच्या बायका आणि आई पुढे आल्या. डिमेलोंच्या घरच्याप्रमाणेच परस्परओळख करून देण्यात आली. नतर सुना आत गेल्या. सगळ्या एस० एस० सी० झालेल्या. सगळ्या मुंबईत नोकरी करणाऱ्या. बहुधा आमच्याच किंवा नतरच्या गाडीने आलेल्या असाव्यात. नीटस, शालीन, बोलायला मोकळ्या. नतर डिमेलोंच्या घरच्या-सारखेच शहाळ्याचे पाणी आले.

आई आमच्याशी बोलत राहिल्या. 'मुल किती? एकच? मुलगी? लग्न झाल? तिला मुल काय? दोन मुलीच? असो. (वर पाहून) देवाची मर्जी! सगळी बरी आहेत ना? माझ्या सुना मुबईला नोकरीवर जातात. त्याची मुल दिवसभर माझ्या ताब्यात. त्याच्या मागे धावतापळता माझी कबर मोडते. पण काय करायच? चालल आहे. बरं, बसा.' असे म्हणून त्या आत गेल्या. तवारीस बधूपैकी एक जवळच होते ते म्हणाले, 'आता खर्च वाढत चालले. स्टॅंडर्डही वाढलं. मुली शिकू लागल्या त्या आता नोकरी करतात.'

एव्हाना अर्धा-एक तास गेला. आम्हाला थकवा आला असेल हे ओळखून त्यानी आम्हाला थोडी विश्रांती घ्यायला सागितले.

आरभी तवारीस बधूशी थोडे औपचारिक बोलणे झाले. पण डिमेलोंच्या घरच्यासारखे साहित्य-समाजकारण वगैरे त्यात नव्हते. शेवटी फादर दिब्रिटो आले तेव्हा रात्रीचे नऊ वाजून गेले होते.

'चला, जेवायच झालय. तुम्ही कटाळला असाल,' श्री० तवारीस म्हणाले.

घराची तीच रचना. 'स्नेहालया'सारखी. मध्ये वाट. डाव्या-उजव्या अंगाना खोल्या. डावीकडची शेवटची प्रशस्त खोली स्वयपाकाची. तिथेच लांबरुद टेबलावर पाढऱ्या स्वच्छ प्लेट्स्मध्ये भात, भाकरी, तीनचार भाज्या, काकडी-कांद्याचे काप, पापड, लोणची अशा वस्तू ठेवलेल्या होत्या. फादर दिब्रिटो आणि आम्ही दोघे अशी तिथेच जेवायला लागलो. ऑगुस्तीन तवारीस माझ्या शेजारी नुसतेच बसले होते. दुसरे दोघे भाऊ, बायकामडळी आमच्याकडे लक्ष ठेवून उभी होती. आईही वडीलपणाने देखरेख करीत होत्या.

आम्हाला शाकाहारी आणि बिनतिखटाचे जेवण पाहिजे असं आम्ही आधीच फादर दिब्रिटोंना सांगून ठेवले होते. तसेच होते. साधे पण रुचकर. मी ऑगुस्तीनना विचारले,

'तुम्ही जेवणार नाही का आमच्याबरोबर?'

ते म्हणाले, 'तुम्ही जेवून घ्या, तुम्हाला दुसरीकडे जायचय. आम्ही मागून जेवू सावकाश.'

जेवता जेवता मी कुतूहल म्हणून त्याना हळूच विचारले, 'असं टेबलावर जेवण्याची पद्धत तुमच्याकडे पहिल्यापासूनच आहे का? आमच्यात अलीकडे आली.'

'छे हो,' ते म्हणाले 'आमचही तुमच्यासारखच आहे. पूर्वी आम्हीही तुमच्यासारखेच पाटावर बसून जेवीत होतो. जेवायला केळीची पानं. घरोघरी केळी आहेत ना? आणि पूर्वी आमच्याकडे सासूसमोर बायका पुरुषाशी बोलत नसत. तिच्यासमोर बसत नसत. सासू बोलल्याखेरीज बोलत नसत. पुरुषाच्या मागून जेवीत असत. पोर्तुगीजांनी आम्हाला युरोपिअन करण्याचा प्रयत्न केला नाही. आमचे वडील, आजोबा धोतर, सदरा, कोट, टोपी असा पोषाख करीत

तुमच्यासारखंच सगळं. आता परिस्थिती बदलत चाललीय. मुली शिकू लागल्या. नोकऱ्या करू लागल्या. तेव्हा पूर्वीच्या चालीरीती पण जात चालल्या —तुमच्यातही नाही का? हा सगळा स्वयपाक बायकांनी मुंबईहून कामावरून आल्यावर केला.'

हे सगळे एका दमात नाही. बोलण्याबोलण्यात आले. जेवण संपत आले होते. 'हे घ्या, ते घ्या.' चाललेच होते. उठायची वेळ आली तेव्हा आई म्हणाल्या,

'ही खीर घ्या थोडी आणखी.'

'खरच नको.'

'एवढा एक चमचा घ्या. थोड मायेच.'

'थोड मायेचं!'

श्री० ऑगुस्तीन म्हणाले, 'मायेच म्हणजे "आग्रहाच" बर का!'

मला 'मायेच' शब्द छान वाटला. आग्रहात नाही म्हटले तरी थोडी जबरदस्ती असते. 'मायेच घ्या'मध्ये आर्जव आहे. आळवणी आहे.

मी म्हटले, 'बर "मायेच" म्हणता तर घेतो पण तेवढा एकच चमचा.' आणि मी ती 'मायेची' खीर खाल्ली.

त्या वेळी मला एक फार जुनी गोष्ट आठवली. स्वातंत्र्यापूर्वीची. मोतीलाल नेहरूंचे जावई रणजित पंडित वायव्य सरहद्द प्रांतात गेले होते. तिथे एका पठाण गृहस्थांनी त्याना जेवायला बोलावले, आणि त्याच्यापुढे मोठी परातभर

पुलावाचा डोंगर ठेवला. आणि जेवता-जेवता ते पंडितांना म्हणाले,

'हा सगळा तुम्ही खाऊन संपवला पाहिजे.'

पडित म्हणाले, 'अहो माझ्या देहाकडे पाहा, हे कस शक्य आहे?'

'ते काही नाही. तुम्ही हा खाल्ला नाहील तर तो तुम्हाला आवडला नाही असं होईल. आणि माझा आग्रह मानला नाहीत म्हणून माझा अपमान होईल. मी तुम्हाला गोळी घालीन.'

पडितानी कशीबशी आपली सुटका करून घेतली. तो 'आग्रह' कुठे आणि हे 'थोड मायेच' कुठे!

जेवणे झाल्यावर आम्ही बाहेर पडलो तेव्हा रात्रीचे दहा वाजून गेले होते. अधार किट्ट पडला होता. घराघरांतून दिवे होते, पण बाहेर रस्त्यावर नव्हते. पायाखाली वाट आहे की नाही तेही कळत नव्हते. फादर दिब्रिटो पुढे चालले होते. आणि त्याच्या पाढऱ्या पोषाखाच्या मागोमाग आम्ही. जाता जाता दिब्रिटो म्हणाले, 'आता आपण मि० विल्यम नरोन्हांच्या घरी जातो आहो. तिथ तुमची रात्रीच्या मुक्कामाची व्यवस्था केली आहे.'

एवढे बोलणे होत आहे तो आम्ही एका प्रशस्त आवाराच्या फाटकाशी आलो. आवारात विजेचा झगझगीत दिवा होता. डावीकडे एक दुमजली घर दिसत होते आणि समोर आत पसरट असे एकमजली आम्ही फाटकाशी आलो तो एक घनगर्जित अल्सेशन भुकणे आमच्या कानावर आले आणि आम्ही जागच्या जागी थबकलो.

कुत्रा आणि कुत्र्याच्या मागोमाग मि० नरोन्हा आमच्या दिशेने पुढे आले. त्यानी आम्हाला त्या दुमजली घराच्या दिवाणखान्यात नेले. खोलीत गेल्यावर मी थक्कच झालो. घर म्हणजे राजवाडा नव्हता; पण थाट श्रीमती, आलीशान, होता. उजव्या हाताकडल्या सबंध भिंतीवर एक जगलाचा उन्हाने प्रकाशलेला देखावा रगवलेला होता. आकाशापर्यंत पोचलेली गर्द हिरव्या पानाची उच-उच झाडे आणि त्यामधून दगडाळ-खडकाळ पात्रातून आपल्याकडे वाहत येणारा फेसाळ ओढा. मी पाहतच राहिलो. दिवाणखान्यात बसून मी खरोखरीचे जगल पाहत आहे असे वाटत होते. इतके वास्तवदर्शी. मि० नरोन्हा म्हणाले, 'तो वॉलपेपर आहे त्याचे तीन भाग आहेत. बेमालुम चिकटवले आहेत. माझा भाऊ दुबईला असतो, त्याच घर आहे हे त्यानच तो आणला.'

समोरच्या भिंतीवर पुरुषभर उंचीची शोकेस. त्यात चिनी मातीची-काचेची भांडी, निरनिराळ्या प्रकारच्या सुबक वस्तू ठेवलेल्या होत्या. टेबलांना, दाराच्या झडपांना एकाच डिझाइनचे सनमायका लावलेले. वर आमच्या खोलीकडे जातो तो जिन्याच्या पायऱ्यांना संगमरवरी लाद्या. आम्हाला निजण्यासाठी दिलेली खोली मुलांच्या अभ्यासाची खोली होती. पलंगावर वीतभर जाडीच्या रबर फोमच्या गाद्या. वर मच्छरदाण्या. टेबलावर, भिंतींवर, छताला दिवे. टेबलावरच्या प्रसाधनवस्तू सगळ्या फ्रेंच किंवा अमेरिकन. न्हाणीघर, शौचकूप ह्यांतल्या लाद्या, पुरुषभर उंचीपर्यंत टाइल्स, तोट्या, फवारे, बेसिन्स सगळे उत्कृष्ट, अव्वल दर्ज्याचे. 'फर्स्ट क्लास' अतिथिगृहात काय असेल असे सर्व होते. हे एवढे सुख आपल्याला मानवेल की नाही असे मनात आले.

आमची सगळी सोय लागल्यावर फादर दिब्रिटो म्हणाले, 'मी आता पापडीला जातो. तिथे पहाटे माझ्या हातून मिस्सा विधी होणार आहे. सकाळी सव्वाआठ वाजता पालीच्या चर्चमध्येही मीच मिस्सा विधी करणार आहे. तिथं तुम्ही यायचं. मि० नरोन्हा तुम्हाला घेऊन येतील.'

दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसातपर्यंत आम्ही स्नान, न्याहारी वगैरे सकाळची कामे आटोपली. बरोबर आठ वाजता मि० नरोन्हांनी आपल्या गाडीने आम्हाला पालीच्या चर्चच्या फाटकापाशी सोडले. काल संध्याकाळी आम्ही हे चर्च उभ्याउभ्या पाहिले होते. फादर दिब्रिटोच आम्हाला सामोरे आले. सगळा मिस्सा विधी आम्हाला चांगला जवळून पाहता यावा म्हणून त्यांनी आम्हाला व्हेस्ट्रीत पहिल्या रांगेत बसवले.

थोड्याच वेळात धर्मगुरूंची खास वस्त्रे चढवून ते वेदीपाशी आले. सगळे वातावरण शांत गंभीर झाले. सकाळचे सोनेरी ऊन चर्चच्या पडवीत आणि आतही शिरले होते. प्रत्यक्ष उपासनेला प्रारंभ करण्यापूर्वी फादर दिब्रिटो म्हणाले,

'मुंबईचे सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक रा० भि० जोशी आणि त्यांच्या पत्नी सौ० सुधाताई आज आपल्यामध्ये पाहुणे आलेले आहेत. त्यांचं मी आपल्या धर्मग्रामाच्या वतीने मनःपूर्वक स्वागत करतो.'

त्यांच्या तोंडून आमची नावे निघाल्याबरोबर आम्ही चकितच झालो. संकोचलो. आणि हेलावलोही. हा आमचा केवढा मान होता! तसे आम्ही त्या

लोकाच्या दृष्टीने कोण होतो ? आमच्या आजूबाजूला बसलेले लोक आमच्या-कडे पाहू लागले. त्यामुळे आमच्या अस्तित्वाची आम्हाला अधिकच जाणीव झाली. आम्ही नुसती ख्रिस्ती कुटुंबात राहायची इच्छा व्यक्त केली होती. ती तर फादर दिब्रिटोंनी पुरी केलीच; पण आम्हाला त्यांच्या धर्मजीवनातही सामावून घेतले. ह्या सर्व प्रकारामुळे आम्हाला आमची मने सावरायला काही क्षण लागले.

एव्हाना विधी सुरू झाला होता. सगळा विधी शुद्ध मराठी भाषेत चालला होता. काही प्रार्थना पुटपुटल्यासारख्या म्हणायच्या असत. त्या वेळी सबंध चर्चमध्ये हलका-मंद कुजबुजल्यासारखा आवाज भरे. उंच स्वरात गीते होत तेव्हा पुरुषांचा गंभीर, आणि स्त्रियांचा उच, स्वच्छ, अशा दुहेरी स्वरमेळाने सबंध चर्च निनादत असे. आणि गीत संपल्याबरोबर पुन्हा सर्व शांत, निःशब्द अशा वातावरणाचा म्हणून एक परिणाम असतो तो जाणवत होता.

मिस्साचा विधी जवळजवळ तासभर चालला होता. त्यात अनेक टप्पे होते. फादर दिब्रिटोंना मदत करण्यासाठी विशिष्ट पोषाख केलेले चारसहा मुलगे होते. ते वेळोवेळी लागतील त्या वस्तू वेदीवर आणून ठेवीत आणि ज्यांचे काम झाले त्या उचलून नेत. सगळ्या हालचाली शांत, नेटक्या, पद्धतशीरपणे चालल्या होत्या. सगळा वेळभर तिथले गांभीर्य मनात खोलवर शिरत होते.

विधी चालला असताना मी चर्च पाहत होतो. पालीचे हे चर्च देवमाता मरियेचे आहे. आणि वसई प्रांतावर पोर्तुगीजांचा अंमल बसल्यानंतर पन्नास-साठ वर्षांत वसई प्रांतात जी चर्चे निर्माण झाली त्यापैकी एक, म्हणजे जवळजवळ चारशे वर्षांचे जुने आहे. आजची वास्तू त्या वेळची नाही. मध्ये वादळे आली, पडझड झाली. एकदा तर मरिया मातेची मूर्ती स्थानावरून सरकून अधांतरी ओळंबून राहिली. पण वास्तू त्या वेळची नसली तरी चर्च जुने आहे. म्हणजे धर्मग्राम जुने आहे.

ह्या चर्चने अशी वादळे-वावटळी पाहिल्या तसे काही संघर्षही पाहिले. वसईचे ख्रिस्ती कॅथलिक असले आणि त्यांची नावे, आडनावे पोर्तुगीज असली, आणि ते पोर्तुगीज राजवटीतच ख्रिस्ती झालेले असले तरी ते स्वतःला पोर्तुगीज ख्रिस्ती समजत नाहीत. वसई प्रांत इंग्रजांच्या अमलाखाली आल्यावरसुद्धा त्या प्रांताचे धर्मगुरू पोर्तुगीज राजांकडून नेमले जात हे वसईकरांना पसंत नव्हते. पोर्तुगीजांची धार्मिक सत्ता त्यांना नको होती. ती झुगारून देण्यासाठी त्यांनी

जवळजवळ शंभर वर्षे लढा दिला. त्यात पाली आणि पापडी ह्या दोन धर्मग्रामांनी पोर्तुगीज धर्मगुरूंना नको जीव केले होते. अखेर वसईकर ख्रिस्त्यांनी लढा जिंकला. पोर्तुगालमधून धर्मगुरू नेमणे बंद झाले.—असे हे पालीचे चर्च.

माझे मन इतिहासात गेले होते. दृष्टी मरिया मातेच्या, प्रभावळीने प्रकाशित झालेल्या, सुंदर प्रसन्न मूर्तीवरून फिरत होती. मिस्सा विधी संपत आला होता. 'ही भाकरी माझं शरीर आहे. आणि हा द्राक्षरस माझं रक्त आहे. ह्याच तुम्ही सेवन केल्यानं माझ्यात तुम्ही आणि तुमच्यात मी असे एकरूप झालो.' असे म्हणून फादर दिब्रिटोंनी वेदीवरच्या प्लेटमध्ये ठेवलेला पवित्रीकृत भाकरीचा तुकडा खाल्ला आणि छोट्या पेल्यातल्या द्राक्षरसाचा घोट घेतला. आणि शेवटची छोटी प्रार्थना करून विधी संपवला.

पकडला जाण्यापूर्वी आपल्या शिष्यासमवेत येशू ख्रिस्ताने भोजन केले. त्या वेळी, दोन हजार वर्षांपूर्वी, त्याने उच्चारलेले हे शब्द. त्या प्रसंगाशी दुवा जोडणारे. विधी संपला. गोंगाट नाही. आरडाओरडा नाही. सर्व लोक शांतपणे बाहेर पडले.

विधी संपल्यावर आपला खास पोषाख उतरवून फादर दिब्रिटो आमच्याकडे आले. चर्चच्या आवारात ठिकठिकाणी थडग्यावर शिलालेखाच्या लाद्या बसव-लेल्या होत्या. त्यांच्यामधल्या आणि आवारातल्या मोकळ्या जागेत जांभळ्या, तांबड्या, गुलाबी तेरड्याची गच्च गर्दी झाली होती. सगळे आवार रंगमय झाले होते. त्यातून वाट काढीत फादर दिब्रिटोंनी आम्हांला चर्चच्या मागल्या बाजूला नेले. लांब पश्चिमेकडे आभाळाच्या करड्या-निळ्या भुईवर वसईच्या किल्ल्याची काळी आकृती दिसत होती. एकेकाळी त्या किल्ल्याचा ह्या चर्चशी किती जवळचा संबंध होता. आता किल्ला हे नुसते उद्ध्वस्त स्मारक आहे तर चर्च अजून जिवंत आहे!

तिथून आम्ही वसईच्या उत्तरेकडे फादर दिब्रिटोंच्या गावाला जायला निघालो. आदल्या संध्याकाळी पाली-वडवली भागात जशी सगळीकडे शेते-झाडे दिसत होती, तशीच आता वसईची वस्ती मागे टाकल्यावर दिसू लागली. जिकडे दृष्टी वळवावी तिकडे हिरवेच हिरवे होते. शेती, वाड्या, मळे, झाडी. कुठे दाट, कुठे विरळ. कुठे जमेल तशी पुंजके करून उभी, तर कुठे आखून-रेखून. त्यातूनच लहान-मोठी, जुनी-नवी, झाडांनी वेढलेली, तांबड्या-काळ्या कौलारू छपराची,

पिवळ्यापाढऱ्या रंगाची घरे दिसत. आधी घरे दिसू लागावी. मग बाजारपेठ. ती मागे पडली की ते गाव संपून पुन्हा झाडी. केरळातून समुद्रकिनाऱ्याने जाताना असेच दृश्य दिसले होते पण तिथली हिरवी गर्दी माडाची तर इथली इतर झाडाची. ह्या सगळ्या हिरव्या विस्तारावर आता लख्ख ऊन पडले होते. पण कधी तो काळ्या ढगानी झाकळून जात असेल. कधी त्यावर पाऊस सहस्र धारानी कोसळत असेल, तर कधी हळुवार उतरत असेल. पण सर्व वेळी हे दृश्य रमणीयच दिसत असेल.

एकामागून एक गावे मागे पडत होती. मी आपला कुतूहल म्हणून त्यांची नावे विचारीत होतो मध्येच नाव ऐकले, 'तर्खड'. दादोबा पांडुरंगाचे मूळ गाव ! कोणीतरी नात्याचे भेटल्यासारखे वाटले. आणि गाव मागे पडले तरी वळून वळून पाहत होतो.

फादर दिब्रिटोंच्या घरी गेलो तेव्हा जुन्या पिढीतल्या ख्रिस्ती लोकाच्या राहणीसंबंधी ऑगुस्तीन तवारिसानी जे सांगितले होते त्याचा प्रत्यय आला. फादर दिब्रिटोंच्या वडीलबंधूचा—पास्कोल दिब्रिटोंचा—पोषाख धोतर, सदरा, टोपी असाच होता. बायकाही पाचवारी साड्या नाही तर जेमतेम पोटऱ्यापर्यंत पोचणारी कासोट्याची रुंद काठांची तांबडी लुगडी नेसल्या होत्या. वसईतल्या रस्त्यावर अशीच लुगडी नेसलेल्या प्रौढ ख्रिस्ती स्त्रिया दिसल्या होत्या. जणू काही तो युनिफॉर्मच होता.

दिब्रिटोंकडला पाहुणचार घेऊन नरोन्हाकडे परत येतो तो जेवण तयारच होते. जेवणाचा बेत तवारीसच्या घरच्यासारखाच होता. पण भाज्या, चटण्या थोड्या वेगळ्या. इथेही जेवणाच्या शेवटी 'थोड मायेचं' घ्यावे लागलेच.

काल रात्री फार उशीर झाला होता, त्यामुळे घरातल्या सगळ्यांची ओळख झाली नव्हती. सकाळपासून आम्ही बाहेरच होतो. ती आता करून देण्यात आली. ह्याही घरातल्या तरुण शिकलेल्या सुना-मुली मुंबईला नोकरीला जातात. आणखी विशेष म्हणजे सुटीच्या दिवशी त्या इतर बायकाप्रमाणे, बाजारात वाडीतला माल विकायला बसतात. त्यात त्याना कमीपणा वाटत नाही. आणि मुंबईत मोठमोठ्या जागावर नोकरीला असलेले नरोन्हा बंधूसुद्धा चड्डया घालून आपल्या शेतात इतर गड्याच्या बरोबर चिखला-पाण्यात कामे करतात. त्यांचे घर, त्यांचे कपडे, त्यांची मोटर पाहून असे वाटले नव्हते.

ख्रिस्ती कुटुंबात राहण्याची आमची इच्छा पुरी करण्यासाठी फादर दिब्रिटोंनी

किती काळजीपूर्वक आणि सुरेख आखणी केली होती! तीन वेगवेगळ्या शैक्षणिक-आर्थिक गटांतल्या कुटुंबात तर त्यांनी आम्हाला नेलेच. अगदी घरात. शिवाय वसईचा जवळजवळ सगळा ख्रिस्ती धर्मप्रांत आम्हाला दाखवला. चर्चे दाखवली. ज्याच्या घरी आम्ही गेलो ती काही त्यांनी आमच्यासाठी मुद्दाम सजवलेली नव्हती. पण सगळीकडे राहणी स्वच्छ होती. घरात किंवा घराच्या आसपास कचरा-घाण दिसली नाही. घरात, चर्चमध्ये आणि इतरत्र माणसे दिसली त्यात बहुतेक सर्वांचा रंग उजळ, रूप नीटस आणि प्रकृती निकोप होती.

नरोन्हा मंडळींचा निरोप घेतला आणि पापडीला आलो. तिथल्या भव्य चर्चसमोरच्या टॉमस बॅप्टिस्टा हायस्कूलच्या सभागृहात 'सुवार्ता' लेखकांचा मेळावा होता. पन्नास-पाऊणशे लोक होते. काही स्त्रियाही होत्या. रॉक कार्व्हालो अध्यक्ष होते. फादर एलायस रॉड्रिग्ज यजमान. मेळाव्याचे काम व्यवस्थितपणे पार पडले. लेखकांनी प्रश्न विचारले, अडचणी मांडल्या. चर्चा झाली. बक्षिसे वाटली गेली. एका पुस्तकाचे प्रकाशन झाले.

ज्या कामासाठी मुख्यत' वसईला आलो होतो ते झाले. वसई स्टेशनावर गाडीत बसलो. वसई स्टेशन मागे गेले. नायगावचे स्टेशन आले तेव्हा साहजिकच आमची दृष्टी लांब पाली-वडवलीच्या दिशेला वळली. आदल्या दिवसापासून झालेल्या प्रेमळ पाहुणचाराने, भेटीगाठींनी, नजरेत भरलेल्या हिरव्या समृद्धीने मने अगदी तृप्त झाली होती. तरी पण वसई म्हणत होती : 'थोडं मायेचं घ्या'. न घेऊन कसे चालेल?

# सोपारान्तं महीतलम्

'वसईजवळ निर्मळ म्हणून एक क्षेत्र आहे.' हे वाक्य माझ्या आठवणीत लहानपणापासून ठसलेले होते. मराठी दुसरीच्या की तिसरीच्या पुस्तकात एक धडा वाचला होता. त्यातले हे वाक्य. त्या धड्यातूनच मी निर्मळेच्या जत्रेला गेलो होतो आणि जत्रेतल्या बाजारातले पेढे खाल्ले होते. तिथे एक शंकराचे मंदिर आहे. शंकराचार्यांची समाधी आहे. समोर एक तळे आहे. असे त्या धड्यात म्हटलेले लक्षात होते. केव्हातरी निर्मळला जाऊन ते मंदिर, ती समाधी, ते तळे पाहावे, असे मी कित्येक वर्षे मनाशी म्हणत होतो. पण मुंबईपासून निर्मळ इतके जवळ असूनसुद्धा वर्षामागून वर्षे गेली तरी मी काही निर्मळला गेलो नव्हतो.

हळूहळू निर्मळची माहिती मिळत गेली तसे निर्मळ मोठे मोठे होत गेले. म्हणजे त्याची थोरवी कळत गेली. जसे, शिवाजी हा शहाजीचा मुलगा होता, त्याने पुडाई करून राज्य मिळवले, असे मी लहानपणी शाळेतल्या इतिहासाच्या पुस्तकात वाचले होते. मग पुढे इतिहास वाचतावाचता शिवाजी कसा मोठा होता, किती मोठा होता हे कळले. तसेच निर्मळेच्या बाबतीत झाले. निर्मळ हे नुसतेच जत्रेचे आणि मिठाईच्या दुकानांचे क्षेत्र नाही. फार मोठे, काशीपेक्षाही मोठे, क्षेत्र आहे हे कळले. आपल्या ह्या महाराष्ट्रात काशीपेक्षा जवभर अधिक अशी तीन क्षेत्रे आहेत. एक माहूर, दुसरे करवीर, ज्याला कोल्हापूर म्हणतात ते, आणि तिसरे निर्मळ. प्रयाग, काशी आणि गया ह्या तीनही ठिकाणी क्रिया केल्याने जे पुण्य मिळते, ते एकट्या निर्मळ क्षेत्रात केल्याने मिळते. इतकेच नाही तर इथल्या तळ्यात नुसते स्नान केल्याने सर्व पातके नष्ट होतात. तेही जमले नाही आणि नुसते निर्मळ-माहात्म्य वाचले तरी सर्व पातके नष्ट होतात. अशी त्याची थोरवी आहे. पृथ्वीच्या पाटीवर तीनच थोर सरोवरे आहेत. एक मानस सरोवर, दुसरे पंपा सरोवर आणि तिसरे निर्मळचे. तात्पर्य काय की, केव्हातरी निर्मळला गेले पाहिजे.

निर्मळला हे महत्त्व आले, किंवा निर्मळ इतके महत्त्वाचे क्षेत्र झाले, ते विमलासुर नावाच्या एका राक्षसामुळे. एकवीस वेळा क्षत्रियांचा निःपात करून

परशुरामाने शेवटी सर्व पृथ्वीचे दान केले तेव्हा त्याला राहायला जागा राहिली नाही, म्हणून त्याने बाण मारून समुद्राला मागे हटवले हे आपल्याला माहीत आहे. ते थोर कृत्य त्याने इथे जवळच उभे राहून केले. तेव्हा जी भूमी मिळाली त्या वेळी निर्मळ क्षेत्र आणि निर्मळ सरोवर निर्माण झाले. नतर परशुरामाने स्वर्गातून वैतरणा नदी आणली. ती इथून जवळच आगाशीपाशी समुद्राला मिळते. हे क्षेत्र निर्माण झाल्यावर तिथे ब्राह्मण राहायला आले. यज्ञयाग होऊ लागले. परतु शकराच्या वराने अवध्य आणि अजिंक्य झालेला विमलासुर त्याना त्रास देऊ लागला. त्याचे यज्ञ उधळू लागला. तेवढ्यावर न थाबता एकदा तो लोमहर्षण ऋर्षीच्या तरुण, सुदर कन्येच्या मागे लागला. तेव्हा सगळे ऋषी-मुनी शकराकडे गेले. विमलासुराचे पारिपत्य करण्याचे काम शकराने परशुरामावर सोपवले. घनघोर युद्ध झाले. परशुरामाने सर्व शस्त्रे-अस्त्रे वापरली. पण विमलासुराचा पराभव होईना. तेव्हा परशुरामाने शकराचा धावा केला. विमलासुराने शकराकडून सर्व शस्त्रापासून अभय मिळविले होते, पण त्यात परशूचा समावेश नव्हता. शकराने परशुरामाला हे रहस्य सागितले. मग परशुरामाने परशूचा घाव घालताच विमलासुराचे शिर धडापासून वेगळे झाले. आणि पुढे अशा वेळी नेहमी होते तसेच झाले. ते विमलासुराचे शिर हसू लागले आणि परशुरामाला म्हणाले, ‘परशुरामा, तुझ्या हातून मरण पावून मी धन्य झालो. माझा उद्धार झाला. आता माझी तुला एकच प्रार्थना आहे पृथ्वीतलावरची सगळी पवित्र तीर्थं इथं आण. इथं स्नान केल्याने ब्रह्महत्या, स्त्रीहत्या, बालहत्या, गोहत्या इत्यादी सर्व महापातकाच क्षालन होईल आणि मोक्ष मिळेल असं कर. हे माझ शिर जिथ आहे तिथ दिव्य लिंग स्थापन कर.’ ‘तथास्तु’ म्हणून परशुरामाने दिव्य लिंग स्थापन केले. तेच निर्मळमधल्या शकराच्या मदिरातले विमलेश्वर शिवलिंग आणि विमलासुराचा देह जिथे पडला तिथे परशुरामाने एक सरोवर निर्माण केले ते विमल सरोवर. अशी तिथे दोन सरोवरे आहेत.

असे हे निर्मळ पाहू पाहू म्हणत पाहायचे राहून जात होते. पण अखेर एकदा जाण्याचा योग आला.

पुस्तकात एखाद्या स्थळाचे वर्णन वाचल्यावर आपल्या मनात त्याचे जे चित्र उभे राहते ते, आणि आपण प्रत्यक्ष पाहतो तेव्हा दिसते ते, ह्यांत नेहमीच अतर आढळते. तसाच अनुभव निर्मळला गेल्यावर आला. निर्मळला मदिर आहे, तळे आहे. असे वाचून मला वाटले होते, बदिस्त मंदिर असेल, भोवताली वस्ती

असेल, समोर एखादे बांधीव तळे असेल. पण प्रत्यक्ष पाहतो तो देखावा अगदीच वेगळा होता.

वसईहून आगाशीकडे दक्षिणोत्तर जाणाऱ्या रस्त्याच्या शेजारीच उजव्या अंगाच्या एका टेकाडावर निर्मळचे शंकराचे म्हणजेच विमलेश्वराचे मंदिर, शंकराचार्यांची समाधी, दत्ताच्या पादुका, ही स्थाने एका प्रशस्त आवारात आहेत. आवाराबाहेर टेकडीवर उभे राहून दक्षिणेकडे पाहिले तर विस्तीर्ण देखावा दिसतो. टेकडीच्या पायथ्याशीच निर्मळ सरोवर आहे. आणि रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला पश्चिमेकडे विमल सरोवर. त्याच बाजूला थोड्या अंतरावर समुद्र दिसतो. तळ्यात बायका धुणी धूत होत्या, त्यांच्या धुण्यांचे वेगवेगळे रंग. कुणी भांडी-हंडे घाशीत होत्या, त्यांच्या भांड्यांचे ताब्या-पितळेचे झळझळीत रंग, खुद्द त्यांच्या नेसूच्या वस्त्राचे रंग. त्यामुळे तळ्याच्या निळ्या विस्ताराला वेगवेगळ्या रंगाची किनार लाभली होती. एरव्ही जिकडेतिकडे हिरवेच हिरवे होते. बागा-वाड्या, कुठे अस्ताव्यस्त वाढलेली झाडी तर कुठे आखीव-रेखीव, कुठे दाट तर कुठे विरळ, फुलबागात फुले फुलली होती. शेतात पिकाची ताटे उभी होती. श्रावणमास होता म्हणून हिरवे अधिक हिरवे असेल, पण एरव्हीही हिरवेच असेल. तो सगळा विस्तार आणि ते हिरवे वैभव पाहून डोळे सुखावले. मन प्रसन्न झाले. आणि निर्मळला आल्याचे अपेक्षेपेक्षा अधिक समाधान वाटले.

माझ्याबरोबर एकदोन ख्रिस्ती मित्र होते एक म्हणाले, 'निर्मळचं मूळ मंदिर, रस्त्याच्या ह्याच बाजूच्या शेजारच्या टेकडीवर होतं. (म्हणजे परशुरामाने दिव्य लिंग स्थापले ती जागा ही नाही! निदान लिंग तरी तेच असेल असे समजू या!) तिथे आता चर्च आहे ते आपण पाहूच. पोर्तुगिजांच्या राजवटीत मूळ मंदिर ख्रिस्ती लोकांनी उद्ध्वस्त केलं. हिंदूंनी पुन्हा तिथे येऊ नये म्हणून पायऱ्यांवर गायीचं रक्त शिंपडून ठिकठिकाणी गोमांसाचे तुकडे टाकले, आणि मंदिराच्या जागी चर्च बांधलं.'

दुसरे ख्रिस्ती मित्र गोष्ट पुढे चालवीत म्हणाले, 'पेशव्यांनी पोर्तुगीजांकडून वसई घेतली. त्यानंतर त्यांनी ख्रिस्ती चर्च पाडून टाकलं आणि शंकराचं मंदिर इथं बांधलं. हे आवार वगैरे सगळं त्यांच्या वेळचं. त्यांनी देवळाला इनामही करून दिलं. त्यानंतर ख्रिस्ती लोकांनी चर्च पुन्हा बांधलं.'

हे सगळे ते कोणत्याही प्रकारच्या अभिनिवेशाने सांगत नव्हते. त्यात

ख्रिस्ती धर्माची प्रौढी नव्हती की हिंदू धर्माचा अधिक्षेप नव्हता. इतिहास घडला तसा ते सांगत होते.

मी म्हटले, 'आता इथले हिंदू आणि ख्रिस्ती असे एकमेकाचे शेजारी म्हणून सुखान, स्नेहान नादताहेत. तसं हे मंदिर आणि तुमच चर्चदेखील सुखान शेजारी नादताहेत म्हणायच.'

'बरोबर आहे. तुम्हांला आणखी एक नवल वाटेल अशी गोष्ट सांगतो. वसईचे सामवेदी ख्रिस्ती हे सगळे निर्मळ भागातले आहेत. आणि आपण ज्या रस्त्याने आता जाणार आहो त्याच्या एका बाजूला सगळे ख्रिस्ती झालेले सामवेदी आहेत. आणि दुसऱ्या बाजूला सगळे हिंदू राहिलेले.'

'म्हणजे हे मंदिर आणि तुमच चर्च आहेत तसंच.' मी म्हटले.

हे बोलणे होत आहे तो आम्ही निर्मळच्या 'पवित्र क्रूसा'च्या चर्चच्या पायऱ्या चढत होतो. समोर उंचावर चर्चची भव्य वास्तू दिसत होती. पायऱ्या चढताना माझ्या मनात विचार आला : जिथे गायींचे मांस आणि रक्त टाकण्यात आले होते त्याच ह्या पायऱ्या असतील! पायऱ्या त्याच नसल्या तरी जागा तीच असेल! आणि त्याच निषिद्ध जागेवरून मी चाललो होतो. चर्चमधले 'अल्तार' पाहताना वाटले, जिथे हे 'अल्तार' आहे तिथे ते मंदिरात पाहिलेले 'शिवलिंग' असेल. परशुरामाने स्थापलेले. बहुधा असेच असते. एका धर्माची जी पवित्र जागा असते त्याच जागी दुसरा धर्म आपले पवित्र प्रतीक उभारतो. ख्रिस्ती आणि मुसलमान लोकांनी हे अनेक ठिकाणी केलेले आपल्याला माहीत आहे. पण हिंदूंनीदेखील हे केलेले आहे. जुन्नरजवळच्या लेण्याद्रीतला गणपती आणि नाशिकजवळच्या लेण्यांपैकी दहाव्या क्रमाकाच्या लेण्यातला भैरव ही मूळची बौद्ध शिल्पे होती. त्यांना हिंदूंनी आपल्या देवाचे रूप दिले.

निर्मळचे चर्च पाहून आम्ही पुढे सोपाऱ्याकडे निघालो. ही दोन गावे अगदी लागून असल्यासारखी आहेत. किंबहुना वसई भागातली नायगाव-कोळीवाड्या-पासून आगाशीपर्यंत सगळी गावे लागूनलागूनच आहेत. एका गावाची वस्ती आणि शेते संपली की दुसऱ्या गावाची शेते आणि वस्ती सुरू होते. तेव्हा निर्मळपर्यंत आल्यावर सोपाऱ्याला जायचे नाही असे कसे करता येईल?

आम्ही दहा-पंधरा मिनिटांत सोपाऱ्याला येऊन पोहोचलो. जवळच कुठे तरी अशोकाचा स्तूप असावा असे वाटून गाडीतून उतरलो. पण स्तूप कुठे होता?

तो कुठे आहे हे दाखविणारी पाटी नव्हती. जवळपास कुठे काही उद्ध्वस्त अवशेष दिसत नव्हते. इकडेतिकडे चौकशी केली तेव्हा तिथेच राहणाऱ्या एका शेतकऱ्याने एका मोकळ्या चौकोनी जागेत दोन-अडीच पुरुष उंचीचे आणि बऱ्याच मोठ्या घेराचे एक टेपाड दाखवले. 'तोच स्तूप' तो शेतकरी म्हणाला. त्या टेपाडाच्या अगभर आणि सभोवार आवारभर गुडघागुडघा उंच गच्च हिरवे गवत माजले होते. स्तूप म्हणावे असे त्याच्यात काय होते? त्या टेपाडापर्यंत जायला आखलेली किंवा मळलेली वाट नव्हती. तिथे स्तूप आहे किंवा होता असे दाखवणारे दगडही मांडलेले नव्हते. गवतातूनच वाट काढीत पुढेपुढे चाललो. केव्हातरी स्तूपाभोवती प्रदक्षिणेचा मार्ग असावा. त्या मार्गाच्या आणि मूळ स्तूपाचा पायथा जिथे असेल त्याच्या खुणा दाखवणाऱ्या काही दगडी चिपा त्या गवतात मधूनमधून अर्धवट दिसत होत्या. उन्हाळ्यात आलो असतो तर सगळे गवत वाळून झडून गेल्यामुळे कदाचित तिथे काय आहे ते दिसले असते. कदाचित त्याचे ते उद्ध्वस्त खाचा-खबदाडी पडलेले उदासीन उपेक्षित रूप पाहवले नसते. कदाचित आहे त्या रूपात का होईना, अशोकाने बांधलेला स्तूप पाहिल्याचे समाधान मिळाले असते. कोण जाणे! पायऱ्याजवळ एका ठिकाणी कोणी तरी नवबौद्धाने बसवलेला, वीत दीड वीत उंचीचा, ध्यानस्थ बुद्धाचा एक संगमरवरी पुतळा एका आडव्या जुनाट दगडी कोनाड्यात दिसला. त्या कोनाड्याच्या डाव्याउजव्या अंगाना तिथलेच दोन झिजलेले, भगलेले सिंह बसवले होते. सारनाथच्या अशोकस्तंभावर आणि भारताच्या राजमुद्रेवर दिसणाऱ्या सिंहाचेच ते दूरस्थ भाऊबंद. जमीनदोस्त होऊन पुन्हा उभे राहिलेले एक मंदिर आणि चर्च पंधरा मिनिटापूर्वीच पाहिले होते. हा स्तूप काही कोणी परधर्मीयांनी जमीनदोस्त केला नाही. पण पडतझडत चाललेला कोणी नीटनेटकाही केला नाही. एका अज्ञात नवबौद्धाने ती बुद्धमूर्ती आणि ते सिंह तिथे बसवले म्हणून अशोकाच्या काळाशी आणि भगवान बुद्धाशी त्याचे पुन्हा नाते साधले गेले. आणि त्याच्यात थोडाबहुत का होइना, जिवंतपणा आला. नाही तर तो नुसता दगडा-मातीचा ढिगाराच राहिला असता. निर्मळहून सोपाऱ्या-पर्यंतचा गाडीचा प्रवास दहा-पंधरा मिनिटाचा झाला. पण त्या पंधरा मिनिटांत मानसप्रवास मात्र परशुरामापासून पेशव्यापर्यंतच्या कालावधीचा झाला.

पाहण्यासारखे काही नव्हते तरी बराच वेळ पाहत राहिलो. मन मागे गेले. त्याचा वैभवाचा आणि भरभराटीचा प्राचीन काळ मनात आला आणि आताची

त्याची ती अवकळा आणि आबाळ पाहून उदास वाटले. जो शेतकरी आम्हाला स्तूप दाखवायला आला होता त्याने स्तुपाजवळच्याच वीतभर खोल खळग्यातून ओलसर-काळसर असे तांदळाचे काही दाणे काढून आमच्या हातावर ठेवले. म्हणाला, 'हे स्तूपातले आहेत. फार जुने आहेत.' जुने असोत नसोत, स्तूपाच्या कुशीतले म्हणून बरोबर घेतले. म्हटले, इतर ठिकाणाहून आणलेल्या अशाच दुसऱ्या वस्तूबरोबर राहतील.

सोपाऱ्यापर्यंत आल्यावर खरे म्हणजे अर्नाळ्यालाही जायला हवे होते. पण परशुरामाने समुद्राकडून मिळवलेल्या भूमीचा विस्तार कुठपर्यंत? तर 'सोपारान्त महीतलम्' असे म्हटले आहे. तेव्हा निर्मळपासून सुरू केलेला प्रवास सोपाऱ्या-पाशीच संपवणे योग्य म्हणून तिथेच संपवला.

# एक दिवस : एक आश्रम

सकाळचे नऊ-सवानऊ वाजले होते. आमची गाडी सिद्धाश्रमाच्या महाद्वारासमोर उभी राहिली. द्वार चांगले मोठे असले तरी रजनीश-आश्रमाच्या द्वारासारखा त्याचा डौल आणि थाट नव्हता. एखाद्या श्रीमंताच्या वाड्याच्या दारासारखे दार होते. आजचा सबंध दिवस ह्या आश्रमातच घालवायचे ठरले होते. दारातून आम्ही पुढल्या अंगणात आलो. त्याच्या एका अंगाकडल्या बोळातून आतल्या मोठ्या पटांगणाकडे जाऊ लागलो. तो समोरच 'परवानगीवाचून आत येऊ नये', 'कुत्र्यापासून सावध राहा', अशा एकंदरीत प्रवेशबंदी करणाऱ्या सूचना रंगवलेल्या पाट्या दिसल्या. परंतु आम्ही बाबांच्या अध्यात्ममार्गी भक्ताबरोबर आलो होतो म्हणून असेल किंवा त्या दिवशी मुक्तद्वार असेल, पण आम्हाला कोणी—कुत्र्यानेसुद्धा—अडवले नाही.

ह्या सूचनांशेजारीच आणखी एक सूचना होती 'लीव्ह योअर एगो बुइथ योअर शूज.' ('तुमच्या जोड्याबरोबरच तुमचा अहंभाव काढून ठेवा.') ही सूचना पाहून मी घुटमळलो आणि गोंधळलोही. मला सूचना मजेदार वाटली. चांगलीही वाटली. खरोखरच आपला अहंभाव जोड्यासारखा काढून ठेवता आला तर किती चांगले होईल ? पण हे साधायचे कसे ? आपले सगळे जगणे अहंभावाच्या जोरावर आणि त्याच्यासाठीच चाललेले असते. की तसा प्रयत्न करण्यासाठीच ती सूचना होती ? इतर लोक भराभर आत चालले होते. त्यांनी ती सूचना वाचलीच नव्हती की, जोड्याइतक्याच सहजपणे अहंभाव काढून ठेवणे त्यांना जमले होते ?

माझ्या मनाचा हा गोंधळ चालूच होता, तेवढ्यात आमचे आध्यात्मिक मित्र म्हणाले, 'चला, बाबा बसलेलेच आहेत. लवकर दर्शनाला चला.' मी जोडा काढला. आणि अहंभावाचे काय करायचे हे न ठरवताच आत गेलो.

समोरच्या प्रशस्त पटांगणात मध्ये वाट सोडून लोक दाटीने बसले होते. अंगणाच्या पलिकडल्या अंगाला एका आंब्याच्या झाडाखाली पारावर बाबा बसले होते. अंगात राखी रंगाची बंडी आणि डोक्यावर थंडीच्या दिवसात वापरतात तशी पिशवीसारखी भगव्या रंगाची लोकरी टोपी होती. डोळ्यांवर

काळसर काचाचा चष्मा होता. रंगारूपाचा, अंगकाठीचा आणि पोषाखाचा रजनीशांचा जसा रुबाब होता, तसा बाबाचा मुळीच नव्हता. किंबहुना त्यांच्या सबंध व्यक्तिमत्त्वात डोळ्यात किंवा मनात ठसेल असे काहीच नव्हते. त्यांच्या हातात एक मोरकुंचा होता आणि पुढे येऊन नमस्कार करणाऱ्याच्या डोक्यावर ते तो आशीर्वाद दिल्यासारखा ठेवीत. असे मोरकुंचे दर्ग्यातल्या मुजावराच्या हातात असतात, आणि तेही असेच ते दर्शनाला येणाऱ्यांच्या डोक्यावर टेकतात.

आमची आध्यात्मिक मित्रमंडळी नेहमी येणारी, बाबांच्या ओळखीची होती. त्यांना बाबांनी कुशल विचारले. एका गृहस्थाना जवळ घेऊन म्हणाले, 'दोन दिवसापूर्वी तुमची आठवण आली होती. तुम्ही याल असं वाटलंच होत.' दुसऱ्या एका बाईंनी नमस्कार केल्यावर बाबानी त्यांच्या डोळयात निरखून थोडा वेळ पाहिले असे मला वाटले. मी आध्यात्मिक वातावरणात आलो आहे ह्याची मला जाणीव होऊ लागली. प्रत्येक गोष्टीला वेगळा अर्थ असेल असे वाटू लागले.

थोडया वेळाने आम्हा दोघांकडे वळून बाबा म्हणाले, 'ह्यांना सगळा आश्रम दाखवा.'

बाबा बसले होते त्यांच्या शेजारीच एका चौथऱ्यावर एक भव्य पूर्णाकृती उभा पुतळा होता. लज्जा झाकण्यापुरते पुढे लावलेले फडके सोडले तर संपूर्ण नग्नच. ब्रॉंझचा वाटत होता. मनातल्या मनात बाबाच्या किरकोळ देहयष्टीशी मी त्याची तुलना करीत होतो. त्या पुतळ्याकडे माझे सारखे लक्ष जाते आहे हे पाहून आमचे मित्र म्हणाले, 'हा आमच्या बाबाच्या गुरुमहाराजांचा पुतळा. ते आता हयात नाहीत. त्यांचा आश्रम इथून जवळच आहे. पण आता तिथे काही नाही. कोणी विशेष जातही नाही. आमचे बाबा तिथून इथे येऊन राहिले.'

हे ते सांगत असतानाच आम्ही आश्रम पाहायला निघालो.

सगळा आश्रम अगदी स्वच्छ आहे. रस्ते कॉंक्रीटचे आहेत. आश्रमाच्या मागे खूप मोठी बाग आहे. डोंगराच्या पायथ्यापर्यंत पायऱ्यापायऱ्यांनी चढत गेलेली. बागेत पुरुषभर उंचीची तुळशीची झाडे आहेत. ओंजळीएवढ्या आकाराची वेगवेगळ्या रंगाची गुलाबाची फुले आहेत. जाई-जुई, मोगरा, शेवती, झेंडू आहेतच. तांबड्या कमळाची पुष्करिणी आहे. सर्व प्रकारची फळझाडे आहेत. थोडक्यात म्हणजे, एखाद्या अद्भुतरम्य कादंबरीत जशा बागेचे वर्णन आपण वाचतो, तशी ती बाग आहे. बागेत काडया-काटक्या, पानेपाचोळा कुठे दिसला नाही. वीसपासून तीसपर्यंतच्या वयाचे अनेक गोरे स्त्री-पुरुष साधक म्हणून

आश्रमात राहायला आले आहेत, त्यातले कोणी हातात झाडू घेऊन सारखे रस्ते झाडीत होते. कोणी पालापाचोळा उचलून घेत होते. इतकेच नव्हे, तर त्यांतले काही झाडाच्या पानावरची धूळ पुशीत होते. सगळ्याच्या चेहऱ्यांवर शांत गांभीर्य होते. रजनीशाच्या आश्रमातल्यासारखा उर्मट बेफिकीरपणा नव्हता. सगळ्याचे पोषाख साधे कफनीसारखे होते. कोणाही स्त्रीच्या चेहऱ्यावर कसलाही मेकअप नव्हता.

बागेत ठिकठिकाणी नारद, तुबरू, सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार, कृष्ण, शकर, दत्त, बुद्ध, विठ्ठल-रखुमाई, शिरडीचे साईबाबा, शेगावचे गजाननमहाराज, चाळीसगावचे हरिगिरीमहाराज, रामकृष्ण परमहस, विवेकानद इत्यादिकाचे रगीत पुतळे आहेत. गजेंद्रमोक्ष, अजामीळ-उद्धार अशा पौराणिक कथाची रगीत शिल्पदृश्ये आहेत. बागेच्या रचनेत आणि फळझाडे, फुलझाडे ह्याच्या निवडीत जी अभिरुचीची अभिजातता दिसली, तिच्याशी ही ढोबळ रंगीत शिल्पे विसंगत वाटली. पण भक्तानी किंवा भक्तासाठीच ही शिल्पे निर्माण केली असली तर ! आम्हाला ते विसंगत वाटत होते; पण इतर बरेच लोक त्याचे भक्तिपूर्वक कौतुक करीत होते.

बाग पाहून झाली. नतर आम्ही ध्यानमदिरात गेलो. तिथे संपूर्ण अधार होता. आणि आम्ही बाहेरून उन्हातून आल्यामुळे तो अधिकच गडद वाटत होता. आत काही माणसे ध्यान करीत बसली होती. ती आधी दिसली नाहीत. त्यामुळे काहींना माझा पायही लागला. मग हळूहळू अधुक दिसू लागली. समोरच्या भिंतीत बाबाच्या गुरुमहाराजाचे अगदी जिवत वाटावे असे काचेवर रंगवलेले मोठे पूर्णाकृती चित्र होते. त्याच्या डोक्यामागून प्रकाश टाकला होता, त्यामुळे त्याच्याभोवती प्रभा फाकल्यासारखी दिसत होती. त्यांच्या डोळ्याच्या बाहुल्यातूनही प्रकाश येत होता. आणि ते आपल्याकडेच पाहत आहेत असे वाटत होते. काही वेळ टक लावून तिकडेच पाहत बसले तर ते आपल्यातून आरपार पाहताहेत असे आपल्याला वाटेल आणि हळूहळू आपण भारले जाऊन आपले भान जाईल असे वाटू लागले. कदाचित त्या चित्राचा आणि त्या अधुक वातावरणाचा तोच उद्देश असावा.

सगळा आश्रम पाहून होईतो अकरा वाजले. नामघोषाची वेळ झाली होती. आम्ही मदिरात आलो. सभामडपात बायका एका बाजूला आणि पुरुष एका बाजूला असे रागा करून बसले होते. आम्ही आमची जागा धरून बसलो.

गोरे आश्रमवासी आपापली आसने घेऊन येत. त्यांवर गुडघ्यांवर बसून वाकून समोरच्या गुरुमहाराजांच्या मूर्तीला वंदन करीत आणि गुडघ्यांवरच ताठ बसत. एकदोन साध्या वाद्याच्या साथीवर 'ओम् नमः शिवाय' हा षडक्षरी नामघोष सुरू झाला तो तासभर चालला होता. म्हणण्यात पुढाकार घेणारे तीनचार गोरे स्त्रीपुरुष होते. पुरुषांचा गंभीर आणि स्त्रियांचा उंच स्वर ह्यांचा मेळ सुस्वर आणि परिणामकारक होता. त्यांच्या मागून इतर सगळे म्हणत. परकी लोकांचे उच्चारही अगदी आपल्यासारखे होते. वातावरण अगदी शांत गंभीर होते. ह्या नामघोषाचा इतका परिणाम होतो की, काही लोकांना मूर्च्छा येते म्हणतात. त्यात नवल नव्हते. तेच तेच स्वर जर एकसारखे कानावर पडत राहिले तर मूर्च्छा नाही तरी गुंगी नक्कीच येईल अंगाईचे उदाहरण आहेच. ध्यानमंदिरात गुरुमहाराजांच्या डोळ्यांतून येणारा भेदक प्रकाश, इथले त्याच त्याच स्वरांचे मधुर-गंभीर आवर्तन, ह्या सगळ्यांचा अपेक्षित परिणाम भान हरपवणे, स्वतःला विसरायला लावणे हाच असला पाहिजे. आणि त्यासाठीच लोक पुन्हा पुन्हा इथे येत असावेत. स्वतःला विसरायला. शिवाय चार समवृत्ती लोकांत मिसळायला मिळते ते वेगळेच रजनीशांच्या आश्रमातल्याप्रमाणे आरडून-ओरडून, किंचाळून, मनावरचे कांच काढून टाकून ते मोकळे-शांत करणे, आणि इथल्यासारखे मन जवळजवळ बधिर करून त्याचे काच त्याला विसरायला लावणे आणि अशा रीतीने त्याला शांत करणे ह्यांतला मनाच्या आरोग्याच्या दृष्टीने कोणता मार्ग अधिक चांगला हे कसे ठरवायचे?

नामघोष संपला. आरती झाली. गंभीर वृत्तीनेच पण हळूहळू गर्दी पांगू लागली. जेवायची वेळ होत आली होती. पण आमच्या वाटाड्यांना आम्हाला आणखी काही दाखवायचे होते. त्यांनी आम्हांला थांबायला सांगितले.

आश्रमात गुरुमहाराजांचे उभे बसलेले पूर्णाकृती पुतळे ठिकठिकाणी आहेत. मी मोजले नाहीत, पण त्यांची संख्या दहा-पंधरा सहज भरेल. आणि रंगीत-साधे फोटो तर असंख्य असतील. जिथे पाहावे तिथे गुरुमहाराजांचा फोटो. त्यांच्याबरोबर काही फोटोंत बाबाही. इतके पुतळे आणि इतके फोटो कशाला? जॉर्ज ऑरवेलच्या 'नाइन्टीन एटिफोर'मधल्या 'द बिग ब्रदर'ची ही आध्यात्मिक आवृत्ती तर नाही? तुम्ही कुठेही असा, काहीही करा, गुरुमहाराजांची तुमच्यावर नजर आहे ह्याची जाणीव तुम्हांला सतत असावी. ह्या सभामंडपातही तसेच बरेच फोटो आहेत. एका भिंतीवर तांब्याच्या पत्र्यावर गुरुगीता कोरलेली

आहे. शंकराने पार्वतीला सांगितलेली. ती आमचे मित्र मला दाखवू लागले. गुरुगीता, गुरुमाहात्म्य, 'नास्ति तत्त्व गुरोः परं' हे माझ्या मनावर बिंबवण्याचा त्यांचा सारखा प्रयत्न चालला होता.

सभामंडपातले फोटो पाहता पाहता वेळ गेला, त्यामुळे आमची जेवणाची पहिली पंगत हुकली. आम्ही दुसऱ्या पंगतीसाठी रांगेत उभे राहिलो. त्या दिवशी काही कारणाने खूप गर्दी होती. दोन-तीन हजार लोक आले होते. आमच्या रांगेत माझ्या शेजारीच एक लांब सदरा-पायजमा घातलेला बावीस-चोवीस वर्षांचा गोरा गृहस्थ उभा होता.

आमची रांग हलली. आम्ही पुढे चालू लागलो. त्याला काय वाटले कुणाला ठाऊक, तो माझ्याकडे पाहून किंचित हसला आणि म्हणाला, 'तुम्हाला आमचा राग येत असेल!'

मी म्हटले, 'का? राग कशासाठी? तुम्ही माझं काही वाकडं केलं नाही!'

'आम्ही इथं असे येतो म्हणून.'

'त्यात राग येण्यासारखं काय आहे? तुम्ही आपल्या मनानं येता. काही जबरदस्तीने येत नाही. पण मला एक प्रश्न विचारावासा वाटतो : तुम्हांला इथं अशा आश्रमात यावंसं का वाटतं? तुम्ही कुठून आलात? आम्ही येतो ते स्वाभाविक आहे. कारण ते आमच्या परंपरेतच आहे. पण तुम्ही? तुम्हाला तुमच्या धर्मात समाधान मिळत नाही का?'

तो म्हणाला, 'मी ऑस्ट्रेलियन आहे. मी चर्चमध्येच आहे. पाद्री आहे.'

'तुम्ही चर्चमध्ये असून तुम्हाला इथं यावंसं वाटलं? नवल आहे!'

'त्याचं कारण असं आहे. आमच्या धर्मात "गुरू" नाही. "माणसा" शी "माणूस" म्हणून आमच्या धर्मात परस्परसंबंध येत नाही. आमचं धार्मिक जीवनसुद्धा नियमांनी बांधलेलं आहे. इथं बाबांजवळ आम्ही कितीतरी गोष्टी बोलू शकतो. शंका विचारू शकतो. इथं अगदी मोकळं वाटतं.'

'तुम्ही किती दिवस राहणार आहात? तुम्हाला इथे काही नियम पाळावे लागतात का?'

'आम्हा परदेशी लोकांना इथं साधारण सहा आठवडे ते तीन महिने राहता येते. सकाळी साडेपाच वाजल्यापासून आमचा दिनक्रम सुरू होतो. आम्हाला साफसफाईपासून सर्व कामं—संडास धुणंसुद्धा—सरासरी दोन तास करावी लागतात. ध्यानाच्या, प्रवचनाच्या, चर्चेच्या वेळा ठरलेल्या आहेत.

काही नियम कडक आहेत. राजकारणावर चर्चा करायची नाही. रेडियो-ट्रॅन्झिस्टर लावायचा नाही. फोटो घ्यायचे नाहीत. (मला तर आश्रमात फोटोच फोटो दिसत होते.) वर्तमानपत्र वाचायची नाहीत, धूम्रपान करायच नाही—'

'म्हणजे आश्रमात असेतोपर्यंत बाहेरच्या जगाशी संबंध ठेवायचा नाही? ही बंधनं तुम्हाला कठोर नाही वाटत?'

'नाही. एक तर ती आम्ही पत्करलेली असतात. दुसरं म्हणजे आम्हाला ते शात वाटत '

एव्हाना आम्ही जेवणघरात आलो होतो. तीन-चारशे माणसे एका वेळी बसू शकतील एवढे मोठे हे जेवणघर आहे. बसायला लाबचलाब सतरंज्या अथरल्या होत्या. जेवायला स्टेनलेस स्टीलच्या ताटे-वाट्या.

वाटाण्याची उसळ, वटाट्याचा रस्सा, टमाटे-काकड्यांचे काप, भात, पुऱ्या, असे 'संतुलित' जेवण होते. शिवाय शिरा होता. स्वयपाक चागला होता.

ऑस्ट्रेलियन माझ्या शेजारीच बसला होता. म्हणाला, 'आज शिरा आहे. कोणी तरी भक्तान दिलेला दिसतो. रोजच जेवण साध असतं . '

'तुम्हाला हातान जेवायच जमतं का?'

'सुरवातीला थोड जड गेल. आता सवय झाली. आता हेच बर वाटत.'

आमच्या समोरच्या ओळीत काही गोरी कुटुबे जेवायला बसली होती. नवरा-बायको, दोनतीन मुले. पाचसात वर्षांची मुलेसुद्धा आपल्या मुलासारखीच हाताने जेवीत होती. इथे आश्रमात आल्यावर त्या लोकानी आपल्या पद्धती संपूर्णपणे आणि सहजपणे स्वीकारलेल्या दिसत होत्या.

वाढप करणाऱ्यातही गोरे लोक होते. शिस्तीने वाढीत होते. जेवताना पानात काही टाकायचे नाही. तरी काही राहिलेच तर ते वाटीत भरायचे. ताट-वाटी, पाणी पिण्याचे भाडे आपण उचलून हात धुण्याच्या जागी न्यायचे. तिथे वाटीतले अन्न एका हौदात टाकायचे, आणि भाडी घासायला टाकायची, अशी सगळ्या कामाला शिस्त लावलेली होती.

पाच वाजले. पागापाग होऊ लागली. एका गृहस्थांनी विचारले, 'आमच्या बाबानी तुमच्या पाठीवर हात ठेवला का?'

मी सकाळपासून ज्याच्यात्याच्या तोंडून 'आमचे बाबा' हे शब्द ऐकत होतो. ते ऐकून 'लीळाचरित्रा'त चक्रधरस्वामींना उद्देशून त्याच्या शिष्यशिष्यिणींनी

वापरलेल्या 'आमुचे गोसावी' ह्या शब्दांची मला आठवण होत होती.

मी म्हटले, 'नाही.'

'मग तुम्ही पुन्हा या. नेहमी या. बाबांनी तुमच्या पाठीवर हात ठेवला म्हणजे त्यांचा तुमच्यावर अनुग्रह झाला असं समजा.'

मी काही बोललो नाही. दिवसभरात बऱ्याच जणांना मी विचारले,

'तुम्ही इथं कधीपासून येत आहा? कशासाठी येता?'

'पुष्कळ दिवसांपासून. बरं वाटतं.'

काही लोक पूर्वी इतर महाराजांकडे जात असत. एका गृहस्थाला नाशिकच्या गजानन महाराजांनी स्वप्नात गुरुमंत्र दिला होता. पण नंतर पुन्हा स्वप्नात येऊन त्यांनी इथल्या महाराजांकडे यायला सांगितले, म्हणून ते इकडे आले.

आश्रम चांगला आहे. शिस्तही चांगली वाटली. बेगुमानपणे लोकांच्या अंगावरून जाणे, जातायेता स्त्रीपुरुषांनी एकमेकांना मिठ्या मारणे, मुके घेणे, मांडीवर मांडी टाकून बसणे, हे जे प्रकार इतरत्र पाहिले होते त्यापेक्षा हे बरे होते. पण शेवटी, इथे येणाऱ्याचे मन समर्थ आणि मुक्त होते की, अशा गुरूला—हा नाही तर दुसरा—नेहमीचेच बांधलेले राहते, हा प्रश्न मनाला टोचीत राहिला.

संपूर्ण आध्यात्मिक वातावरणात एक दिवस गेला. बाहेर पडताना जोडा पायात घातला. अहंभाव बाहेर काढलेला नव्हताच!

# रोजनिशी रत्नागिरीची

१९ एप्रिल, १९६४

महाड सोडून मुंबईला गेल्यानंतर पुन्हा ह्या बाजूला येण्याची शक्यता कमीच, म्हणून महाड सोडण्यापूर्वी संगमेश्वर, रत्नागिरी, मालगुड, गणपतिपुळे ही ठिकाणे पाहवीत असा विचार केला. मालगुड हे माझी पत्नी सुधा हिच्या आईच्या आजोळचे गाव. शिवाय केशवसुतांचे ते जन्मगाव. गणपतिपुळे तिथून जवळच महाडहून सकाळी निघून दहा-सव्वादहाच्या सुमाराला संगमेश्वरला पोचलो.

औरंगजेबाच्या लोकानी सभाजीराजाना सगमेश्वर येथे पकडले. संभाजीराजे शूर, धाडशी, अत्यत अभिमानी खरे; पण प्रकृती उग्र, विवेक आणि शहाणपण कमी, आणि संगत नको त्या माणसाची. त्यांचे वर्तन शिवाजीराजानाही आक्षेपार्ह वाटले आणि ते राज्य कसे चालवतील अशी चिंताही वाटली. इतके असले तरी स्वाभिमान आणि धर्माभिमान हेच गुण शेवटी वरिष्ठ ठरले. औरंगजेबाने त्याना पकडून नेऊन त्याची अप्रतिष्ठा केली. त्याची जीभ कापली. डोळे काढले. पण अपमानास्पद वागणूक सहन न करता त्यानी मरण पत्करले. त्यामुळे राज्यकर्ता म्हणून त्याच्या अंगी काही दोष असले तरी शेवटी सहानुभूती-त्याच्याकडे वळते आणि आदर वाटतो. अशा ह्या संभाजीराजांना ते विलासात मग्न असताना, अचानक छापा घालून, मोगलाच्या लोकानी संगमेश्वरात कोणत्या ठिकाणी पकडले, ते गाव तरी कसे आहे, हे पाहण्याचे कुतूहल होते. आणि संगमेश्वर रत्नागिरीच्या वाटेवरच आहे. म्हणून सगमेश्वरला उतरलो.

संगमेश्वरचे एक व्यापारी आणि कवी एकनाथ बेंडके हे महाडला मला भेटले होते. म्हणून त्यांच्याकडे उतरायचे ठरवले होते. बाजारात त्याच्या दुकानात त्यांना भेटलो. घरी घेऊन जाण्यासाठी ते स्वत आमच्याबरोबर आले. शास्त्री नदीच्या पलीकडे कोंड भागात डोंगरांच्या उतरणीवर त्याचे घर आहे. कौलारू पण चागले प्रशस्त. मागे आणि दोन्ही बाजूना आंबा, फणस, साग यांची झाडी आहे. त्यामुळे जवळपास आणखी घरे आहेत की नाही इकडे लक्षही गेले नाही. मागे डोंगर, समोर नदीचे पात्र, आजूबाजूला झाडी असे शात मनोरम दृश्य आहे. पावसाळ्यात फारच रमणीय दिसत असले पाहिजे. घरातली

माणसेही सुस्वभावी, स्वागतशील आहेत.

जेवण, विश्रांती वगैरे झाल्यानतर कसबा संगमेश्वराकडे जायला निघालो. गावात शिरून सरळ जाऊ लागलो तो रस्त्याच्या बाजूची घरे इतर गावातल्या घरांपेक्षा वेगळी दिसली. प्रत्येक घर रस्त्याला लागूनच आहे. घराला उंच जोते आहे. घरासमोर प्रशस्त अगण आहे आणि त्याच्या रस्त्याकडच्या बाजूला हात दीड हात उंचीचा लाकडी कठडा आहे. रस्त्याच्या बाजूला एका रागेत एकाला एक चिकटून अशी घरे मी कोकणात, बाजारपेठ सोडून इतरत्र, कुठे पाहिली नव्हती. श्री० बेंडके म्हणाले, 'ही मुसलमानांची घरं आहेत.' घरे स्वच्छ, नीटनेटकी दिसली. श्रीवर्धन, मुरूड, मोर्वे, महाड या ठिकाणी मी मुसलमानाची घरे पाहिली होती. आतही गेलो होतो. पण त्यांची माडणी अशी नव्हती. एखाद्या तरी घरात जाऊन घर आतून कसे दिसते ते पाहावे असे मनात आले. पण बेंडक्याचे तिथे कोणी ओळखीचे नव्हते. त्यामुळे ते तसेच राहिले.

बरेच चालून गेल्यानतर रस्ता सोडून आत वळलो आणि एका वाड्यात शिरलो. हा सरदेसायाचा वाडा. इमारत नवी आहे, पण जागा आणि आराखडा जुनाच आहे. ह्याच वाड्यात संभाजीराजाचा मुक्काम होता. तेव्हाही वाडा सरदेसायाचाच होता म्हणतात. औरंगजेबाचे लोक येताहेत असे कळताच पलीकडेच बागेत काही मदिरे आहेत तिकडे पळून जाऊन एका मदिरात राजे लपले आणि तिथेच ते पकडले गेले. 'ते मंदिर हे.' असे एका मदिराकडे बोट दाखवून आम्हाला तिथल्या एकाने सांगितले. कोणाला ठाऊक तेच की नाही! पण काही क्षण त्याकडे पाहत राहिलो. शिवाजीराजाचे शहाणपण, धोरण, दूरदृष्टी, चागली माणसे जोडण्याची, जवळ करण्याची, त्याचा विश्वास आणि निष्ठा मिळवण्याची वृत्ती संभाजीराजाच्या ठिकाणी असती तर ते असे ह्या मदिरात पकडले गेले असते का? आणि गेले नसते तर मराठी राज्याचे सगळे वळण आणि भवितव्यच कदाचित बदलून गेले असते. असे विचार मनात घोळत असताना सभोवती पाहिले. कितीतरी लहानमोठी हेमाडपती देवळे आसपास होती. नुसता गाभारा आणि छोटासा सभामडप. पण नेटकी आणि सुंदर होती. काही मदिरावर संभोगाची, पशुसंभोगाचीही, चित्रे आहेत. केव्हातरी ही मदिरे जोत्यावर असतील. पण आता भोवतीची जमीन भरून वर आली आहे. यामुळे काही मदिरे तर जमिनीत रुतल्यासारखी झाली आहेत. मदिरात ओल

आहे. सगळीकडे थंड, नि:शब्द, औदासीन्य आहे. पूर्वी अशी साडेतीनशे मंदिरे होती म्हणतात. किती समृद्ध, संपन्न, भरभराटलेले गाव असेल हे त्या वेळी !

मुख्य रस्त्याने पुढे गेल्यावर गावाच्या टोकाशी वरुणा आणि अलकनंदा या नद्यांचा संगम आहे. तो कृष्णा-कोयनेच्या प्रीतिसंगमासारखाच आहे. आणि तिथूनच पुढे शास्त्री नदी निघते. संगमावरच एक लहानसे शंकराचे मंदिर आहे. हाच बहुधा संगमेश्वर असावा.

परतताना वाटेत 'न्यू इंग्लिश हायस्कूल' नावाची पाटी दिसली आणि हायस्कूल उघडेही दिसले. एकदरीतच हायस्कूलाबद्दल मला आस्था असल्यामुळे आम्ही आत गेलो. शाळेचे मुख्याध्यापक म्हसकर नावाचे मुसलमान गृहस्थ होते. त्यांनी उत्तम मराठीत आमचे स्वागत केले. शाळेत बहुसंख्य विद्यार्थी मुसलमान आहेत, पण माध्यम मराठी आहे. बोलता-बोलता संगमेश्वरातल्या मुसलमान स्त्रिया पडदा पाळीत नाहीत असे कळले. कुलाबा जिल्ह्यातही मुसलमान स्त्रिया पडदा पाळीत नाहीत हे मी पाहिले आहे.

घरी परतताना जुन्या बंदराजवळ साकवासारख्या पुलावरून नदी ओलांडली. नदीकाठी भाजीपाल्याच्या चांगल्या बागा दिसल्या.

**रामनवमी, २० एप्रिल, १९६४**

सकाळी संगमेश्वर सोडले. दोन तासांत रत्नागिरीला पोचलो. वाटेत एका ठिकाणी शेतात एक चर्च दिसले. बसमध्ये बसल्याबसल्याच त्याचे एक रेखाचित्र काढून ठेवले. रत्नागिरीला आल्यानंतर रत्नागिरी पाहायची होतीच, पण त्याआधी मालगुंडला आणि गणपतिपुळ्याला जाऊन यायचे होते.

आम्ही रत्नागिरीला पोचून चहा वगैरे घेत आहो तो पुण्याचे ज्येष्ठ व्यायाम-शिक्षक सदूमामा गोडबोले आम्हांला भेटायला आले. ते नात्याने सुधाचे मामा. म्हणून आम्ही त्यांना सदूमामा म्हणतो. आम्ही आल्याचे त्यांना बहुतेक 'विहार'च्या मालकाकडून कळले असावे. आम्ही पुळ्याला-मालगुंडला जाणार आहो असे कळल्यावर ते म्हणाले, 'इथून पायवाटेने गेलात तर पुळं फक्त बारा मैल आहे. तिथून खाडी ओलांडली की मालगुंड. मी जाऊन आलो.'

मी म्हटले, 'द्रोणागिरी आणण्यात काय कठीण आहे? एका हातावर तोलून धरीत एक लांब उडी मारून आणता येईल,' असं मारुतीने म्हणण्या-सारखं आहे हे. तुम्हांला जे सहज जमलं ते आम्हाला कसं जमेल? तुम्ही

बलभीम मल्ल. आम्ही आपले इतरासारखे बसनेच जाऊ.'

आम्ही तीनच्या बसने मालगुडला जायला निघालो. निवेंडी फाट्यापाशी डावीकडे वळून बस मालगुडच्या रस्त्याला लागली आणि सगळे दृश्यच बदलले. मैलचे मैल पोफळीच्या हिरव्यागार छत्र्या उभ्या होत्या. पाहता पाहता माल-गुडला पोचलो. पोचलो ते झाडीतच शिरलो.

जेमतेम साडेपाच वाजले होते. सुधाचे मामा गणेशपत केळकर यांच्याकडे गेलो. सामान ठेवले. चहा घेऊन ताजेतवाने झालो. आणि ओझरते का होईना, आधी केशवसुतांचे जन्मस्थान पाहायचे असे ठरवून बाहेर पडलो. बाजारपेठ वगळता बहुतेक घराची आवारे प्रशस्त दिसली. त्यातल्या काहींत शेते आहेत. पण त्याशिवाय बहुतेक घराच्या आवारात साग, कुंभा, कळक, आंबा, फणस, रातांबी अशी आणि आणखीही इतर झाडे आहेत. पाहून प्रसन्न वाटले. मोठ्या, रुंद, खरबरीत पानांचे, दणकट फांद्याचे सागाचे झाड मर्दानी वाटते. उलट, उंच वाढलेले पण रेखीव लांबोळक्या-पानाचे रातांबीचे झाड जनानी वाटते. गोवा, कारवार, गोकर्ण, या सर्व ठिकाणी ही दोन्ही झाडे पाहताना असेच वाटले होते.

पाचसहा हजार वस्तीच्या मानाने मालगुंडचा बाजार चांगला दिसला. इमारती लाकडाचा, बांबूचा व्यापार आहे. लहानसे पण कोकणातले नमुनेदार गाव वाटले.

थोडेसे चालून गेल्यावर 'बळिराम परकर हायस्कूल' अशी पाटी दिसली तिच्या अलीकडे डावीकडे जाणाऱ्या एका पाणदीसारख्या रस्त्यावर 'केशवसुत मार्ग' अशी पाटी लावलेली होती. त्याच वाटेने फर्लांगभर चालून गेल्यावर एका मोकळ्या मैदानाच्या डाव्या अंगाला एक पडके घर दिसले. तेच केशवसुतांचे जन्मस्थान. सात खण लांब आणि तीन खण रुंद अशा त्या घरात आता कोणीही राहत नाही. आणि आमच्यासारखी बाहेरून मुद्दाम आलेली काही चौकस माणसे सोडली तर कोणी तिकडे फिरकत असेल असेही वाटले नाही.

घराची कौले बहुतेक उडाली आहेत. भिंती कोसळून जमीनदोस्त झाल्या आहेत. त्यांचे ढिगारे जसे पडले तसे तिथेच पडले आहेत. ते असे किती वर्षे आहेत ते त्या घरालाच ठाऊक. छप्पर उडालेल्या मागच्या खोलीतल्या एका कोपऱ्यात एक चौरंगाचा देव्हारा आहे. त्यात एका काळवंडलेल्या तांब्याच्या ताम्हनात एक दगडाचा गणपती (म्हणजे तांबडा दगडच) आहे, आणि भोके पडलेले दोन किरकोळ आकाराचे शंख. पावसाचा अभिषेक आणि मावळत्या

चंद्रसूर्यांची आरती घेत हे सगळे पडलेले आहेत. जवळच चुली-बैलाचे अवशेष आहेत. आज 'चंद्रमौळी' घराचे उदाहरण म्हणून उभ्या असलेल्या त्या घरात शंभर वर्षांपूर्वी केशवसुतांचे वडील केसोपंत दामले बिऱ्हाड करून राहत असत आणि तिथे १८६६ साली केशवसुतांचा जन्म झाला म्हणून त्या घराला आज महत्त्व आले आहे. आज आहे अशीच त्या घराची परिस्थिती आणखी काही वर्षे राहिली तर ते पार भुईसपाट होऊन जाईल. पण कोणी सांगावे, आज शंभर वर्षे जर ते घर, कसे का होईना, उभे आहे, तर आणखी बरीच वर्षेही राहील. इथे ह्या जागी केशवसुतांचे स्मारक झाले पाहिजे अशी गावकऱ्यांची बळकट इच्छा आहे. पण सध्याचे घराचे मालक बाहेरगावी असतात त्यांना ह्या घरापासून काहीही प्राप्ती नाही. पण घर फुकट किंवा विकतही द्यायला ते तयार नाहीत असे लोक सांगतात. पुढे जेव्हा केव्हा स्मारक होईल तेव्हा होईल, पण तूर्त घराच्या जवळ एखादी पाटी लावून तिच्यावर 'इथे दिसणाऱ्या ह्या घरात कृष्णाजी केशव दामले उर्फ कवी केशवसुत ह्यांचा १५ मार्च, १८६६ ह्या दिवशी जन्म झाला.' एवढे तरी लिहावे. नाहीतर काही वर्षांनी बळिराम परकर हायस्कूल-मध्ये केशवसुतांची 'नैऋत्येकडील वारा' ही कविता शिकणारे विद्यार्थी 'ह्या रस्त्यावर ही पाटी कशाला लावली?' असे शिक्षकांना विचारतील आणि शिक्षक 'त्या गावचे' नसले तर तेही आश्चर्य करीत तोच प्रश्न स्वत:ला विचारतील!

**२१ एप्रिल, १९६४**

सकाळी पायीच खाडी ओलांडून गणपतिपुळ्याला गेलो. गेलो ते देवळा-समोरचे दृश्य पाहून जागच्या जागी खिळलो. लहानपणी केव्हातरी वाचलेले महादेव हरी मोडकांचे सागराचे वर्णन इथे खरोखर लागू पडते असे वाटले. पुळणीला हळुवार स्पर्श करीत मागेपुढे सरणाऱ्या, पश्चिमेच्या क्षितिजापर्यंत पसरलेल्या काळ्या-निळ्या-करड्या समुद्राच्या लाटा, दक्षिणोत्तर लांबवर पसरलेली स्वच्छ मऊ पिंगट-पांढऱ्या वाळूची पुळण, समुद्राच्या आणि पुळणीच्या सीमेवरच्या शंखशुभ्र फेसाळ वळणदार रेषा, ह्यांचे ते दृश्य आणि तिथले शांत गंभीर वातावरण तिथून हलू देत नव्हते. मद्रासचा समुद्रकिनाराही प्रशस्त आणि प्रसिद्ध आहे. जगन्नाथपुरीचाही आहे. दोन्हीही सुंदर आहेत. पण इथली स्वच्छता आणि शांतता तिथे नाही. आठपधरा दिवस इथे राहावे आणि बाकी सर्व विसरून जावे असे वाटले. पण गणपतिपुळे हे पर्यटनकेंद्र करावे असं

सरकारचा विचार चालला आहे असे ऐकतो. तसे झाले तर ह्या स्वच्छ पुळणीवर सिगारेटची आणि इतर रिकामी कागदी पाकिटे, खाद्यपेयाचे रिकामे पत्र्याचे डबे, कदाचित बिअर-व्हिस्कीच्या रिकाम्या बाटल्या ह्याचे उकिरडे माजतील आणि कर्कश गाण्यानी, पर्यटकांच्या शिट्या-किंचाळ्या-आरोळ्यानी इथले वातावरण प्रदूषित जाईल. गणपती करो, तसे न होवो !

मुळात इथे गणपती नव्हताच. पुढे येऊन पुळणीत घुसलेला शेजारच्या डोंगराचा एक भागच होता. आणि त्याच्या पायाशी केतकीचे दाट बन होते. चारशे वर्षांपूर्वी मुसलमानी अमलात पुळ्याचे वहिवाटदार भिडे याच्यावर काही संकट आले आणि त्याचे निवारण होईपर्यंत अन्नग्रहण करायचे नाही असा निर्धार करून आपल्या कुलदैवताचे—गणपतीचे—अनुष्ठान करीत ते त्या केतकीच्या दाट बनात बसले. तीनच दिवसात त्याना दृष्टांत देऊन गणपतीने सांगितले, 'तुझ्या संकटाच निवारण होईल. चिंता करू नको. मी आगरगुळ्याहून येऊन ह्या डोंगरात प्रकट झालो आहे. हे केतकीच बन साफ कर. डोंगराच्या पायथ्याशी खडकातच दोन गंडस्थळ आणि दात ह्याच्या रूपाने मी दिसेन. तिथे मंदिर बाधून माझी पूजा-अर्चा आणि प्रसिद्धी कर.'

तसे भिड्यानी केले तेव्हा खरेच देवाने सांगितल्याप्रमाणे तिथे गणपती प्रकटलेला होता. तेव्हापासून पुळे नुसते 'पुळे' होते ते 'गणपतिपुळे' झाले आणि देवाला प्रसिद्धीही मिळाली. आधी देवावर नुसते गवताचे छप्पर होते, मग भोवताली थोडी जागा सोडून बाधकाम झाले. मंदिर उभे राहिले.

पण गणपतीला मोठी प्रसिद्धी मिळाली ती पुढे शेजारच्याच कोतवडे गावच्या हरभट पटवर्धनांनी बारा वर्षे केवळ दूर्वांचा रस प्राशन करून गणपतीचे अनुष्ठान केले म्हणून.

हरभटाच्या वंशाचा पुढे विस्तार झाला, उत्कर्षही झाला आणि दक्षिण महाराष्ट्रात पटवर्धन घराण्यातले सरंजामदार, सरदार, जहागीरदार, संस्थानिक उदयाला आले. त्यामुळे पुळ्याच्या गणपतीची प्रतिष्ठा आणि प्रसिद्धी दोन्ही वाढली. त्याला वर्षासने, नेमणुका, देणग्या मिळाल्या. मंदिराचा विस्तार झाला. धर्मशाळा, जामदारखाना उभा राहिला. अन्नछत्र झाले आणि देवाचे संस्थान झाले. पण एक चागली गोष्ट म्हणजे देणग्यांच्या ओझ्याखाली देव गुदमरला नाही की त्याला संस्थानिकी डामडौल आला नाही. तो अजून साधाच आहे.

पूर्वी समुद्र गणपतीपर्यंत येऊन त्याला स्नान घालीत असे. समोर आणि

भोवती बांधकामे झाल्यामुळे आता त्याला तसे करता येत नाही. पण सूर्य मात्र अजून त्याचे दर्शन घेतो आणि मगच अस्ताला जातो. दृश्य मनात साठवीत नाखूष पाय आणि मन ओढीत, मालगुडला परतलो.

२२ एप्रिल, १९६४

आज सकाळी मालगुडहून निघालो. पुळ्याच्या गणपतीसमोरचे दृष्टीत न मावणारे विशाल दृश्य, झाडीत वसलेल्या मालगुडचे प्रसन्न दृश्य, केशवसुतांच्या जन्मस्थानाचे भग्न, उद्‌ध्वस्त, उदास दृश्य ही मनात रेंगाळत होती. बस चालली होती बसच्या प्रवासात नेहमीच चालते तसे बसच्यापेक्षाही मोठ्या आवाजात उतारूचे आपसात बोलणे चालले होते. त्यात मधून मधून 'अहो आता छत्रपतींच राज्य आहे. आपण नुस्त पाह्यच काय चाललंय त !' असे कोणाला तरी चिडवल्या-डिवचल्यासारखे, तिरकस अनुनासिक बोलणे—जे केवळ कोकणस्थ ब्राह्मणच बोलू शकतील असे—ध्रुपदासारखे कानावर येत होते. आणि 'भटा'च्या वेढ्यात सापडलेला कोणी 'छत्रपती' तिथे असलाच—असेलच—तर तो आग्र्याला चाललेल्या मूळ छत्रपतींची गनिमी विनम्रता धारण करून बसला असावा. कारण त्याचे बोलणे कानावर येत नव्हते.

ही करमणूक पाहता-पाहता रत्नागिरीला केव्हा पोचलो ते कळलेही नाही.

रत्नागिरी हे शहर म्हणून तसे पाहण्यासारखे वाटले नाही. पण पाहिलीच पाहिजेत अशी ठिकाणे तिथे पुष्कळच आहेत. लोकमान्य टिळक ज्या घरात जन्मले ते घर मधल्या आळीत आहे; रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि वामन आबाजी मोडक हे दोन धर्मसुधारक आणि प्रार्थनासमाजाचे अध्वर्यू ज्या सरकारी हायस्कूलचे हेडमास्तर होते, आणि जिथे शिकण्यासाठी आगरकर कऱ्हाडहून रत्नागिरीला आले ते हायस्कूल आहे; गेली कित्येक वर्षे ह्या हायस्कूलपेक्षाही ज्याची अधिक नावाजणी होते आहे ते पटवर्धन हायस्कूल आहे; ब्रिटिशानी पदच्युत केलेला ब्रह्मदेशाचा थीबा राजा जिथे तीस-बत्तीस वर्षे राहिला तो राजवाडा आहे; अंदमानहून सुटल्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकर बारा-तेरा वर्षे स्थानबद्ध होऊन रत्नागिरीत जिथे राहिले ते घर आहे; अस्पृश्यासकट सर्वांना मुक्त प्रवेश असलेले, भागोजी कीरांकडून त्यानी बांधवून घेतलेले, पतितपावन मंदिर आहे.

रत्नागिरीच्या वास्तव्यात सावरकरांना राजकीय कार्य करण्याची किंवा

राजकीय विषयावर लेखन करण्याची बंदी होती. म्हणून त्यांनी समाजसुधारणेचे आणि शुद्धीकरणाचे कार्य केले. लोकाची मने अध्यात्म आणि परलोक याच्या-कडून काढून विज्ञान आणि ऐहिकता याच्याकडे वळवणारे, अस्पृश्यतेसकट सर्व प्रकारच्या जातिभेदाचे समूळ उच्चाटन करू पाहणारे, भाषाशुद्धी आणि लिपिसुधारणा ह्याचा प्रचार करणारे लेख त्यानी त्या काळात लिहिले त्याचा जयजयकार करणाऱ्या बहुतेकानी ह्या सर्व बाबतींत त्याची उपेक्षाच केली हे वेगळे. पण ह्या सर्वांमुळे ते राहत होते त्या घराला एक प्रकारचे प्रभावलय लाभले आहे.

ज्या काळात सावरकर रत्नागिरीत आपल्या पद्धतीने समाजोद्धाराचे काम करीत होते त्याच काळात निष्ठावंत गाधीवादी कार्यकर्ते अप्पासाहेब पटवर्धनही रत्नागिरीतच गाधीजींच्या विचारसरणीनुसार कार्य करीत होते. परस्परभिन्न किंबहुना परस्परविरोधी पण प्रभावी विचारसरणींनी रत्नागिरीचे वातावरण त्या काळात भारलेले होते.

शहरभर फिरून ही सगळी ठिकाणे पाहिली. राजिवड्याच्या वाटेने जाऊन थीबा राजाचे थडगे आणि त्याचा वाडा पाहिला. पाहिला म्हणजे बाहेरून पाहिला. आतला भाग दारा-खिडक्यांच्या तावदानातून पाहावा लागला. कारण उघडून दाखवायला तिथे कोणी नव्हते. मात्र तिथल्या प्रशस्त माळावर उभे राहून दृष्टी टाकली तर सभोवतालचा लांबवरचा प्रभावित करणारा परिसर दिसला आणि वाटले, थीबा राजा कैदेत असेल, पण ब्रिटिशांनी त्याला राहायला जागा चागली दिली होती. आणि बगलाही प्रशस्त दिला होता.

गुळ्याचा गणपती पुळ्याला गेला, तो जिथून गेला ते आगरगुळे, रत्नागिरी-पासून उत्तरेला पुळे जितक्या अंतरावर आहे तितक्याच अतरावर पण दक्षिणेला आहे, आणि गावाचा परिसर फार सुंदर आहे असे ऐकले होते. तेव्हा रत्नागिरीला आलोच आहो तर आगरगुळ्यालाही जावे असा विचार केला. पुळ्यात प्रकट होण्यासाठी गणपतीला गुळे सोडण्याची काय आवश्यकता होती ? तो गुळ्यालाच राहून पुळ्याच्या डोंगरात स्वतत्रपणे प्रकट होऊ शकला नसता का ? आणि गेला तोदेखील गुळ्यातल्या आपल्या भक्ताचा रीतसर निरोप घेऊन गेला नाही. तो गुळ्यात गुप्त झाला आणि पुळ्यात प्रकटला. पण गुप्त झाला तर तो कुठून गुप्त झाला ? तिथे आता काय असेल ? ते तरी पाहावे म्हणून आम्ही आगरगुळ्याला कसे जायचे, किती वेळ लागेल, ते

विचारण्यासाठी 'विहार'चे मालक पटवर्धन ह्यांना भेटायला गेलो. त्यांच्याशी थोडेबहुत बोलणे होत आहे तो पटवर्धन हायस्कूलचे अच्युतराव पटवर्धन, आणि सुर्वे हायस्कूलचे दुसरे एक पटवर्धन आले. ह्या सर्व पटवर्धनांनी मिळून आमचा बेत नुसता जवळजवळ नाही, तर संपूर्णच मोडून काढला. ते म्हणाले, 'इथून तुम्हाला राजिवड्याला जावं लागेल. तिथं वेळेवर होडी मिळाली तर खाडी ओलांडून भाट्याला जावं लागेल. त्यात वेळ जाणारच. तिथं लगेच बस मिळाली तुमच्या नशिबानं, तर तिथून आठनऊ मैलावर पावसला जायचं, मग पावसहून पायी दीड मैल डोंगर चढायचा आणि पुन्हा एक मैल उतरायचा, तेव्हा तुम्ही आगरगुळ्याला पोचाल! म्हणजे सगळा दिवस त्यात गेलाच म्हणायचा. शिवाय गणपतीचं स्थान डोंगराच्या उतारावर उंचावर आहे. तिथपर्यंत चढूनच जावं लागेल.' ते मुद्दाम सावकाश बोलत होते की काय कोण जाणे, पण ते सगळे ऐकतानाच मला थकल्यासारखे वाटू लागले. ते पुढे म्हणाले, 'जिथून गणपती पुळ्याला गेला त्या जागेवर मंदिरात काय आहे ते कोणालाच माहीत नाही. कारण तिथं गाभाऱ्याच्या दाराच्या आतल्या बाजूला सगळं दार झाकून मोठा जांभ्या दगडाचा स्वयंभू गणपती बसला आहे. त्यामुळं गाभाऱ्यात जाता येत नाही. आणि आतलं काही दिसतही नाही. तो पाहायचा असल्यास, तितका वेळ आणि धीर असला तर जा बापडे! पण गाभाऱ्यात काय आहे ते काही तुम्हाला दिसणार नाही.'

आमचा इतका हिरमोड करणारे हे पटवर्धन लोक बहुधा आगरगुळ्याचे नसावेत अशी खोडसाळ शंका मनात आली. त्यांना विचारावे असेही वाटले. पण तसे विचारणे बरे नव्हे म्हणून विचारले नाही. शेवटी आगरगुळ्याला जायचा बेत रहित करूनच रत्नागिरीचा निरोप घ्यावा लागला. त्याची रुखरुख मनात राहिली. ती हळूहळू कमी होईल अशी आशा वाटते.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६१
दा. क्र. २४८३९
मु.पु. २०।९३।८
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



# काळे शिलारत्न

गोव्याला किती वेळा गेले म्हणजे 'आता पुरे झाल' असे वाटेल? मला वाटते कधीच वाटणार नाही. आता हे खरे की गोव्याचे आधुनिकीकरण आणि औद्योगिकीकरण—किती भारदस्त शब्द!—सुरू झाल्यापासून गोव्यातल्या पुष्कळशा पूर्वीच्या आकर्षक स्थळांचे आकर्षण कमी होत चालले आहे. तसेच प्रवासाचे 'पर्यटन' आणि पर्यटनाचा व्यापार झाल्यापासून तर 'पर्यटन' शब्दाचीच ॲलर्जी होऊ लागली आहे. तरी पण 'पर्यटनमार्गा'पासून आणि 'पर्यटनक्षेत्रा'पासून लांब आडबाजूला गोव्यात अजून अशी अनेक ठिकाणे आहेत की, जिथे गेल्याने शांतता आणि सौंदर्य—निसर्गाचे तसेच वास्तुकलेचे—एकाच वेळी लाभतील आणि प्रसन्न वाटेल. अशाच एका ठिकाणी मला जायचे होते,

गोवे शासनाने प्रकाशित केलेला गोव्याचा एखादा नकाशा पाहा आणि पणजी, फोंडे, खाडेपार, धारबादोडे असे नकाशावर पाहत-पाहत साकोर्ड्या-पर्यंत चला. पुढे नकाशावर रस्ता दाखवलेला नाही, पण तसेच पुढे पूर्वेकडे चला. थोड्या अंतरावर 'तांबडी' असे गावाचे नाव दिसेल. शेजारी सांबर आणि रानडुकर ह्यांची चित्रे दिसतील. म्हणजे हे जंगल आहे, इतकेच नाही तर वन्य प्राण्यांसाठी राखून ठेवलेले आहे, हे त्या विभागाला दिलेल्या वेगळ्या रंगावरून दिसेल. तिथेच एक मंदिर असल्याची खूणही दिसेल. ते तांबडी-सुर्लेचे शंकराचे मंदिर. ते मला पाहायचे होते. त्याचे फोटो मी पाहिले होते. गोव्यातल्या इतर मंदिरांपेक्षा ते अगदी वेगळ्या शैलीचे आहे.

गोव्यातल्या मंदिरांची बांधणी वेगवेगळ्या प्रकारची आहे. शांतादुर्गा, मंगेशी ह्या मंदिरात जाताना एखाद्या सुखवस्तू घराच्या दिवाणखान्यात गेल्या-सारखे वाटते. मंदिरात गेल्यासारखे वाटत नाही. अर्थात त्या दिवाणखान्यात नगारा आहे. वर घंटा आहेत. समोर गाभारा आणि त्याच्यावर कळस आहे. गाभाऱ्यात मूर्ती आहेत. तेव्हा ती मंदिरे आहेत ह्यात शंका नाही.

गोव्यातल्या मंदिराच्या परंपरागत बांधणीचे वैशिष्ट्य, सौंदर्य, त्यांची भव्यता, प्रमाणबद्धता, त्यात दिसणारी स्थानिक कलावंतांची आणि कारागिरांची

कला-कुशलता ह्याचे उत्कृष्ट नमुने म्हणजे म्हार्दोळचे म्हाळसेचे, वेलिंगचे लक्ष्मी-नृसिंहाचे, आणि शिरोड्याचे कामाक्षीचे, ही मंदिरे. ह्या मंदिरांचे गाभारे आणि शिखरे, तसेच त्याच्या दीपमाळा, वेगवेगळ्या पद्धतीच्या पण आपापल्या परीने भव्य आणि प्रेक्षणीय आहेत, पण सभामंडपाच्या तुळ्या, कैच्या, वासे ह्यात त्यांचे वैशिष्ट्य आहे. हे सर्व लाकडी असते आणि सभामंडपाच्या खांबांवरचे आणि इतर लाकडी भागावरचे कोरीवकाम, लाकडातून कोरलेली चित्रे आणि त्याना दिलेले रंग, ह्यात स्थानिक कलावतानी आपले अंत करण आणि कौशल्य कसे ओतले आहे ते दिसते.

गोव्यातल्या ह्या दोन्ही प्रकाच्या मंदिरापैकी कोणतेही मंदिर देशावरल्या कोणत्याही मध्ययुगीन दगडी मंदिरांच्यासारखे नाही. तसे फक्त तांबडी-सुर्लचे आहे. गोव्यातले त्या प्रकारचे ते एकमेव मंदिर. म्हणून ते पाहायची कितीतरी दिवसापासून मला इच्छा होती. पण ते पाहायला जायचे म्हणजे गोव्याच्या पश्चिम सीमेपासून—म्हणजे समुद्रापासून—पूर्व सीमेपर्यंत जवळजवळ पासष्ट किलोमीटर प्रवास करायला पाहिजे. तो कसा करायचा? तिथे बसेस जात नाहीत. कारण जवळपास गावेच नाहीत. नकाशाच पाहा म्हणजे ते मंदिर किती निर्जन आणि एकांतस्थळी आहे ते दिसेल. शिवाय अरण्यात

पण एकदा मी गोव्याला गेलो त्यावेळी माधव गडकरी तिथे होते. 'माधवराव, मला आकाशफूल पाहिजे.' असे मी त्याना म्हटले असते तर ते म्हणाले असते, 'हात्तिच्या, एवढच ना? उद्या आणून देतो.' हे मला माहीत होते. मला आकाशफूल नको होते. मला तांबडी-सुर्लचे मंदिर पाहायचे होते. मी तसे त्याना सांगितले. मला वाटले होते तसेच ते म्हणाले,

'हात्तिच्या त्यात काय आहे? आपण 'उद्या' व्यवस्था करू. मीही ते पाहिल नाही, मीही तुमच्याबरोबर येईन.'

आणि त्याप्रमाणे 'उद्या' माधव गडकरी, प्रभाकर भुसारी, प्रल्हाद वडेर, अवाजी कामत आणि मी असे सकाळी गाडीने निघालो आणि तुम्हाला नकाशावर दाखवले त्याप्रमाणे फोंडे, खाडेपार, धारबादोडे ह्या मार्गाने साकोर्ड्याला जाऊन पोचलो ते तळावलीकरांच्या मॅंगनीज खाणीच्या ऑफिसासमोर. तिथले मॅनेजर जगू आम्ही त्याचेच अतिविशिष्ट पाहुणे आहोत अशा वृत्तीने आमच्या स्वागताला सामोरे आले. आमचा वेळ जाऊ नये म्हणून त्यानी आमच्या चहाफराळाची आधीपासूनच उत्कृष्ट तयारी करून ठेवली होती. तेवढ्यात त्यानी

त्यांची लायब्ररी (आम्ही लेखक म्हणून) आम्हाला दाखवली, आणि नुसत्या चहा-फराळाची आठवण आम्हाला राहणार नाही म्हणून लोखडाचे, संस्कृत आणि असंस्कृत, नमुने दिले. ताबडी-सुर्लेपर्यंतचे शेवटचे पाचसहा किलोमीटर रस्ता असा नाहीच म्हणून त्यानी आम्हाला त्याची जीप दिली. आणि आम्ही कदाचित बिनरस्त्याच्या जगलात भटकत राहू म्हणून वाट दाखवण्यासाठी ताबडी-सुर्लेचे सरपच तिथेच बसले होते त्यानाही आमच्या बरोबर दिले. गोवेकराच्या दिलखुलास आणि घरंदाज आतिथ्यशीलतेचे माझ्या मनावर जे अनेक ठसे उमटलेले आहेत त्यात ह्या आणखी एका ठश्याची ठसठशीत भर पडली.

तावडीच्या दिशेचा आमचा खरा प्रवास साकोडर्यापासून पुढेच सुरू झाला. कारण साकोडर्यापर्यंत आम्हाला वाटेने डोंगर झाडी वगैरे लागली असली तरी अधूनमधून लहानमोठी गावेही लागली. पण साकोडर्यापासून पुढल्या सगळ्या प्रवासात मात्र आमच्या दोन्ही बाजूनाच नव्हे तर चारी बाजूंना नुसते जंगलच होते. अगदी घाटातल्यासारखे मोठमोठ्या वृक्षांचे नसले तरी होते जगलच. त्या हिरव्या रानामधून चाललेल्या त्या रस्त्याच्या मातीचा झळझळीत तांबडा रंग पाहून माझे डोळे अगदी दिपले आणि तिच्यावर खिळलेही. कोकणातल्याप्रमाणेच गोव्याचीही माती तांबडी आहे. गोकर्णाहून गिरसाप्याकडे रानातून जाणारा रस्ताही तावडा आहे. पण ताबडीच्या वाटेवरल्या त्या मातीचा तांबडेपणा काही वेगळाच. तो गडद—जवळजवळ शेंदरी—तावडा तर आहेच, पण त्याला एक हलकीशी सोनेरी झळाळी आहे. खरे म्हणजे मला जीप थाबवून तिथली मूठभर माती बरोबर आणावीशी वाटली. धनुष्कोडीची, कन्याकुमारीची, हिमालयातली गगेची, अशी ठिकठिकाणची वाळू नाही का आपण आणीत? तशी. पण बरोबरच्या प्रौढ लोकाना माती घेण्याची माझी ही इच्छा पोरकट वाटेल म्हणून मी त्यासबधी बोललोही नाही. पण इथे सांगायला काय हरकत आहे? आणि आता इथे त्यासंबधी लिहितो आहे म्हणजे एका अर्थी आणलीच की!

माझी दृष्टी त्या रस्त्याच्या तावडयावर खिळलेली होती पण माझे मन पुढे सुर्लेच्या मदिराकडे धावत होते. ते मदिर कसे असेल? थोडेबहुत उद्ध्वस्त तर असेलच. पण उत्तर हिंदुस्थानातल्या खजुराहोच्या-भुवनेश्वरच्या मंदिरासारखे असेल? अबरनाथच्या किंवा सिन्नरच्या श्रीगोंदेश्वराच्या मदिरासारखे असेल? की वेरूळच्या कैलासलेण्यातल्यासारखे?

रस्ता सोडून आम्ही आडवाटेला लागलो. ही वाट म्हणजे नुसती गाडया

आल्या-गेल्या असतील त्यांनी पाडलेली चाकोरी आहे. कुठे स्पष्ट कुठे अस्पष्ट आता झाडे मोठी होत चालली होती. त्याची दाटी वाढत चालली होती. साकोर्डे सोडल्यापासून एकही माणूस दिसले नव्हते. ह्या आडवाटेला लागल्यावर एक सतरा-अठरा वर्षांची मुलगी ओढा ओलाडताना दिसली तेवढीच. सर-पचांनी माहिती दिल्याप्रमाणे आम्हाला सांगितले, 'ती शाळेत शिकवते. कामावर चालली आहे.' गोवा शासनाने ह्या जगलातसुद्धा शाळा काढल्या आहेत हे पाहून कौतुक वाटले.

पाचसहा किलोमीटर गेल्यावर वाट सपली आणि माझे विचारही थाबले. कारण ज्या मदिरासबंधी मी 'ते असं असेल का? तसं असेल का?' असे तर्क करीत होतो ते मंदिरच समोर उभे होते. चहूबाजूनी रानाने वेढलेल्या मोकळ्या जागेत. मागल्या बाजूला काही अतरावर झाडीने झाकलेली डोंगराची राग होती. 'अखेर आलो इथे' मनात म्हटले.

मदिर फार लहान नाही आणि फार मोठेही नाही. किंबहुना मोठे म्हणण्या-पेक्षा लहानच आहे. तीन टप्प्याचे शिखर चागल्या स्थितीत आहे, पण त्याच्या-वरचे 'आमलक'—शिखराच्या अगदी वरचा आणि कळसाखालचा कगोरेदार गोल भाग—नाही. ते आवारात एका बाजूला पडलेले होते. खालून किंवा लावून पाहताना बेताचा दिसणारा हा भाग खरोखर किती मोठा असतो ते तो तिथे पडलेला पाहून कळले. सभामडपाच्या वर मुळात काही बाधकाम असेल तर ते आता जागेवर नाही. शिखराच्या बाहेरच्या तिन्ही बाजूवर एकावर एक अशा दोन कोनाड्यात उठावाल कोरलेल्या मूर्ती आहेत. पण एकूणच शिखरावर मूर्तीचे, वेली-फुलाचे किंवा इतर कोरीव काम फारसे नाहीच. ऊन—सावलीचा जो परिणाम साधलेला आहे तो सगळा दगडाचे आयताकार आणि चौकोनी ठोकळे सारख्या अंतराने आलटूनपालटून मागेपुढे रचून. आणि त्यांतही विविधता आहे. वर निमुळत जाणाऱ्या शिखरावर मधून मधून चौफेर आडवे कगोरे पुढे काढलेले आहेत. त्यामुळे त्याचा सरळसोटपणा मोडला आहे. शिवाय शिखर तीन टप्प्यांत विभागले गेले आहे. त्यामुळे शिखराच्या उभारणीत ठोकळेबाजपणा येत नाही. सबध शिखराला एक प्रमाणबद्ध घडीव आकार आहे.

सभामडपाचे खांब ठेंगणे आणि जाड आहेत. त्याना खालपासून वरपर्यंत वेगवेगळ्या भागात चौकोनी, अष्टकोनी, कगोरेदार असे आकार दिल्यामुळे एकदर परिणाम भक्कम आणि नाजूक असा दुहेरी होतो. खाबावर कोरीव काम

अगदी बेताचे आहे, पण जे आहे ते सूक्ष्म, सुरेख, सोन्याच्या एखाद्या उठावदार बांगडीवर किंवा दागिन्यावर असावे तसे आहे. एकदर मंदिराचा परिणाम कोरीव कामापेक्षा रचनेचा अधिक होतो आणि मदिर भव्य आणि भरगच्च वाटण्यापेक्षा सुबक आणि नेटके वाटते. मदिराला जोते असे नाहीच. जेमतेम तीन पायऱ्या चढाव्या लागतात. त्यामुळे सगळे मदिर एखादे मॉडेल करून अलगद जमिनीवर ठेवल्यासारखे दिसते. जगन्नाथपुरीतले पाथरवट जगन्नाथाच्या मंदिराचे लहानमोठे नमुने संगजिऱ्यात कोरून प्रवाशाना विकण्यासाठी पाटावर ठेवतात, त्याची मला आठवण झाली.

बहुधा इतक्या लाब जंगलात असल्यामुळेच ते पोर्तुगिजाच्या छिन्नी-हातोड्याच्या घावांपासून वाचले असावे आणि त्याला जी उद्ध्वस्तता आली आहे ती सात-आठशे वर्षांच्या दुर्लक्षामुळे आणि पावसाच्या माऱ्यामुळेच आली असावी.

हे मदिर कदब वशातल्या राजानी बाराव्या शतकात बाधले म्हणतात. पण ज्याने कोणी हे बांधले असेल त्याने ते इतक्या दाट अरण्यात, कुठल्याही वस्तीपासून इतके दूर का बांधले असावे? मदिर बाधतात ते बहुधा शहराच्या मध्यभागी. किंवा बाहेर बाधले तर एखादे तळे किंवा नदी यांच्या काठावर किंवा संगमावर. इथे तर तळे नाही. नद्याचा संगम नाही. मात्र कधी कधी व्यापारी मार्गाशेजारी पथिकाना विश्रांतीसाठी आणि दर्शनासाठी अशी मदिरे बाधतात. सरपच म्हणाले, 'इथून कोसभरावरून बेळगावकडे जाणारा एक जुना रस्ता होता.' तसे असेल तर पूर्वी केव्हातरी इथे अनेक लोक येत असतील. आता मात्र आमच्यासारखे तरी किती येत असतील कोण जाणे!

मदिर कोणीही कोणत्याही उद्देशाने इथे बाधलेले असो. पण ते अरण्य, तो एकात आणि ते मदिर पाहताना 'कथासरित्सागर', 'कादबरी', 'दशकुमारचरित,' ह्यासारख्या प्राचीन कथावाङ्मयातल्या नायक-नायिकाच्या, संकेत ठरवून किंवा आकस्मिक होणाऱ्या, भेटीच्या स्थानाची आठवण मात्र झाली.

मदिर पाहून झाले, आता परतायचे, अशा विचाराने सहज फिरत असताना जवळच झाडीत एका मोकळ्या जागी काही मूर्ती दिसल्या. एक गजलक्ष्मीची मूर्ती. दोन्ही हातांत कमळे घेतलेली द्विभुजा लक्ष्मी. दोन बाजूनी दोन हत्ती तिच्या मस्तकावर कलशातून पाण्याचा अभिषेक करताहेत. तिच्या खालच्या बाजूला एका ओळीत दोन माणसे मृदग वाजवताहेत, काही माणसे नृत्य करताहेत आणि काही स्त्रियानी पाण्याने भरलेले कुभ खांद्यावर घेतलेले आहेत,

असा देखावा कोरलेला दाखवला आहे. गोवा राज्याचे राजचिन्ह जी गजलक्ष्मी आहे, ती अशीच आहे, फक्त तिच्या आसनाच्या खाली घोडेस्वारांची रांग कोरलेला एक पट्टा आहे.

तिच्यापासून काही अंतरावर दोन्ही हातात फणा पसरलेले नाग घेतलेली एक नागदेवता आहे. ढाल, तलवार आणि त्रिशूल धारण केलेली एक चतुर्भुज महिषासुरमर्दिनी आहे. ह्या तीनही मूर्ती साधारण दोन हात रुंद आणि चार हात लांब अशा दगडातून कोरून काढलेल्या आहेत. ह्याशिवाय एक धनुर्धारी वीराची आणि एक भैरवाची अशा दोन थोड्या लहान मूर्तीही आहेत

ह्या सगळ्याच मूर्तींच्या समोर नुकत्याच जाळलेल्या काटक्याची राख दिसत होती. म्हणजे आम्हाला जे वाटत होते की ह्या निर्जन अरण्यात कोणी येत नसेल ते खरे नव्हते तर ! कुठेही खंडित न झालेल्या इतक्या सुंदर मूर्ती इथे असतील आणि त्यांची पूजा करायला लोक येत असतील आणि त्या आम्हाला पाहायला मिळतील ह्याची आम्हाला इथे येण्यापूर्वी मुळीच कल्पना नव्हती. म्हणजे आम्ही इथे येऊन आम्हांला जे मुख्य मंदिर पाहायचे होते ते पाहू शकलो हा आमचा 'अपेक्षित' लाभ असला तर ह्या मूर्तींचे घडलेले दर्शन हा 'अनपेक्षित' लाभ म्हटला पाहिजे.

तांबडी-सुर्लेचे मंदिर पाहण्याची इच्छा आपण माधव गडकऱ्यांजवळ व्यक्त केली आणि त्यांनी आपल्याला इथे आणले ही किती चांगली गोष्ट झाली—म्हणजे आपण हे किती चांगले केले !—असे मला वाटले. एरव्ही असाध्य वाटणारी गोष्ट त्यामुळे साध्य झाली. काळ्या दगडाचे, पैलूदार शिखराचे ते सुबक-सुंदर मंदिर म्हणजे भोवतालच्या हिरव्या झाडीच्या कोंदणातले काळे शिलारत्न आहे.

गोव्यात अनेक सुंदर मंदिरे आहेत. बरीच एकासारखी एक आहेत. पण तांबडी-सुर्लेच्या मंदिरासारखे दुसरे मंदिर नाही. ते अक्षरशः 'अद्वितीय' आहे.

# गोवे सदैव सुंदर राहो.

१९५१ साली मी काळी, गाळ्जेबाग, तळपण ह्या नद्या तरीने ओलांडून काणकोण मार्गाने कारवारहून मडगावला गेलो होतो. कारवार ते मडगाव ह्या चाळीस-पंचेचाळीस मैलाच्या प्रवासाला त्या वेळी आम्हाला चौदा तास लागले होते. ह्यावेळी १९६४च्या मडगावच्या संमेलनासाठी बेळगावहून अनमोड घाटातून गेलो. ह्या घाटाचा आणि जंगलाचा प्रवास पूर्वीपेक्षा अगदी वेगळा होता आणि त्यामुळे गोव्याच्या अगदी एका वेगळ्याच देखाव्याचे दर्शन झाले. १९५१ साली गोवे पोर्तुगिजांच्या ताब्यात होते. १९६४ साली ते भारतात आलेले होते. त्यामुळे जकात-तपासणी नव्हती. जकात नाके ओसच पडले होते. दुसरा कोणताही अडथळा नव्हता. त्याबरोबरच भारतातल्याच पण परक्या अमलातल्या प्रदेशात प्रवेश करीत असल्याची थरारीही नव्हती.

ह्याही वेळी मी पूर्वीप्रमाणेच देवळे आणि चर्चे पाहायला गेलो. पण काही पाहायला मिळाली, काही मिळाली नाहीत. वेलिंगचे लक्ष्मी-नृसिंहाचे देऊळ बाजूला पडत होते म्हणून आणि महालक्ष्मीचे रस्तादुरुस्ती चालली होती म्हणून पाहायला मिळाली नाहीत. त्यामुळे थोडा विरस झाला. कारण दोन्ही देवळे मला आवडली होती.

नागेशीच्या देवळाच्या आवाराच्या एका कोपऱ्यात काही नवे बांधकाम चाललेले दिसले. पण त्यामुळे त्या आवाराचा सलगपणा आणि समतोल गेला आहे. प्रत्येक वास्तू जेव्हा बांधली जाते तेव्हा तिला तिच्या आवारासह एक प्रकारचा सलगपणा असतो. नंतर दुरुस्त्या किंवा बदल करणारे लोक कधी केवळ स्वार्थामुळे तर कधी अज्ञानामुळे ह्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतात आणि त्यामुळे मूळ स्थलाचा तोल जातो. देऊळ, पुढले तळे, त्याच्या पुढली बाग, आवार ह्या सर्वांचा सामग्र्याने विचार केला तर नागेशीचे स्थान हे गोव्यातले सर्वांत प्रमाणबद्ध आणि रेखीव असे मला वाटले होते. त्याचाच असा तोल जाऊं लागलेला पाहून वाईट वाटले.

तसाच प्रकार मंगेशीपाशीही दिसला. प्रवेशद्वारापासून आत पुष्कळ चालत जावे लागते आणि पावलापावलाला आपण शहर आणि शहरीपण मागे टाकीत

असतो. असे पूर्वी होते. पण आता पाहिले तर आवाराची भिंत फोडून आत मोटारी ठेवण्यासाठी मैदान करण्यात येत असलेले दिसले. मंगेशीच्या प्रांगणावर मोटारींचे किंवा मोटारवाल्याचे अतिक्रमण होत आहेसे वाटले. तसे झाले तर सध्या त्या आवाराला जी निवांत रमणीयता आहे ती हळूहळू नष्ट होईल आणि मंगेशीला जाणे म्हणजे 'पिकनिकला' जाणे असा अर्थ होईल.

ह्या वेळी जुन्या गोव्यातले सेंट फ्रान्सिसचे चर्च काही कारणाने बंद होते. त्यामुळे आत जायला मिळाले नाही. जुन्या गोव्यातल्या इतर चर्चांपेक्षा (बों जेझूसुद्धा) ह्या चर्चने माझ्या मनावर अधिक ठसा पाडला होता. आतल्या रंगातला निर्लेपणाचा प्रभाव, खांबा-भिंतींवर थोड्याबहुत गडद-भडक रंगात रंगवलेली संतांची आणि खिस्ताची चित्रे, खांबाची जाडी, ह्यात एक प्रकारचा जुनाटपणा जाणवला होता. पण त्यामुळेच त्या चर्चमध्ये गेल्याबरोबर एकदम यूरोपातल्या मध्ययुगात गेल्यासारखे वाटले होते. अर्थात ही कल्पनाच. कारण मी कधी यूरोपला गेलो नाही. ह्यावेळी ते समाधान मिळाले नाही. पण आवारा-तून आणि मागून-पुढून फिरायला मिळाले. मागच्या बाजूच्या चौकात बऱ्याच भंगलेल्या मूर्ती—हिंदू देवताच्यासुद्धा—दिसल्या. त्यातच काही देवनागरी लिपीत कोरलेले शिलालेखाचे खडही होते. ह्या मूर्ती आणि हे लेख पूर्वी सेंट कायतानच्या देवळाशेजारी एक पुराणवस्तुसंग्रहालय होते (आता ते नाही) त्यात होते की काय कोण जाणे. पण माझ्या मनात आले, एखादे पुराण-वस्तु-संग्रहालय स्थापन करून, त्यात ह्या वस्तू ठेवल्या असत्या आणि त्याच्या शेजारी त्यांची माहिती देऊन ठेवली असती तर ते प्रवाशांना अधिक उद्बोधक झाले असते. पोर्तु-गिजांच्या काळात हे कदाचित् शक्य झाले नसते, पण आता व्हायला काय अडचण आहे ?

सेंट फ्रान्सिस झेवियरच्या शवप्रदर्शनाचा समारंभ काही महिन्यांनी व्हायचा होता. आणि मुंबईत यूकरिस्टिक कॉंग्रेसही भरणार होती. त्या वेळी जुन्या गोव्यात लक्षावधी लोक येणार अशी साहजिकच अपेक्षा होती. (आणि ती पुरी झालीही.) त्या निमित्ताने जुन्या गोव्यातले रस्ते रुंद आणि खडी घालून पक्के केले जात होते. जुन्या गोव्यातले रस्ते खडी घालून पक्के करावे, स्वच्छ ठेवावे, पण त्यांची लांबी-रुंदी आणि आखणी बदलू नये. जुने गोवे पाहायचे म्हणजे नुसती जुनी चर्चे पाहायची असे असता कामा नये. तर ते गाव मुळात जसे असेल तसे शक्य तितके पाहता आले पाहिजे. जुने वाडे पडले असतील

तर ते परत उभे करू नयेत (निदान नव्या पद्धतीने), शक्य तर अजिबात पाडूनही टाकू नयेत. फक्त अधिक पडणार-झडणार नाहीत इतपत दुरुस्त अवस्थेत ठेवावेत. इन्क्विझिशनचे कार्यालय कुठे होते? शिक्षा देण्याची जागा कुठे होती? व्हाइसरॉयचा राजवाडा कुठे होता? हे पाट्या लावून दाखवावे. आणि प्रवाशाला इतिहासकाळात जितके जाता येईल तितके जाण्याला साहाय्य करावे. जुन्या वास्तूंना नवी ठिगळे लावून त्या दुरुस्त करणे, रस्त्यांची आखणी बदलणे, ह्यामुळे त्या ठिकाणाचा मूळचा पर्स्पेक्टिव्ह जातो आणि त्यात एक प्रकारची विसंगती, किंबहुना विकृती निर्माण होते. ऐतिहासिक ठिकाणे प्रेक्षणीय आणि प्रवाशांना सुगम करणे ह्याचा अर्थ ती नव्यासारखी करणे असा नाही. नसावा.

ह्या वेळी आम्ही पणजीहून जुवारी नदी ओलांडून कुठ्ठाळीच्या वाटेने वास्कोला आणि पुढे मुरगावला गेलो. कुठ्ठाळी सोडल्यावर पुष्कळसा रस्ता समुद्राशेजारून लहान-लहान गावांतून जातो. त्या रस्त्याने जाताना मला केरळात समुद्राच्या काठाकाठाने मोटारीने केलेल्या प्रवासाची आठवण झाली.

गोव्याला पुष्कळशी सपाट भूमी लाभली आहे. त्यामुळे नद्यांना रेंगाळायला, वळणे घ्यायला, एकमेकींना भेटायला पुष्कळ वाव मिळाला आहे. त्यामुळेच गोव्यात बाराही महिने हिरवी-निळी रमणीयता असते. माडाच्या रांगा आणि झाडाच्या राया जिकडेतिकडे दिसतात. कुठेही रूक्ष नसते. त्यात पुन्हा गोव्यातल्या लोकांना सौंदर्यदृष्टी आहे. घरासमोर उन्हाळ्यात मांडव घालायचा तर झावळ्यांचेच आकर्षक विणकाम करून त्याची सजावट करतील. एकदा तर मडगावात एका ख्रिस्ती बाईने पाहता पाहता मला झावळ्यांचे एक वहाणा-सारखे पायतणे विणून दिले. त्याच झावळ्या कोकणात आहेत. तिथेही घरे-अंगणे तशीच स्वच्छ असतात. पण तिथे स्वच्छतेला सौंदर्याची जोड दिलेली दिसत नाही. महालक्ष्मी, म्हाळसा, वेलिंगचा लक्ष्मी-नृसिंह, शिरोड्याची कामाक्षी ह्या देवळांच्या सभामंडपात लाकूडकामाची जी कलाकुसर आहे, त्यात जे चितार-काम आहे, तसे कोकणातल्या देवळांत दिसत नाही. तिथल्या देवळांची बांधणीच वेगळी आहे.

उद्योग आणि व्यापार ह्यांची वृद्धी होऊ लागली म्हणजे उपयुक्ततावुद्धी बळावत जाऊन सौंदर्यदृष्टीला बहुधा ओहोटी लागते. कारण उदमी-व्यापारी ह्यांची दृष्टी साहजिकच द्रव्यावर असते. आणि ज्याच्यापासून प्रत्यक्ष किंवा

अप्रत्यक्ष द्रव्यलाभ नाही त्याची त्यांना मातब्बरी वाटत नाही. गोव्याच्या लोकांनी मात्र व्यवहार आणि सौंदर्यदृष्टी ह्यांची फारकत केलेली नाही. पण पैसे मिळवण्याच्या उद्देशाने बाहेरचे लोक गोव्यात येऊ लागल्यानंतर त्यांच्याकडून सौंदर्याची आणि कलेची बूज कितपत राखली जाईल ह्याची शंका वाटते.

सध्या गोव्यात शहराच्या सोयी, खेड्याचा निवांतपणा आणि निसर्गाची रमणीयता ही एकत्र आहेत. पण गोवे हे प्रवाशांना मोठे आकर्षण आहे. ते अधिक आकर्षक करून अधिकाधिक प्रवाशांना तिथे ओढण्याचा प्रयत्न होण्याची शक्यता आहे. म्हणूनच तर शहरीकरणापासून त्याचा बचाव करण्याची जास्त आवश्यकता आहे. शहरातले लोक तिथल्या गर्दीला आणि गोंगाटाला कंटाळून शांततेसाठी म्हणून लांब एकीकडे जातात अशी समजूत आहे. पण तसे ते जाऊ लागले म्हणजे गर्दी आणि गोंगाट दोन्ही बरोबर नेतात. त्याखेरीज तिथे गेल्याचे समाधान त्यांना मिळत नाही.

गोव्यात उद्योगधंदे वाढू नयेत, शेतीवरचा भार कमी होऊ नये, अधिकाधिक लोकांना समृद्धी लाभू नये, असे म्हणणारा माणूस मागासलेलाच नव्हे तर माणुसकीचा शत्रु म्हणावा लागेल. पण गोव्याची समृद्धी साधू पाहणारे सज्जन उद्योगधंद्याच्या वाढीबरोबर येणारा बकालपणा प्रयत्नपूर्वक टाळतील, आणि गोव्याच्या निसर्गसौंदर्याची जोपासना करतील अशा आशेवरच गोव्याच्या पुनर्दर्शनाची मनोराज्ये मी रचीत असतो. सुंदर गोवे सदैव सुंदर राहो.

REFBK-0024439